म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
क्र. नं. ८०

म. ग्रं. सं. ठाणें
सन
लेखक गो. ना. कानिटे
क्रमांक
पुस्तकाचें नांव ना. खेळ

३९

वीरसेना नाटक

नाटक

हॅम्लेटचें भाषांतर

वीरसेन विचित्रपुरीचा राजपुत्र

लेखक

गोविंद वासुदेव कानिटकर

सन १८८३

# नाटकांतील पात्रें.

रमाकांत................विचित्रपुरीचा राजा
वीरसेन ................नायक, युवराज.
आर्तवीर्य................रमाकांताचा नायब दिवाण
हरसेन ................वीरसेनाचा मित्र
शूरसेन ................आर्तवीर्याचा मुलगा

पिलाजीराव, विठोजीराव, संभाजीराव, मालोजीराव, यशवंतराव, मानाजीराव ........दरबारी लोक

दौलतराव, बहिरोजीराव, राघोजी ........पहारेकरी

राणोजी ................आर्तवीर्याचा चाकर
भीमसिंग ................नवखंडाचा राणा
मदालसा ................राणी, वीरसेनाची आई
चंद्रकला..............नायिका, आर्तवीर्याची मुलगी.

खड्डे खणणार, नाटकवाले, कोळी, पिशाच्च( वीरबाप ) सरदार, शिपायी, जासूद वगैरे

स्थळ—विचित्रपुरी.

# प्रस्तावना.

किमपेक्ष्य फलं पयोधरान् ध्वनतः प्रार्थयते मृगाधिपः ।
प्रकृतिः खलु सा महीयसः सहते नान्यसमुन्नतिं यया ॥

किरातार्जुनीयम्.

कविकुलमुकुटमणी व नाट्याचार्यकुलगुरु शेक्सपीअर याचें Hamlet 'ह्यामलेट' या नांवाचें सर्वोत्कृष्ट नाटक [illegible] वाणीमध्यें आहे. हे नाटक ह्मणजे त्या जगविख्यात कवीच्या वाणीचा केवळ रसपरिपाक होय अशी विद्वज्जनांची समजूत आहे. आमच्या देशांत कविवर्य कालिदासाचें जसें 'शाकुंतल' किंवा भवभूतीचें 'उत्तररामचरित' त्याच प्रमाणें आंग्लभौमांच्या या कविवर्याचें Hamlet 'ह्यामलेट' हें होय. या नाटकाचें भाषांतर महाराष्ट्र भाषेंत होऊन त्याचा रसास्वाद महाराष्ट्रीय जनांस मिळावा, असें आज बहुत दिवस माझ्या मनांत होतें. परंतु आपल्या ठिकाणीं अविश्वास म्हणा किंवा [illegible] मनुष्याच्या मागें लागलेले अनेक व्याप ह्मणा—या कारणांनीं माझी इच्छा पूर्ण होण्याचा प्रसंग आला नाहीं. प्रस्तुत नाटकाचे कांहीं भाग तयार होऊन माझ्या जवळ बहूत दिवस तसेच पडून राहिले होते त्यांतून प्रथम माझा उत्साह भंग होण्याला एक दोन कारणें उपस्थित झालीं. मुंबईंत निघणारें लोकमान्य 'विविधज्ञानविस्तार' या नांवाच्या मासिक पुस्तकांत एक विज्ञान गृहस्थ प्रस्तुत नाटकाचें भाषांतर छापविण्यास तयार आहेत म्हणून मी ऐकलें व पुढें कांहीं दिवसांनीं तें थोडें थोडें त्या मासिक पुस्तकांत येऊं ही लागलें. बहुतेक त्याचवेळीं आमचे

मित्र लोकप्रिय केसरीकार रा०रा० गोपाळ गणेश आगरकर यांणीं दैवदुर्विलासानें प्राप्त झालेल्या आपल्या १०१ दिवसांच्या अज्ञातवासांत प्रस्तुत नाटकाचें भाषांतर केलें व तें लोकांस प्रसिद्ध करण्याचाही त्यांचा मानस आहे, असें मीं ऐकलें. शिवाय, शेक्सपियर सारख्या इंग्रजी कवीच्या नाटकांचीं किंवा संस्कृत कवींच्या नाटकांचीं भाषान्तरें करण्याच्या संबंधानें माझी अशी समजूत आहे कीं, ज्यांस वर्तमानपत्रांत किंवा मासिक पुस्तकांत मोठमाठे निबंध लिहितां येतात त्यांस ही प्रस्तुत सारख्या नाटकाचें भाषांतर व्यावहारिक, सुंदर व स्वल्प अशा मराठी भाषेंत करतां येईलच व तें लोकमान्य व प्रयोगार्ह होईलच असें निश्चयपूर्वक म्हणतां येणार नाहीं. तेव्हां माझ्या सारख्या नवशिक्यानें अशा प्रकारचें हें कठीण काम हातीं धरणें हें मला ... धार्ष्ट्याचें असें वाटलें. वर सांगितलेले हे विचार माझ्या मनात आल्यामुळें व इतर अडचणीमुळें मी जो हेतु प्रस्तुत नाटकाचें भाषान्तर करण्याचा मनांत धरिला होता तो कांहीं दिवसपर्यंत बहुतेक सोडून दिल्या सारखा झाला होता; परंतु मी जे कांहीं भाग तयार केले होते ते माझ्या मित्र मंडळी पैकीं कित्येकांनीं वाचून पाहिले व हें काम शेवटास नेण्याविषयीं त्यांनीं मला शिफारस केली. शेक्सपीयरचें मूळ इंग्रजी नाटक मी ... पाठशाळेंत विद्याभ्यास करित असतां एका रसिक व मर्मज्ञ गुरूच्या मुखांतून तें समग्र व सार्थ ऐकिलें होतें. खेरीज मुंबईमध्यें फेयरक्लो सारख्या नाट्यकलानिपुण नटानें या नाटकाचे केलेले इंग्रजी प्रयोग दोन तीन वेळ मी पाहिले होते, या कारणांमुळें हातांत घेतलेलें काम अर्धेंच टाकावें असें वाटेना. शिवाय 'अधिकस्य अधिकं फलं' या न्यायानें दोघांत आपलें ही तिसरें घोडें ढकलावें, असें मनांत आलें व आरंभिलेला यत्न पुढें चालवावा, असा शेवटीं मी निश्चय केला. त्या निश्चयाचें हें फळ सांप्रत रसिकजनांस मी अर्पण केलें आहे. तीन सूप-

कारांनीं एकाच पदार्थाचीं तीन पक्वान्नें आपापल्या कौशल्यानुसार गोड अशीं तयार करून भोक्त्यांच्या पुढें वाढून ठेविलीं आहेत त्याचा आस्वाद घेऊन कडू कोणचें–गोड कोणचें–हें निरभिमानानें सांगणें त्यांजकडेसच मी सोंपवितों.

या नाटकांत आपण व्यवहारांत बोलतों तीच भाषा घातली आहे. ही भाषा मनोरमा, 'मौजेच्या च्यार घटका' या पुस्तकांतील शाकुन्तल नाटकाचें भाषान्तर व हिंदुपंचांत प्रसिद्ध झालेलं सुरस 'कार्पण्यदोष' नाटक, या व दुसऱ्या अनेक नाटकांतून दृष्टोत्पत्तीस येऊं लागली आहे. ही तऱ्हा आतां बहुतेक लोकमान्य होऊन गेली असावी असें वाटतें. तथापि पुष्कळांच्या मतानें कदाचित् ही पद्धत बरी नसेल. मी आपल्या [illegible] ही व्यावहारिक व शुद्ध लिहिण्याच्या नियमांचें [illegible]घन करणारी भाषा घातली आहे, हें माझें करणें पुष्कळांस नापसंत होईल. परंतु ही केवळ रुचिवैचित्र्याची गोष्ट आहे. माझ्या मतें अशी भाषा नाटकग्रंथांतून लिहिण्याचा सार्वत्रिक प्रचार पडेल तर बरा. या मताच्या प्रतिपादनार्थ जरी कांहीं विरुद्ध सबळ कारणें दाखवितां येतील, तथापि शेवटीं 'भिन्न रुचिर्हि लोकः' याच कालिदासोक्तीचें अवलंबन करणें भाग पडेल. शिवाय भाषेच्या संबंधानें प्रस्तुत पुस्तकाला जे दोष [illegible] त्यांस माझें इतकेंच सांगणें आहे कीं हा दोष मी [illegible]लून अगोदरच केवळ आवडीचा प्रकार ह्मणून पत्करिला आहे.

या नाटकांतील मुख्य पात्राचें किंवा नायकाचें नांव मी 'वीरसेन' असें ठेविलें आहे. आणि याचप्रमाणें मुळांतील सर्व पात्रांचीं व स्थळांचीं नांवें बदलून तीं आपल्या देशाला व रिवाजाला शोभतील अशींच ठेविलीं आहेत. मूळ संविधानक बहुतेक तसेंच्या तसेंच कायम ठेविलें आहे. तथापि त्यासंबंधानें इतकें सांगणें जरूर दिसतें कीं मूळ नाटकांतील राजा हा नायकाचा काका किंवा चुलता असून त्यानें आपल्या राज्यपदाच्या बंधूला

ठार मारून त्याच्या राणीशीं म्हणजे नायकाच्या आईशीं लग्न लाविलें आहे. या संबंधांत मी थोडा बदल केला आहे. राजाच्या ठिकाणीं किंवा चुलत्याच्या म्हणा, प्रधान किंवा कारभारी कल्पिला आहे.

आपल्या लोकांत चुलत्यानें आपल्या भावाच्या बायकोशीं लग्न किंवा पाट लावण्याची चाल नाहीं. तेव्हां दुसरी कल्पना चुलत्याच्या ठिकाणीं प्रधान किंवा कारभारी घालावा ही सहज सुचली. कांहीं राजांचे कारभारी किंवा मन्त्री चांगले असतात. कांहीं वाईट असतात. मूळ नाटकांतील पात्राच्या ऐवजीं कारभाऱ्यां[illegible]ज दुसरी एखादी इतकी चांगली कल्पना सुचेना; तेव्हां त्यांच घालणें भाग पडलें.

[illegible]नें राज्याच्या लालचीनें व राणीशीं विषय[illegible]भोगा[illegible]च्या इच्छेनें राजाला ठार मारिलें अशी कल्पना केली आहे. हा व दुसरे बारीक सारिक फेरफार योग्य वाटले ते केले आहेत. मूळ नाटक अगदीं विदेशी लोकांच्या आचारविचारांस अनुसरून असल्यामुळें प्रस्तुत नाटकांत या संबंधानें कोठें कोठें विलगपणा व असंगति हे दोष वाचकांच्या दृष्टोत्पत्तीस येतील. उदाहरण अग्निसंस्काराच्या ठिकाणीं प्रेतास पु[illegible] वगैरे, पण त्याला नाइलाज आहे. प्रस्तुत भाषान्तराच्या संबंधा[illegible] गोष्ट सांगावयाची ती ही कीं, इतर भाषान्तरकारांप्रमाणे ठिकठिकाणीं वाटेल तेथें मूळचें भाषण लांबविण्याचा व मूळ कवीच्या सरसवाणीचें माधुर्य आपल्या लेखणीच्या शर्करौघानें वाढविण्याचा व्यर्थ प्रयत्न मी केला नाहीं. बहुतेक मूळ म्हणून कोठेंच सोडिलें नाहीं.

एक दोन स्थळीं मात्र, विशेषेंकरून पहिल्या अंकांत, मूळांतलें लांबचलांब वर्णन कमी करून थोडक्यांत आणिलें आहे. जेथें जेथें इंग्रजींतल्या म्हणी सारखी एकाच अर्थाची म्हण महाराष्ट्र भाषेंत असलेली ज्या ज्या ठिकाणीं सुचली त्या त्या ठिका-

णीं मुळाचें केवळ शब्दशः भाषांतर न करितां तो ह्मण घातलं आहे. माझी या कामांत अशी समजूत आहे कीं, मूळ इंग्रज नाटकाचें महाराष्ट्र भाषेंत 'Adaptation' (मूळ पुस्तकाच्य आधारें केलेली रचना ) जरी करूं म्हटलें तरी पाहिजे तेथें मूळ कवीच्या वाग्मौघाशी भाषान्तरकारानें आपल्या वाणीच्य ओघाची भेसळ करून द्यावी हें बरोबर नाहीं. हा प्रकार मुख्य त्वेंकरून 'विविधज्ञानविस्तारांत' जें प्रस्तुत नाटकाचें भाषान्तर येतें त्यांत स्पष्ट दिसतो. असें करण्यापेक्षां मग भाषान्तकारानें आपण एक स्वतंत्रच नाटक लिहावें तें बरें. कवीच्या मूळ उक्तीचें वाटेल त्याठिकाणीं दीर्घीकरण करणें म्हणजे—त्य कवीच्या कृतीचें भाषान्तर करणें किंवा 'Adaptation' करणें हें नव्हे, असा माझा ग्रह आहे. एखाद्या [illegible] मनुष्याची प्रतिमा काढणें असेल तर ती तसबीर [illegible] तसबीर काढतांना तिच्यांत आपल्या पदरचें सौंदर्य [illegible] प्रसिद्ध यत्न करणें हे कितीसें शोभणार आहे? त्याच प्रमाणें कालिदास किंवा शेक्सपीअर यांच्या नाटकांच्या प्रतिकृति किं प्रतिबिंबें स्वभाषेंत उठविणें असेल तर स्थळोंस्थळीं मूळ सोडू दिल्यावर ती प्रतिकृति किंवा प्रतिबिंब कसलें? मग त्या भाषान्तरित नाटकास शेक्सपीयरचें किंवा कालिदासाचें [illegible] म्हणणें शोभणार नाहीं किंवा सार्थ होणार नाही.

अस्तु. आतां अधिक विस्तार न करितां नाट्यकथामृतार जे खरे भोक्ते असतील व ज्यांस महाराष्ट्रभाषेचा खरा अभिमान असून आमची नाट्यसामग्री वाढावी, अशी ज्यांची मनापासून इच्छा असेल, त्यांस एक शेवटची विनंति करून ह भाग आटपता घेतों. ती अशी कीं, प्रस्तुत नाटकाच्या प्रत मी थोड्याच काढिल्या आहेत. तरी हा पाक लोकांस पसं पडून लोकाश्रय मिळाल्यास दुसरी आवृत्ति लवकरच काढाव लागेल अशी उमेद आहे. तरी माझ्या या भाषान्तरांत ज

दोष राहिले असतील ते ज्यांच्या जसे नजरेस येतील तसे त्यां त्यांणीं मला स्वतांला पत्रद्वारें किंवा वर्तमानपत्रांतून स्पष्टपणें कळवावे. म्हणजे दुसऱ्या आवृत्तीचे वेळीं ते दोष काढून टाकण्याचा मी यत्न करीन.

हें पुस्तक तयार करीत असतां आमचे चुलते ' रत्नपाल आणि शशिकला ' या नाटकाचे कर्ते ति० रा० रा० नारायण बापूजी कानिटकर वकील ; रा० रा० हरि नारायण आपटे, विद्यार्थी न्यू स्कूल ; रा० रा० शंभुराव कृष्ण बापट ; व रा० [illegible] ढेरे ; या गृहस्थांनीं मला अनेक प्रकारें [illegible] मदत केली त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

गोविंद वासुदेव कानिटकर.

1483 [illegible]

# कथेचा सारांश.

——:O:——

पूर्वी भरतखंडात विचित्रपुरी म्हणून एक नगरी होती. तेथें राजा रामचंद्रा सारखा न्यायी व प्रजापालनदक्ष राजा राज्य करीत होता. त्याला वीरसेन नांवाचा एक [illegible] होता. त्याची राणी मदालसा ह्मणून होती. त्या राजाचा [illegible]माकान्त नामें एक मुख्य प्रधान किंवा कारभारी होता. तो दुष्ट[illegible] होता. राजपुत्र वीरसेन तरुण होता. त्याचें वय सुमारें वीस [illegible] होते. वीरसेनाच्या विद्याविलासी बापानें आपला [illegible] [illegible]लगा [illegible] बुद्धि आहे असें पाहून त्याला वाराणसी नगरांत [illegible] प्रसिद्ध पाठशाळेंत विद्याभ्यासा करितां ठेविलें होतें.

एके दिवशीं असा चमत्कार झाला कीं, विचित्रपुराचा राजा एकाएकी मरण पावला. यामुळें सर्व राज्यांत मोठा हाहा:कार झाला. राज्यांत अशी बातमी पसरली कीं राजा आपल्या नजरबागेंत संध्याकाळीं निजला असतां त्यास सर्पदंश होऊन मरण पावला. हा महा अनर्थ लोटून कांहीं दिवसांनीं लोकांचीं मनें स्वस्थ होत आहेत तों व त्या गादीचा खरा वारस पितृदु:खांत निमग्न होऊन राहिला आहे तोंच पूर्वीच्या राजाचा मुख्य प्रधान किंवा कारभारी रमाकान्त यानें ती गादी आपण बळकाऊन 'विचित्रपुरीचा राजा मी' असें ह्मणून आपल्या नांवानें राज्यांत दंवडी पिटविली. हें काम रमाकान्तानें इतक्या युक्तीनें केले व आपले सर्व बेत त्यानें इतक्या हुशारीनें व निश्चयानें सिद्धीस नेले कीं आपण बळकाऊन बसलेल्या गादीच्या योग्य व कायदेशीर वारसाचा कैवार घेऊन भांडण्यास प्रजाजनापैकीं कोणी ही धजेना. रमाकान्तानें हें

एक धाडसाजें कृत्य तडीस नेल्याबरोबर राज्याभिषेकाचा विधी ही मोठ्या समारंभानें करवून लागलीच कांहीं दिवसांनीं पूर्वीच्या राजाची राणी मदालसा इजबरोबर त्यानें आपला पाठ लाऊन टाकला. हे सर्व प्रकार पाहून राज्यातले पुष्कळ लोक असंतुष्ट होऊन खवळून गेले. परंतु राजा रमाकान्त यानें हे सर्व राजकीय समारंभ अशा मोठ्या थाटाने व डौलानें करविले कीं सर्व प्रजा आपल्या ठिकाणीं आश्चर्य करीत स्वस्थ बसली व कोणाचें कांहीं चाललें नाहीं. रमाकान्तानें या प्रमाणें लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा होईल तवढा यत्न केला. डामडौलांत व थाटामाटांत कांहीं एक कमी पडूं दिलें नाहीं. राज्याभिषेकाचा समारंभ तर इतका [illegible] उडवून दिला कीं तो पहाण्यास शेंकडों कोसावरून [illegible] विचित्रपुरीस आले होते. रमाकान्तानें आसपासचे [illegible] संस्थानिक, अमीर उमराव, मानकरी वगैरे मण्डळी, [illegible] अगत्यानें पत्रें व जासूद पाठवून आणविली. असो. या समारंभा करितां राजपुत्र वीरसेन याचा सहाध्यायी वाराणसीहून आला होता; विचित्रपुरीचा मुख्य मुत्सद्दी किंवा नायब दिवाण आर्तवीर्य, याचा मुलगा विलास नगरीहून आला होता. राजवाड्यांत या प्रमाणें समारंभांची अगदीं गर्दी उडून राहिली आहे तों एक अलौकिक चमत्कार घडून आला. तरुण राजपुत्र वीरसेन याच्या कानावर असें वर्तमान आलें कीं मध्यान रात्रीं कांहीं शिपाई लोक किल्ल्यांतील राजवाड्याच्या पुढच्या पटांगणावर पहारा करीत असतां त्यांस एक पिशाच दिसलें व त्याचा आकार थेट आपल्या मेलेल्या बापासारखा असून त्यानें अंगावर चिलखत चढविलें होतें व इतर शस्त्रेंही धारण केलीं होतीं. वीरसेनानें हा काय चमत्कार आहे तो प्रत्यक्ष पहावा म्हणून देवडीच्या पहाऱ्यावरील शिपायाचा नाईक दौलतराव व आपला मित्र हरसेन या दोघांस बरोबर घेऊन दुसऱ्या दिवशीं मध्यरात्रीं किल्ल्याच्या पटांगणावर पहारा करीत उभें रहावें अ-

सा निश्चय केला. दुसऱ्या दिवशीं नियमाप्रमाणें तें पिशाच तेथें आलें व वीरसेनास एकीकडे नेऊन ' मी तुझ्या बापाचें पिशाच्च आहे. माझा दुष्ट प्रधान रमाकान्त यानें, माझ्या राज्याच्या व माझ्या राणीच्या अभिलाषानें मी बागेंत निजलों असतां माझ्या कानांत जाहालीम विष घालून मला ठार मारिलें. तूं जर माझा मुलगा असशील तर या दुष्ट कृत्याबद्दल त्या रमाकान्ताचा सूड घे ' असें मोठ्या काकुळतीनें त्यास सांगितलें.

वीरसेनानें ' या दुष्ट कृत्याबद्दल मी रमाकांताचा सूड त्यास घेतों ' म्हणून पिशाच्या जवळ प्रतिज्ञा केली. आर्तवीर्य याची मुलगी चंद्रकला हिचें ही प्रेम राजपुत्रावर होतें. परंतु तिचा बाप व तिचा भाऊ शूरसेन या दोघांनीं तिच्या मनांत वीरसेनाविषयीं भलभलतें भरून देऊन ' वीरसेन हा तुझ्याशीं लग्न करणार नाहीं. तूं त्याजवर प्रेम ठेऊं नकोस. तो राजघराण्यांतला आहे ' वगैरे मजकूर सांगून तिच्या मनाचा त्यांनीं सर्वस्वी उत्साहभंग केला. इकडे राजपुत्र वीरसेन यानें, वेड्याचें सोंग घेऊन आपला इष्ट हेतु साधावा व रमाकांताचा सूड घ्यावा असा निश्चय केला आणि त्याप्रमाणें राजवाड्यांतील सर्व लोकांशीं वर्तन करूं लागला. राजदरबारांत विठोजी व संभाजी म्हणून दोन सरदार होते. वीरसेनाचे लहानपणापासूनच हे त्याजबरोबर वाढलेले असे त्याचे मित्र असत. परंतु, ते राजा रमाकांत याला अनुकूळ आहेत असें वीरसेनाच्या ध्यानांत आलें—व राजा रमाकांत, आपली आई राणी मदालसा, आर्तवीर्य, विठोजी व संभाजी फार काय, त्याची हृदयवल्लभा चंद्रकला, हे सारे एक असून आपल्यास प्रतिकूळ आहेत, अशी त्याची खात्री झाली. वीरसेन आपलें मन उघडून एक हरसेना बरोबर मात्र बोले. बाकी साऱ्यांशी कांहीं संदिग्ध, कांहीं समंजस, कांहीं वेड्यासारखें असें भाषण करी. असो. पुढें वीरसेनाच्या मनांत त्या पिशाच्या विषयीं संशय उत्पन्न होऊन त्याचें म्हणणें

खरें किंवा खोटें आहे, हें पहाण्या करितां व आपली पक्की खात्री करून घेण्या करितां, रमाकांता पुढें एक नाटक करून दाखवावें व त्या नाटकांत, कोणी एका राजाच्या कारभाऱ्यानें बागेमध्यें तो राजा निजला असतां त्याचा प्राण घेतला, अशा प्रकारचा भाग दाखवावा, असा त्याणें निश्चय केला. निश्चयाप्रमाणें वीरसेनानें नाटकाचा प्रयोग करविला. प्रयोग करविण्याच्या अगोदर आपला मित्र हरसेन याला तो नाटक करण्याचा बेत कळवून नाटक होत असतां राजाची मुद्रा कसकशी बदलते ती लक्षपूर्वक पहा म्हणून सांगितलें. त्या ठरीव नाटकाचा प्रयोग पाहून राजाची चर्या एकाएकीं बदलून जाऊन, नाटक अर्धेंच [illegible] होण्याचें बंद करण्याविषयीं हुकूम करून राजा रागानें निघून गेला. हा चमत्कार पाहून, आपली मसलत चांगली साधली, असें पाहून वीरसेन आनंदानें नाचूं लागला, व पिशाच्यानें सांगितलेली गोष्ट खरी, अशी त्याची खातरी झाली. परंतु त्याचें मुख्य कर्तव्य राजाचा सूड घेणें तें तर दूरच राहिलें. वारंवार मनांत अनेक प्रकारचे बेत करून व केवळ आपल्या कल्पनेच्या तरंगांत बुडून जाऊन राजपुत्र वीरसेन आजचें उद्यांवर लोटूं लागला. आपल्या हातून घडावी ती गोष्ट घडत नाहीं, असें पाहून वारंवार त्याच्या मनास दुःख होई व तो अनेक प्रसंगीं आपली आपणच नानाविध निंदा करून घेऊन आपण आपला व्यर्थ शापून घेई. शेवटीं आपल्या आईच्या महालांत जाऊन त्यानें अगदीं निष्ठुर होऊन तिची पुष्कळ निर्भर्त्सना केली. ही निर्भर्त्सना होत असतां वीरसेनाची ती क्रूर, आवेशांत आलेली मुद्रा पाहून राणी मोठ्यानें ओरडली. तों इकडे पडद्या मागें म्हातारा आर्तवीर्य, या दोघां मायलेकांचें काय भाषण होत आहे तें ऐकण्या करितां लपून बसला असतां भयभीत होऊन 'धांवारे धांवा! ' म्हणून ओरडला. त्या बरोबर वीरसेनाला तो दुष्ट राजा रमाकांतच तेथें बसला आहे, असें वाटून त्यानें आपली

तरवार उपसली, आणि 'उंदीर रे उंदीर!' असें म्हणून पड-द्यांत भोसकली, ती बिचाऱ्या आर्तवीर्याच्या उरांत लागून तो तात्काळ भुईवर मरून पडला. हें वृत्त राणीनें राजाला कळविलें. 'वीरसेन पक्का वेडा झाला आहे, त्यानें हें एक भयंकर कृत्य केलें, कदाचित् आपल्या सर्वांच्या जिवावरही बेतेल' असा विचार करून व राणीची कशी तरी समजूत घालून, वीरसेनाला सौराष्ट्रास पाठऊन द्यावा, असा राजानें बेत केला. आणि त्याचे मित्र विठोजी व संभाजी यांस बरोबर देऊन त्यांची रवानगी एकदांची सौराष्ट्रास करून दिली. इकडे वीरसेन तेथेंच मारला जावा अशा बुध्धीनें दुरात्म्या रमाकांतानें एक युक्ति लढविली कीं सौराष्ट्राच्या राजास वीरसेन सौराष्ट्रांत पोंचल्याबरोबर त्याला ठार करावा अशा मजकुराचें पत्र लिहिलें. विठोजी व संभाजी यांच्या बरोबर वीरसेन सौराष्ट्रास जात असतां मार्गांत ती दुष्ट थैली व तें पत्र हीं त्याच्या अवचित् दृष्टीस पडलीं. पत्र वाचून पाहून त्यानें त्यांतलीं नांवें बदलून आपल्या ठिकाणीं विठोजी व संभाजी यांसच पाहिल्याबरोबर ठार मारावें असें लिहिलें, आणि मग तें पत्र आणि ती थैली जेथल्या तेथें ठेऊन दिलीं. दैवयोगानें असें घडलें कीं, ज्या तारवांतून वीरसेन व त्याचे सोबती जात होते, त्या तारवावर, समुद्रांत कांहीं शिकार सांपडेल म्हणून चांचे लोकांचे तारूं फिरत होतें, त्यानें हल्ला केला. हल्ला करतांच दोन्ही तारवांतलि लोक हातघाईस येऊन त्यांनीं युद्ध केलें. त्यांत चांचे लोकांच्या तारवाचा पराभव होऊन तें शत्रूच्या तारवाला चुकवून पळून गेलें—त्या गडबडींत वीरसेनानें चांचे लोकांच्या तारवांत उडी टाकली. चांचे लोकांनीं प्रथम त्यास बंदीवान केलें, परंतु वीरसेन हा कोणी तरी थोर कुळांतला मनुष्य आहे असें पाहून त्यांनीं उदारपणानें पुनः त्यास त्रिचिन्नपुरी जवळ आणून सोडिलें. नंतर वीरसेनानें आपली झालेली स्थिति एका पत्रांत लिहून तें पत्र एका कोळ्याच्या हातीं आप-

ला प्रिय मित्र हरसेन यास कळविलें; आणि दुसरें एक पत्र लिहून ते वृत्त रमाकांताच्या ही कानीं त्यानें घातलें. हा सर्व प्रकार घडतो आहे तों इकडे आर्तवीर्याच्या आकस्मित मृत्यूची बातमी शूरसेनाला विलासनगरींत कळाली. शूरसेन लागलाच विलासनगरी सोडून विचित्रपुरींत येऊन ठेपला. आणि मोठी वेडाळी माजवून आपल्या बरोबर कांहीं नगरवासी फितूर केलेले लोक घेऊन, राजा रमाकांत किल्ल्यांतील राजवाड्यांत राणीसह बसला असतां, राजाचा सूड घेण्याकरितां आला. आपला बाप रमाकांतानें मारिला असें समजून शूरसेनानें 'माझा बाप कुठे आहे तो ...!' असा प्रश्न राजाला केला—राजानें 'मी तुझ्या बापाला मारिला नाहीं. मारला असेल त्याचा सूड तूं खुशाल घे' इत्यादि अनेक प्रकारें त्याचें शान्तवन केलें. शूरसेनानें अतिशय आग्रह धरल्यावरून शेवटीं राजानें 'तुझा बाप वीरसेनानें मारला, त्याचा तूं सुड घे' असें त्यास सांगितलें. पुढें राजा व शूरसेन या दोघांनीं खलबत करून वीरसेन व शूरसेन या दोघांनीं पट्टा खेळावा व त्यांची पैज लावावी; पट्टा खेळतांना शूरसेनानें पट्टया ऐवजी विषाचें पाणी पाजलेली एक तरवार हातांत घेऊन वीरसेनाला घाव करावा; आणि कदाचित् हा बेत फसला तरी, पट्टा खेळतां खेळतां वीरसेनाला तहान लागेल त्या वेळीं आगींतलें विषयुक्त पाणी पिण्यास देऊन आंत विष घालून तयार केलेला विडा ही तयार असेल तो वर खावयास द्यावा; असें ठरविलें. वीरसेन पट्टा खेळण्यास सिद्ध झाला. इकडे इतक्यांत असा चमत्कार घडला कीं, बापाच्या मृत्यूनें व वीरसेनाच्या, क्रूर वर्तनानें बिचारी चंद्रकला अगदीं विव्हळ होऊन अखेरीस तिला वेड लागलें व त्या वेडाच्या भरांत रानोमाळ चोंहोंकडे भटकूं लागली; तिणें तोंडानें गाणीं म्हणावींत, रस्त्यांतल्या काड्या निवडाव्या, नानाप्रकारचीं रानांतलीं फुलें व झाडपाला गोळा करून अंगावर घालावा, अशा स्थितींत ती एकदां बागे-

मध्यें वेळूच्या ठिकाणीं पाण्याचा मोठा संचय असून त्यांत डोह होता, त्याठिकाणीं रानांतलीं फुलें वेंचण्या करितां म्हणून गेली तों तिचा पदर पाण्यांत वांकलेल्या एका वेळूला अडकून ती सोडवावयाला गेली असतां पाण्यांत पडून मरण पावली. हें दुःखकारक वर्तमान प्रथमतः राणीला कळतांच शूरसेन व राजा हे दोघे वीरसेनाचा घात करण्याचा बेत ज्या ठिकाणीं करीत बसले होते त्याठिकाणीं तिनें तें त्यांस कळविलें. त्यामुळें शूरसेन तर अधिकच संतापून गेला. इकडे वर सांगितल्या प्रमाणें वीरसेन व शूरसेन यांची पट्टा खेळ[illegible]ची सर्व तयारी झाली. परंतु हा पट्टा खेळण्याचा समारंभ होण्यापूर्वी वीरसेन व शूरसेन यांचा परस्पर द्वेष वाढण्यास दुसरें एक मध्येंच चमत्कारिक कारण घडलें. तें असें कीं चंद्रकलेला स्मशान भूमींत पुरण्या करितां आणिली असतां तिच्या अंत्यविधी-प्रसंगीं आपल्या बहिणी विषयीं आपली अत्यंत प्रीति शूरसेन बोलून दाखवीत आहे तों तेथें वीरसेन येऊन उभा राहिला, तो कसा तर, वीरसेनाचें मन अतिशय खिन्न होऊन तो आपला प्रिय मित्र हरसेन याला बरोबर घेऊन ते दोघे फिरत फिरत स्मशान भूमीपर्यंत आले, त्या ठिकाणीं कोणी मजूर खाडा खणीत आहेत व एकीकडे गाणीं म्हणत आहेत, असें पाहून तो चमत्कार अवलोकन करण्याकरितां दोघे ही खाड्याजवळ आले. तेथें त्या खाडा खणणाऱ्या पैकीं एका मजुराशीं वीरसेनाचीं मोठीं चमत्कारिक भाषणें झाल्यावर वीरसेन त्या स्मशानांतील तो दुःखोत्पादक देखावा पाहून आपल्या कल्पनातरंगांत निमग्न आहे, इतक्यांत चंद्रकलेचें प्रेत राजा, राणी, शूरसेन, व इतर मंडळी समवेत तेथें आलें तें पाहून ते दोघे अंमळ एकीकडे झाले. सर्व प्रेतसंस्कारविधी आटपल्यावर चंद्रकलेचा हृदयवल्लभ नायक वीरसेन व तिचा बंधु शूरसेन यांचा कलह झाला तो असा. आपल्या बहिणी [illegible]

आपलें विलक्षण प्रेम दाखविण्याकरितां शूरसेन हा, चंद्रकलेला ज्या खाड्यांत पुरली त्या खांचेंत आवेशानें उडी टाकतो आहे, इतक्यांत वीरसेनाला आवेश येऊन त्यानें ही त्या खाचेंत उडी टाकली. मग दोघांची कांहीं वेळ झटापट होत आहे तों राजा, राणी, व इतर मानकरी मध्यस्त पडून त्यांनीं त्यां दोघांस सोडविलें. पट्टा खेळण्याचा समारंभ झाला, त्यांत राजा राणी व इतर दरबाराचे मानकरी बसले होते. वीरसेन व शूरसेन पट्टा खेळत आहेत, इतक्यांत राणीनें विष घातलेला विडा खाल्ला व तहान लागली ह्मणून रमाकान्तानें विष घालून वीरसेना करितां ह्मणून जी रुप्याची झारी पाणी भरून ठेविली होती ती झारी तिणें तोंडाला लाविली. 'घात झालारे घात झाला' असें मनांत समजून राजा राणीला 'तो विडा नको खाऊ, ते पाणी नको पिऊं,' असें ह्मणाला. परंतु राणी त्याचें न ऐकतां ते पाणी पिऊन गेली. इकडे शूरसेनानें वीरसेनास आपल्या तरवारीनें एक घाय केला तरी ते खेळतच होते. खेळतां खेळतां शूरसेनाच्या हातांतली तरवार वीरसेनाच्या व वीरसेनाची शूरसेनाच्या हातांत आली. कांहीं वेळानें वीरसेनानें शूरसेनासही एक घाय केला. असे झाल्याबरोबर राजानें ते फार खवळले आहेत असें समजून त्यांस सोडविले. असें होत आहे तों, इकडे राणीच्या अंगांत तें विड्यातलें व पाण्यांतलें विष भिनून जाऊन 'वीरसेना! वीरसेना! मला कोणी विषप्रयोग केला' असें ओरडून राणीनें तत्काळ प्राण सोडिला. हें शूरसेनानें पाहून वीरसेनाला राजाचें सर्व कपट कळविलें. 'तुला विष पाजलेल्या तरवारीचा वार लागला आहे, तूं आतां घटकेचा सोबती, आहेस हें सर्व कृत्य राजाचें आहे, मी ज्या तरवारीनें तुला घाव केला ती घातक तरवार तुझ्या हातांतच आहे' असें शूरसेनानें वीरसेनास कळविल्यावरून 'घातरे घात!' ह्मणून तीच तरवार वीरसेनानें राजाचा उरांत 'दुष्टा हरामखोरा, मानकापू

चांडाळा ! मर आतां. जा माझ्या आईकडे' असे म्हणून भोसकली. वीरसेनानें शूरसेनास क्षमा कर, माझ्या बापाचा, व माझा हे मृत्यु तुझ्या हातून झाले नाहींत किंवा तुझा मृत्यु माझ्या हातून झाला नाहीं असें म्हणून, वार लागला त्यानें आपल्या अंगांत दहा करीत आहे व आपले प्राण कासावित्स होऊं लागले आहेत, असें पाहून हरसेनाला मोठ्या प्रेमानें दृढ आलिंगन देऊन आपल्या मित्राचा शेवटचा निरोप घेतला. तेव्हां हरसेन ह्मणाला 'मी तरी आतां कशाला जगूं' या झारींत वीष शिल्लक राहिलें आहे तें पिऊन मी तुमच्या बरोबर सहगमन करणार. तेव्हां वीरसेनानें त्यास सांगितलें "मित्रा ! माझी ही शेवटची विनंति ऐक. माझ्या मागें जगाला या गोष्टी सांगायला तुझ्या खेरीज कोणी राहिला नाहीं; तर तूं अखण्ड सुखाविषयीं इतका उतावीळ न होतां या दुष्ट जगांत कसे तरी माझ्या करता कांहीं दिवस काढ !' असें ह्मणून वीरसेनानें स्वर्गलोकाची वाट धरली.

याप्रमाणें हा जो सर्व प्रकार इकडे घडत आहे तों राणा भीमसिंग, सौराष्ट्रांचे वकील व इतर लोक तेथें येऊन दाखल झाले. 'हा भयंकर परिणाम कसा झाला तो मला सर्व निवेदन कर.' म्हणून भीमसिंग बोलला असतां हरसेनानें त्याला थोडक्यांत सर्ववृत्त कळविलें. वकिलांनीं 'विठोजी व संभाजी हे दोघे सौराष्ट्रांत मरण पावले' असें सांगितलें. भीमसिंगानें सर्व मृतांची व्यवस्था लाऊन व वीरसेनाचा अंत्यविधी मोठ्या समारंभानें शेवटास नेऊन वीरसेनाच्या इच्छेनुसार मोठ्या दुःखानें व नाइलाजानें विचित्रपुरीच्या राज्यपदाचा स्वीकार केला.

# वीरसेन नाटक.

## अंक पहिला.

### प्रवेश १.

(स्थल) विशाळगडचा किल्ला. किल्ल्यासमोरचें पटांगण.

(**राघोजी** पहाऱ्यावर असतानां **बहिरोजी** येतो).

**बहिरोजी**—कोणरे तो ?

**राघोजी**—तूर कोन्? बोल. थांब, थांब! खबरदार फुड पाऊल टाकशील तर! बोल, कोन् हयेस?

**बहिरोजी**—रय्यत. विचित्रपुरचे महाराज दीर्घायु होवोत.

**राघोजी**—(आश्चर्यानें) कोन्? भईरूजीराव?

**बहिरोजी**—होय होय. तोच मी.

**राघोजी**—वा राव! अपुन् तर अक्षि वख्तावर आलाती.

**बहिरोजी**—अरे वख्तावर ह्मणजे? आतांच बघ हा, दाराचा ठोका पडला. राघोजी, जार बा, जा तूं आतां. घे थोडी शी डुकली.

**राघोजी**—आमावर दादा आपल लई उपकार हैती. अर, काय र ही थंडी! अक्षी व्हॉलन न्हाई बगा! थंडीन काकडून ग्येलो बगा!

**बहिरोजी**—गड्या, जिकडे तिकडे बंदोबस्त ठीक आहे नारे बोवा? तुझ्या पहाऱ्यांत कांहीं गडबड तरी नाहींना झाली?

**राघोजी**—हे गाव, अगदीं सामसुम जिकडे तिकडे. चिट् पाखरूंची हलल न्हाई बगा !

**वहिरोजी**—ठीक आहे तर. रामराम ! अरे पण हे बघ, तुला वाटेंत जर हरसेनराव आणखी दौलतराव भेटले तर झट् इकडे पाठवून दे. त्यांना सांग कीं, मी पाहाऱ्यावर तुमची अगदीं वाट बघत बसलों आहे.

**राघोजी**—( ऐकल्यासारखें करून ) अव मला वाटतं कीं ते आलच बगा इकडं. कोन हाईर ? हो ! हो !

( हरसेन व दौलतराव येतात. )

**हरसेन**—आम्ही सरकारचे दोस्त आहोंत.

**दौलतराव**—आणखी विचित्रपुरीच्या महाराजांची रयत आहोंत.

**राघोजी**—तर मंग ह्या गरीबाचा रामराम तर घ्याकी ! रामराम ! दादासाब !

**दौलतराव**—कोण राघोजी ? अरे, तुला पहाऱ्यावरून कोणी सोडविलं ?

**राघोजी**—माझ्या पाऱ्यावर तुकतच वहिरोजीराव आल. येतो तर मंग रावसाव, रामराम !

( राघोजी जातो. )

**दौलतराव**—रामराम वहिरोजी !

**वहिरोजी**—कोण, दौलतराव ? या असे. अहो, तुम्हांबरोबर हरसेनराव आले आहेत कां ?

**हरसेन**—तर हो ! हा बघा, मी. पटली का ओळख ?

बहिरोजी—या, या, हरसेनराव, या असे. दौलतराव, या, बरे आहांत ना? आजची कांहीं कमी जास्त खबर?

दौलतराव—अहो, तुम्हीच आम्हाला सांगा कांहीं खबर असली तर. पण हो. बरी आठवण झाली. त्या दिसची ती मौज आज तुमच्या दृष्टीस पडली का?

बहिरोजी—माझ्या तर बोवा कांहीं एक दृष्टीस पडलं नाहीं.

दौलतराव—बहिरोजी, आमचे हरसेनराव म्हणतात कीं, हा आपल्या कल्पनेचा सारा खेळ आहे. आपण जो पिशाच्या-चा भयंकर चमत्कार पाहिला, त्याजवर ह्यांना बिलकुल भरंवसा नाहीं. ते म्हणतात हें सारं झूट आहे. तेव्हां मीहि त्यांना म्हटलं, 'महाराज! आपण मेहरबानी करून आज रात्रीं आमच्या बरोबर या तर खरं. आणखी पुन्हा तो चमत्कार घडून आलाच, तर तुम्ही तो प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं एकदा पहा. म्हणजे तर खातरी होईल ना?' असं सांगून मोठ्या जुलमानं आज स्वारी इथे आणल्या आहेत. बघूं या आतां काय होतं तें.

हरसेन—छट्! छट्! कसलं वेड हें तुमच्या डोक्यांत भरलं आहे? तें पिशाच खास येत नाहीं.

बहिरोजी—हरसेनराव! अहो बसाल तर खरे घटीभर सारे धिराधिरानं घ्या. आम्हीं एकसारखा दोन रात्रीं हा चमत्कार पाहिला; अन् तुम्ही आपलं चक्क आम्हाला हें सारं झूट आहे म्हणून म्हणतां! याला म्हणावं तरी काय? आजरात्रीं आपण स्वस्थपणानं या पहाऱ्यावर बसा मात्र. आपलीही खात्री होणार यांत शंका नाहीं. अगोदर, तुम्हाला तो चमत्कार कसकसा घडून येतो त्याचा थोडासा वृत्तांत सांगतों. का? म्हणजे अनायासें करमणूकही होईल, आणखी वेळही लौकर जाईल.

हरसेन—फार उत्तम! बसा तर मग खालीं. ऐका बहिरोजी काय गम्मत सांगतो ती ऐकूं तर खरी. दौलतराव बसा कीं हो!

**बहिरोजी**—ऐका तर मग. काल काय झालं,—ती पलीकडे चांदणी दिसते आहे ती,—ती अशी या, या बाजूला होती. तिचा उजेड खूप पडला होता. अन् मग काय—तुमचं देव भलं करो—झालं बोवा. दौलतराव आणखी मी असे बसलों होतो. इतक्यांत बघा एकाचा ठोका पडला.—

( पिशाच येतें. )

**दौलतराव**—अरे थांब थांब, चिप्, तें बघ, आलंरे आलं!

**बहिरोजी**—अरे कालचाच पोषाख! तेंच स्वरूप अगदीं. अहाहा! आपल्या नुकत्याच कैलासवासी झालेल्या महाराजासारखीच अगदीं आकृति! नाहीं बरं?

**दौलतराव**—हरसेनराव? तुम्हाला कांहीं थंतर मंतर येतं आहे. राव, बोला त्याच्याशीं कांहीं तरी!

**बहिरोजी**—अहो! अगदीं महाराजांसारखी आकृति दिसते! पाहा बघा!

**हरसेन**—अहो काय सांगावं अगदीं हुबेहूब! हे महाराज नाहींत म्हणून म्हणेल कोण? मोठा चमत्कार आहे बोवा! काय आश्चर्य हें! माझी तर बोवा छाती फाटून गेली!

**बहिरोजी**—अरे! त्याच्या मनांत आपल्याशीं कोणी तरी बोलावं असं आहे बरं का!

**दौलतराव**—हरसेनराव, बोलाकिहो त्याच्याशीं कांहीं तरी.

**हरसेन**—(थोडा पुढें सरून) हे रात्रिचरा! तूं कां बरं या ठिकाणीं आलास? या विचित्रपुरीचे स्वर्गवासी झालेले जे राजाधिराज त्यांचा सुंदर व शौर्यशाली आकार कां बरं धारण केलास? तुला वेताळाचा शपथ आहे. सांग! सांग! तुझं या स्थळीं येण्याचं कारण काय?

**दौलतराव**—त्याला आपली मानखंडना झाली असं वाटलं.

**वहिरोजी**—ओहोहो! तें गेलं किहो. बघा, बघा. ते चाललं आहे!

**हरसेन**—(पुढें सरून) थांब थांब पिशाच्या! बोल! बोल! तुला वेताळाची शपथ आहे! बोल.

( पिशाच निघून जातें. )

**दौलतराव**—गेलं बोवा तें. बोलेचना कांहीं!

**वहिरोजी**—कां हरसेनराव! झाली खातरी! आतां काय आपलं म्हणणं आहे? आपल्या तोंडचं पाणी पळालं आहे, यांत संशय नाहीं. कशी आपली हवेलंडी उडून गेली आहे! आतां हा सारा भ्रम या कल्पनेचाच खेळ आहे, किंवा यांत कांहीं तरी अर्थ आहे? बोला बरं आतां!

**हरसेन**—खरंच रे बोवा. देवा शपत सांगतो. हा प्रकार जर 'चक्षुर्वै सत्यं' असा झाला नसता तर हें सर्व झूटच म्हटलं असतं.

**दौलतराव**—काहो! पण, तें थेट महाराजासारखं दिसलं, नाहीं बरं?

**हरसेन**—यांत काय संशय! त्यानां लपवावं आणखी याला काढावं. हेंच अन् दुसरं कार्य? त्या नवखंडाच्या मदोन्मत्त फत्तेसिंगाशी जेव्हां महाराजांनीं सामना केला, तेव्हांची तीं त्यांची क्रोधाविष्ट झालेली मुखश्री—व त्या वेळचं तें अंगावर चढिवलेलं चिलखत—सारं तसचं अगदीं. आश्चर्य आहे!

**दौलतराव**—याप्रमाणं महाराज, हा दोनदा अस्साच चमत्कार झाला बरं! आणखी, वेळही पण हीच! पहाऱ्यावरून, तो लढाऊ पोषाख घालून, थोरले महाराज पूर्वी दोनदा अस्सेच दिसले.

**हरसेन**-याचं कारण अमूकच असेल, ही कांहीं बो वा कल्पनाच होत नाहीं. पण माझा एक तर्क असा धांवतो कीं, कांहीं असो,—हा प्रकार आपल्या या राज्याला अगदीं अनिष्ट आहे—येवढी गोष्ट खरी !

**दौलतराव**-अहो, थमा खाली. हो, वरी आठवण झाली. मी असं विचारतों कीं, हल्लीं ह्या आपल्या राज्यांत ही लढाई-ची कडेकोट तयारी चालली आहे, तोफांवर तोफा ओततात; लढाईचं सामान एकसारखं येतं आहे, खूप दारू गोळा तयार होतो आहे. ही काय गडबड आहे बरं ?

**हरसेन**-हें मला ठाऊक आहे. मी सांगतो. निदान लो-कांत तरी अशी अफवा आहे. नवखंडाचा राणा फत्तेसिंग, याला आपल्या ... महाराजांनीं युद्धांत ठार मारलं. याबद्दल पुरा सूड उगवावा म्हणून त्याचा मुलगा राणा भीमसिंग हा आप-ल्या देशावर चालून येणार आहे. तेव्हां त्याच्याशीं समर करण्या-करितां ही सर्व ... चालली आहे. समजलांत ?

**बहिरोजी**-तर मग हें समर बघण्याकरतांच तर थोरले महाराज हें पिशाचरूप घेऊन येत नसतीलना ? मला वाटतं असंच असावं.

**हरसेन**-पुढें एखादं महासंकट राज्यावर येणार अ-सलं किंवा एखादा भयंकर प्रसंग गुदरणार असला म्हणजे ही अनिष्ट चिन्हं अशुभसूचक अगोदर होतात, असं शास्त्रच आहे. पुराणांतरीं ही अशा प्रकारचं वर्णन त्यांनीं केलेलं आढळतं. अ-रे, पण हें पुन्हा आलं बघ. ( पिशाच पुनः येतें. ) येईतर आहे यानं आपल्याला झपाटलं तरी ? पण आपण तर याला आडवे जाणार ! मग काय होणं असेल ते होवो ! ( पुढें सरून ) हे पि-शाच्च्या, थांब. तुला जर वाचा असेल तर माझ्याशीं बोल. ज्याच्या योगानं तुझ्या चित्ताला शांती मिळेल व माझी

योग्यता अधिक वाढेल असं 'एखादं सत्कर्म घडावं अशी तुझी इच्छा असेल तर सांग. ( कोंबडा ओरडतो ). या राज्यावर एखादा अनिष्ट प्रसंग गुदरणार असेल, आणखी तो जर तुला ठाऊक असेल, तर योग्य वेळीं सांग म्हणजे आम्हांला तो टाळतां येईल. अथवा जिवंतपणीं लोकांच्या द्रव्याचा अपहार करून तें द्रव्य जर भूमीच्या उदरांत कुठें सांठवून ठेवलं असलंस, आणखी तुझा हेतू राहून जर तूं या पृथ्वीवर वायुरूपानं संचार करीत असशील तर तें ही सांग. बोल, शपत आहे तुला ! दौलतराव? थांबवरे त्याला.

**दौलतराव**—काय म्हणतां, घालूं हें सोडगं त्याच्या अक्यांत ?

**हरसेन**—बेलाशक. तें उभं रहात नसलें तर ठीक. बघतोस काय ?

**बहिरोजी**—अरे, हें बघ इथे आलं !

**हरसेन**—हें इकडे आलं बघ !

( पिशाच जातें. )

**दौलतराव**—छे, गेलं रे गेलं, गड्यांनो ! अरे ! त्या गजाधिराजाचा हा आपल्या हातून अपमान नाहीं का झाला! अरे! तें पडलं वायुरूप, तेव्हां त्याच्यावर हात टाकणं म्हणजे केवळ थट्टाच करणं होय.

**बहिरोजी**—तें मघाशी कांहीं बोलणार होतं बरं. इतक्यांत कोंबडा ओरडला. यामुळें सर्व फसलं.

**हरसेन**—अरे, दिशा अगदीं उजळल्या ! पहाट झाली ! चला तर मग. आपला हा पहारा आतां उठतो आतां फिरवई, आजच्या रात्री जो हा आपण चमत्कार पाहिला तो आपल्या युवराज वीरसेन महाराजांच्या कानावर घा.

कारण, माझी खात्री आहे कीं, हें पिशाच्च आपल्याशीं जरी कांहीं बोललं नाहीं, तरी पण वीरसेन महाराजांशीं कांहीं तरी बोलेल. ज्या अर्थी महाराजांवर आपलं पूर्ण प्रेम आहे, त्या अर्थी त्यांना हा प्रकार विश्रुत करणं हें आपलं कर्तव्य आहे. कां हो, असंचना ?

**दौलतराव**—मला ही असंच वाटतं. अगोदर ही गोष्ट त्यांच्या कानांवर घालूं. यावेळीं वीरसेन महाराज कुठें असतील हें मला ठाऊक आहे.

( निघून जातात. )

---

## प्रवेश २.

### स्थळ — राजवाड्यांतील दरबारचा दिवाणखाना.

### ( राजा रमाकांत, राणी मदालसा, वीरसेन, आर्तवीर्य अर्जुन, पिलाजी व यशवंतराव. )

**राजा**—थोरले महाराज कैलासवासी झाल्यामुळें आमच्या वीरसेनाला फार दुःख झालं, ही तर गोष्ट खरीच. आणि त्यापासून अम्ही ही शोकनिमग्न व्हावं व सर्व राज्यांत जिकडे तिकडे उदासीनता उत्पन्न व्हावी, हें ही स्वाभावीकच आहे. तथापि अशा प्रसंगाला कांही थोडासा विवेक केला पाहिजे. जे गेले ते कांहीं पुन्हा परत येतात असं नाहीं. त्यांच्या बरोबर आपल्याला तर कांहीं जातां येत नाहीं ना ? आमची जी पूर्वीची मालकीण व हल्लींची आमची यजमानीण, इला अम्ही दुःखांत सुख मानून व मागच्या सर्व गोष्टी विसरून जाऊन ह्या राज्याच्या बंदोबस्ता करतां व व्यवस्थे करतां आमची पट्टराणी केली आहे व अम्ही राज्यसूत्रं स्वतःच हातांत घेतलीं आहेत. या कामांत ज्या उमराव व दरकदार मंडळीनीं मदत केली आहे त्या सर्वांचे

गादीवर मोठे उपकार आहेत, असें म्हटल्यावांचून आमच्यान्यानें रहावत नाहीं. आतां हा प्रसंग पाहून, नवखंडाचा राणा फतेसिंग याचा मुलगा भीमसिंग हा मदोन्मत्त होऊन बंडाळी माजवीत आहे व ' अम्ही लढण्यास तयार आहोंत ' असा निरोप घेऊन त्याचा वकील या दरबारीं आला आहे. या प्रकरणाचा यथाकाळीं विचार करण्यांत येईलच. प्रस्तुत दुसरें एक काम आहे. तें हे कीं, भीमसिंगाचा चुलता उदेसिंग हा फार वृद्ध झाला असल्यामुळें आपल्या पुतण्यावर त्याची कांहीं एक सत्ता चालत नाहीं. या गोष्टीला त्याचा नाइलाज आहे. या नवीन राज्यव्यवस्थेची खबर कळविली असता त्याला बरें वाटेल, व त्याच्या मदतीपासून आपल्याला अंशतः तरी उपयोग होईल. म्हणून त्याच्याशीं तह करण्याकरता व ही आनंदाची खबर त्याला कळविण्याकरिता पिलाजी व यशवंतराव पाठविण्याचा आमचा हुकूम होत आहे. यशवंतराव ! पिलाजीराव ! तुम्ही आज्ञेप्रमाणें निघण्याची तयारी करावी.

**यशवंतराव**
**पिलाजी** } —जशी आज्ञा.—

( ते जातात. )

**राजा**—शूरसेना, तुझी काय इच्छा आहे बोल.

**शूरसेन**—सरकार, विलासनगरीहून सरकाराज्ञेप्रमाणं या राज्याभिषेकाच्या समारंभाकरितां मी हजर झालों होतो. हें कार्य आटपलं आहे. तेव्हां मला आतां परत जाण्याची आज्ञा व्हावी.

**राजा**—आपल्या बाबांजवळून तुला परवानगी मिळाली का? आर्तवीर्य, आपलं काय म्हणणं आहे ?

**आर्तवीर्य**—सरकार, मुलानं माझा अगदीं पिच्छा पुरविला. तेव्हां एकदा सरतेशेवटीं मोठ्या कष्टानं मी हो म्हटलं. दुसरं काय !

**राजा**—बरं आहे. शूरसेना, संभाळून जा. विद्येकडे नीट लक्ष दे. अरे बाबा, तूं तरुण आहेस, तेव्हां मौजा मारण्याचे दिवस आहेत तुझे.

**आर्तवीर्य**—खाविंद, या मुलाला जाण्याला आपला ही हुकूम व्हावा.

( शूरसेन मुजरा करून जातो. )

**राजा**—असो. बाळा वीरसेना !

**वीरसेन**—( एकीकडे ) अरे ! या काळ्या सर्पाचं बाळ म्हणून घेण्याचा प्रसंग मजवर यावाना !

**राजा**—[illegible] ! तूं अजून असा थंडावलेला कां ?

**वीरसेन**—[illegible] ! आतां अखंड ऊन खातों आहे. तेव्हां कुठची थंडी [illegible]

**राणी**—बाळा वीरसेना ! आतां हें दुःख पुरे कर; हा उदा-[illegible] अरे, असा एक सारखा खालीं मान घालून [illegible] बसत असतास आणखी डोळ्याचं पाणी क्षणभर [illegible] नाहींस, याला म्हणावं तरी काय ? जे झालं तें आतां पुनः परत येणार आहे का? त्यांचा तुझ्यावर मोठा जीव; आणि तूं ही पण त्यांना घटकाभर सोडीत नव्हतास. पण बाळा, आतां काय करायचं! आपल्या सगळ्यांची हीच गत आहे. आज ते गेले. उद्या आपल्याला ही जायचं आहे. पण खाणं, पिणं, उठणं बसणं हें कोणाला सुटलं आहे का ? ही जन्माची रहाटीच आहे.

**वीरसेन**—आईसाहेब, खरी गोष्ट आहे !

**राणी**—तर मग तूं ती कांहीं एक विशेष गोष्ट आहे असं कां दाखवतोस ?

**वीरसेन**—आई! तुमचा 'दाखवणं' नाहींग. खरोखर, मला ती गोष्ट विशेषच वाटते ! अग, माझं हें पांढरं पागोटं किंवा

क्षार अथवा अनवाणी चालणं, गोड टाकणं, विडा न खाणं तसेच हे हुंदके, ही डोळ्यांतली टिपं, चेहऱ्यावरली ही म्लानी, हे सर्व दुःख दाखविण्याचे प्रकार बाहेर दिसतात. पण यांनी माझ्या दुःखाचं खरं स्वरूप दिसत नाहीं. कारण, हे प्रकार एखाद्या सों-गाड्यालाही करून दाखवितां येतील. पण माझ्या या हृदयांत जें कांहीं होऊन राहिलं आहे, तें दाखवितां येतच नाहीं ग !

**राजा**–वीरसेना ! तूं आपल्या पित्याच्या दुःखाबद्दल हीं जीं चिन्हं धारण केलीं आहेस हें तुला खरोखर मोठं भूषण आहे. पण असं पहा कीं तुझ्या वडिलांचे वडील गेलेना? त्या-प्रमाणें त्या वडिलांचे ही वडील स्वर्गस्थ झाले. असं हें रहाट-गाडगच आहे. जो जिवंत राहतो त्याला मेलेल्यांच्या सन्मानार्थ सर्व क्रिया कर्मं केलीं पाहिजेत. धर्माच्या आज्ञेनुसार अशौचादि दुःखदर्शनाचे प्रकार कांहीं काळपर्यंत केलेच पा-हिजेत. हें ठीकच आहे. परंतु, भलताच दुराग्रह धरून सारखं दुःखच करीत बसणं, हें महत्पाप आहे. एवढेंच नाहीं पण अगदीं नामर्दुमकीचं काम आहे. असं करणं ईश्वरेच्छे विरुद्ध आहे. अशा मनुष्याचं काळीज अगदीं कोमळ; मन अगदीं अधीर असून त्याची बुद्धी जड व अशिक्षित आहे, असं समजलं पाहिजे. कारण, जी गोष्ट खास घडणार, असं आपल्याला पक्कं ठाऊक आहे व जी हरहमेश घडतांना आपण पाहतों, ती घडून आली असतां तिजबद्दल आपण इतकं विव्हळ कां म्हणून व्हावं ? छीः, ईश्वराचा हा मोठा अपराध करणं आहे. आपल्या दुःखाश्रुंनीं आपल्या पितरांना त्रास होतो असं शास्त्र आहे. तेव्हां ही गोष्ट करणं म्हणजे सृष्टी विरुद्ध आहे, अगदीं अविचाराची आहे. कारण, सृष्टीच्या उत्पत्तिपासून आज पर्यंत अशीच गोष्ट घडत आली आहे. तेव्हां बाळा, आतां हे तुझं दुःख पुरे कर. मी तर तुला बापाच्या ठिकाणींच आहे.

तुझा बाप जिवंतच आहे असं समज. कारण, साऱ्या राज्यांत आम्ही अशी दंवडी पिटाविणार कीं, आमच्या या गादीचा वारस तूं आहेस. बापाचं पुत्रावर जसं प्रेम असतं, त्याही पेक्षां आमचं प्रेम तुझ्यावर अधिक आहे. आतां वाराणसी नगरीस विद्याभ्यास करण्याकरितां जाण्याचा जो तूं उद्देश मनांत धरिला आहेस तो आमच्या इच्छेच्या अगदीं विरुद्ध आहे. ह्मणून आमची तुला अशी प्रार्थना आहे कीं, तूं जाऊं नकोस. तूं नेहेमीं आमच्या छायेखालीं व नजरे खालीं रहावंस. आमच्या दरबारचा मुख्य सरदार व गादीचा वारस आणि आमचा पुत्र, अशा मानानं त रहावंस.

**राणी**—बा रा, वीरसेना, माझंही पण तुला पदर पसरून तूं ... सां... असं मागणं आहे. या आईच्या एवढ्या विनवणीचा अपमान करूं नकोस. ऐकलंस का !

**वीरसेन**—माझ्याकडून होईल तितकी, आईसाहेब ! मी आपली आज्ञा शिरसावंद्य करीन.

**राजा**—वा:, कसं बाळानं चांगलं उत्तर दिलं ! बाळा, तूं शहाणाच आहेस. या विचित्रनगरींत आमच्या ठिकाणींच तूं आहेस. ( राणीकडे पाहून ) कां चला आतां ! आज आमच्या या बाळा विरसेनाच्या मुखांतून दोन गोड शब्द ऐकिल्यापासून माझ्या जिवाला फार आनंद वाटत आहे. या आनंदप्रदर्शनार्थ तोफांची सरबत्ती होऊन एकंदर नगरवासी जनाला मेजवानीचा थाट केला पाहिजे. चला तर मग. जाऊं आतां.

( वीरसेना शिवाय बाकी सर्व ज तात. )

**वीरसेन**—अरेरे ! हें माझं दगडा सारखं जड निगरगट्ट शरीर बर्फा सारखं वितळून कां जाईना ! किंवा आकाशांतील वीज माझ्या अंगावर कडाडा कोसळून माझ्या शरीराचे असंख्य तुकडे कां होईनात ! आत्महत्या करणं हें अत्यन्त घोर

पातक आहे ह्मणून त्याचा निषेध प्रत्यक्ष भगवंतानं व धर्मशास्त्रानं केला नसता तर किती चांगलं झालं असतं? शिव शिव! शिव! या जगांतल्या एकंदर गोष्टी मला किती कं... वाण्या व निःसार वाटत आहेत! या जगांतलं जगणं मला कडू कडू विषतुल्य वाटतं आहे. जिकडे पहावं तिकडे मला भयंकर, शून्य दिसतं आहे. हें जगत् जीर्णारण्या प्रमाणं आहे. हर! हर! हर! हें विश्व हा एक सुंदर बगीच्या होय असं कांहीं कवींनीं म्हटलं आहे. छीः, छीः, छीः कोणी याला सुंदर बगीच्या म्हणावा? अरे, हें ज... आहे यांत काय संशय? जितकं कांहीं ... नासकं तेवढ्यानं अगदीं हें व्यापून ... आहे. हाय! हाय! शेवटी परिणाम असा व्हावा ना! ... मरून दोनच महिने झालि ना? छेः! पण अरे दोन सुद्धां ... पुरे झाले नाहींत. थोरले महाराज पण काय होते! 'राजाधिराज' हें ... खरोखर त्यांनां शोभत असे. त्यांच्यांत आणि ... किती अंतर! जमीन अस्मानाचं! 'कहां राजा भोज और ... गांगा तेली'! त्यांच्या पायाची धूळ देखील या हरामखोराच्या ललाटावर शोभणार नाहीं! थोरल्या महाराजांचं आमच्या मातोश्रींवर तरी किती प्रेम असे! वारा अम्मळ अधिक वाहूं ... गला तर त्याच्यापासून आई साहेबानां त्रास होईल म्हणून ... त्याचा राग येई! हे द्यावापृथ्वीनो! अरेरे! ही माझी स्मृति ... पहा कशी द्वाड याच प्रसंगीं अधिकाधिक जागृत होत आहे. माझी आई नेहमी बाबांच्या भोंवती भोंवती असे. काय त्या मिठ्या,—काय तो प्रेमरस!—आणखी हें सारं एकाच महिन्यांत अं!—अरेरे! नको नको तो विचार—स्त्रियांनां 'अबला' हें नांव अगदीं योग्य आहे! स्त्रियांचं मन चंचळ ह्मणतात तें अगदीं खरं वरं! कारण, अरे, एकच छोटासा महिना मधें गेला न गेला,—फार काय—तिच्या त्या रडरडून सुजलेल्या मानभावी डोळ्यांची सजही कमी झाली नाहीं तोच कीग ... —अरे

पापिणी! या कारभाऱ्यावर फिदा झालीस अँ! आणखी लागलीच त्याच्याशीं पाट ही लावलास! तुझी लाज एकदम कुठे ग नाहींशी झाली! अग! तूं बुद्धिहीन जड पशू झाली असतीस तर आणखी दोन दिवस तरी व्रतस्थ राहिली असतीस! एक महिन्याच्या आंतच सारं हें अँ! हाय! हाय! साक्षात् मदनमूर्ति, असे ते थोरले महाराज कुठे, आणखी हा रांडलेकाची अवलाद,—हा चेडमुळ्ळ कारभारी कुठे! अरे चोरा! पाहून घेईन रे पाहून घेईन. हरहर! हर! या कृत्याचा एकंदर शेवट फारच कडू होणार यांत शंका नाहीं. अरेरे! हें माझें हृदय फुटून जाईल तरी बरं—कारण मला ही जीभ आवरून धरली पाहिजे!

( हरसेन व दौलतराव येतात. )

**हरसेन**—सरकारांचा जयजयकार असो!

**वीरसेन**—हरसेनराव, गड्या, तुला पाहून मला फार आनंद झाला आहे; पण मी चुकलों तर नाहींना!

**हरसेन**—मीच तो सरकार. हरसेनच, आपला बंदा.

**वीरसेन**—गड्या, आपण आपलीं नांवं बदलूं. मीच आपला हरसेन अं! पण तें असो. हरसेना, खरच सांग, तूं वाराणशी सोडून कांवरं आलास? कोण, दौलतराव!

**दौलतराव**—जी सरकार.—

**वीरसेन**—वाः तूंही आलास, फार संतोषाची गोष्ट आहे. पण अरे, खरंच सांगा, तुम्ही दोघेही वाराणशी नगरी सोडून कां आलात?

**हरसेन**—दुसरं काय महाराज, आम्ही पडलों आपले फाटिंग भाइ, तेव्हां आलो भटकत भटकत झालं.

**वीरसेन**—छे:, तुझ्या वैऱ्यांनीं जरी अशी गोष्ट सांगितली तरी मी ती खरी मानणार नाहीं. तूं, आणखी फाटिंग, ही गोष्ट माझे

कान ऐकावयाचे नाहींत. काय वेड्या, आपली निंदा आपणच करून घेत आहेस ! या विचित्रपुरींत तुझं रे पण काय काम होतं ? आतां इथून परत जाईपर्यंत आपण मदिरेचे पुरे भोक्ते बनून जाणार !

**हरसेन**—थोरल्या महाराजांच्या दिवसा करितां येथे आलों होतो.

**वीरसेन**—अरे, तूं माझा सहाध्यायी असून माझा असा उपहास करितोस अं ? मला वाटतं तूं आमच्या आईसाहेबांच्या पाटाच्या समारंभा करितांच आला होतास ?

**हरसेन**—अहाहा ! खरं आहे महाराज! तो समारंभ लागलीच उरकला ! शिव ! शिव !

**वीरसेन**--याला म्हणावी काटकसर! काटकसर, वेड्या, ही काटकसर बरं ! अरे, बाबांच्या तेराव्या दिवसाच्या शिळ्या पुरणपोळींवर हा पाट उरकून घेतला.दुसरं काय ! छिः, हा दिवस प्रहाणं माझ्या नशीबीं आलं, त्यापेक्षा मला मरण आलं असतं तरी पुरवतं.—माझे बाबा—अरे, मला वाटतं, माझे बाबा मला दिसताहेत !

**हरसेन**—महाराज, कुठे ?

**वीरसेन**—हरसेना, अरे कुठे म्हणजे, माझ्या हृदयांत !

**हरसेन**—मी त्यानां एकदां पाहिलं होतं—महाराज फार चांगले होते बरं. राजा हे नांव त्यानां शोभत असे.—

**वीरसेन**—ते तरी मनुष्यच होते. पण एकंदरींत असा पुरुष कांहीं पुन्हा दृष्टीस पडायचा नाहीं.

**हरसेन**—मला वाटतं, मी काल त्यानां पाहिलं.

**वीरसेन** -पाहिलंस ! कोणाला ?

**हरसेन**-सरकार, कोणाला ह्मणजे, काय? आपले वडील थोरले महाराज, त्यानं पाहिलं!

**वीरसेन**—थोरल्या महाराजांनां! माझ्या बाबांनां?

**हरसेन**—सरकार, अगोदर ऐकावं. विस्मय व्हायचा तो मग पुढें. या दोन गृहस्थांसमक्ष घडलेला चमत्कार मी कथिलेलें ऐकून तर घ्यावा!

**वीरसेन**—असं अं! तर मग खचीत ऐकला पाहिजे. काय, काय अं चमत्कार घडला!

**हरसेन**—हे दौलतराव व बहिरोजीराव पहाऱ्यावर असतां ऐन मध्यरात्रीं यांना त्या पिशाच्यानं पछाडलं. थोरल्या महाराजांच्या सारखी नखशिखांत एक चिलखत चढविलेली आकृति यांच्या समोरून सावकास, हळू हळू, पण मोठ्या डौलानें यांच्या जवळून गेली! एका भाल्याच्या अंतरावरून भयाभित झालेल्या अशा त्यांच्या डोळ्यासमोरून स्वारी तीन वेळ गेली. हे दोघे तर अगदीं भयानें गर्भगळित होऊन त्यांची बोबडी वळून गेली होती आणि त्यांच्या तोंडांतून एक शब्द देखील बाहेर उमटेना. ही गोष्ट त्यांनीं मला अगदीं एकांतात सांगितल्यावरून मी तिसऱ्या रात्रीं पहाऱ्यावर उभा राहिलों. तिथें पहातो तों, त्यांनीं सांगितला होता तोच वेळ, तसाच आकार, अशा थाटानें तें पिशाच आलं! थोरले महाराज माझ्या चांगल्या ओळखीचे होतेच.

**वीरसेन**—पण अरे, हें सर्व कुठे झालं?

**दौलतराव**—त्या दिवशीं आम्ही त्या पहाऱ्यावर होतो ते, त्यांच किल्ल्याच्या पटांगणावर.

**वीरसेन**—मग तुम्ही कांहीं त्याच्याशी बोलला नाहीं?

**हरसेन**—मी बोललो पण त्यानं जबाब ह्मणून दिला नाहीं, तरी पण एकदा मला वाटलं डोकं वर करून कांहीं बो-

लण्याच्या बेतात होतं तों इतक्यांत पहाटचा कोंबडा आरवला. त्याच्या त्या आरवण्या बरोबर ते अगदीं कुणीकडे नाहींसच होऊन गेलं !

**वीरसेन**—हा मोठा मोठा चमत्कार आहे!

**हरसेन**—या गळ्याशपत महाराज, यांत एक शब्दही खोटा नाहीं ! आणखी त्यावेळेस आम्हाला असं वाटलं—कीं ही गोष्ट आपल्या कानावर घालावी हें आमचं कर्तव्य कर्म आहे.

**वीरसेन**—वाहवा! शाबास गड्यानो! पण हें ऐकून माझं मन उद्विग्न झालं आहे. आज तुमचा पहारा आहे का ?

**दौलतराव**
**बहिरोजीराव** }—जी सरकार.

**वीरसेन**—काय म्हणता ? तें हत्यार बंद होतं ?

**दौलतराव**
**बहिरोजीराव** }—जी सरकार, हत्यारबंद.

**वीरसेन**—चिलखत, शिरस्त्राण वगैरे आयुधं अगदीं नखशिखांत चढविलीं होतीं ?

**दौलतराव**
**बहिरोजीराव** }—जी सरकार, अगदीं नखशिखांत.

**वीरसेन**—तर मग तुम्हाला त्याचा चेहेरा दिसला नसेलच?

**हरसेन**—हो हो, दिसला तर ! त्यानं तोंडावरचं मुखत्राण वर केलं होतं.

ळ आहे**रसेन**—त्याची मुद्रा रागीट दिसली का ?

रं प्रेम न**ा**—चेहेऱ्यावर रागापेक्षां दु:खाची छाया जास्त

काचं फूल

**वीरसेन**—त्याचा चेहेरा फिक्कट दिसत होता का अगदीं लाल होऊन गेला होता?

**हरसेन**—छे:, अगदीं फिक्कट दिसला.

**वीरसेन**—तो तुमच्याकडे न्याहाळून पहात असे का?

**हरसेन**—हो. अहो, एकसारखी त्याची नजर आमच्याकडे होती. पे.

**वीरसेन**—अरेरे, मी तिथें असतों तर फार बरं झालं असतं!

**हरसेन**—आपण त्याला पाहिल्याबरोबर अगदीं गांगरून गेला असतां !

**वीरसेन**—गेलो असतो खरा! बराच वेळ होतं का तें तिथें?

**हरसेन**—हजार शंभर अंक मोजीतोंपर्यंत होतं.

**दौलतराव**
**धाहिरोजीराव** —छे हो! असं कां, बराच वेळ होतं!

**हरसेन**--मी पाहिलं तेव्हां नव्हते बोवा फारवेळ!

**वीरसेन**—मी आज रात्रीं पहाऱ्यावर त्याची वाट पाहात बसणार. न जाणो कदाचित् आज ही तें येईल !!

**हरसेन**—कदाचित् कां? मी खात्रीनें सांगतो, कीं तें येईलच.

**वीरसेन**—माझ्या बाबांच्या सारखंच रूप जर तें घेऊन येईल तर प्रत्यक्ष कृतांतानं जरी नको म्हणून सांगितलं तरी मी त्याच्याशीं बोलणार. माझं तुम्हां सर्वांपाशीं येवढंच मागणं आहे कीं अजून पर्यंत जर ही गोष्ट तुम्हीं कोणाजवळ बोललां नसाल तर ती पुढें ही तशीच ठेवा. आणखी आज रात्रीं जें जें म्हणून कांहीं घडेल, तें तें फक्त आपल्या मनांत ठेवा. कोणा[ला] ? बोलूं नका. ह्या उपकारांची मी फेड करीन. या[...] या आतां. आज रात्री त्याच्या जागेवर अकरांच्या अ[...]णून दिला [...]च्या दरम्यान आपली फुन्हा भेट होईलच. कांहीं बो-

**वीरसेन**—या तर मग. [ वीरसेना खेरीज बाकी सर्व निघून जातात ] आमचे बाबा, आणखी पिशाच्चरूप घेऊन, आणि त्यांत हत्यारबंद ! छेः; चिन्ह कांहीं ठीक दिसत नाहीं ! कांहीं तरी घातपात आहे ! आतांच जर रात्र असती तर बरं झालं असतं. पण नाहीं त्या अर्थी हे अंतरात्म्या ! ती येईपर्यंत जरा शांत रहा ! दुष्कृत्यें पाताळांत जरी नेऊन लपवलीं तरी तीं उघडकीला यायचीच ! ( जातो. )

---

## प्रवेश ३.

( स्थळ ) आर्तवीर्याच्या वाड्यांतला दिवाणखाना.

**शूरसेन व चंद्रकला येतात.**

**शूरसेन**—माझं सगळं सामान सुमान गलबतावर चढविलं आहे. तर आतां मी येतों अं ताई ! आतांशा वारा चांगला वहातो. गलबतावर बंदोबस्तही चांगला असतो. तेव्हां गलबतं वरचेवर येतात जातात. तर इकडचा समाचार नेहमी कळवीत जा. अळस करूं नकोस.

**चंद्रकला**—दादा, मी कधीं पत्र पाठविण्यांत अळस करणार नाहीं.

**शूरसेन**—पण हो. बरी आठवण झाली. तुला त्या वीरसेनाविषयीं थोडसं सांगायचं आहे. ताई, वीरसेनानं ज्या कांहीं तुला प्रीतीच्या खुणा दिलेल्या आहेत, त्यावरून त्याची तुझ्यावर खरी प्रीति आहे, असं समजूं नकोस. ते सर्व कामविकाराचे खेळ आहेत. कामव्यथितांची अशीच रीत असते असं समज. हें खरं प्रेम नव्हे, तर, हें आयुष्याच्या तारुण्यग्रीष्मांतील पारिजातकाचं फूलच आहे. पारिजातकाच्या फुलाप्रमाणं हें …

फार लौकर उद्भवतं आणि लौकरच नाशही पावतं. वीरसेनाचं तुझ्यावरलं हें प्रेम हें ही मोठं मधूर, पण अगदीं क्षणभंगूर आहे असं समज. याचा देखील गंध क्षणभरच टिकणारा आहे. यापेक्षा त्यांत कांहीं जास्त नाहीं.

**चंद्रकला**—दादा, असंचना ?

**शूरसेन**—हो असंच. याच्या पेक्षा त्यांत कांहीं जास्त अ-[illegible] विचार बिलकुल मनांत आणूं नकोस. कारण, प्राणी [illegible] जो मोठा होत जातो, तों तों, तो फक्त शरीरानं आणखी शरीरानें वाढत जातो असं नाहीं, तर शरीर वाढत चाललं म्हणजे त्याच्या बरोबर त्याचे विचार, त्याचा अनुभव आणि त्याच्या इच्छा, याही वाढत जातात. कदाचित् त्याची तुजवर आतां प्रीति असेल, आणि आतां त्याच्या मनामध्यें बिलकूल खोटमाळपणा किंवा कसली लचाडी नसल. परंतु, तो कोणत्या कुळांत उत्पन्न झालेला आहे इकडे व त्याच्या मोठेपणा कडे लक्ष दिल असतां तुला इतकं सहज कळून येईल कीं, त्याचा तो मालक नाहीं. त्याला आपल्या इच्छे प्रमाणंच चालतां येणार नाहीं. त्यानं ज्या कुळांत जन्म घेतला आहे, त्या कुळाला उचित असंच त्याला वर्तन ठेवलं पाहिजे. आम्हां सारख्या गरीब लोकांप्रमाणं वीरसेनाला स्वतः कांहींच करितां येणार नाहीं. कारण, राज्याची बळकटी आणि सुरक्षितपणा, हीं त्याच्या चन्या किंवा [illegible]ट निवडणुकीवर अवलंबून आहेत. आणि, म्हणून या राष्ट्रांतील सर्व लोक जी गोष्ट सांगतील तीच त्याला मान्य केली पाहिजे. त्यांच्या म्हणण्या बाहेर वीरसेनाला अगदीं जातां येणार नाहीं. बरं, इतकं ही असून जर तो 'माझी तुझ्यावर प्रीति आहे' असं तुला म्हणतच असेल, तर त्याला ती आपल्या कृतीनं जितकी खरी करून दाखवितां येईल तितकीच आहे, जास्त नाहीं, असं समज. कारण, विचित्रपुरीतील लोकांच्या इच्छे बाहेर ती कधीं नसायचीच. आणखी, जर त्याचे ते प्रेमालाप अगदीं भोळेपणानं ऐकून घेऊन तूं आपलं

हृदय त्याच्या स्वाधीन करून टाकशील, आणि त्याच्या त्या मदनप्रेरित प्रार्थनांना भुलून जाऊन, आपलं कौमार्यभांडार त्याला खुशाल लुटूं देशील, तर तुझ्या अब्रूला किती धक्का बसेल याचाही पुरतेपणी विचार कर. चंद्रकले, सावध रहा बरं. तूं आपल्या मनोविकारांच्या अगदीं आधीन होऊं नकोस. वासनेच्या तावडींत अगदीं कशी ती सापडूं नकोस. आपल्याला कलंक लागू नये म्हणून नेहेमी सावध रहाणाऱ्या कुमारिकेनं आपलं सौंदर्य, त्या कलंकी चंद्राला दिखील दाखवूं नये. अग, प्रत्यक्ष सद्गुण दिखील लोक दोष दिल्या वाचून रहात नाहींत. कधीं कधीं वसंतऋतूंतील पुष्पांच्या कळ्या बनल्या नाहींत, तोंच त्यांना कीड लागते. आणि तारुण्याच्या उदयकालीं तर सद्गुणकलिकेला कीड लावणाऱ्या गोष्टी अगदीं जवळच असतात. असल्या गोष्टींचं भय बाळगणं हेंच उत्तम. तारुण्याचा असा कांहीं प्रभाव आहे कीं, त्यांत आपोआप मनुष्याला व्यसनं लागतात. त्याला दुसऱ्या तिसऱ्या गोष्टींची गरज लागतच नाहीं.

**चंद्रकला**—दादा, हा तुझा चांगला उपदेश मी आपल्या मनांत अगदीं खडान्खडा साठवून ठेवीन. पण दादा, एखाद्या आतांच्या वेदांत्याप्रमाणं मला मात्र हा मोक्षप्राप्तीचा कठीण मार्ग दाखवून देऊन आपण खुशाल एखाद्या चैनी मनुष्या सारखं ऐष आरामांत राहायचं, असं मात्र करूं नकोस हो!

**शूरसेन**—ताई, तूं माझ्याविषयीं अगदीं काळजी करूं नकोस.—पण आतां मला भारी उशीर झाला. हे पहा आपले बाबा आले!

[ आर्तवीर्य येतो. ]

आणखी एकदा आशिर्वाद मिळण्याचा हा चांगला प्रसंग आला आहे! जितक्यान्दा आशिर्वाद मिळतील तितकं चांगलंच.

**आर्तवीर्य**—अरे, अजून तूं इथेच? जा, जा, लवकर

जा. गलबतावर शिडं दिखील उभारलीं. तुझ्या करितां वाट पहातांहेत. जा, चिरायुषीहो. पण एवढे दोन उपदेशाचे शब्द सांगतों, ते मात्र नीट लक्षांत ठेव. आपले विचार कोणी पुसल्याखेरीज कधी आपल्या मुखावाटे बाहेर काढूं नकोस. एखादा भलताच्या भलता विचार मनांत आला तर तत्क्षणीं त्याप्रमाणें तूं करूं नकोस. लोकांशी चांगला मिळून रहात जा; पण आपल्या अंगांतील हलकटपणा शिरूं देऊं नकोस. तुझे जे मित्र असतील त्यांची चांगली परिक्षा केल्या नंतर त्यांना आपल्या गळ्यातले ताईत असं मान, त्यांना आपल्या हृदयांतील अधिदैवत करून ठेव. ज्यानां बिलकूल अनुभव नाहीं अशा लोकांशी स्नेह करूं नकोस. कोणत्याही भांडणांत पडण्याच्या अगोदर चांगली सावधगिरी ठेव. परंतु एकदां आंत पडलास ह्मणजे तुझी वर्तणूक अशी असूंदे कीं तुझा प्रतिपक्षी तुला भिऊन वागेल. प्रत्येक मनुष्याचं ह्मणणं ऐकून घेत जा; पण आपला निर्णय तूं आपल्या पाशींच ठेव. आपल्याजवळ पैसे असतील त्या मानानं आपला पोषाख करावा; परंतु तो छिचोरपणाचा दिसूं नये. पोषाख उंची असावा, परंतू त्यांत भपका नसावा. कारण, बहुधा मनुष्याची किंमत त्याच्या पोषाखावरून करतात. विलास नगरींतले बडे बडे लोक तर या गोष्टींत मोठे तरबेज आहेत. कधीं कोणाला कर्ज देऊं नकोस आणि कोणापासून घेऊं नकोस. कारण, कर्ज दिलं असतां कधी कधीं कर्ज ही बुडतं आणखी ज्याला द्यावं त्याचा स्नेहही बुडतो. कर्ज काढण्याची सवय लागली कीं सहजच काटकसर नाहींशी होते. पण सगळ्यात मुख्य गोष्ट सांगायची राहिली आहे ती ही. तूं आपण स्वतः नीतीनं वाग, आणखी असा तूं वागलास म्हणजे दुसऱ्याशीं लबाडीनं वागावं असं तुझ्या मनांत येणारच नाहीं. जा तर मग आतां. माझ्या आशिर्वादान हा उपदेश तुझ्या मनावर पक्का ठसो.

**शूरसेन**—मी आपल्याला नमस्कार करतों बाबा, आणखी आपला निरोप घेतों.

**आर्तवीर्य**—जा आतां उशीर झाला.—ते चाकर लोक तुझी वाट पहाताहेत.

**शूरसेन**—ताई, मी येतों अं आतां. मी सांगितलेल्या गोष्टी चांगल्यां ध्यानांत ठेव हो.

**चंद्रकला**—दादा, मी नाहीं हो विसरणार. तूं सांगितलेल्या साऱ्या गोष्टी मी लक्षांत ठेवीन.

**शूरसेन**—बरं तर, येतों मी अं?

(जातो.)

**आर्तवीर्य**—चंद्रकले, काय सांगितलं आहे ग त्यानं तुला?

**चंद्रकला**—विशेष कांहीं नाहीं. वीरसेनमहाराजांविषयीं कांहीं आहे.

**आर्तवीर्य**—हो बरी आठवण झाली! मीं असं ऐकलं आहे कीं, आताशां महाराजांची स्वारी तुझ्याकडे येऊन बराच वेळ बसत असते, आणखी तूंही त्यांच्याशीं खुशाल हवी तेवढी बोलत बसतेस. असं जर असेल तर तुला बजावून सांगतों कीं आपल्या अब्रूला आणखी कुळाला काय योग्य आहे हें तुला बिलकुल कळत नाहीं. त्याचं आणि तुझं कायग येवढं चालतं? खरं सांग.

**चंद्रकला**—दुसरं काय बाई चालायचं आहे? आताशा किनई बाई ते माझ्यावर फार लोभ दाखवितात.

**आर्तवीर्य**—लोभ! अं: अगदींग भाबडी तूं! अग, तुला या असल्या गोष्टींचा अगदीं अनुभव नाहीं. तूं त्याचा तो लोभ खरा का मानतेस?

**चंद्रकला**—मला त्यातलं कांहीं कळत नाहीं.

आर्तवीर्य—हं. हं ! अग मी तुला शिकवितो बघ. तूं अजून पोर आहेस. तूं तेव्हांच फसशील. ज्याला तूं खरा लोभ ह्मणतेस तो सारा लटका आहे. जरा धातांचेतानं वागावं, नाहीं तर, काय ह्मणतात तें, तुमचं देवभलं करो—नाहीं आठवत बोवा—आमचा फजीता करून टाकशील ! दुसरं काय ?

चंद्रकला—बाबा, त्याचं बोलणं चालणं मला अगदीं रीतीचं दिसलं.

आर्तवीर्य—रीतिचं अं ! छट् ! हावेडे !

चंद्रकला—बाबा, कां बरं नसावं ? त्यांनीं प्रत्येक शब्दागणिक आणाशपथा वाहिल्या किहो.

आर्तवीर्य—हा वेडपे ! अग, त्या आणाशपथा नव्हेत; तर तीं गरीब बिचाऱ्या पाखरानां धरण्याकरितां पसरलेलीं जाळीं ! मला पक्कं ठाऊक आहे कीं कामामी एकदां पुरतेपणीं भडकला म्हणजे मग काय आणावर आणा आणखी शपथावर शपथा ! तर तुला सांगतो, मोठ्या बेतानं वागत जा, फारशी त्याच्या दृष्टीस पडूं नको. तो आलारे आला कीं लागली लुगू लुगू करायला ! असं नाहींहो कामाचं ! वीरसेन म्हणशील तर तो तारुण्याच्या ऐन भरांत आहे. आणखी, तो पुरुष आहे, म्हणून तुझ्यापेक्षां त्याला स्वातंत्र्य जास्त आहे. बेटा, तुला थोडक्यांत सांगतों. तूं त्याच्या त्या लाडीगुडीच्या भाषणांवर आणखी शपथांवर अगदीं विश्वास ठेऊ नकोस. त्याच्या शपथा तुम्हासारख्या अल्लड पोरीनां कुमार्गाला मात्र लावतात. सरशेवटीं तुला एवढं स्पष्ट सांगून ठेवतों कीं, आजपासून त्या वीरसेनमहाराजांशीं खबरदार हंं तंस बोलत बसलीस तर ! माझ्या नाहीं कामाला पडायचं ! समजलीस ! चल माझ्या बरोबर.

चंद्रकला—मी तुमच्या आज्ञेबाहेर इतकी सुद्धा जायची नाहीं.

—जातात—

## प्रवेश ४ था.

### (स्थळ) किल्ल्याच्या पुढलें पटांगण.

### वीरसेन, हरसेन व दौलतराव.

**वीरसेन**—अरे, काय गार वारा सुटला आहे हा! अंगाला कसा झोंबतो आहे!

**हरसेन**—छे बोवा, आज थंडीचा फारच कडाका पडला आहे. झाडावरचीं पानं दिखील गळून पडायचीं!

**वीरसेन**—आतां किती वाजले असतील रे?

**हरसेन**—आतां बारांचा अम्मल असावा.

**वीरसेन**—छेः हो. बारा केव्हांच वाजून गेले!

**हरसेन**—खरंच कीं काय? मी कांहीं ऐकले नाहींत बोवा! तर मग तें पिशाच येण्याचा वेळ झालाच ह्मणायचा. (तोफ होते व लागलीच सुस्वर वाद्यें वाजूं लागतात) महाराज, हें काय बरं ऐकूं येतं आहे?

**वीरसेन**—अरे, काय म्हणून काय पुसतोस? तुला नाहीं का ठाऊक? आज वाड्यांत मोठी मेजवानी आहे. त्या मेजवानीचा अगदीं थाट उडून राहिला आहे, आणि तिथे यथेच्छ मदिरापानांत मंडळी कशी गर्क होऊन गेली आहे!

**हरसेन**—इथे कां हम्मेश असाच प्रकार चालतो?

**वीरसेन**—होय बोवा, असाच चालतो. ही अशी चालच पडून गेली आहे. पण मी जरी इथला नेहेमीचा राहणारा आहें आणखी जन्मापासून हें मी बघत आलों आहें, तरी पण ही चाल चालविण्यापेक्षां मोडण्यांत अधीक प्रतिष्ठा आहे, असं मला वाटतं. एकंदरींत, या राज्यांतले लोक मोठे प्रतापी, शूर नी अ-

नेकगुणसंपन्न असे खरे. परंतु ह्या एका दुष्ट चालीपासून त्यांच्या नांवाला कळंक लागून राहिला आहे.

**हरसेन**—महाराज, पहा पहा! तें आलं बरं का—

( पिशाच येतें- )

**वीरसेन**—हे इंद्रादिदेवहो! आह्मां सर्वांचं रक्षण करा. तू कोणी सत्पुरुष, अथवा यक्ष किन्नर असशील किंवा दुष्ट पिशाच्य असशील; या भूतलावर संचार करण्यांत तुझे हेतू बरे असोत अगर वाईट असोत, तरी पण तू असें कांहीं स्वरूप धारण केलं आहेस कीं, तुझ्याशी बोलल्या शिवाय माझ्यानें रहावतच नाहीं. मी तुला 'बाबा' म्हणेन, 'राजाधिराज' म्हणेन! बाबा माझ्याशी बोलाच. मला या कामीं अज्ञानांत ठेवूं नका. आपण ह्या मृत्यु लोकाचा पसारा सोडून गेल्यानंतर अखंड अविनाशी सुखाचा उपभोग घेत असतां, या भूतलावर पुन्हा कशा करितां अवतरलांत? बाबा, स्मशानभूमीमध्यें आपला देह अग्निनारायणाला अर्पण केला असतां व आपल्या अस्थी गंगेंत टाकल्या असतां पुन्हा तोच देह धारण करून कां बरं आलांत? आपला पूर्वीचा देह नष्ट झाला असून या पिशाच्याच्या रूपानं पुनरपि चिलखत घालून व सर्व आयुध घेऊन या चांदण्यांत हिंडतां, आणि या रात्रीं असा हा भयंकर वेश धारण करून आजन्मात् आह्माला माहित नाहीं, किंवा ज्यांची आम्हाला कल्पनाही करितां येत नाहीं, अशा या कृतींनीं आह्मां मर्त्यांनां भिवडवून टाकतां! सांगा बरं याचं काय कारण तें? काय बरं हेतु असावा? आम्ही काय करावं अशी आपली इच्छा आहे?

[ पिशाच वीरसेनाला खुणावतें. ]

**हरसेन**—महाराज, तुह्माला तें खुणावतं आहे. तुह्माला कांहीं तरी एकांतांत सांगावं अशी त्याची इच्छा आहे.

**दौलतराव**—तें पहा किती मोठ्या आर्जवानं इथून आपण वरंच लांब यावं अशा अर्थानं खुणावतं आहे. पण सरकार, जाऊं नका हो !

**हरसेन**—छेः छेः, नाहींच जायचं.

**वीरसेन**—तें माझ्याशीं इथे कांहीं बोलणार नाहीं. मग मला गेलंच पाहिजे.

**हरसेन**—नका. नका. महाराज, आपण जाऊं नका.

**वीरसेन**—कां ? त्यांत कशाची भीति आली आहे ? माझ्या जिवाची मला बिलकुल पर्वा नाहीं. आणि माझ्या आत्म्याविषयीं जर म्हणाल, तर तो अमर आहे, त्याला तें पिशाच्च काय करणार ? तें पहा मला फिरून बोलावित आहेः आपण तर जाणारच !

**हरसेन**— महाराज, आपल्याला जर त्यानं एखाद्या नदीच्या डोहाकडे नेलं, किंवा समुद्रकाठावरील एखाद्या तुटलेल्या कड्यावर नेऊन, आणखी त्या ठिकाणीं एखादं अक्राळविक्राळ स्वरूप धारण करून आपली सर्व विचारशक्ति आणि बुद्धि हीं नष्ट करून जर त्यानं आपल्याला वेड लावलं तर कसं वरं होईल ? पहा, नीट विचार कराः ज्या ठिकाणाहून समुद्र हजारों वाव खोल आहे असा दिसतो, आणखी त्याच्या प्रचंड गर्जना स्पष्टपणें खोल खालीं ऐकूं येतात, त्याठिकाणीं गेलं असतां तें पाहिल्याबरोबर माणसाला आपलं वाटतं–खालीं उडी घ्यावी. त्याला दुसरं कांहीं कारणच लागत नाहीं. विचार करा !

**वीरसेन**–तें अजून मला बोलावतं आहेः—चल चल, हा आलोंच तुझ्या मागुन !

**हरसेन**-सरकार, आपल्याला आम्हीं नाहींच जाऊं देत.

**वीरसेन**-चल कांढ हात !

**हरसेन**—महाराज ऐका ; नका जाऊ !

**वीरसेन**—माझं नशीब ओढावतं आहे रे ! यावेळेस माझ्या अंगांत भीमाची शक्ति आली आहे. माझ्या शिरान् शिरा कशा तटाटून गेल्या आहेत—( पिशाच बोलाविते ) मला एकसारखं तें बोलावतं आहे. चला सोडा हात. ( त्यांच्या हातून निसटून ) जो यावेळेस आडवा येईल त्याचा मी मुडदाच पाडीन ! ऑ ! हे, निघा. ( पिशाचास ) हे, व्हा पुढें. आलों, हा मी आलों.

**हरसेन**—तो अगदीं बहकून गेला आहे.

**दौलतराव**—चला त्याच्या मागं जाऊ. त्याचं ऐकायचा हा वेळ नाहीं.

**हरसेन**—चला चला, त्याच्या मागून. याचा परिणाम काय बरं होईल !

**दौलतराव**—या विचित्रपुरींत कांहीं तरी पापकर्म झालं आहे, यांत कांहीं संशय नाहीं.

**हरसेन**—परमेश्वरासच काळजी त्याची ! चला त्याच्या पाठीमागं.

( सर्व जातात. )

---

## प्रवेश ५.

( पटांगणाचा दुसरा भाग. )

[ **पिशाच** व **वीरसेन** येतात. ]

**वीरसेन**—आतां तूं मला नेणार तरी कुठे ? बोल. मी याच्या पुढं खचित येणार नाहीं.

**पिशाच**—ऐक.

**वीरसेन**—ठीक आहे. ऐकतों. चालूं दे.

**पिशाच**—माझी वेळ आतां अगदीं जवळ आली. म पुनः नरकयातना सोशीत एखाद्या वडावर किंवा पिंपळावर सून राहिलं पाहिजे.

**वीरसेन**—अहारे बिचाऱ्या पिशाच्च्या !—

**पिशाच**—माझ्याविषयीं नुसती तुला दया वाटून, उपयोग? तर मी आतां ज्या गोष्टी तुला उघड करून सांग त्यांच्याकडे चांगलं लक्ष्य असूं दे.

**वीरसेन**—बोल. तुला पुरतेपणी ऐकण्याचं माझं कर्तव्य आहे.

**पिशाच**—माझं म्हणणं ऐकून घेतल्यावर सूड घेणं तुझं कर्तव्यच आहे

**वीरसेन**—काय ?

**पिशाच**—मी तुझ्या बापाचं पिशाच आहे. मी जिवंत असतांना केलेल्या पापकर्मांच्या प्रायश्चित्तार्थ कांहीं काळपर्यंत उपाशीं राहून यातना सोसाव्या व रात्रभर भूतलावर संचार करावा, अशी मला यमधर्माची शिक्षा आहे. माझ्या कारागृहाच्या कांहीं गुप्त गोष्टी आहेत त्या सांगण्याची मला सक्त मनाई आहे. नाहीं तर मी तुला अशा कांहीं गोष्टी सांगितल्या असत्या कीं, त्या ऐकून तूं जिथल्या तिथे थंड गार पडला असतास; तुझे दोन्ही डोळे रक्तासारखे लाल झाले असते, आणि तुझ्या सर्वांगावरचे केंस सायाळीच्या काट्यासारखे उभे राहिले असते! परंतु; आमच्या वेताळाच्या दरबारांतील गोष्टी तुझ्या चर्मेंद्रियाला कळविण्याची मोकळीक नाहीं. ऐक रे ऐक ! आपल्या बापावर

**वीरसेन**—अरे ! देवा !

**पिशाच**—तर त्याच्या भयंकर खुनाबद्दल सूड घे.

**वीरसेन**—खून !

**पिशाच**—होय, खून, खून. हाय, हाय! कसलं भयंकर आणि अलौकिक दुष्ट कृत्य तें !

**वीरसेन**—सांग सांग, सांग कोणचं कृत्य तें कीं, मी मनाच्या धावेबरोबर त्याचा सूड उगवण्यास जातों !

**पिशाच**—वाः, शाबास, तुझी योग्यता तशीच आहे. पण हें काम बजावण्यांत जर काई मात्र हयगय करशील, तर तूं एक मनुष्यरूपी अजगर आहेस असंच समजलं पाहिजे. वीरसेना, मी सांगतों ऐक. लोकांची समजूत अशी आहे कीं, मी बागेंत निजलों असतांना मला भुजंगदंश होऊन माझा अंत झाला. परंतु, ही निवळ गप्प असून विचित्रपुरीच्या लोकांची या कामांत अगदीं भलती समजूत केली आहे. हे तरुण राजपुत्रा! तूं असं पक्कं समज कीं, ज्या भुजंगानं तुझ्या बापाचा जीव घेतला, तोच भुजंग आज तुझ्या आईचा भुजंग होऊन हल्लीं या राज्याचा धनी होऊन बसला आहे !

**वीरसेन**—अरेरे ! मला वांटलंच होतं बरं असं ! तो दुष्ट दुरात्मा रमाकांत ?

**पिशाच**—होयरे होय ! तोच दुष्ट दुरात्मा, चांडाल नरपशु! त्यानंच आपल्या जादुगिरीनं आणि आपल्या मोह पाडणाऱ्या व विश्वासघातक अशा दुष्ट युक्तींनीं तुझ्या दिसण्यांत सद्गुणी अशा आईच्या पातिव्रत्याचा भंग केला ! बाबा ! वीरसेना ! तुझ्या आईनं जी ही निवड केली तिला म्हणावं तरी काय ! ज्या माझं तुझ्या आईवर पाणिग्रहणा पासून शेवटपर्यंत अस्खलित प्रेम होतं त्या मला तुच्छ मानून ती त्या दुः

दुरात्म्या अधम रमाकांतावर फिदा झाली ! पण खरा सगुण, जसा एकाद्या नरकवासी पिशाच्यानं मोह पाडला असतां तो ढळत नाहीं, त्याच प्रमाणें दुर्गुणाचा देवदूताशीं समागम होऊन त्याला जरी स्वर्ग सुखांत ठेवलं असलं, तरी उकिरडा फुंकल्या खेरीज तो कधींही राहणार नाहीं. पण अरे, मला वाटतं आतां पहाट झाली. तेव्हां मी आतां तुला बागेचा वृत्तांत थोडक्यांत सांगतों: मी नेहमीं दुपारीं क्षणभर बागेंत जाऊन झोंप घेत असें. अशी ही उत्तम संधी ए..., तो दुष्ट रमाकांत चोरून बागेंत आला आणि त्यानें आपल्या बरोबरं हालाहला सारखं जाहलीम वीष एका कुपींत घालून आणलं होत, तें त्यानं माझ्या कानांत ओतलं ! असं हें झाल्या बरोबर शरीरांत जसा पारा भिनतो त्याप्रमाणं माझ्यां अंगां सर्वत्र तें वीष भिनून त्यानं माझ्या अंगाचा भडका करून दिले आणि ज्याप्रमाणं दुधांत अंबट ताकाचे थेंब घालतांच दही बनतं त्याप्रमाणं माझ्या पातळ रक्ताची अवस्था होऊन गेली. असं हो. तांच माझ्या सर्वांगावर एकदम फोड उठले आणि माझ्या अंगाचीं गुळगुळीत व मऊ कातडी रक्तपितीच्या व्याधीनं ग्रस्त झालेल्या मनुष्या सारखी झाली. या प्रमाणं त्या दुष्ट रमाकांताच्या हातानं मी निजलों असतां माझं राज्य, माझी राणी व माझा जीव, यांचा अपहार केला. फार काय सांगावं ! माझ्या पातकाची क्षमा परमेश्वरा जवळ मागण्याला सुद्धां मला अवधी दिला नाहीं ! मरण्यास मी सिद्ध नसतां मला त्यानं एकदम यमसदन दाखिवलं. हरहर ! भयंकर ! भयंकर ! अत्यंत भयंकर! वीरसेना, तुला जर काळीज ह्मणून असेल तर ही गोष्ट कधींही तूं सहन करूं नकोस. या कृत्याबद्दल पक्का सूड घे. ही विचित्र पुरीची गादी भ्रष्ट करून देऊं नकोस. पण या घोर कृत्याचं प्रायश्चित्त तूं त्या हरामखोराला हव्या त्या रीतीनं दे. परंतु कोणत्याही रीतीनं तूं आपल्या आईचा छळ करूं नकोस, किंवा कोणत्याही रीतीनं तिला दुखवूं नकोस. परमेश्वर तिला पाहून

येईल. तिचीं दुष्कृत्यं तिलाच जाचतील व तिची हृदयशल्यं तिला टोंचतील, येवढं बस आहे. बरं तर, मी आतां येतों. या रानांतील काजव्यांचं तेज अधिक अधिक फिकं पडत चाललं आहे: यावरून पहाट खास झाली. मी जातों तर आतां. वीरसेना! माझी आठवण ठेव.

( जातो. )

**वीरसेन**—हे इंद्र! हे मित्रावरुण हो! हे द्यावापृथ्वीनों! ... ाखी हे कृतांता!—अरेरे! हृदया, थांब थांब! फाटून न ... जाऊस! हे शिरांनों! तुम्ही इतक्या दुर्बळ कां झालात! मला बळकट सांवरून धरा.—तुझी आठवण ठेवायची! हाय हाय बिचाऱ्या गरीब पिशाच्या! जों पर्यंत माझ्या या भणभणले-ल्या डोक्यांत स्मरणशक्ति कायम असेल तों पर्यंत मी तुला कधीं विसरणार नाहीं. आ:! तुझी आठवण! अरे! फार काय, माझ्या या स्मृतिपटावर जेवढ्या म्हणून जुन्या बारिक सारिक गोष्टी लिहून ठेवल्या असतील त्या सर्व पुसून टाकीन, आणि या स्मृतिरूप पुस्तकांत तुझी आज्ञा मात्र लिहून ठेवीन. खरोखर असंच मी करीन. यास परमेश्वरच साक्ष आहे. अरेरे! काय दुष्ट, चंडाळ बायको ही! अरे लफंग्या! अरे हसून मान कापणाऱ्या हरामखोरा! अरे पण माझी वही कुठे आहे? मला ही गोष्ट यांत लिहून ठेवलीच पाहिजे. ती कोणची? 'या विचित्रपुरांत असा एक माणूस आहे कीं त्यानं हसतां हसतां लोकांच्या माना कापाव्या'! ( लिहितो ) हं राव, आपले दिवस भरलेच समजा. तें पिशाच काय बरं ह्मणालं? 'मी आतां येतों, माझी आठवण ठेव.' असंच ह्मणालं, नाहीं बरं? असो, मी तर प्रतिज्ञा करून चुकलों.

**हरसेन**—( पडद्यांत ) सरकार! सरकार!—

**दौलतराव**—महाराज, अहो वीरसेन महाराज?

**हरसेन**—परमेश्वर त्याचे रक्षण करो.

**वीरसेन**—तथास्तु !

**दौलतराव**—( आंतून ) महाराज ! सरकार !

**वीरसेन**—हो; हो; पोरा, ये ये.

( हरसेन आणि दौलतराव येतात. )

**दौलतराव**—महाराज ! कशी काय खबर आहे ?

**हरसेन**—कसं काय झालं सरकार ?

**वीरसेन**—काय बोवा ! मोठा चमत्कार आहे म्हणा !

**हरसेन**—काय, काय झालं महाराज?

**वीरसेन**—छे बोवा ! षट्कर्णी होईल.

**हरसेन**—महाराज ! आणखी ही गोष्ट माझ्या हातून ! हे .

**दौलतराव**—आपण सुद्धां कुण्णा जवळ नाहीं बोलणार महाराज.

**वीरसेन**—बरं पण. तुह्माला काय वाटतं? तुमची कांहीं कल्पना चालते आहे? पण हें पहा ! फार गुप्त हो !

**हरसेन**——
**दौलतराव**— } देवाचीच शपथ. सरकार! ही गोष्ट आम्ही कधीं कुण्णाजवळ फोडणार नाहीं.

**वीरसेन**—ऐका तर. हें पहा, या विचित्रपुरींत एक मुद्दां चांडाळ असा नसेल कीं जो हरामखोरी केल्या शिवाय राहील!

**हरसेन**—वा ! हें सांगायला पिशाचच कशाला आलं पाहिजे ? हें आम्हाला नाहीं वाटतं समजत !

**वीरसेन**—होय, होय, असंच. तर मग अधिक खटपट न

करितां मी तुम्हाला एकदम सांगतों कीं आपण एकमेकांची आतां रजा घेऊन चालते होऊं कसे ! तुम्हाला जिकडे काम असेल किंवा तुमच्या इच्छेस येईल, तिकडे तुम्ही जावं. कारण प्रत्येक माणसाला आपपलं काम व आपापली इच्छा आहेच. मज गरीबाविषयीं ह्मणाल तर मी जाऊन आतां आपला भजन करीत बसणार !

**हरसेन**—महाराज ! हें काय वेड्या वेड्या सारखं बरळतां! हें पाहून आम्हांला फार दुःख वाटतं.

**वीरसेन**—माझ्या बोलण्यानं तुमचा अपमान झाला हें पाहून मला दिखील खरोखर मनापासून वाईट वाटतं. खरोखर वाईट वाटतं !

**हरसेन**—महाराज, यांत कसला अपमान झाला ?

**वीरसेन**—हरसेना! असं कसं म्हणतोस? खरोखरच तुमचा अपमान मजकडून झाला असं मी समजतों. असो. आतां या पिशाच्याच्या चमत्काराविषयीं ह्मणाल तर, एवढी गोष्ट मी तुम्हाला कळवितों कीं, हें पिशाच्च मोठें इमानी आहे बरं कां? आत त्याचं व आमचं काय खातं पोतं आहे त्याविषयीं तुम्हाला वाटेल तशी कल्पना करा. भल्या गड्याहो ! ज्या अर्थी तुह्मी माझे मित्र आहांत, विद्वान् अहांत व शूर आहांत त्याअर्थी माझी तुमच्या जवळ एकच विनंती आहे !

**हरसेन**—महाराज, काय हुकूम आहे ? आम्ही आपले बंदे आहोंत.

**वीरसेन**—सांगणं ह्मणून एवढंच कीं, आज रात्रीं तुम्ही हा जो सर्व प्र ार पाहिलात, त्याबद्दल कोणाजवळ एक अक्षर सुद्धां काढूं नका.

**हरसेन**
**दौलतराव** } —छेः महाराज. आम्ही नाहीं काढणार.

**वीरसेन**—छे, छे, पण शपथ वहा.

**हरसेन**—महाराज, मी शपथ वाहून सांगतों कीं मी कुण्णा जवळ ही गोष्ट सांगणार नाहीं.

**दौलतराव**—मीही शपथ वाहून सांगतों कीं, मी कुण्णा जवळ हें बोलणार नाहीं.

**वीरसेन**- माझ्या तरवारीची शपथ वहा.

**दौलतराव**—महाराज, आम्ही एकदां शपथ वाहिलीच आहे

**वीरसेन**—माझ्या या तरवारीची शपथ वाहारे !

**पिशाच**—( खालीं ) शपथ वहा !

**वीरसेन**—काय रावसाहेब, आपण कां हें सांगतां ? आहां-तच कां आपण इथे !—जरा पुढें यारे, अरे या भुयारांतल्या स्वाऱ्यांचं ऐकलंत कां आपण ? तर मग आतां शपथ वाहायचं करा कबूल.

**हरसेन**—सांगा, कोणाची शपथ वाहायची तीं; ह्मणजे वहातों.

**वीरसेन**—माझ्या तरवारीची अशी शपथ वहा कीं, आम्ही जें काय आज इथें पाहिलं आहे त्यांतला एक चकार शद्ब देखील बाहेर बोलणार नाहीं.

**पिशाच**—( खालून ) शपथ वहा !

**वीरसेन**- या स्वाऱ्या इथे पण आल्या कां ? तर मग आपण थोडेसे पुढें जाऊं चला. यारे या, जरा पुढें या. आणि पुन्हा या आमच्या तरवारीवर हात ठेऊन शपथ वहा. 'आज जें कांहीं अम्ही ऐकलं आहे यातलं एक अवाक्षर देखील बाहेर काढणार नाहीं,' अशी शपथ वहा.

**पिशाच**—(खालीं) अरे, त्याच्या तरवारीची शपथ वहा

**वीरसेन**–स्वारी जामिनींतून इतकी का जलद चालते ? गड्यानों आणखी पुढें चला !

**हरसेन**–भगवन्, काय चमत्कार हा !

**वीरसेन**–हरसेना, या सृष्टीच्या पाठीवर अशा पुष्कळ गोष्टी आहेत कीं, त्या तुझ्या कधीं ध्यानीं मनीं किंवा स्वप्नीं देखील आल्या नसतील. पण हें पहा, आजपर्यंत तुमचा आमचा इतका स्नेह आहे, त्याची आतां यापुढें परिक्षा होण्याची वेळ आली आहे. मला कदाचित् कारणपरत्वें वेड्याचें सोंग घेण्याचा प्रसंग येईल. तेव्हां माझी वर्तणूक कशीही जरी चमत्कारिक किंवा विक्षिप्त दिसली, तरी त्या प्रसंगीं माझ्याकडे पाहून ( हात करून दाखवितो ) असे हात करून, किंवा अशी मान डोलवून, अथवा 'हुं हुं ! अम्हाला ठाऊक आहे,' किंवा 'अम्हाला वाटलं तर अम्ही सांगू,' अथवा 'अम्हाला सांगावंसं मात्र वाटलं पाहिजे' इत्यादि संशयात्मक भाषण बोलून माझ्या विषयीं तुम्हाला कांहीं माहिती आहे असं दाखवाल, तर मग माझी ही रचलेली सारी इमारत ढासळून जाईल ! बाबानों, एवढी गोष्ट मेहेरबानी करून नका करूं. देव तुम्हाला अशीच चांगली बुध्धी देवो म्हणजे झालें.

**पिशाच**–( खालून ) घ्या शपथ.

**वीरसेन**–हे प्रक्षुब्ध पिशाच्या ! शांत हो, शांत हो! ( ते शपथ घेतात ) गड्यानों, माझ्यावर तुमचे खरोखर फार उपकार आहेत ! हा गरीब वीरसेन आपला स्नेह व आपली प्रीति दर्शविण्याच्या कामांत आपल्या हातून जें होईल तें करायला कधींही कमी करणार नाहीं. चला, या. आपण बरोबरच किल्ल्यांत जाऊं. पण हें पहा, मी तुम्हाला विनवून सांगतों कीं नेहमी कसे आपले चिप ! काळ मोठा विपरीत आला आहे!

अरेरे ! काय हा दीर्घ द्वेष ! आगलागो त्या द्वेषाला ! आणख हें सर्व निस्तरणं माझ्या कपाळी यावंना? बरं आहे 'भवितव्यता बलवती.' जें व्हायचं असेल तें होईलच. चला आतां.

[ सर्व जातात. ]

# अंक दुसरा.

## प्रवेश १.

थळ—( आर्तवीर्यांच्या घरांतील एक दिवाणखाना. )

[ आर्तवीर्य व राणोजी येतात. ]

**आर्तवीर्य**—राणोजी, या मोहोरा आणखी या जिनसा त्याच्या हवालीं कर.

**राणोजी**—जी सरकार !

**आर्तवीर्य**—पण हें बघ, राणोजी, तुझी त्याची भेट होण्याच्या अगोदर त्याची वागणूक गावांत कशी काय आहे त्याची दुरून दुरून चौकशी कर.

**राणोजी**—जी सरकार—माझ्याही मनांत तेंच होतं.

**आर्तवीर्य**—वा, कसं बोललास. फार चांगलं बोललास. अरे हें बघ, या विचित्रपुरींतले लोक विलासनगरींत किती आहेत, याचा अगोदर शोध कर. ते कुठे रहातात, आपला निर्वाह कसा करतात, त्यांची सोबत संगत कशी असते, वगैरे बाहेरून बाहेरून त्यांची नीट चौकशी कर. आणि त्यावरून त्यांची व माझ्या मुलाची ओळख आहे कीं नाहीं हें समजल्यावर मग मुद्याची गोष्ट आहे तिकडे हलके हलके वळ. पण हें करशील तें मोठ्या युक्तीनं कर. असं म्हणावं—‘ त्याचा बाप ठाऊक आहे बुवा मला. त्याच्या मित्रांनां ही मी ओळखतों. तोही पुसट पुसट माझ्या माहितीचा आहे.’ राणोजी, आलीना लक्षांत गोष्ट ?

**राणोजी**—होय महाराज.

**आर्तवीर्य**—आणखी असं म्हणावं ‘ तो पुसट पुसट मा-

ज्या माहितीचा आहे खरा; पण चांगलासा नाहीं.' पुढें 'पण मी म्हणतों तोच जर हा असेल तर तो तर बुवा मोठा उडाण-टप्पु आहे. त्याला अशीं अशीं व्यसनं आहेत.' अशा प्रकार-च्या लागतील त्या खोट्या नाट्या गोष्टी त्याच्या विषयीं सांग. पण हें बघ, त्याच्या अब्रूला फारच धक्का बसेल इतकी वाईट एक दिखील नसावी. ही गोष्ट पण पक्की ध्यानांत ठेव. तर मग कोणच्या गोष्टी सांगशील? तरुण माणसाला स्वातंत्र्य असतांना ज्या फंदाच्या व उनाडपणाच्या गोष्टी त्याच्या हातून निरंतर घडण्यासारख्या असतात अशा पैकीं हे झोकून झालं!

**राणोजी**—महाराज, उदाहरणार्थ द्यूतकर्माची थोडीशी चु-टक!

**आर्तवीर्य**—हं! कां होईना. किंवा मदिरापान, थोडा गाण्याचा छंद, आणखी थोडा रंगेलपणा, इथपर्यंत गेलास तरी चालेल.

**राणोजी**—महाराज, यानं त्याची बेअब्रू होण्याचा संभव आहे.

**आर्तवीर्य**—हो, अमुकच सांग, असं नाहीं ह्मणत मी! पण बो-लतां बोलतां ओघानं जें येईल तें बोल. पण एक गोष्ट नको सांगूस अं! तो बाहेरख्याली आहे एवढं नको बोलूं. ही नाहीं हो माझ्या मनांत गोष्ट! नाहीं तर बोलशील एखादा. पण हीं जीं त्याची व्यसनं ह्मणून तूं सांगशील तीं मोठ्या युक्तीनं बेताबातानं अ-शीं सांग; ह्मणजे काय होईल कीं, स्वतंत्रपणा मिळाला ह्मणजे हे असे दोष घडतातच असं दिसून येईल.

**राणोजी**—पण सरकार—

**आर्तवीर्य**—परंतु तुला ह्या इतक्या गोष्टी कां करायच्या हें कळलं का?

**राणोजी**—नाहीं सरकार, हेंच मी आतां विचारणार होतों.

**आर्तवीर्य**—ऐक मी काय सांगतों तें. माझा हेतू हा कीं, असा हा शोध काढायचा म्हणजे त्याला हीच युक्ती लढविली पाहिजे. ह्या शारीक सारीक खोड्या आमच्या मुलाच्या अंगांत आहेत असं सांगतांना, एखादा पदार्थ बनवितांना जशा त्यांत नजरचुकीनें कांहीं खोडी राहून जातात, तशाच प्रकारच्या ह्या आहेत असं दिसूं दे. शूरसेनाविषयीं माहिती काढून घेण्याकरितां त्याला तूं ह्या गोष्टी सांगशील, त्यानं जर तूं ज्याविषयीं बोलत असशील तो तरुण गृहस्थ, त्या द्वाड खोडी किंवा तीं व्यसनं यांच्या आधीन होऊन गेला आहे असं पाहिलं असेल, तर तुला तो झटकर असं म्हणेल :—'पण महाराज' अथवा 'गड्या' 'किंवा जो कांहीं त्या देशांत परकी मनुष्याला उद्देशून बोलण्याचा प्रचार असेल त्याप्रमाणें तुला उद्देशून—

**रणोजी**—ठीक आहे महाराज !

**आर्तवीर्य**—मग तो तुला असं म्हणेल—काय म्हणेल—काय बरं मी म्हणत होतों आतां—कायसं मी म्हणणार होतों—माझं बोलणं कुठपर्यंत आलें होतं बरं ?

**राणोजी**—'तो झटकर असं म्हणेल:—'पण महाराज' 'गड्या' वगैरे पर्यंत आलं होतं.

**आर्तवीर्य**—हो ! हो ! कसं बोललास ! तेव्हां तो तुला झटकर म्हणेल :—'ते गृहस्थ तर आहेत आमच्या ओळखीचे ! ते मला कालच भेटले होते नव्हे बरं—एकदां कुठेसे पाहिले होते खरे—तो अमका तमका त्यांच्या बरोबर होता. आणखी तुह्मी म्हणतां त्याप्रमाणें ते द्यूत खेळत होते खरे. ते एकदां चैनींत असतांना मी त्यांनां पकडले होते खरे. आलीकडे त्यांनीं एक अंगवस्त्र ठेवलं आहे खरं ' वगैरे गोष्टी तुला तो सांगेल कां ? ध्यानांत आलीना गोष्ट—मी काय म्हणतों तें ? इतकंसं आमिष लावलं असतां एवढा मोठा मासा गळाला ला-

गुन जसा बाहेर येतो, तसं एवढंसं खोटं सांगितलं, म्हणजे प
दर खरं बाहेर पडतं. आम्हीं हीं म्हातारीं अनुभवलेलीं माण
जगांत टक्के टोणपे खाऊन शहाणे झालेले, येवढीशी युक्ती ल
वून एवढा मोठा डोंगर खणून काढणार! तेव्हां तुला मी
तां एवढा वेळ जें पुराण सांगितलं तें चांगलं लक्षांत ठेऊन अ
च्या मुलाचा वागणूक एकंदरींत कशी आहे ती पाहून ये—मम
लाम—मी युक्ती सांगितली ती तुझ्या ध्यानांत राहीलना ?
सांगू फिरून ?

**राणोजी**—नको महाराज, माझ्या चांगली ल
आहे.

**आर्तवीर्य**—जा तर मग. संभाळून जा.

**राणोजी**—जी महाराज—

**आर्तवीर्य**—त्याचा कल पाहून त्याप्रमाणं वाग हं.

**राणोजी**—होय महाराज.

**आर्तवीर्य**—त्याला म्हणावं, आपला सतारीचा अभ्या
सोडूं नको.

**राणोजी**—ठीक आहे महाराज. येतों तर मी. मुजर
करतों.

(राणोजी जातो.)

(**चंद्रकला** येते.)

**आर्तवीर्य**—चंद्रकले! बेटा, अशी घाबरल्यासारखी कां
दिसतेस ?

**चंद्रकला**—अग बाईग! बाबा, बाबा! कायग बाई मला
अगदीं घाबरवून टाकलं कसं तें ?

**आर्तवीर्य**—ऑं ? काय म्हणतेस ? कुणी भिवडावलन
पोरी ?

**चंद्रकला**—बाबा, मी किनई माजघरांत कशीदा काढीत बसलें होतें; आणखी वीरसेन महाराज एकदम आपले—

**आर्तवीर्य**—बोल झटपट—

**चंद्रकला**—वीरसेन महाराज उघडे डोक्के—ती शेंडी मोकळी टाकलेली—तो अंगावरचा पोषाख अस्ताव्यस्त झालेला—ते अंगरख्याचे बंद तुटलेले—तो शेला मागं जमीनीवर लोळतोच आहे—ते डोळे लाल भडक झालेले—चालतांना कितीदां अडखळताहेत—तो त्यांची दया आणणारी दृष्टि—एखाद्या यातनेंतून पळून आलेल्या मनुष्यासारखी मुद्रा—असे आपले एकदम माझ्या समोर येऊन उभे राहिले. तेव्हां—

**आर्तवीर्य**—पोरी त्यांची अशी स्थिति तुझ्या मुळं तर झाली नसेल!

**चंद्रकला**—मला नाहीं बाई यातलं कांहीं कळत! (लाजते) पण कुणी सांगावं? कदाचित् तसंही कांहीं असेल.

**आर्तवीर्य**—काय बोलला ग तो?

**चंद्रकला**—त्यांनीं किनई माझा आपला हात एकदम गच्च धरला; आणखी माझ्यापासून अंमळ दूर होऊन पुन्हा माझ्यासमोर येऊन आपला दुसरा हात त्यांनीं असा आपल्या कपाळावर लावला; आणखी माझ्याकडे कसे अगदीं टक लाऊन पाहूं लागले. मला असं वाटलं कीं, ते जसं कांहीं माझं आपलं चित्रच काढून घेणार आहेत. असे आपले ते माझ्याकडे पुष्कळ वेळ निरखून पहात होते. सरते शेवटीं माझ्या हाताला थोडासा हिसका देऊन तीन तीनदां माझ्याकडे अगदीं न्याहाळून पहात. आणखी पुन्हा: खालीं पहात. असं केल्यावर असा बाई त्यांनीं मोठ्यानदा एक उसासा टाकला कीं त्यांचं सगळं शरीर फाटून जाऊन प्राण जातात कीं काय, असं मला वाटलं. मग अंमळ-

शांनीं त्यांनीं माझा हात सोडला; आणखी आपली मान वळवून आपल्या जायच्या रस्त्याकडे मुळींच लक्ष न देतां अगदीं बाहेर जाईपर्यंत माझ्याकडे एक सारखे डोळे लावले होते—

**आर्तवीर्य**—तर मग चल पोरी माझ्या बरोबर! महाराजाकडे गेलंच पाहिजे. अरे, हा तर अगदीं बेफाम झाला आहे. प्रीति अतिशय बलवत्तर झाली तिचा हा परिणाम! या विकाराची शक्ति अमर्याद झाली कीं, तो आपण आपलाच नाश करून टाकतो. आणखी, हा कामविकार अविचाराचीं व भयंकर अशीं कृत्यं देखील मनुष्याच्या हातून करवितो, या जगात मनुष्याला व्यथा देणारे जे कांहीं मनोविकार आहेत; त्या सर्वांमध्यें हा मनोविकार मोठा प्रबळ आहे! मला फार वाईट वाटतं. पोरी; त्याच्या मनाला लागून राहील असं तर कांहीं त्याला बोलली नाहींस ना?

**चंद्रकला**—छे हो बाबा! मी असं कांहीं बोललें नाहीं. पण तुम्ही सांगितलंत तेव्हांपासून मी त्यांची पत्रं दिखिल घेतलीं नाहींत; कीं त्यांची माझी गाठ दिखिल पडूं दिली नाहीं!

**आर्तवीर्य**—हं; कळलं! म्हणूनच तो अगदीं भ्रमिष्ट होऊन गेला आहे वरं! या गोष्टीचा मी जर आधींच थोडा ज्यास्त सारासार विचार केला असता, तर असा प्रकार झाला नसता. अग, त्यानं आपला उगीच खेळ आरंभला होता; आणखी तुझा सर्वस्वी घात करायचाही हेतु त्याच्या मनांत होता असं मला वाटलं. अरेरे, आग लागो त्या माझ्या अविचाराला! पण, पोरपणीं विचार कमी असणं हें जसं साहजिक आहे, तसंच वृद्ध माणसं नसत्या शंका घेऊन फाजील विचार करितात, हें त्यांनांही साहजिक आहे. चल तर मग. महाराजाकडे जाऊं. ही गोष्ट उघड केली असतां आतां जितकं दुःख होणार आहे, त्यापेक्षां ती आज लपवून ठेविली असतां पुढें मोठाच अनर्थ होईल.

( जातात. )

## प्रवेश २.

(राजा, राणी, विठोजी, संभाजी व चाकर माणसें येतात.)

**राजा**—या तुह्मी, विठोजीराव! संभाजीराव! या असे, बसा. काय सांगावं, आज किती दिवस तुमची गांठ घ्यावी म्हणून माझ्या मनांत होतं. शेवटीं आज तुह्मांला मुद्दाम बोलावणं पाठिवलं. वीरसेनाची खबर तुम्हांला कांहीं कळली आहे का? अलीकडे त्याच्या मनाची स्थिति अगदीं बिघडून गेली आहे. त्याच्या वडिलांच्या मृत्यू शिवाय त्याचं डोकं फिरून जाण्याला दुसरं काय कारण झालं असेल तें असो. त्याची मला कांहीं कल्पनाच होत नाहीं. तर तुम्ही दोघेजण मजवर दया करून एवढी गोष्ट करा. ती ही कीं, तुम्ही दोघेजण त्याचे बाळ मित्र आहां, तुह्मी तरुण असून समानवयस्क आहां, त्याचा स्वभाव तुह्मांला चांगला ठाऊक आहे. तेव्हां तुह्मी दोघेजण आमच्या दरबारांत कांहीं दिवस राहण्याची मेहेरबानी करा. समजलां! तुम्हीं नेहमी त्याच्या बरोबर राहून त्याच्या उदास मनाला कांहीं करमणुकीच्या मार्गाकडे वळवा. सोंगट्या, गंजिफा, वगैरे खेळांत त्याचं मन गुंतवून तो सुप्रसन्न राहील असं करा. आणि प्रसंगविशेषीं त्याच्या संबंधाच्या ज्या ज्या गोष्टी तुम्हांला कळतील त्या आम्हाला येऊन वारंवार सांगत चला. असं झालं असतां आम्हाला ठाऊक नाहीं, अशी कांहीं गोष्ट जर त्याच्या मनांत डांचत असेल, तर त्याला कांहीं इलाज करण्यास आह्मांस बरं पडेल.

**राणी**—विठोजीराव! संभाजी! मी असं ह्मणतें कीं, माझ्या वीरसेनाची व तुमची मोठी गट्टी आहे. तो तुमच्या गोष्टी नेहमीं माझ्याजवळ काढित असतो. आणि खरंच बाई, या विचित्र-युगींत त्याचं खरं प्रेम ज्यांच्यावर आहे अशी दोन माणसं तुह्मां दोघां खेरीज नाहींतच म्हटलं तरी चालेल. तर बाबानों, आम्हांवर तुह्मी मेहेरबानी करा आणि आमच्या या दरबारांत

दोन दिवस रहा. आमची आजकाल सारी आशा, सारी भिस्त काय ती माझ्या वीरसेनावर. त्याला आराम पडावा म्हणून जितका वाई उपाय असेल तेवढा करून पहावा. दुसरं काय आपल्या हातांत? देवाची मर्जी असेल तसं होईल. हें पहा, हे तुमचे उपकार आम्ही विसरणार नाहीं. सांगायला नकोच. पण आपली सांगतें.

**विठोजीराव**—सरकार! हें काय विचारावं! आपण दोघे आम्हांस सर्वथा वंद्य आहां! या पायाचे आह्मी दोघे बंदे नोकर आहों. आम्हांवर आपली पूर्ण सत्ता आहे. आम्ही हुकुमाचे बंदे. हुकूम करण्याचा अवकाश. आम्हांस आपण विज्ञप्ति करण्यापेक्षां आज्ञप्ति करावी.

**संभाजी**—महाराज, आपण हुकूम करावा. आम्ही हुकमा बरहुकूम चालावं ही आमची योग्यता. आम्ही सर्वस्वी या पायाचे असे म्हणवितों. या बंद्यांच्या हातून जी सेवा घेण्याची सरकारची इच्छा असेल ती करण्यास आम्ही राजीच आहों.

**राजा**—शाबास विठोजीराव! शाबास संभाजीराव! काय गोष्ट आहे! खरोखर, या दरबारचे तुम्हां सारखे दोस्त दुसरे थोडेच असतील.

**राणी**—संभाजीराव! विठोजीराव! तुम्हां दोघांचं हें सौजन्य पाहून माझ्या मनाला फार संतोष वाटतो. माझ्यावर हे तुमचे उपकार आहेत असं मी समजतें. तर आतां एवढं करा. जा असेच आणि ज्याच्या मनाची अगदीं चल विचल झाली आहे अशा माझ्या वीरसेनाला गांठा. अरे! कोण आहे रे तिकडे—जा आणि या दोघांस माझा वीरसेन बसला असेल तिथे न्या!

**विठोजी**—परमेश्वर करो आणि आमच्या सहवासाचं सार्थक होवो.

(दोघे जातात.)

( आर्तवीर्य येतो. )

**आर्तवीर्य**—महाराज, नवखंडास पाठविलेले वकील आनंदाची बातमी घेऊन सुखरूप परत आले आहेत. खाविंदास कळावं.

**राजा**—आर्तवीर्य! शाबास. तुम्ही यहावी तेव्हां आपली आनंदाचीच खबर सांगतां !

**आर्तवीर्य**—असं, असं. खाविंद ! मी आपल्यास खात्री पुरःसर सांगतों मी आपला हा अंतरात्मा जसा परमेश्वराला व या गादीला अर्पण केला आहे, तसाच हा देहही परमेश्वराच्या व मी आपल्या राजाच्या चरणकमलीं अर्पण केला आहे. आणि मला असं खास वाटतं कीं, मी वीरसेनाच्या वेडाचं कारण अगदीं बरोबर शोधून काढलं आहे. असं जर नसेल तर माझ्या मुत्सद्दीपणाला मोठाच बट्टा येईल असं मी समजतों.

**राजा**—हं ! बोला तर बोला—काय बरं तें कारण ? तेंच तर जाणण्या विषईं मी अतिशय उत्कंठित आहें.

**आर्तवीर्य**—सरकार, अगोदर त्या वकिलांची आपण भेट घ्यावी. हें काम उरकलं म्हणजे मग मी आपल्याला सारी हकीकत कळवितों.

**राजा**—तुम्ही स्वतांच जाऊन त्यांस आमच्याकडे आणा

( आर्तवीर्य जातो. )

प्रिये मदालसे ! तुझ्या मुलाच्या एकंदर मनोव्याधीचं कारण याला सांपडलं आहे असं हा म्हणतो.

**राणी**—मला बाई मोठी भीति वाटते. वीरसेनाच्या वेडाचं दुसरं काय कारण असायचं आहे ? आपल्याला दिसतंच आहे कोणचं तें ! तिकडचा मृत्यु व लगेच मोठ्या घाईनं झालेलं लग्न, हेंच मुख्य कारण असेल.

**राजा**—बरं असो. पाहूं आपण काय होईल तें.

[ पिलाजीराव व यशवंतराव यांस घेऊन आर्तवीर्य पुनः येतो. ]

या पिलाजीराव! यशवंतराव या. बरे आहांना? पिलाजीराव, नवखंडाच्या राज्यांतली काय खबर आणलीत !

**पिलाजी**—आमची पहिल्यानं गांठ पडल्या बरोबर त्यांनीं आपलं अभिनंदन केलं. नवखंडाधिपती भीमसिंग यानं आपल्या पुतण्याला दाबण्या करितां लोक पाठावले. पहिल्यानं तो आपल्याच विरुद्ध बंड करीत आहे हें त्याना ठोऊक नव्हतं. पण मागाहून तें कळल्या बरोबर त्यानीं त्याला बोलावून आणून 'मी रमाकांतमहाराजाच्या विरुद्धकधीं ही बंड करणार नाहीं' अशी त्याच्या पासून शपथ वाहून घेतली. भीमसिंगाला त्यामुळं मोठा आनंद होऊन त्यानं ही खंडणी व हें पत्र दिलं आहे.

**राजा**—वा ! ही गोष्ट आह्माला फार आवडली. असो. आम्ही या कामाचा आणखी एखाद्या फुरसतीच्या वेळीं चांगला विचार करून नवखंडाच्या राजाच्या पत्राचं उत्तर पाठऊं. असो. पिलाजीराव, यशवंतराव, तुम्हांस आमच्या करतां या कामांत फार तसदी पडली. त्याबद्दल आह्मांवर तुमचे मोठे उपकार आहेत. आतां तुम्ही चांगली विश्रांती घ्या. आज रात्रीं आमच्या पंक्तीला बसून तुह्मी भोजन करावं, अशी आमची इच्छा आहे. तुम्ही या तर मग.

[ पिलाजी व यशवंतराव जातात. ]

**आर्तवीर्य**—या कामाचा एकदां ठीक निकाल लागला. राजाधिराज ! राणीसाहेब ! राज्यलक्ष्मी ह्मणजे काय, कर्तव्य ह्मणजे काय, दिवसाला दिवस कां ह्मणाव, रात्रीला रात्र कां ह्मणावी, काळाला काळ कां ह्मणावं, या गोष्टींचं विवरण करणं ह्मणजे दिवस, रात्र आणखी काळ फुकट घालिवणं आहे. दुसरं काय?

खऱ्या शहाणपणाचं लक्षण हेंच कीं, कोणचीही गोष्ट थोडक्यांत सांगणं. उगीच लांबच लांब चऱ्हाट वळणं, हें कांहीं शहाणपणाचं मुख्य लक्षण, किंवा खरं तत्व, समजायचं नाहीं. तस्मात् थोडक्यांत सांगतों. आपला युवराज, योग्य राजपुत्र वेडा आहे. मी त्याला वेडाच म्हणतो. कारण, खऱ्या वेडाची व्याख्या करायला गेलं तर—वेड म्हणजे वेडच तें—वेडा खेरीज दुसरं कांहीं नाहीं. पण तें असो.

**राणी**—नुसतं पांडित्य पुरे बाबा! मतलब सांगा काय असेल तो.

**आर्तवीर्य**—राणीसाहेब! मी आपल्या पायाची शपथ वाहून सांगतों कीं, मी नुसतं पांडित्य करीत नाहीं. सांगतों यांत कांहीं खोटं नाहीं. तो वेडा आहे ही गोष्ट खरी आहे. ही गोष्ट खरी आहे हें शोचनीय आहे. आणखी हें शोचनीय आहे कीं, ही गोष्ट खरी आहे. वेडं वाकडं असो—पण हें भाषण मोठं आलंकारिक आहे; त्यांत मोठी चमत्कृति आहे. असो. हें पुरे झालं. कारण, पांडित्य नको आहे. तेव्हां तो वेडा आहे, ही गोष्ट आपण गृहीत करून पुढें चालूं. आतां एकंदर राहतां पैकीं गोष्ट कोणची राहिली—तर ही. हा जो परिणाम झाला, याचं कारण शोधून काढायचं—किंवा घटकाभर असं कां म्हणाना, कीं हा जो विपरीत परिणाम, किंवा हें जें व्यंग, याचं कारण काय? हां, असंच म्हटलं पाहिजे. कारण, हा व्यंगाचा जो परिणाम, म्हणजे हा व्यंगरूप जो परिणाम, त्याला कारण असलंच पाहिजे. तात्पर्य, एवढं हें सार निघालं—आणखी साऱ्याचं सार म्हणून काय तें एवढंच. असो. माझ्या पोटीं एक कन्या आहे. आहे म्हणजे काय, माझी आहे तों पर्यंत आहेच म्हणायची. तिनं आपल्या पित्याच्या आज्ञेस अनुसरून हें माझ्या जवळ आणून दिलं. आतां हें वाचा आणि करा तर्क—

( वाचतो. )

'देवलोकांत राहणारी, माझ्या अंतरात्म्याची अधिदेवता,

अत्यंत सुंदर बनविलेली' अशी जी चंद्रकला तिजप्रत—' 'सुंदर बनविलेली! काय वेढे चावट शब्द हे! पण पुढें पहा.—

**राणी**—हें पत्र माझ्या वीरसेनाकडून तर आलं नसेलना?

**आर्तवीर्य**—सरकार! थोडा धीर धरा. या चरणांपाशीं सर्व निवेदन करतों.

(वाचतो.)

'समुदित रवि होई पूर्विचा पश्चिमेला;
'हलविल निजवेगें वायु अस्ताचलाला;
'सखि! हुतवह किंवा चंदनाच्या समान,
'परि तुजवरचें हें प्रेम खोटें न मान!

'प्रिये चंद्रकले! हें पद्य रचित असतांना माझ्या मनाची अशी दुर्धर स्थिति झाली आहे. प्रिये! दिवसांतून तुझ्या करतां मी कीती सुसकारे टाकतों, त्यांची मला गणना दिखिल करतां येत नाहीं. हे लावण्यलतिके! माझें तुझ्यावर अत्यंत गाढ प्रेम आहे.

या कुडीमध्यें प्राण आहे तों पर्यंत
तुझें आज्ञाकरत्व धारण करणारा
दास,

'वीरसेन.'

हें पत्र माझ्या मुलीनं माझ्या सांगण्यावरून मला दाखिवलं. तिनं मला निरनिराळ्या, ठिकाणीं निरनिराळ्या वेळीं जे जे कांहीं प्रीतिदर्शनाचे प्रकार वीरसेनानं केले, ते सारे मला सांगितले.

**राजा**—पण त्या साऱ्याला तिचं काय म्हणणं पडलं?

**आर्तवीर्य**—मी मनुष्य कसा आहें आपल्याला वाटतं?

**राजा**—तुम्ही काय,–तुम्ही फार थोर व राजनिष्ठ आहां!

**आर्तवीर्य**—अर्थात्. मी या कामांत असाच मोठ्या युक्तीनं वागलों. मी कसला पक्का! मीं पहा काय केलं तें. हा अन्योन्य अनुराग, हें निःसीम प्रेम, जेव्हां महाराज, माझ्या लक्षांत, आलं—आणखी, माझ्या या पोरीनं मला त्या विषयीं सांगण्याच्या अगोदरच मीं तें ताडलं होतं, हें ही पण मला आपल्याला सांगितलं पाहिजे—असो. महाराज, राणीसाहेब, आपल्या चरणाचा हा बंदा—हें त्या दोघांचं खातंगोतं पाहून आपला स्वस्थ बसता, कांहीं बोलला नसता, चालला नसता, आपला एखाद्या दगडा सारखा अगदीं मुखस्तंभ असा राहून अशा या गोष्टीकडे कानाडोळा करता, तर आपण त्याला काय म्हटलं असतं? आपल्याला काय बरं वाटतं? छे छे. मी कुठला राहायला तसा स्वस्थ! मी लागलों त्याच उद्योगाला. मी आपल्या पोरीला हातांत धरुन सांगितलं, 'पोरी! वीरसेन महाराज ग तुझ्या कुठले नशिबीं! छे, छे, नाहीं बरं हें जुळायचं' असं म्हणून चांगला तिला उपदेश केला. आणखी तिला स्पष्ट सांगितलं कीं, 'खबरदार! वीरसेन महाराजांची गांठ घेशील तर! त्यांच्याकडून कोणी निरोप घेऊन आला तर त्याला दिखील तूं भेटूं नकोस. त्यांनीं प्रीतीच्या खुणा म्हणून आंगठी बिंगठी जर पाठिवली तर ती तूं घेऊं नकोस.' असं सांगितलं मात्र—पोर कशी माझ्या आज्ञेच्या बाहेर इतकी दिखील गेली नाहीं. इकडे वीरसेन महाराजांची काय स्थिति झाली—तिच्याकडून जेव्हां नकार मिळाल्या सारखं झालं, तेव्हां—थोडक्यांत आपलं सांगतों—पहिल्यानं त्यांनां औदासिन्य आलं—मग अन्न सुटत चाललं—त्यामुळं रात्रीच्या रात्री झोपेशिवाय जायला लागल्या—नंतर क्षीणता येत चालली—तात्पर्य काय—अशा या उतरत्या अनुक्रमानं हें वेड येऊन जडलं आणखी आतां आपण लागले आहेत बडबडायला, अन् आपल्यानां लावलं आहे रडायला!

**राजा**—(राणीला) काहो! आपल्याला वाटतं कीं हें कारण खरं असेल?

**विठोजी**—महाराज, आमच्या मनांत असं आलं. आपल्याला मनुष्य पाहून आनंद होत नाहीं तर नाटकवाले हे आपणांस कसे आवडतील ते आवडोत! त्यांच्या बरोबर च आम्ही आलों. ते आपल्या सेवेला इतक्यांत येऊन हजर होतील.

**वीरसेन**—जो राजाचं सोंग घेईल त्याचा मी योग्य रीतीनं आदर करीन. त्या राजाधिराजाला मी करभार देईन. नायिकेकरितां जो कामव्यथित होऊन सुसकारे टाकील, त्याच्या मेहेनतीबद्दल योग्य बक्षिस मी त्याला देईन. जो नकला करील त्याचे ही श्रम मी फुकट जाऊं देणार नाहीं. त्याला खूष करीन. विदूषक येवा तर ज्यानां पुष्कळ हसायला पाहिजे त्यानांच हसवील. नायिकेनं आपल्या मनांत जें कांहीं असेल तें स्पष्ट बोलून दाखवावं. पण तें असो. हे नाटकवाले कुठले आहेत रे?

**विठोजी**—आपण पूर्वी त्यांचे खेळ पाहिलेले आहेत. ते शोकरस फार उत्तम वठिवतात.

**वीरसेन**—हो. बरीच आठवण झाली. ते अलकापुरीचेच कां? पण ते असे गांवोंगांव कां बरं भटकूं लागले?

**विठोजी**—महाराज, तो अलकापुरीचा संस्थानिक आहे किनई, त्यानं आपल्या नगरांत नाटकं करण्याची सक्त मनाई केली आहे. नाटकं करणारांस तो मोठी कडक शिक्षा करितो. त्यामुळें या नाटकवाल्यांनां आपला गांव सोडणं भाग पडलं.

**वीरसेन**—असं काय? तो अलकापुरीचा संस्थानिक फारच अरसिक आहे. यांत संशय नाहीं. बरं, पण या नाटकवाल्यांचीं पात्रं पहिल्या सारखींच चांगलीं आहेत का? मी पूर्वी इथे होतों तेव्हां ते लोक कांहीं कांहीं खेळ फारच चांगले करीत. अजून त्यांची कीर्ती तशीच कायम आहे का?

**विठोजी**—छे महाराज. ती मौज आतां राहिली नाहीं.

**वीरसेन**—असं कां वरं ? त्यांच्यांत काय कमीपणा तुह्मी पाहिलात ?

**विठोजी**—त्यांच्यांत कांहीं कांहीं पात्रं बरीं आहेत. पण आलीकडे त्यांच्यांत कांहीं नवीन पोरं आलीं आहेत, तीं उगीच उंच कर्कश आवाज काढतात; आणखी त्यांचं भाषणं अगदीं साधारण असतं—तेव्हां जी खरी रसिक मंडळी आहे तिला हें नाटक नीरस वाटतं.

**वीरसेन**—अगदीं पोरं आहेत ह्मणतोस ? पण त्यांचा निर्वाह रे कसा चालतो? त्यांचे आवाज फुटले ह्मणजे हे नाटकवाले त्यांना हांकलून देत असतील ! कारण, मग कोण त्यानां विचारतो आहे ? शिव ! शिव ! ह्या बिचाऱ्यांची पुढें अगदीं दुर्दशा होत असेल.

**विठोजी**—तें काय विचारावं. त्यानां अनेक प्रकारचीं व्यसनं लागतात. मग आपआपसांत भांडतात. पोरं बहुत करून असतात गरीबाचीं. त्यांच्या हातांत पुनः चौपद्री येते. पण त्यांत कांहीं कांहीं श्रीमंताचीं ही असतात. त्यांचे वरीक हाल कुत्रा खात नाहीं. मोठमोठे सावकार, इनामदार अशा लोकांचीं हीं पोरं या नाटकवाल्यांच्या पाहिल्यानं नादीं लागतात आणखी मग बिचारीं फसतात झालं.

**वीरसेन**—अरे ! हें ऐकून मला खरोखर वाइट वाटतं. यांत कांहीं तरी सुधारणा झालीच पाहिजे. कारण, या पोरांत खरोखर कांहीं पोरं अतीशय बुद्धिवान् असतात असं माझ्या पाहण्यांत आलं आहे. त्यांना जर चांगली विद्या मिळेल व चांगलं शिक्षण असेल तर त्यांपैकीं कांहीं कांहीं फार चांगलीं माणसं निपजतील व देशाला फार उपयोग होईल. नाटकाचा तरी धदा कांहीं वाईट नाहीं. कारण, जसा शिक्षकांचा, तसाच नाटककरणारांचा देशाला फार उपयोग आहे. लोकांचं

मनोरंजन करून नीतीचा उपदेश त्यांच्या मनावर ठसविणं हा कांहीं लहान सहान अधिकार नाहीं !

[ पडद्यांत वीणा व मृदंग वाजतो. ]

**संभाजी**—सरकार, हे पहा नाटक करणारे आले.

**वीरसेन**—विठोजी, संभाजी, तुह्मी दोघे ही या विचित्र-पुरींत आहां तों पर्यंत आमचं आदर आतिथ्य घ्या. तुमचा योग्य मानमरातब ठेवला जाईल. त्यांत कांहीं कमी पडणार नाहीं. समजलांत ? या नाटकवाल्यांपेक्षां तुम्ही मला अधिक प्रिय आहां. पण आमचे पितृस्थानापन्न कारभारी व आमची मातोश्री दोघेंही चांगलीं फसलीं !

**विठोजी**—कशीं बरं महाराज ?

**वीरसेन**—कशीं म्हणजे काय ? अरे मी तर पक्का वेडा बनलों आहें. पण प्रसंगविशेषीं मला थोडसं मागचं पुढचं भान असतं कळलं ?

## [ आर्तवीर्य येतो. ]

**आर्तवीर्य**—कां ठीक आहांतना मंडळी ?

**वीरसेन**—संभाजी, पाहिलस ना हें ? विठोजी, तूं ही पाहिलसना ? जिकडे जावं तिकडे टेहेळे माझ्या मागं आहेतच. तें पहा तें मोठं बाळ इकडे येतं आहे. पहा ध्यान कसं आहे तें !

**विठोजी**—म्हण आहे ती का खोटी आहे महाराज ? माठी अन् बुद्धी नाटी. लहान पोराची आणखी म्हाताऱ्या माणसाची स्थिति एकच. कोणच्याशा एका कवीनं म्हटलं आहे कीं, म्हातारपण म्हणजे दुसरी बालदशाच होय !

**वीरसेन**—या स्वाऱ्या इथे कां आल्या आहेत मला पक्कं ठाऊक आहे. नाटकवाले आले आहेत म्हणून मला सां-

गायला आला असेल. पहा आतां माझ्या ह्मणण्याप्रमाणं होतं आहे कीं नाहीं.—तुह्मी म्हणतां तसंच अं! सोमवारीं सकाळचं ठरलं अं!

**आर्तवीर्य**—महाराज, थोडी खबर कळवायला आलों आहे.

**वीरसेन**—महाराज, मी आपल्याला थोडी खबर कळविणार आहें—भोजराजाच्या दरबारांत वसंतोत्सवानिमित्त जेव्हां नाटक झालं.—

**आर्तवीर्य**—सरकार, नाटकवाले इथे हजर झाले आहेत.

**वीरसेन**—हुम् हुम्!

**आर्तवीर्य**—खरंच महाराज. याच चरणांच्या शपथ—

**वीरसेन**—आणखी मग एक एक पात्र जेव्हां का तोंडाला राख फासून आलं आहे.—

**आर्तवीर्य**—महाराज, नाटकवाले खरोखर फारच चांगले आहेत हो. गाणं बिणं, तें; हें जिकडे तिकडे ठाकठीक आहे. आपण आजपर्यंत बुवा असे नाटकवालेच पाहिले नाहींत! पात्रं काय बोलतोहेत. कीं बृहस्पतीच! शृंगार पाहिजे तर शृंगार. शोक पाहिजे तर शोक. हास्यरस पाहिजे तर हास्यरस. पुराणांतलं पाहिजे तर पुराणांतलं. पद पाहिजे तर पद. नाच पाहिजे तर नाच. नकला पाहिजेत तर नकला. रडावं हसावं—हसावं रडावं! काय बोवा हवी ती मौज करितात बेटे!

**वीरसेन**—हे मालिनीतीराश्रमवासी कण्वमुने! तुझ्या जवळ केवढं अमूल्य भाण्डार होतं!

**आर्तवीर्य**—महाराज, कसलं बरं भाण्डार त्याच्या जवळ होतं?

**वीरसेन**—काय विचारावं! अहो भाण्डार म्हणजे—

(दिंडी) 'अन्य नाहीं, रमणीय अशी कन्या '
प्रेम त्याचें तिजवरी बहू-धन्या !'

**आर्तवीर्य**—(एकीकडे) अजून माझ्या पोरीवरच चित्त अं !

**वीरसेन**—कण्व बाबा ! खरं कीं नाहीं मी म्हणतों तें ?

**आर्तवीर्य**—मला जर आपण कण्वमुनि ह्मणत असाल, तर जिच्यावर माझं फार प्रेम आहे अशी एक माझी कन्या आहे,

**वीरसेन**—छे ! असं अनुमान कुठे निघतं आहे ?

**आर्तवीर्य**—महाराज, असं अनुमान नाहीं निघत तर कसं निघतं ?

**वीरसेन**—मी सांगतों:—

(दिंडी) 'देवरायाचा हेतु पूर्ण झाला '
' योग्य भर्ता घेवोनि तिला गेला.'

पण हे पहा नाटकवाले आले—

( नाटकमंडळींपैकीं चार पांचजण येतात. )

या मंडळी ! तुह्मांला पाहून मला फार संतोष वाटतो. गड्यानों, तुमची माझी भेट फार दिवसांनीं झाली. हा, हा तर आमचा अगदीं जुना स्नेही. पण काय रे ! तुला मीं मागं पाहिलं होतं त्यापेक्षां तूं आतां इतका काळारे कशानं झालास? आतां तुला चांगली मिसरू फुटली आहे ! पण अहो बाईसाहेब ! हो बाईसाहेबच नाहीं का तुह्मीं ? मी आपल्याला पूर्वी पाहिलं होतं तेव्हां पासून आपण बरंच कांड टाकलं आहेत ? पण आपला आवाज बिवाज कसा काय आहे आतां ? पहिल्यासारखाच चढतो कां मध्येंच चिरकतो ! हं, ठीक आहे. तेव्हां आतां तुम्ही मंडळी, आह्मांला नाटक करून दाखविणार ! कोणचा बरं खेळ करतां ? बरा

झालं कोणचा तरी! आपल्याला कसलं तरी नाटक पाहायचं येवः खरं. पण एखादा भाग आपल्याला दाखवा बरं! थोडासा नमुना तर दाखवाल! चलरे ए, करा एक छानदारसा भाग.

**नाटककारांपैकीं एकजण**–सरकार आपण सांगाल तें करून दाखवूं.

**वीरसेन**–मागं एकदां तुम्ही कांहीं भाग तयार केला होता. त्यांतलं कांहीं तरी होऊं द्या. तो खेळ तुम्ही रंगभूमीवर आणला नव्हता; आणखी आणला असलात तरी, मला वाटतं एकदांच आणला होता. कारण कीं या बाजार बुणग्या प्रेक्षक मंडळीला तो अगदीं आवडला नव्हता. परंतु माझ्या मतानं आणि माझ्या ही पेक्षां ज्या लोकांच्या मतांची अधिक योग्यता मी समजतों, त्यांच्या ही मतानं तो फारच चांगला उतरला होता. त्यांत निरनिराळ्या प्रवेशांची व्यवस्था, भाषणांची शैली वगैरे जिकडल्या तिकडे ठीक उतरलं होतं. एकाचं मत पडलं कीं त्यांत गाणंच नाहीं. दुसरा एकजण म्हणाला, यांत कांहीं तो दशमुख्या धिप्पाड रावण नाहीं, कांहीं नाहीं; हें नाहीं बोवा आपणाला आवडत! असो. तेव्हां तात्पर्य काय, कीं तो खेळ पाहिजे आपल्याला. हं! आठवलं रे आठवलं! तें उत्तररामचरित्र नाटक. त्यांत रामाला सीतेचा वियोग झाला असतांना रामाचं तें शोकपर भाषण आहे कीं नाहीं तेवढं म्हणून दाखीव. हा असाच कांहीं आरंभ आहे–' हाय हाय, मी केवढा क्रूर कर्मा!'

–बाल्यापासुनि पोशिली–

हं म्हण पुढें.

**नाटककार**––

'बाल्यापासुनि पोशिली प्रियसखी देवोनि त्या त्या प्रिया,
'अन्याला जरि देह भिन्न दिसती ती एक चित्ता प्रिया:

तीतें छद्म करोनि आज सहसा मी मृत्युला देतसें,
जैसा खाटिक पाळिल्या बकरिचा कापी गळा हें तसें !
गे मी अपूर्व कर्म चांडाळचि सोड मज कळे न तुला,
शिवलीस चंदनाच्या भ्रांतीनें दुर्विपाक विषतरुला !

(पद.) सोड सोड सोड अतां जानकी मला ॥ ध्रु० ॥
आज कर्म चांडाळ हाचि जाहला ।
नसेल आजवरी असा कोणि पाहिला ॥ १ ॥
भ्रांति धरुनि चंदनाचि शिवलीस मला ।
स्पष्ट दुष्ट परिणामीं विषतरु तुला ॥ २ ॥
मजवरी विश्वास फार ठेविला ।
मीच आज खरा तुझा गळा कापिला ॥ ३ ॥

(पद.) न कळे होइल गति कैशी। आतां काय करूं॥ ध्रु.॥
विपरित काळाचें लक्षण । झाला जीव लोक निर्वाण ॥
सरलें जगण्याचें कारण । आतां प्राण केंवि धरूं ॥ १ ॥
भासे मजला जग हें शून्य । दिसतें जैसें जीर्ण अरण्य ॥
सरलें माझें सर्व हि पुण्य । होउनि वन्य काय फिरूं ॥ २ ॥
पूर्वी मानवला संसार । वाटे आतां तोचि असार ॥
शरिरीं होती कष्टहि फार । नाहिं अधार कुठे शिरूं ॥ ३ ॥
सीते वांचुनि मजला क्षण । होतलि कल्पासमान जाण ॥
वाटती सोडावे हे प्राण । खोचुनि बाण उरीं मरूं ॥ ४ ॥

**आर्तवीर्य**—छे ! हें फारच लांब चऱ्हाट आहे.

**वीरसेन**—तुमच्या शेंडी सुद्धां हजामाकडे हें पाठविलं पाहिजे! म्हणरे बोवा म्हणं. चालूं दे. या काय बोंगाड्याला कळतं आहे! अरसिक कुठला!

**नाटककार**—

'हृदय उलतें शोकें माझें न हो द्विविधा तरी'

**वीरसेन**—यंत्र खूप आहे बोवा! शाबास!

**आर्तवीर्य**—तर, तर! काय बेटा बोलतो आहे! शाबास! शाबास!

**नाटककार**—

'विकल करिते काया मूर्च्छा न जीवित संहरी.'
'अंतुनि तनुला भाजी ज्वाळा न भस्म करीतसे'
'विधि जरि करी मर्मोद्भेदा न जीव हरीतसे!'

'त्या देवीनें शून्य हा लोक केला'
'बारा वर्षे लोटलीं कीं तयाला'
'झालें तीचें मायशा नष्ट नाम'
'आहे अद्यापी हि जीवंत राम!'

'हा हा देवी! हृदय फुटतें देह माझा गळाला'
'वाटे शून्य त्रिभुवन मला अंतरात्मा जळाला'
'या आत्म्यानें किति तरि सदा दुःखभारा धरावें'
'मोह व्यापी फिरफिरुनि, मी काय आतां करावें!'
'स्थिति निजगृहीं त्या देवीची तुह्मांस न रूचली'
'ह्मणुनि तृणवत् ती म्या रानीं त्यजूनि न शोचिली,'

'परि परिचिता त्या त्या वस्तू न राहविती थिरा'
'ह्मणुनि रडतों हा मी येथें क्षमा जनहो करा !'.

**आर्तवीर्य**—महाराज ! काय मुद्रा केली आहे वेश्यानं ! काय डोळ्यांत अश्रु आले आहेत ! कंठ काय सद्गदीत झाला आहे ! पुरे बोवा ! आपल्याला नाहीं पहावत. मला अगदीं भरून आलं आहे. बस कर !

**वीरसेन**—बरं आहे तर पुरें कर. फार चांगलं करतोस बोवा. आपल्याला फार आवडलं. मी तुम्हाला लवकरच असा दुसरा एक भाग करण्याला सांगणार आहें. अहो राव ! या नाटकवाल्यांची तरतूद नीट ठेवा. समजला ? त्यानं नीट वागवा. कारण, अशी मंडळी आपल्या राज्यांत फारच दुर्मिळ आहे. तुम्हीं मेल्यावर जर तुमची समाध बांधली आणखी ती वाईट झाली तर एकवेळ चालेल. परंतु तुम्हीं जिवंत असतांना यानां चांगलं वागावलं नाहीं, अशी जर त्यांनीं वाईट खबर येऊन मला कळविली तर माझ्या कामास नाहीं पडायचं ! —

**आर्तवीर्य**-महाराज ! त्यांच्या योग्यते प्रमाणें त्यांचा मान मरातब ठेवण्यास मी कमी करणार नाहीं.

**वीरसेन**—आणि त्यांच्या योग्यतेच्या बाहेर त्यांचा मानमरातब ठेवलात म्हणून काय झालं ? योग्यताच पहायला गेलं तर चाबूक खाल्ल्या खेरीज एक तरी माणूस मिळेल का..? आपल्याला अनुकूळ असेल त्याप्रमाणें व आपल्या मानमान्यते प्रमाणें दुसऱ्याला वागवावं. दुसऱ्याची योग्यता कमी असतां जर आपण असं केलं तर त्यांत आपल्याला अधीक भूषण आहे. चला तर, जा आंत घेऊन त्यानां.

**आर्तवीर्य**—यारे बोवा, या असे.

**वीरसेन**—जारे यांच्या मागं. (आर्तवीर्य एक शिवाय

करून बाकीच्या नाटक वाल्यांना घेऊन जातो ) गड्या हें बघ. तुम्हाला त्या अमोघवर्ष राजाच्या वधाचं नाटक करून दाखवितां येईल काय रे !

**नाटककार**—होय महाराज.

**वीरसेन**—तर मग आमच्या मनांत उद्या रात्रीं तो खेळ पाहायचा आहे. तें असो. पण हें बघ, जर तुला एखादं नवंच भाषण करून दिलं तर तुला तें त्यांत घुसडून देतां येईल कीं नाहीं ?

**नाटककार**—हो महाराज. फार चांगलं आहे.

**वीरसेन**—त्याच्या मागं जा. आणखी त्याला वाकुल्या बिकुल्या नका दाखवूं हं. समजलांत ? ( नाटककार जातो )
( विठोजी व संभाजीकडे पाहून ) गड्यांनो ! आतां रात्र होई पर्यंत तुमचा आमचा वियोग होणार.

**विठोजी**—बरं आहे. येतों सरकार.

( **विठोजी** व **संभाजी** जातात. )

**वीरसेन**—आतां मी एकटा आहें. अरे ! मी किती हरामखोर बंदा गुलाम आहें ? हा यःकश्चित् नाटकांतला सोंगाड्या—वस्तुतः सारं खोटंच—पण मोठ्या मनोविकाराच्या भरांत आपल्या अंतःकरणाची अशी वृत्ति करून टाकलीन कीं त्याची मुद्रा एकदम बदलून जाऊन डोळ्यांत अश्रूंचा लोट आला. चेहेरा अगदीं कावरा बावरा झाला व कंठ अगदीं सद्गदित होऊन गेला. सारांश, आपल्या सोंगाची वतावणी त्यानं आपल्या अनेक हाव भावांनीं कशी बरोबर करून दाखविली. आणि हे सर्व आकाशपाताळ त्यानं एक केलंन याचा हेतु काय ? तर कांहीं नाहीं हा सीते ! हा सीते ! हा बेटा सीतेचा कोण आणि सीता याची कोण, कीं यान तिच्या करितां रडावं !

अरे ! मला आवेशाच्या भरांत यायला व माझा क्रोध खवळायला जो हेतु व जें कारण आहे, असा हेतु किंवा असं कारण याला जर असतं तर यानं काय केलं असतं याची मला कल्पनाही होत नाहीं. त्यानं सारी रंगभूमी आसवांत बुडऊन काढली असती! आणखी, मोठं प्रचण्ड भयंकर भाषण करून लोकांच्या कानठळ्या बसविल्या असत्या! पापनिमग्नांस भ्रमिष्ट करून सोडलं असतं! जे निष्पाप त्यांस ही भयकंपित करून टाकना! अज्ञानांस घोटाळ्यांत पाडता, आणखी कान व आणखी डोळे यांच्या शक्तीच गुंग व बधिर करून सोडता !

असं असून मी जड मृत्पिंडबुद्धि हरामखोर लेंढोबा बनून आपलं मुख्य कर्तव्य सर्वथा विसरून आपला स्वस्थ बसतों, कांहीं बोलत नाहीं! एवढा मोठा राजाधिराज माझा बाप! त्याचा जीव व त्याचं राज्य या दरोडखोरांनीं दरोडा घालून लुटून नेलं. असं असतां त्याच्या करितां एक शब्दही माझ्याच्यानं उच्चारवत नाहीं ! मी किती भेकड आहें? मला हरामखोर ह्मणायला कोण आहे? माझं डोकं फोडून टाकायला कोण आहे? माझं नाक धरून कान उपटायला तरी कोण आहे ? आणखी मला लुच्चा लबाड तरी कोण म्हणतो? या सर्व गोष्टी करायला कोणी आहे ? कोणी नाहीं. माझं मलाच करून घेतलं पाहिजे. हो तर दुसरं काय ? माझ्यांत कांहीं पाणीच नाहीं, असं ह्मटलं पाहिजे. जसं एखादं बिचारं गरीब करडूं असावं तशी माझी स्थिती झाली आहे. नाहीं तर, यापूर्वीच या गुलामाच्या मुड्याचा बळी कोल्ह्याकुत्र्यांनां व या आसमंतांतील गिधाडांनां द्यायला पाहिजे होता ! दुष्ट ! अधम! चाण्डाळ ! ज्याला पश्चातापाचा ह्मणून लवलेश नाहीं असला हा राजद्रोही विश्वासघातकी हरामखोर ! अरे ! सूड, सूड घेतला पाहिजे. कोण गाढव मनुष्य आहें मी! माझ्या शौर्याची व पराक्रमाची कमाल आहे! माझ्या आवडत्या प्रिय जनकाचा वध झाला असतां मी एखाद्या भागूबाई सारखा आपापल्याशींच रडत बसातों अं ! यवरे वीरसेन !

छीः मना! कांहीं तरी कल्पना काड. पहातोस काय? मी असं ऐकलं आहे कीं, ज्यांनीं एखादं मोठं पापकर्म केलं आहे अशांच्या कडून एखादा खेळ बघवावा आणि त्यांत एखादा प्रवेश मोठ्या युक्तीनं घालावा कीं, तो पाहिल्या बरोबर त्यांच्या जिवाला असा कांहीं चटका बसून जाईल कीं त्यावरून त्यांचं तें पापकर्म लागलंच बांहेर पडेल! कारण, म्हण आहे ती खरी आहे— पाप फार वेळ छपलं जात नाहीं. खुनाला जरी जीव नाहीं, तरी त्याला मोठ्या चमत्कारिक रीतीनं वाचा फुटते. तेव्हां आतां असं करावं—हे खेळ करणारे लोक आले आहेत, त्यांच्याकडून माझ्या बापाच्या खुनाचं नाटक आपल्या कारभारीसाहेबांच्या पुढें करून दाखवावं. खेळ चालला असतां त्याची मुद्रा, किंवा त्याच्या चेहऱ्यावर कसकसे विकार उत्पन्न होतात ते, मी नीट लक्षपूर्वक पहातों. त्याला अशा रीतीनं टोंचून पाहतों. तो आपलं अंग चोरूं लागला, तर मग पुढें काय करायचं तें माझं मला पक्कं ठाऊक आहे! जें पिशाच मी पाहिलं आहे, तें दुष्ट असेल. दुष्ट पिशाच्चं हवं तें सुंदर मनोहर रूप धारण करतात असं ऐकतों. आणखी कुणी सांगावं—कदाचित् माझ्या मनाचा हा दुर्बळपणा व माझं हें औदासिन्य पाहून मला फसवून माझा घात सुद्धां करायचं त्यानं मनांत आणलं असेल! तेव्हां मोठ्या खबरदारीनं मला वागलं पाहिजे. या कामांत मी आपली पक्की खातरी करून घेईन तेव्हांच पुढें पाऊल टाकीन. नाटक करायची खूप पसंत कल्पना सुचली. हं! नाटकच केलं पाहिजे, म्हणजे या गुलामाचं इंगित काय असेल तें बाहेर पडेल!

(जातो.)

# अंक तिसरा.

## प्रवेश १.

( स्थल ) ( किल्ल्यांतील एक दिवाणखाना. )

[ राजा, राणी, आर्तवीर्य, चंद्रकला, विठोजी व संभाजी येतात. ]

**राजा**—हे दिवस म्हटलं म्हणजे वीरसेनानं स्वस्थपणानं व सुखानं घालवावेत. तसं न करतां अशी ही क्षोभ करणारी व भयंकर वेड्याची स्थिति त्यानं का धारण केली आहे, त्याचा हेतू काय असावा, हें त्याच्या पासून कांहीं युक्तीनं नाहीं. का तुम्हांला काढून घेतां येणार ?

**विठोजी**—'माझी भ्रमिष्टा सारखी स्थिति झाली आहे खरी असं ते आपण होऊनच कबूल करतात. पण त्याचं कारण काय तें मुळींच कांहीं सांगत नाहींत!

**संभाजी**—त्यांच्या मनाची खरी स्थिति काय आहे ती समजून घेण्याचा आह्मी यत्न करूं लागलों, म्हणजे ते टाळाटाळ करूं लागतात, आणि वेडाचा बहाणा करून दूर दूर रहातात.

**राणी**—तुमच्याशीं नीट बोलला तरी कां तो ?

**विठोजी**—हो. फार प्रौढपणानं बोलले.

**संभाजी**—पण जरा आढेवेढे घेऊनच !

**विठोजी**—आपण होऊन त्यांनीं आम्हांला प्रश्न केले नाहींत. पण आम्ही जें कांहीं विचारूं त्याचं उत्तर ते तेव्हांच देत.

**राणी**—तुम्ही त्याच्या करमणुकी साठीं कांहीं खेळ बीळ काढला होतात का ?

**विठोजी**—सरकार, आम्हांला रस्त्यांतच मुळीं एक नाटककार मंडळी भेटली. तें आम्ही त्यांनां सांगितलं—हें ऐकल्याबरोबर त्यांनां पुष्कळ आनंद झालासा वाटला. ते नाटकवाले आज वाड्यांत आलेच होते; आणखी मला वाटतं, आज रात्रीं वीरसेन महाराजांपुढें त्यांनीं खेळ करून दाखवावा असा सरकारचा हुकूम झाला आहे.

**आर्तवीर्य**—हो हो. झाला आहे खरा. आणि वीरसेन महाराजांनीं आपल्या दोघांनाहीं तें नाटक पाहायला यावं अशी विनंति करायला मला सांगितलं आहे.

**राजा**—हो, हो, मोठ्या खुषीनं मी येईन. कारण, माझ्याविषयीं त्याची प्रेम बुद्धि पाहून, आणखी अशा गोष्टींकडे त्याचं चित्त लागत चाललं आहे, हें ही पाहून मला फार संतोष वाटतो. गड्यानों ! या अशा करमणुकीच्या गोष्टींकडे त्याचं चित्त हलके हलके वळवा.

**विठोजी**—जशी सरकारची आज्ञा.

( **विठोजी** व **संभाजी** जातात. )

**राजा**—प्रिये मदालसे, तूं ही अंमळशी आंत जा. कारण आह्मी अशा बेतानं वीरसेनाला इथे आणण्याचा घाट घातला आहे कीं, चंद्रकला त्याला भेटली म्हणजे जशी सहजच भेटली, असं वाटावं. हे आर्तवीर्य, आणखी मी,—आम्हां दोघानं इथे लपून उभं राहायला कांहीं हरकत नाहीं. तेव्हां आह्मी असे लपून बसलों असतां त्यांची दोघांची भेट झाली, म्हणजे जें त्याचं वर्तन दिसेल त्यावरून याचं हें दुःख खरोखर प्रेमापासूनच आहे कीं नाहीं, याचा सहज छडा काढूं.

**राणी**—मला काय—मी आपल्या म्हणण्याप्रमाणं वागते. बाई चंद्रकले ! देवकरो अन् तुझं सौंदर्यच त्याच्या या वे-

हाचं कारण असो म्हणजे झालं. तुझ्या सद्गुणांनीं तो पूर्व स्थितीवर येवो म्हणजे झालं. त्यांत तुला ही भूषण आहे, त्याला ही भूषण आहे.

**चंद्रकला**—बाईसाहेब, माझी दिखील हीच इच्छा आहे.

( **राणी** जाते. )

**आर्तवीर्य**—चंद्रकले ! ये पुढें अशी. सरकार, आपण दोघे असे इकडे लपून बसूं. ( चंद्रकलेला ) पोरी ! अशी इथे कशीदा काढीत बैस. म्हणजे तूं एकटी आहेस हें तुला चांगलं शोभेल- अरेरे ! वर वर मोठा भाविकपणा दाखवून आपलीं दुष्कृत्यं माणसं छपिवतात—ही गोष्ट अगदीं सिद्ध आहे. या कामांत आम्ही माणसं खरोखर अपराधी आहों.

**राजा**—( एकीकडे ) हाय ! हाय ! आर्तवीर्य सर्वथा खरं बोलला. माझ्या जिवाला याच्या या भाषणानं कसा चटका लाऊन दिला ! वेश्येला जसं आपलं मुख बाह्यशृंगारानं व कपटी गोड भाषणानं शोभवावं लागतं, त्याच प्रमाणं माझी ही कृति व माझ्या मुखावाटे निघणारे शब्द, यांची अवस्था आहे: अरेरे, काय माझ्या जिवाला हा घोर लागून राहिला आहे !

**आर्तवीर्य**—सरकार, मला वाटतं वीरसेन महाराज आले, आपण एकीकडे होऊं.

[ **राजा** व **आर्तवीर्य** जातात. ]

( **वीरसेन** येतो. )

**वीरसेन**—मरावं का जगावं—हं—विचार म्हणून एवढाच. मरणं आणखी जगणं, या दोन गोष्टींपैकीं अधिक चांगली गोष्ट कोणती ? ज्यांस संपत्तीचा अगदीं ऊत आला आहे व गर्वानं जे अगदीं फुगून गेले आहेत, त्यांचे वाग्बाण मुकाट्यानं सहन करून राहावं—किंवा आपल्या सर्व विपत्तीवर आत्महत्यारूप शस्त्र

धरून त्यांचा एकदमच शेवट करून टाकावा? या दोन्हीं मध्यें खरोखर चांगली गोष्ट कोणची बरं? मृत्यु म्हणजे निद्रा! यापेक्षां ज्यास्त कांहीं नाहीं. मनाच्या ज्या अनंत व्याधी व या जीवाला संसाराच्या ज्या असंख्य पीडा त्या, या महानिद्रेच्या योगानं सर्वथा नाश पावत असतील, असच म्हटलं पाहिजे. अहाहा! खरोखर जर असंच होत असेल, तर ही महानिद्रा प्राप्त होणं अत्यंत इष्ट असून फारच सुखावह असेल. पण बरं, मृत्यु म्हणजे निद्रा—महानिद्रा कां होईना—पण निद्रा, अशी कल्पना केली, तर मग त्या निद्रेंत स्वप्नंही पडत असतील! हां, इथें पंचाईत आली. कारण, असं पहा—हा नश्वर देह सोडल्यावर जी आपल्यास मृत्युरूप निद्रा प्राप्त होते, त्यांत पडणारीं जीं स्वप्नं, त्यांचा विचार मनांत आला कीं घोड थकलं! इथें पंचाईत येते! एवढ्याच करितां माणसं अखण्ड विपत्ती भोगून इहलोकीं आयुष्य घालवितात बरं! कारण, अहो एरवी काळाचे काटे उगीच कोण सहन करील? जुलुमी राजाचा जुलूम, गर्वानं ताठलेल्या माणसाकडून होत असलेली मानखण्डना, अवधीरित केलेल्या प्रीतीपासून होणारी पीडा, न्याय मिळायला अतिशय वेळ लागणं, मोठ्या हुद्यांवर असणाऱ्या लोकांचा उच्छृंखलपणा व क्रौर्य, तसाच साधुजनाचा दुर्जनाकडून होणारा छळ—इतक्या या गोष्टी जर एक लहानशा कट्यारीनं टळत असतील, तर त्या सहन कोण करणार आहे? खचित, हा कंटाळवाणा दुःखी कष्टी जीव माणसं एरवीं खास जगवितीना! पण मरणानंतर पुढं काय असेल कोणास कळे, ही भीती ज्याला त्याला नडते. मृत्यूच्या पलीकडचा व अजून कोणास न कळलेला असा तो मुलुख कीं, ज्या मुलखांत आजपर्यंत इतके यात्रेकरू गेले, पण त्यांतला एक दिखील माघारा आला नाहीं! हां, हेंच तें. इथें घोड अडतं! या संसारांत आपलीं दुःखं कितीही असली तरी माणसं मुकाट्यानं सहन करितात. याचं कारण एवढंच कीं, न जाणों—त्या दुसऱ्या स्थि-

तींत या पेक्षांही दुःखपरंपरा कठीण नसेल कशावरून? तेव्हां उघडच; ज्या दुःखांचा आपणांस अनुभव नाहीं, किंवा ज्यांची कल्पनाही आपणांस होत नाहीं, अशा दुःखांत पडण्यापेक्षां ज्यांचा अनुभव आहे, अशीं दुःखं माणसं आपलीं मुकाट्यानं सहन करि-तात. काय घोटाळा हा ! हें मन फारच बोवा भित्रं! पण त्याचा तरी काय दोष? नपुंसकच पडलं कीं नाहीं तें! तेव्हां, तें भ्याड आहे यांत नवल तें काय? हे गांडलेक विचारच मनाला अगदीं भितरं करून सोडतात. त्यामुळं कोणचाच निश्चय होत नाहीं. आणि म्हणू-नच मोठमोठीं महत्वाचीं कामं माणसाच्या हातून पार पडत नाहींत. शिव! शिव! काय करावं? एकंदरींत माझ्या जिवाला खि-ळलेले हे कष्ट सुटत नाहींत एवढं खरं. पण थांब, अरे कोण बरं आलं हें ! अहाहा! ही माझी परम प्रिया चंद्रकला आली वाटतं ! हे स्वर्गदेवते ! तूं परमेश्वराजवळ माझ्या अघोर पातकांची क्षमा माग बरं !

( चंद्रकला येते. )

**चंद्रकला**—महाराज ! आपली प्रकृत ठीक आहेना ! कि-ती दिवस तरी बाई गाठ पडली नव्हती! मी विचारते, आपली प्रकृत ठीक आहे ना ?

**वीरसेन**—काय ? माझी प्रकृत? ठीकच आहे—तिला काय झालं आहे ? बाई ! माझा समाचार का घेण्यास आपण आलां? फार चांगलं केलंत बरं! आपले माझ्यावर फार उपकार आहेत! ठीक आहे—सर्वच ठीक आहे.

**चंद्रकला**—पण प्राणेश्वरा ! मला आज किती दिवस आ-पल्याशीं कांहीं बोलायचं होतं. ती आज बरी एकदांची गाठ प-डली. पण हें पहा, आपण माझ्याजवळ जें कांहीं बोललां होतां त्याची आपल्याला आठवण आहे कां ? त्यांतलं आपल्याला कांहीं स्मरतं आहे कां आतां

**वीरसेन**—काय म्हणतस ? मी तुझ्या जवळ कांहीं बोललों हां ? मी कांहीं एक बोललों नाहीं, आणि मला कांहीं स्मरत-हीं नाहीं !

**चंद्रकला**—सख्या ! आपण माझ्या जवळ जें कांहीं बोल-ला होता त्याची आपल्याला आठवण असलीच पाहिजे. अहाहा! कायग बाई त्या दिवशींचे ते शब्द! ते विसरण्यासारखे का हो-ते? छे बाई, असं कसं होईल? पण असले शब्द ज्या अर्थी आ पण विसरलों म्हणतां, त्या अर्थी ते आपण आपले आतां परत घ्या. कारण, त्यांतली गोडी आपल्या आतांच्या आपणानं अगदीं गेली. तर आतां हे नुसते नीरस शब्द मलाग बाई घेऊन काय करायचं आहे ? जर एखादी वस्तु आपण होऊन प्रेमचिन्ह म्हणून कोणी मोठ्या भक्तीनं दिली, आणखी पाठीमागून त्या देणाराची ती भक्ति कमी झाली, तर थोर मना-च्या माणसाला त्या वस्तूची किंमत कमी होते.

**वीरसेन**—( रागाऊन ) अग दुष्टे ! तुझ्यांत कांहीं इमान आहे ?

**चंद्रकला**—म्हणजे ?

**वीरसेन**—तूं देखणी आहेसना ? झालं तर मग ?

**चंद्रकला**—हेंग काय बाई! याचा अर्थ तरी काय समजावा?

**वीरसेन**—हें बघ, तूं म्हणतेस मी देखणी आहें आणखी इमानी आहे. पण हें जुळेल तरी कसं ?

**चंद्रकला**—प्राणनाथ ! सौंदर्याला एकनिष्टपणासारखं दुसरं भूषण तें कोणचं बरं ?

**वीरसेन**—हं ठीक आहे. पहा, एकनिष्ठपणा आणि सौंदर्य हे दोन्ही गुण चांगले खरे; पण ते एके ठिकाणीं झाले कीं सौंदर्याच्या अलौकिक जोरानं एकनिष्ठपणाचा अनेकनिष्ठपणा झालाच असं समजावं ! पण एकनिष्ठपणांत असा कांहीं अलौ-

किक जोर नाहीं. त्याच्यानं कांहीं सौंदर्याचं असं रूपान्तर होत नाहीं. आजपर्यंत हा मोठा विरोध भासत होता. पण आतांच्या गोष्टीनं याचा चांगला उलगडा होतो.—माझी तुझ्यावर पूर्वी प्रीति होती खरी.

**चंद्रकला**—प्राणनाथ ! आपण मला असं वाटायला लावलं होतं खरं.

**वीरसेन**—माझ्यावर विश्वास ठेवायचा नव्हतास. सद्‌गुण जरी वरून दिसला तरी आंतला दुर्गुण गेला" असं समजूं नये. मी मुळींच तुझ्यावर प्रीति केली नाहीं.

**चंद्रकला**—हाय ! हाय ! प्राणनाथ ! तर मग आतां मी पुरीच फसलें असं म्हणायचं !

**वीरसेन**—जा ! जा ! मठांत जाऊन जोग घे जा ! मी पक्का इमानी आहें, तरी पण माझ्या देखील हातून अशीं कांहीं कृत्यं घडलीं आहेत कीं, मी आपल्या आईच्या उदरीं आलों नसतों तर बरं झालं असतं, असं मी समजतों. आतां तुझ्या पोटीं तरी अशींच पातकी कारटीं निपजायचीं कीं नाहीं? मी फार गर्विष्ठ आहें; मोठा डाव धरणारा आहें; महत्वाकांक्षी आहें. ज्यांची कल्पनाही करितां येत नाहीं, अथवा जीं बोलून दाखवितां येत नाहींत, अशा पातकांच्या राशीच्या राशी माझ्या डोक्यावर आहेत. मला आणखी इतके कांहीं गुन्हे करायचे आहेत, कीं ते दर्शवायला मजजवळ पुरते विचार देखील नाहींत; त्यांचा विचारही माझ्यानं होत नाहीं व ते कोणत्या तऱ्हेचे आहेत, याची कल्पनासुद्धां मला होत नाहीं; आणखी ते करायला माझं आयुष्यही पुरणार नाहीं ! आमच्या सारख्या केवळ भुईला भार असणाऱ्या प्राण्यांचा उपयोग काय ! आम्ही झाडून सारे पक्के हरामखोर लोक आहोंत. आमच्यापैकीं कुणावर विश्वास ठेवूं नकोस. जा, जा, मठाचा रस्ता धर जा.—कायग, तुझा बाप कुठें आहे?

**चंद्रकला**—कुठे म्हणजे, घरीं आहेत.

**वीरसेन**—तर मग आत्तां जाऊन त्या घराचीं दारं बंद कर जा. त्याला ह्मणावं, आपला पाजीपणा आपल्या घरांतच कर ! जा. तूं जा, जा आतां.

**चंद्रकला**—हे कृपाळू देवा ! आतां इकडचं संरक्षण करणार तूंच आहेस.

**वीरसेन**—आतां तूं कधीं लग्न केलंसच, तर हा आपला माझा आहेर तूं आपल्या जवळ ठेव. तो कोणचा समजलीस? तूं अगदीं अनसूये सारखी पतिव्रता असलीस आणखी जानकी सारखी शुद्ध असलीस तरी तुझ्या कपाळचा लोकापवाद कधींही टळणार नाहीं. जा, जा, मठांत जाऊन बैस जा. आणखी एक सांगतों, तुला कदाचित् लग्न करणंच झालं, तर एखाद्या महामूर्खाशीं तरी लग्न लाव. कारण, तुम्ही बायका पुरुषाला राक्षस कसा करून सोडतां, हें शहाण्या माणसांनं पक्कं ठाऊक असतं. जा, जा, मठांत जाऊन लौकर एकदांची जोग घेऊन बैस.

**चंद्रकला**—हे देवाधिदेवा ! यांना पूर्वस्थितीवर आणणं हें तुझ्याकडे आहे !

**वीरसेन**—तुम्ही बायका आपले रंग कसकसे बदलतां हें हीं मला ऐकून ठाऊक आहे. देवानं तुम्हाला दिलेला मुखडा असतो एक, आणखी दाखवतां दुसरा; काय माना वेळतां, काय कंबर लचकावतां, काय फुद्राण्यासारख्या उडतां, काय लाडं लाडं बोलतां, आणखी सारा आपला भोळा भाव दाखवतां! चल, जा. आपल्याला नको बोवा तें कांहीं ! आपल्याला या गोष्टीचा तर अगदीं कंटाळा आला आहे. आतां आपल्याला कोणाच्या लग्नाविग्नाची जरूर नाहीं ! ज्यांचीं लग्नं झालीं आहेत, त्यांच्यापैकीं एक शिवाय करून सगळे जगतील. बाकीचे सारे आहेत तसेच राहतील. चल निघ; हो मठांत चालती !

( **वीरसेन** जातो. )

**चंद्रकला**—हाय हाय! अशा थोर मनाची काय दशा उडून गेली आहे? ज्यांची तरवार शूर शिपायाच्या तरवारीसारखी घमके—ज्यांची वाणी एखाद्या महापंडिता सारखी अस्खलित चाले—ज्यांची नजर एखाद्या मुत्सद्यासारखी अति सूक्ष्म असे, या सुंदर राष्ट्रांतील प्रजेची ज्याच्यावर सारी भिस्त व जो साऱ्या लोकांच्या गळ्यांतला अगदीं ताईत—या राष्ट्राचा मुकुटमणी; कसं बसावं, कसं उठावं, कसं चालावं, हें सारं ज्यांच्या पासून शिकावं—अशी ही प्रत्यक्ष मदनमूर्ति—ज्यांच्या सौंदर्याकडे पहात घटका न् घटका लोकांनीं उभं राहावं, त्यांची ही अशी, अशी स्थिति व्हावीना? आणि मी जगांतल्या साऱ्या बायकामधें अतिशय कष्टी, अभागी, कीं त्यांच्या मुखांतून अगोदर ती अमृतासारखी गोड भाषणं ऐकून शेवटीं माझ्या प्रालब्धीं हें पाहणं यावंना! एखाद्या वीणेच्या तारा तुटल्या असतां त्याचा मधुर आवाज नाहींसा होऊन तो जसा निरुपयोगी होतो, त्यासारखी यांची बुद्धी नष्ट झाल्याकारणानं यांचं आयुष्य फुकट जावंना! आणखी यांचं हें अलौकिकरूप, आणि तारुण्याचा ऐन बहर, यांची अगदीं माती माती व्हावीना! काय माझ्यावर हा दुःखाचा डोंगर कोसळला आहे! या डोळ्यांनीं पहिल्यान्दा पाहिलं काय आणि आतां हें काय पाहण्याचा प्रसंग आला आहे!

[ **राजा** आणि **आर्तवीर्य** पुनः येतात. ]

**राजा**—काय? प्रीति! छे तशांतला कां हीं एक प्रकार नाहीं. त्याच्या भाषणांत जरी फारसा मेळ नसतो, आणखी त्याच्या बोलण्यावरून, कोणाशीं कसं वागावं, कोणाला काय बोलावं, हें त्याला समजत नाहींसं जरी दिसतं, तरी एवढ्यावरून हा वेडाचा प्रकार खास नाहीं. त्याच्या जिवाला अशी कांहीं एक गोष्ट

लागून गेली आहे कीं, त्यामुळें तो नेहमीं उदासीन दिसतो, आणि या गोष्टीचा परिणाम फारच वाईट होईल अशी भिती वाटते. म्हणून आम्हीं ही गोष्ट टाळण्याकरतां तावडतोब विचार करून असा निश्चय केला आहे कीं, आमची उन्मत्तपणानं न दिलेली खंडणी वसूल करण्याकरितां म्हणून त्याला सौराष्ट्राला पाठवावा. असं केलं असतां कदाचित् निरनिराळ्या समुद्रावरील हवा, निरनिराळे देश, आणखी त्यांतले निरनिराळे पदार्थ हे पाहून त्याच्या अंतःकरणांत जी कांहीं गोष्ट टंवचत आहे, आणि जी त्याच्या मस्तकांत सतत भ्रमण करीत राहिल्यामुळें तो वेडा झाला आहे, ती अगदीं समूळ निघून जाईल. तुमचं कसं काय मत आहे?

**आर्तवीर्य**—वा! फार उत्तम आहे! तरी पण त्याच्या दुःखाचं कारण आणि प्रथमारंभ प्रत्यादिष्टप्रीतीच होय असं मला वाटतं. चंद्रकले! छे छे, वीरसेन महाराज काय बोलले हें कांहीं तुझ्यापासून ऐकण्याची आम्हाला जरूर नाहीं. आम्हीं तें सारं ऐकलं.—महाराज! आपल्या मर्जीप्रमाणं आपण करावंच. पण आपल्याला जर योग्य वाटेल तर हें नाटक पाहिल्यानंतर त्याच्या मातोश्री राणीसाहेब यांच्याकडून हलकेंच त्याच्या दुःखाचं कारण काय तेवढं काढून घ्यावं. त्यांनीं त्याच्या मनांतला खडानखडा काढून घ्यावा. आणि आपल्याला मान्य असेल तर, त्यांचीं बोलणीं होतील तीं नीट ऐकूं येतील अशा जागीं मी गुप्तपणें बसेन. इतकं करूनही जर त्याच्या मनांतली गोष्ट बाहेर पडली नाहीं, तर मग आपल्या बुद्धीला वाटेल तिथे पाठविण्याचा अथवा प्रतिबंधांत ठेवण्याचा विचार आपण खुशाल करावा.

**राजा**—ठीक आहे तर मग असंच करूं: थोर मनुष्याच्या बुद्धीला भ्रंश झाला म्हणजे त्याच्यावर चांगली नजर ठेवून त्याचा बंदोबस्त केलाच पाहिजे.

[ सर्व जातात.

## प्रवेश २.

### किल्ल्यांतील एक दिवाणखाना.

(**वीरसेन** व नाटकमंडळी येतात.)

**वीरसेन**—अरे ए ! हें पहा, मीं तुला जीं भाषणं लिहून दिलीं आहेत तीं कशीं स्पष्ट सर्वांना ऐकूं येतील अशीं म्हण अं! नाहीं तर तोंडांतल्या तोंडांत गळमुळत म्हणशील. पुष्कळ पात्रें या आतांच्या नाटकांतून पाहिलीं तीं आपलीं भाषणें करूं लागलीं कीं दांतओंठ खात, वेडोवाकडीं तोंडं करून भाषणं करतात. तसं तूं जर करणार असलास, तर हे दारावर फेरीवाले येतात त्यांच्या कडून, किंवा न्यायासना पुढें हेल काढून चोपदार ओरडतात त्यांच्या कडूनच मी हें भाषण बोलवीन. आणखी पहा, हावभाव करायचे ते मारून असे वेडेवांकडे हात वारे करून करूं नकोस हो ! पण अभिनय करशील तो कसा सौम्य कर. कारण, मनुष्याची वृत्ति कितीही खवळली, समज कीं अगदीं मारून तुफान माजून राहिलं आहे, तरी त्यालाही एका प्रकारची मर्यादा पाहिजे. कांहीं शांतता पाहिजे. कारण पहा. एखादा लठ्ठ भयंकर बंव्या तें अकाळविक्राळ सोंग घेऊन जेव्हां कां रंगभूमीवर येतो आहे आणि अललल आणि प्रधानजी सेनेचा बंदोबस्त—अहाहा—अंगांत जसं कांहीं गुलामाच्या वारं आलं आहे.—छे ! छे ! छे ! ते राक्षस म्हणजे केवढं लठ्ठंभारती प्रकर्ण ! केवढा आरडा ओरडा ! पण तोच आवडणारी श्रोत मंडळी हरीचे लाल आपले असतातच ! खरोखर, असलं सोंग रंगभूमीवर पाहिलं म्हणजे मला वाटतं ज्या दोन थोबाडींत लगावाव्या! हे गुलाम धांगडधींग्यामध्यें रावणाच्या बापालाही मागें सारतात.

**नाटक मं० पैकीं एकजण**—महाराज, आमच्यांत हा असला कांहीं प्रकार नाहीं.

**वीरसेन**—झालं, तसंच अगदीं आपलं बेंगरूळ व मळमळीत, असेंही भाषण उपयोगाचं नाहीं. या कामांत ज्याची त्याला थोडी तरी अक्कल पाहिजे. या गोष्टी सांगून शिकवून किती येणार! भाषण करीत असतां पात्राच्या मुखावाटे जे शब्द निघतील त्याला अन्वर्थ व त्याच्या अनुरूप अभिनय पाहिजे. त्याचप्रमाणें अभिनय करावा तो त्याला योग्य अशी भाषणशैलीही पाहिजे. सारांश, भाषणास अनुसरून अभिनय असला पाहिजे व अभिनयास अनुसरून भाषण असलं पाहिजे. त्यांतही सर्व कांहीं प्रतिष्ठितपणाचं असावं. छचोरपणा उपयोगाचा नाहीं. कारण, कोणचंही काय, अतिशय झालं म्हणजे गेलं फुकट. नाट्यकलेचा मुख्य हेतु म्हटला म्हणजे पूर्वी काय—आतां काय—केव्हां काय, संसाराचं चित्रच तें! संसारांतील गोष्टी हुबेहुब करून दाखवाव्या व त्यांत अंमळ चमत्कृतिही असावी. नाटक म्हणजे सृष्टीचा आरसा—या संसाराचं प्रतिबिंब त्यांत दिसावं. सद्गुणाचा चेहेरा सद्गुणाला, दुर्गुणाचा दुर्गुणाला दाखवावा. त्या त्या काळाचं स्वरूप वगैरे सर्व कांहीं मूर्तिमंत श्रोत्यांपुढें उभं करावं. याचं नांव नाटक. खूप चावटपणा केला, खूप मोठ्यानं ओरडलं, हाव भाव फाजील केले, म्हणजे मूर्ख व अरसिक लोकांस मात्र मोठी मौज वाटते व ते मोठी वाहवा करितात. पण जे जाणते व खरे रसिक असतात, त्यांस फार दुःख होतं. आणि वास्तविक अशा एका मनुष्याचा अभिप्राय साऱ्या नाटकगृहांत भरलेलं जे बाजारबुणगं त्याच्या अभिप्रायापेक्षां त्याची किंमत तुम्हीं अधिक समजावी. शिव! शिव! या कांहीं कांहीं नाटकांत अशी एक एक गमतीचीं पात्रं असतात कीं बस्स बोलणं नाहीं. आणि चमत्कार हा कीं शेंकडों लोक त्यांची वाहवा करतात. चालणं काय आंगाड्या बोंगाड! गुलामांच्या हातात जशा कुबड्या दिल्या आहेत. काय धांगड धिंगा! काय ओरडणं! शिमगाच तो! नाटक कसलं?

**खेळ करणाऱ्यांपैकीं एक**—सरकार, आपण आमचा खेळ पाहिला कीं, आम्हीं हें बहुतेक आमच्या नाटकांतून काढू-न टाकलं आहे, असं आपल्या नजरेस येईल.

**वीरसेन**—एकंदर हा पहिला वाईट प्रकार काढून टा-का. कांहीं ठेऊं नका. अगदीं मुळापासून सुधारणा करा. दुसरं हें पहा, तुमचा तो विदूषक असतो तो—त्याला सांगा कीं तूं खबरदार फाजील नकला करशील तर! त्याला सांगितलेला भाग त्यानं उत्तम करावा हेंच त्याचं काम. कांहीं विदूषक मीं पाहिले ते रांडलेक आपल्या भाषणानं दुसऱ्याला हसूं येईना ह्मणजे आपणच खूप हसतात! तेव्हां मग श्रोत्यांपैकीं कांहीं वेडगळ मूर्तीही त्याच्या बरोबर थोडयाशा हसतात. तवऱ्यांत काय गम्मत होते कीं, इक-डे खेळ ऐन रंगांत आलेला असतो, श्रोत्यांचीं मनं अगदीं तल्लीन झालेलीं असतात. इतक्यांत विदूषक कांहीं तरी फाजील-पणा करितो; त्यामुळें रंगाचा अगदीं बेरंग होतो. तेव्हां एखादे वेळ मला अस्सं वाईट वाटतं व इतका राग येतो कीं, पायांतला एक पायपोस काढून लगावावा! असो. जा तुह्मी आतां. खेळाची तयारी करा

[ नाटकमंडळी जाते. ]

[ **आर्तवीर्य, विठोजी** आणि **संभाजी** येतात. ]

कसं काय रावसाहेब! हें नाटक पाहण्याची राजेसाहेब मे-हरबानी करतील काय?

**आर्तवीर्य**—हो! राणीसाहेबां सुद्धां महाराज आत्तां येतील.

**वीरसेन**—तर मग त्या नटांना सांगा लवकर तयारी क-रावला.

[ आर्तवीर्य जातो. ]

तुह्मी ही त्यांना जरा जलदी करायला सांगाल कां?

**दोघे**—जी सरकार. [ निघून जातात. ]

[ हरसेन येतो. ]

**वीरसेन**—अहो हरसेनराव !

**हरसेन**—हा मी सेवेला हजर आहें.

**वीरसेन**—हरसेना ! खरोखर माझ्याशीं बोलायला योग्य मनुष्य ह्मणून कायतो तूंच आहेस.

**हरसेन**—कसा बरं सरकार ?

**वीरसेन**—तुझी कांहीं मी खोटी स्तुती करतों असं समजूं नकोस. खोटी स्तुती करून तुझ्या पासून काय मला प्राप्ती आहे. तुझं स्वतांचं पोट भरायला तुझ्याजवळ आपल्या सुस्वभावावांचून दुसरी काय संपत्ती आहे ? गरीब गुरीबांची काय व्याजस्तुति करायची आहे ? बरबर खडीसाखरे प्रमाणें मिठ्ठे बोलणाऱ्या लोकांनीं श्रीमंत लोकांची हांजी हांजी करावी. ज्या ठिकाणीं द्रव्य मिळण्याचा संभव आहे त्या ठिकाणीं खाविंदचरणांरविंदीं मिलिंदायमान झालं असतां चालेल तरी. ऐकलस कां ? माझं मला बरं वाईट कळायला लागल्यापासून आणि माझं मला चांगला मनुष्य कोण हें निवडून काढायला यायला लागल्यापासून मीं तुलाच पसंत केला आहे. कारण तूं मनुष्य कसा आहेस कीं सारीं दुःखं सहन करून त्यांचं तुला कांहींच वाटत नाहीं. दैव अनुकूल असो कीं प्रतिकूल असो, लक्ष्मी येवो किंवा जावो, तुझ्या दृष्टीनं दोन्हीही सारखेंच; खरोखर ज्यांच्या मनोविकारांचा व विचारशक्तीचा असा मेळ असतो कीं ते विधीच्या हातांतील तो नाचवील त्याप्रमाणें नाचणारीं बाहुलीं होऊन राहत नाहींत, तेच धन्य होत. मनोविकारांचा जो अगदीं बंदा गुलाम नाहीं, असा एखादा मनुष्य मला दाखिव कीं मी तुझ्या सारखा त्याला आपल्या गळ्यांतला ताईत करून ठेवीन इतकंच काय, मी त्याला आपल्या हृदयांतील आधिदैवतच करीन— पण असो फार वाहवलों—आज रात्रीं कारभारीसाहेबांच्या पुढें एका नाटकाचा प्रयोग होणार आहे. आणखी त्यांतला एक

धिक भरीस पडून पातकांच्या राशीला आणखी भर पाडशील! हा सदुपदेश मी तुला करतों—याजबद्दल मी तुझी माफी मागतों. कारण, आजकाल दिवस असे खराब आले आहेत कीं, साधूंनीं चोरांची, सज्जनानीं दुर्जनांची, क्षमा मागितली पाहिजे! एवढंच नव्हे, तर उलटं त्यांच्या कल्याणाकरितां त्यांच्या पुढें वाकलं पाहिजे व त्यांच्या पुढें नाकं घासलीं पाहिजेत!

**राणी**—अरे वीरसेना, माझ्या काळजाची तूं दोन छकलं केलीस रे!

**वीरसेन**—त्यांतलं वाईट साईट घाणेरं असेल, तें दे फेंकून—म्हणजे झालं. मग बाकी तें चांगलंच राहील. राजा रामचंद्राच्या जानकी सारखी अग्निशुद्ध होशील. आई मी आतां जातो. पण हें बघ, पुनः त्या कारभाऱ्याशीं कांहीं संबंध ठेऊं नकोस बरं. अग- अंगीं सद्गुण किंवा पातिव्रत्य मुळींच वागत नसलं, तथापि, बाह्यात्कारीं तरी दाखीव! ही दुष्ट दांभिकपणाची सवय पक्की अंगवळणीं पडणं जरी वाईट आहे, तरी चांगलीं कृत्यं मनापासून होवोत, अगर नहोवोत, तीं लोकदृष्टीला तरी करणारा मनापासून करीत आहे असं दिसतं. कसंही कर. पण आजरात्रीं त्याचं तोंड दिखिल पाहूं नको. हें असं करणं आज जरी तुझ्या जिवावर येईल, तरी तें उद्यां इतकं अवघड जाणार नाहीं. कोणचीही गोष्ट अभ्यासांत पडली ह्मणजे नैसर्गिक स्थिती देखील बदलते. अभ्यास काय करीत नाहीं? त्याचा असा कांहीं विलक्षण प्रभाव आहे कीं तो पापवासनेला क्षीण करतो, किंबहुना तिचा समूळ नाश करून टाकतो. बरं तर, आतां येतों मी. नको, नको, आतां तुझा आशिर्वाद नको. जेव्हां परमेश्वराचा आशिर्वाद आपल्यास मिळावा अशी तुझी इच्छा होईल, म्हणजे जेव्हां तुला खरा पश्चात्ताप होईल, तेव्हां तुझा आशिर्वाद घेण्याला हा वीरसेन तयार आहे य. (आर्तवीर्याकडे बोट दाखवून) या म्हाताऱ्याबद्दल मला अत्यंत वाईट वाटतं आहे. पण काय करावं? परमेश्वराच्याच मनांत अस

प्रवेश असा आहे कीं, मी जी तुला बाबांच्या मरणाची हकीगत सांगितली तिच्याशीं त्याचं बरच साम्य आहे. हें बघ, तूं एवढं कर कीं तो प्रवेश चालला असतांना कारभारी साहेबांच्या चेहे-ऱ्यावर बारीक नजर ठेव.

**हरसेन**—बरं आहे तर मग. महाराज, हा खेळ चालला असतांना त्यांच्यानं जर एवढीशी गोष्ट छपवून ठेववली तर त्या चोरीचा जबाबदार मी होईन !

**वीर०**—ह्या पहा सरकारच्या स्वाऱ्या आल्या खेळ पहा-यला. आपल्याला जसं कांहीं यांत ठाऊकच नाहीं, असं दा-खिवलं पाहिजे. तूं जाऊन बैस कुठे तरी.

**[राजा, राणी, आर्तवीर्य, चंद्रकला, संभाजी, विठोजी व आणखी दुसरे येतात.]**

**राजा**—बाळा वीरसेना ! बेटा, तुझं बरं आहेना?

**वीरसेन**--वा ! काय विचारावं ? उत्तमोत्तम ! आह्मी सध्यां गारगोट्यांच्या भातावर आहों. हवा पितों. लोकांच्या गोडगोड वचनांवर निजतों. काय हो! वाऱ्याच्या भाकरी केल्या तर पोट भरेल कां ?

**राजा**—वीरसेना ! अरे, हा माझ्या प्रश्नाचा जाब नाहीं. मी विचारलं काय आणखी तूं सांगतोस काय? मी हें नाहीं बोललों.

**वीरसेना**—माझंही पण तें बोलणं आतां नाहीं. ( आर्त-वीर्यास ) अहो ! राव ! तुम्ही लहानपणीं कधीं नाटकांत सोंग घेतलं होतं कां ?

**आर्तवीर्य**—होय, सरकार. मी आणखी चांगल्या सोंगा-ड्यांपैकीं एकजण होतों.

**वीरसेन**—तुम्ही कोणाचं सोंग घेतलं होतत ?

**आर्तवीर्य**—कोणी, मी ? मी घेतलं होतं—रावणाचं सों-ग. मग मला रामानं येऊन ठार केलं. तेव्हां रावण पड-ला उताणा !

**वीरसेन**—हाँ ! ठीक झालं, ठीक झालं. अरे, पण ते आम-चे खेळ करणारे कुठे आहेत ? झाली का नाहीं त्यांची तयारी ?

**विठोजी**—होय, महाराज अगदीं तयारी आहे. आपल्या येण्याचाच अवकाश आहे.

**राणी**—अरे ! बाळा वीरसेना ! असा बैस माझ्या जवळ.

**वीरसेन**—आई ! छे. इकडे हा एक लोकचुंबक आहेना मला आकर्षण करणारा !

**आर्तवीर्य**—( राजाकडे पाहून ) हाँ, हाँ. महाराज, पाहि-लंतना हें ?

**वीरसेन**—बाई साहेब! टेकूं का आपल्या मांडीवर—

[ **चंद्रकलेच्या** पायाजवळ पडतो. ]

**चंद्रकला**—छे. हे काय बाई !

**वीरसेन**—अग डोकं—मी ह्मटलं—मी आपलं डोकं तुझ्या मांडीवर अमळ टेकूं का !

**चंद्रकला**—मग नको कुणी ह्मटलं होतं ?

**वीरसेन**—तुला कांहीं भलतच वाटलं वाटतं !

**चंद्रकला**—मला नाहीं बाई कांही कळत!

**वीरसेन**—कांहीं कळत नाहीं हेंच चांगल आहे. कुमारि-केला हेंच भूषण!

**चंद्रकला**—कां—आज कळी फारशी उमलली आहे ?

**वीरसेन**—कोणाची—माझी ? हो तर—अग माणसानं रं-गेल असावं तर काय करावं ? कारण, त्या आमच्या आईसाहेब

पाहिल्यास का ? त्यांची कळी कशी उमलून फूल देखील आलं आहे ! आणखी दोन घटका दिखिल पुरत्या लोटल्या नाहींत आमचे वडील मरून !

**चंद्रकला**—छे, त्यानं मरून चांगले चार महिने झाले.

**वीरसेन**—काय, इतके दिवस झाले ? मग कोणी हें कंदी पागोटं, आणखी हा भिकार पोषाख भुतासारखा अंगावर घालावा ? मी आतां छान भभक पोषाख घालणार ! काय चमत्कार! दोन महिन्यापूर्वी माझा बाप मेला आणखी अजून मी त्याला विसरलों नाहीं! एखाद्या मोठ्या माणसाची साऱ्या जन्माची आठवण पक्के साहा महिनेपर्यंत लोकानं राहील, अशी आशा वाटते ! पण मग खरंच त्यांचं स्मारक म्हणून त्यांच्या छत्र्या बांधल्या पाहिजेत. नाहीं तर, बांधली एखाद्या सन्याशाची समाध—ठेवला वर एक महादेव—जो येणार तो म्हणणार, शंभो ! हर ! त्या संन्याशाला मग कोण विचारतो आहे !

[नाटकांतील **राजा व राणी** अशीं दोन पात्रें येतात.]

**नाटक॰ राजा**—प्रिये ! या हातानं तुझें पाणिग्रहण केल्यापासून भगवान् सूर्यनारायणानं आपल्या रथांत बसून या पृथ्वीसभोंवती वीसवेळां पर्यटन केलं असेल ! आपण परस्परांशीं प्रतिज्ञा केल्या, आपण एकमेकांच्या हातांत लग्नकंकणं बांधलीं, आणि परस्परांचीं मनं त्या विवाहकालीं प्रेमपाशानं बध्द झालीं—या गोष्टी होऊन आज बहुत काल झाला. नाहीं बरं ?

**नाटक॰ राणी**—प्राणेश्वरा ! आपली एकमेकांवरची प्रीति अशीच पुढेंही चिरकाल रहावी, हेंच देवा जवळ माझें मागणं आहे. दुसरं काय ? पण, अगबाई, आलीकडे आपली प्रकृति इतकी अस्वस्थ दिसते—आपला पूर्वींचा तो आनंदी स्वभाव-आणखी आपली ती पूर्वींची स्थिति, हीं इतकीं बदलून गेलीं आहेत कीं, आपल्या मला [illegible] बरं वाटत नाहीं. मला आपला [illegible]

वसा वाटत नाहीं, तरी प्राणप्रिया ! आपल्या जिवाला त्यापासून तिळप्राय वाईट वाटूं देऊं नये. कारण, नवऱ्यावर बायकांची प्रीति, आणखी नवऱ्याच्या जिवाविषयीं काळजी, दोन्ही मेलीं सारखीच असतात. दोन्हीही अपरंपार असतात असं नाहीं. माझी आपल्यावर किती प्रीति आहे, हें मी सांगायला कां पाहिजे? आपल्याला त्याचा अनुभव आलाच आहे. आणखी, माझी प्रीति किती आहे हें जसं आपल्याला ठाऊक आहे—तशीच या जिवाविषयीं मला किती काळजी असते तीही इथे माहितच आहे. आणखी प्राणनाथ ! प्रीति फार असली किनई ह्मणजे मनांत संशय तरी किती येतात? त्यामुळं मेली आपल्या जिवाला काळजी लागते. म्हण आहे ना—'मन चिंती तें वैरी न चिंती'? तेव्हां जिथे असे वेडे वेडे संशय मनांत फार येतात, तिथे बाई प्रीतीही फारच असली पाहिजे. नाहीं बरं ?

**राजा**—खरं आहे. प्रिये ! तूं किती शहाणी आहेस म ?, हें तुझं भाषणच सांगतं. पण हें बघ, मला हें जग तुझ्या आधीं सोडून जावं लागेल असं कशावरून नाहीं होणार ?—आणखी मी हें जग सोडून गेलों—तरी तुला का माझ्या बरोबर जातां येतं आहे ! तूं आपली आनंदानं विलासांत राहशील; आणखी मग कदाचित् माझ्या सारखाच एखादा प्रेमळ नवरा—

**ना० राणी**—नको, नको तें बाकीचं ऐकायला—काय मेलं अभद्र बोलणं हें ! देव करो आणखी माझ्या हृदयांत असली दुष्ट वासना कधीं कधीं न येवो ! आपल्या खेरीज दुसरा पुरुष मी स्वप्नीं दिखील पाहिला नाहीं. आपला पहिला नवरा जिला मेलीला आवडत नसेल, ती मेली त्याला ठार मारल्या खेरीज दुसरा कशाला करील ?

**वीरसेन**—( एकीकडे ) यंव् ! काय टचका लागला आहे ! कडू कडू वीष !

**ना० राणी**—नायका दुसरी लग्नं करतात त्यांत प्रीतीचा भाग असतो का कांहीं? तें आपलं कांहीं तरी. पुन्हा त्या सटवीनं आपला नवरा मारावा आणखी त्याला मिठ्या मारित बसावं! इश्श ग बाई. कसली मेली प्रीति ही! जनावरंच तीं!

**ना० राजा** सखे! तूं तोंडानं बोलते आहेस, असंच तुझ्या मनांत असलं तर खरं! माणसं आपल्याकडून कितीदां विचार करतों आणखी मोडतों कितीदां? निश्चय हा स्मृतीचा दास आहे. त्याच्या जन्मकाळीं मोठ्ठी त्याची धामाधूम असते-पण त्याचा तो तडक, त्याची ती शक्ति स्थिर रहात नाहीं. झाडावर एखादं फळ कसं कच्चं असतं तोंपर्यंत ते डहाळीला चिकटून राहतं, तुटतां तुटत नाहीं. पण तेंच फळ जेव्हां पिकून मऊ होतं तेव्हां—फार काय—कोणी हालिवल्याशिवाय आपोआप पडतं. आपण आपल्याशीं जें कबूल केलेलं असतं, तें आपण विसरून जातों. त्याला काय इलाज आहे? अगदीं ऐन भरात आलों असतां आपण जो एखादा विचार किंवा निश्चय करतों, तो विचार, किंवा निश्चय, तो आपला भर संपला म्हणजे नाहींसा होतो. हर्ष किंवा शोक, यांची अगदीं कमाल झाली, म्हणजे आपणच केलेल्या इमारतीचा ते आपणच नाश करून टाकतात. शोकाचा हर्ष व हर्षाचा शोक व्हायला इतकंसं कारण बस्स होतं. यांत कांहीं मोठ्ठंसं अलौकिक आहे असं समजूं नकोस. जगाची ही रहाटीच आहे. आपणांस संपत्ति प्राप्त झाली, म्हणजे लोक आपल्यावर प्रीति करतात; विपत्ति प्राप्त झाली म्हणजे द्वेष करूं लागतात. 'सर्वे गुणाः कांचनमाश्रयंते!'. प्रेम लक्ष्मीच्या मागं धावतं किंवा लक्ष्मी प्रेमाच्या मागं धांवते, या गोष्टीचा निर्णय अजून व्हायचा आहे. एखादा मोठ्ठा श्रीमान् मनुष्य विपत्तींत पडला कीं, त्याच्या अगदीं लोभांतलीं माणसं त्याला सोडून पळून जातात. त्याचप्रमाणं गरीब मनुष्याला लक्ष्मी प्राप्त झाली कीं त्याचे शत्रू असतात तेच त्याचे मित्र होतात. यावरून तूं पहा

कीं प्रीति ही संपत्तीवर अवलंबून आहे. ज्याला सर्व कांहीं अनुकूल आहे, म्हणजे कोणचं ही कांहीं कमी नाहीं, त्याला स्नेही ही कमी नसतात; लागतील तेवढे मिळतात. तीच ज्याच्या पदरी गरीबी असते; तो एखाद्या पोकळ भोंदू मित्राची परीक्षाच पाहूं लागला तर तो त्याचा शत्रू बनलाच, असं समजावं. सारांश काय कीं, आपल्या इच्छा आणखी आपल्या कर्मदशा, परस्पर अगदीं विरुद्ध असतात. आपण जे मनांत बेत करतों ते बहुत करून नेहेमी ढासळतात. विचार तेवढे आपले—पण त्या विचारांचं पर्यवसान आपल्या हातांत नसतं. त्याचप्रमाणं तुला आतां मात्र वाटतं आहे कीं, मी दुसरा पती करणार नाहीं. पण तुझा पहिला पति हिरावला कीं तुझे ते पहिले विचार ही लयास गेलेच असं समजावं.

**ना० राणी**—हर! हर! देवा मला अशी बुद्धी कधीं कधीं देऊं नकोस वरं! फार काय—असं झालं तर ही धरणी मला अन्न न देवो, माझ्या डोळ्याच्या खाचा होवोत—माझा सारा विश्वास, माझी सारी आशा, भग्न होवो. माझा सारा सत्यानास होवो! माझ्या नशिबीं दुःख व शोक, आणखी जगांतल्या जेवढ्या विपत्ति म्हणून आहेत, तेवढ्या साऱ्या माझ्या मागं लागोत! यमाच्या त्या दुर्धर यातनांत मी पडेन! प्राणप्रिया, माझ्या कपाळीं एकदां वैधव्य आलं आणखी फिरून जर मी कोणाची बायको होईन, तर मी वर सांगितल्या सारखी माझी स्थिति होऊन माझे हाल हाल होवोत!

**वीरसेन**—हिनं हें दिलेलं वचन मोडलं, तर मग कसं?

**ना० राजा**—शाबास! तूं मोठी घोर प्रतिज्ञा केलीस! सुंदरि! क्षणभर मला इथेच सोड. मला झोंपेनं फार व्याकुळ केलं आहे. तर क्षणभर मी इथेच स्वस्थ निजतों.

[ निजतो. ]

**ना० राणी**—सख्या ! तुला ही निद्रा सुखदायक होवो. देव करो आणखी आह्मां दोघांचा कधीं ही वियोग न होवो !

[ जाते. ]

**वीरसेन**—आईसाहेब ! आपल्याला हा खेळ कसा काय आवडला ?

**राणी**—मला वाटतं, ती राणी झाली आहे कीं नाहीं, ती बोलतेच फार.

**वीरसेन**—पण ती आपलं वचन खरं करणार आहे !

**राजा**—वीरसेना ! तुला या नाटकाचं संविधानक ठाऊक आहे का ? तुला तें अगदीं निर्दोष वाटतं ?

**वीरसेन**—छे ! छे ! ती नुसती थट्टा आहे. केवळ विनोद· त्यांतला विषप्रयोग सुध्धां नुसत्या विनोदानंच केला आहे. त्यांत कुणाचा दोष आहे ? कुण्णाचा नाहीं !

**राजा**—या नाटकाचं नांव तरी काय ?

**वीरसेन**—महाराज, याला 'मूषकपिंजर' ह्मणतात. हे नांव आपलं आलंकारिक आहे. मगध देशांत वेंग्यपूर म्हणून एक गांव होता. तिथे सिंव्हलेश्वर अमोघवर्ष म्हणून एक राजा होता, त्याची राणी मोहमंजिरी ह्मणून होती, त्या राजाचा वध झाला. त्याचं हें नाटक आहे. आपण आतां पाहालच बाकीचा खेळ ! एकंदरीत ही कृति मोठी धूर्तपणाची आहे ! पण असली तर असेना, तुम्हांला आह्मांला काय त्याचं ! तुमची आमची अंतःकरणं निर्मळ, निर्दोष आहेत, तेव्हां आपल्याला काय त्याचं? ज्यांच्या अंतःकरणांत दुष्कर्म आणखी पापं दंवचत असतील त्यांना त्याचं कायतें भय !

( लक्ष्मीविलास येतो. )

याच नांव लक्ष्मीविलास. हा राजाचा कारभारी. अरे मा-

रेवन्ना ! आतां ही वेडी वांकडी तोंडं करायचं बंद कर, आण खो तूं आपल्या कामाला कर एकदांचा आरंभ !

**लक्ष्मी विलास**—आतां माझं मन पाषाणासारखं कठीण झालं आहे. हात अगदीं तयार आहेत. औषधी पाहिजे ती तर मिळविली. ही वेळही पण ठीक आहे. इथे जवळ पाहायलाही कोणी नाहीं! कसा छान योग आला आहे! या औषधींचं मिश्रण काय पण बनलं आहे वा ! याच्या पुढें शंकरानीं गिळलेल्या हालाहलनामक विषाची काय मातबरी आहे ? अहो विषराज ! आपला प्रताप आतां दाखवा काय असेल तो ! आपल्या भयंकर जादूनं या जीवाचं हरण करा—

( निजलेल्या राजाच्या कानांत विष घालतो. )

**वीरसेन**—या बागेंत राजाची संपत्ति हरण करावी म्हणून हा त्यानं विषप्रयोग केला. या राजाचं नांव अमोघवर्ष. हा इतिहास संस्कृतांत एका कवीनं वर्णन केला आहे. महाराज, ही गोष्ट खरोखरी घडलेली आहे. ज्यानं या अमोघवर्षाचा खून केला, त्यानचं या राजाच्या राणीची प्रीति संपादन केली. हा भाग आपण पुढं पहालच—

**चंद्रकला**—अग बाइ ! राजे साहेब उठले.

**वीरसेन**—काय, या कपटनाटकाला भ्याले ?

**राणी**—महाराज, आपल्याला काय झालं !

**आर्तवीर्य**—बंद करारे ! नाटक बंद करा !

**राजा**—अरे ! मशाल मशाल आणारे ! चला !

**सारे लोक**—मशालवाला ! अरे मशालजी !

( **वीरसेन** आणि **हरसेन** यांच्या खेरीज सर्व जातात. )

**वीरसेन**— ( गातो )

कसा पळाला हरीण तयाला बाण लागतां उरीं ॥ मी पा-
ऊस हा नाचूं लागे, मौज पहाही काय तरी ! ॥ १ ॥
कोणी कोणी झोपीं जाती कोणी जागत वसति घरीं ॥
अशी जगाची रहाटी परंतु या मर्दाची मौज खरी ॥ २ ॥

कायरे हरसेना! पठ्यानं नाटक कसं वठीवलं? आतां एखाद्या नाटकवाल्या मंडळीचे अस्मादिक सूत्रधार होतील कि नाहीं ?

**हरसेन**—महाराज, आपल्याला रुपायांत आठ आणे.

**वीरसेन**—छे, छे, सगळा सबंदचा सबंद—सोळा आणे.—

( गातो )

या राज्याची स्थिती तुलारे ठाऊक होती बृहस्पती ॥
काक असोनी राजा येथें करि राज्याची रांगोळी ॥ १ ॥

**हरसेन**—महाराज, पण प्रास नाहीं जुळला!

**वीरसेन**—त्या पिशाच्याचे शद्ब लाख रुपयाचे होते ! पण ए, तूं पाहिलसरे ?

**हरसेन**—महाराज, अगदीं टक लावून पाहात होतों !

**वीरसेन**—आणखी तो विषाचा संबंध आला, तेव्हां पाहिलस कां ?

**हरसेन**—चांगलं पाहिलं. अगदीं बोलणं नाहीं महाराज !

**वीरसेन**—ओहो ! आपल्याला गाणं पाहिजे बोआ. अरे कुठे आहेत रे ते गाणारे आणखी सतारवाले ? ( गातो. )

जरि राजानं वाइट केलं फुकट मारतां कां हाका जसे
आह्मि रंगूं तसे तुह्मि रंगा उगीच दंगा करूं नका ॥१॥

घला गाणं आयकूं आतां.

( विठोजी आणि संभाजी येतात. )

**संभाजी**—सरकार, एक शब्द बोलण्याची परवानगी असावी.

**वीरसेन**—कांरे बाबा, एक कां? सारं पुराण सांगना !

**संभाजी**—महाराज, राजेसाहेब—

**वीरसेन**—बरं मग ? ते काय म्हणतात ?

**संभाजी**—त्यांच मन विलक्षण रीतीनं अस्वस्थ झालं आहे.

**वीरसेन**—दारू पिऊन ?

**संभाजी**—छे महाराज, अंमळसा पित्तप्रकोप झाला आहे.

**वीरसेन**—मला वाटतं तुला अक्कल कमी आहे. अरे मूर्खा, महाराजांची प्रकृत अस्वस्थ झाली हें वैद्याला सांगायचं कीं मला ? कारण, त्या प्रकृतीची दुरस्ती मी करीन म्हटलं तर त्यांचं पित्त आणखी खवळायचं!

**संभाजी**—महाराज, आपण बोलतां तें कांहीं मागं पुढं पाहून बोलत जा. मी बोललों काय आणि आपण ह्मणतां काय? उगीच ।ां संताप करून घेतां ?

**वीरसेन**—तर मग हा झालों बाबा शांत ! बोल आतां.

**संभाजी**—आपल्या मातोश्री राणीसाहेब यांच्या जिवाला

फार अस्वस्थ वाटून त्यांनीं मला आपल्याकडे पाठविलं आहे.

**वीरसेन**—मग! बरं झालं आलास तर. बैस.

**संभाजी**—महाराज, आपण असं भाषण करावं हें कांहीं उचीत नाहीं. आपण जर माझ्याशीं सरळपणानं बोलाल तर आईसाहेबांनीं मला सांगितलेलं काम मी शेवटास नेईन. आपण माझ्याशीं सरळ बोलणार नाहीं, तर ही आपली क्षमा मागून हा चाललों; माझं काम आटपलं.

**वीरसेन**—माझ्यानं ते कांहीं व्हायचं नाहीं.

**संभाजी**—काय व्हायचं नाहीं महाराज?

**वीरसेन**—तुझ्याशीं सरळ बोलणं! माझं डोकं कांहीं बोवा ठिकाणावर नाहीं. पण मला जें कांहीं उत्तर सुचेल तें मी देईन. मग तुला त्याचं काय वाटेल तें वाटो. तुला तें आवडो— किंवा माझ्या आईचा निरोप तूं घेऊन आलास असं ह्मणतोस त्याअर्थीं माझ्या आईला माझं भाषण आवडो अथवा न आवडो. बरं, हें राहो—तूं काय म्हणत होतास? माझ्या आईनं—काय म्हटलंस?—

**विठोजी**—आईसाहेबांचं असं म्हणणं आहे: आपली आ- आजची वागणूक पाहून त्यानं फारच आश्चर्य वाटून राहिलं आहे.

**वीरसेन**—यं रे पोर! पोर अलौकिक खरा कीं आईला आश्चर्य वाटण्या सारखा प्रताप बाळ्यानं केला—पण कायरे, या आई साहेबानं आश्चर्य वाटलं असं ह्मणतोस, तर त्याचा पुढें काय परिणाम झाला? सांग!

**विठोजी**—आपण आज निजायला जाण्याच्या अगोदर त्यांनीं आपल्याला भेटून जायला सांगितलं आहे. महालांत आपल्याशीं त्यानं कांहीं बोलायचं आहे.

**वीरसेन**—हं हं! तर मग अवश्य येऊन भेटेन. अशा आ-

ईसाहिबानं भेटणं तरी नशीबीं पाहिजे ! झालं ? आणखी कांहीं सांगायचं आहे अझाला ?

**विठोजी**—महाराज, माझ्यावर आपला पूर्वी फार लोभ होता.

**वीरसेन** — बरं मग ? आतां कुठे नाहीं?

**विठोजी**—महाराज, आपलं मन ठिकाणीं नाहीं याचं कारण काय ? आपलीं दुःखं आपल्या मित्रानं जर कळिवलीं नाहींत तर मग आपल्या जिवाला हलकं तरी कसं वाटावं ?

**वीरसेन**—सांगूंचतर ? गड्या, माझी दरबारांत बढती व्हावी ही माझी इच्छा आहे.

**विठोजी**—महाराज, आपली बढती दरबारांत आणखी ती काय व्हायची ? प्रत्यक्ष राजेसाहेबांनींच बोलून दाखिवलं कीं त्यांच्या मागं आपणच गादीचे मालक आहां.

**वीरसेन**—अरे तें खरं—पण ती कायशी म्हण आहेना—

[ नाटक वाल्यांपैकीं कांहीं जण सतार, मृदंग इत्यादि वाद्यें घेऊन येतात. ] ही पहा गाणारी मंडळी आली. अहो ! तुम्ही घटकाभर थांबा अं.—अरे ! तुम्ही कां हांत धुऊन माझ्या पाठीं मागं लागला आहांत ? मला अगदीं त्रासून सोडलं आहेत.

**संभाजी**—महाराज, माझं काम पडलं अंमळ नाजूक. त्यामुळें माझं आपल्यावर जें प्रेम आहे ते मला बरोबर दाखवितां येत नाहीं.

**वीरसेन**—तूं काय म्हणतोस हें कांहीं मला कळत नाहीं. हें बघ हे अल्गुज. तुला हें वाजिवतां येईल ?

**संभाजी**—छे महाराज मला नाहीं तें वाजवायला येत.

**वीरसेन**—वाजीवरे, वाजीव !

**संभाजी**—सरकार, याच पायाची शपथ—मला नाहीं वा जवायला येत.

**वीरसेन**—असं काय बरं ! ए, मी तुझ्या पडतों. वाजीवरे

**संभाजी**—महाराज, मला त्याच्यावर बोटं कशी ठेवावी ‍हें सुद्धां ठाऊक नाहीं.

**वीरसेन**—नाहीं का ठाऊक! छे, अरे तें अगदीं सोपं आहे ? खोटं बोलणं जसं अगदीं सोपं तस्संच हें आहे. हें बघ, ही बोटं, आणखी हा आंगठा या भोंकांवर ठेव, अन् तोंडानं त्याच्यांत वारा घाल—मग त्यांत काय छान गाण्याची तान निघेल —हीं पहा, हीं भोकं. यावर बोटं ठेवावीं—

**संभाजी**—पण त्यांतून महाराज, मला गोड सूर काढतां यायचाच नाहीं. माझ्यांत तें कसब कुठे आहे ?

**वीरसेन**—हं, हं ! आतां पहा. या अलगुजापेक्षां माझी योग्यता तूं कमी समजतोस अं ? मला आपलं हवं तसं खेळवावंसं वाटतं नारे तुम्हाला—माझी छिद्रं तुम्हाला सारीं ठाऊक आहेत असं समजतां—माझं इंगित काय आहे तें काढून घेण्याचा उद्योग करता—माझ्या मनांतले एकंदर विचार बाहेर काढून घेण्याचा यत्न करतां: आणखी हें लहानसं अचेतन वाद्य—यांत काय गोड सूर निघतात, किती मंजुळ अलाफ निघते—तरी हे तुला वाजवायला येत नाहीं ! अरे लुच्यानों, या नळकांड्यापेक्षां सुध्दां माझी किंमत कमी समजतां—माझा खेळ करणं अगदीं सोपं वाटतं अं ! मला हवं तें वाद्य समजा—अलगुज समजा, सतार समजा, माझा छळ तुम्ही हवा तेवढा कराल—पण माझ्या तारा तुम्हाला छेडतां येणार नाहींत बरं !

[ **आर्तवीर्य** येतो. ]

यावं ! ईश्वर आपलं कल्याण करो !

**आर्तवीर्य**—महाराज, राणीसाहेबांना आपल्याशीं कांहीं बोलायचं आहे. आणखी तें ही आत्तांच.

**वीरसेन**—अहो ! तो पाहिलात कां पलिकडचा ढग? त्याचा आकार कसा उंटा सारखा दिसतो. नाहीं ?

**आर्तवीर्य**—हो बोवा. खराच अगदीं उंटा सारखा दिसतो आहे. हुबेहूब उंट !

**वीरसेन**—छे हो ! पण मला वाटतं तो ढग घुशी सारखा दिसतो.

**आर्तवीर्य**—होय खरा बोवा ! त्याची पाठ दिसते खरी घुशी सारखी !

**वीरसेन**—किंवा सुसरी सारखा दिसतो बरं का ?

**आर्तवीर्य**—हो हो—सुसरी सारखाच दिसतो.

**वीरसेन**—असं काय—तर मग आलोंच हा आईकडे.—काय सांगावं ! माझी होईल तेवढी आपली टर उडवायचा या गुलामांनीं बेत केला आहे ! मी हा आलोंच पहा.

**आर्तवीर्य**—ठीक आहे. मी आईसाहेबांना याप्रमाणं कळवितों जाऊन.

**वीरसेन**—' मी हा आलोंच ' असं बोलणं सोपं आहे. गड्यानों ! तुह्मी जा आतां.

[ वीरसेना शिवाय सारे जातात. ]

अहाहा ! रात्रीची काय भयंकर वेळ ही ! या वेळीं हे स्मशानभूमि कशी अगदीं आ वासून राहिली आहे! आणखी प्रत्यक्ष कृतांताची स्वारी हातांत मृत्यु पाश घेऊन या मर्त्यलोकीं उतरली आहे असं भासतं: आतां या वेळेला असं वाटतं आहे कीं, कोणाच्या तरी नरडीच्या ऊन ऊन रक्ताचा घोट घ्यावा. किंवा

असं एखादं भयंकर कृत्य करावं कीं तें पहातांच त्रैलोक्य थर थर कापूं लागेल! पण नको. आईकडेच जावं! हृदया! असं अत्यन्त कठोर होऊं नकोस! या माझ्या दगडा सारख्या अंतःकरणांत मातृहत्येची कल्पना कधींही न येवो ! मी क्रूर व्हावं–पण माझं आचरण केवळ हिंसक पशू सारखं नसावं. मी जशी एखादी कट्यारच काळजांत खुपसावी अशा मर्म भेदक भाषणांनीं तिचं हृदय छिन्नविच्छिन्न करून टाकीन–पण मूर्तिमंत कट्यार तिच्या काळजांत कधीं खुपसणार नाहीं. माझ्या मनांत जे विचार येतात किंवा तोंडानं मी जें बोलतों, त्याप्रमाणं हातानं कृति मात्र तशी घडूं नये ! हृदया ! मी क्रूर शद्वांनीं तिला कितीही ताडन केलं, तरी माझ्या हातून तसं कांहीं घोर कृत्य कधीं ही घडवून आणूं नकोस !

( जातो. )

---

## प्रवेश ३.

### ( राजा विठोजी व संभाजी येतात. )

**राजा**—मला याचा अगदीं कंटाळा आला आहे. याचं हे वेड भडकूं देणं हें कांहीं ठीक नाहीं. तर मग तुम्ही आतां तयारी करा. मी अगोदर थैली पाठवितों, मागून त्याला बरोबर घेऊन तुम्ही सौराष्ट्राला जा. असं झालं म्हणजे त्याच्या या वेडामुळं या गादीला प्रतिक्षणीं जे धोके येण्याचा संभव आहे ते नाहींसे होतील.

**संभाजी**—सरकार, आम्ही त्याचा नीट बंदोबस्त करूं. ज्यांचे देह आपल्या अन्नाचे आहेत, अशांना सुरक्षित ठेवण्याविषयीं आपल्याला काळजी असणं हें योग्यच आहे.

**विठोजी**—ठीकच आहे. एकटा प्राणी असला तरी आप-

ला जीव जगविण्याविषयीं त्यानं आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न करावा. परंतु, जो हजारांचा पालन करणारा तो धोक्यांत पडूं नये, अशा विषयीं फारच काळजी घेतली पाहिजे. राजावर जर कांहीं संकट आलं तर तें सर्व प्रजेवर आलं, असं समजलं पाहिजे. जसा एखादा पाण्याचा लोंढा येऊन तो जसे आसपासचे पदार्थ ओढून घेतो, त्याप्रमाणंच राजाची गोष्ट आहे. राजा म्हणजे एखाद्या उंच पर्वताच्या शिखरावर उभारलेलं एक प्रचंड चक्र आहे, या चक्राच्या आरांनां लाखों बारीक बारीक पदार्थ जडलेले असतात. जर का तें चक्र खालीं पडलं तर त्याच्या बरोबर ते बारिक सारीक पदार्थ सारे एकदम ढासळतात ; राजावर दुःखाचा प्रसंग आला व तो आक्रोश करूं लागला ह्मणजे एकंदर प्रजा आक्रोश करूं लागते.

**राजा**–तेव्हां तुम्ही मेहेरबानी करून ही सफर मोठ्या जलजलदीनं करा. कारण, राज्याला ही जी कांहीं भीति उत्पन्न झाली आहे, इचं निवारण अवश्य केलं पाहिजे.

**विठोजी**
**संभाजी** }—सरकार, आज्ञेप्रमाणें जलदी जाऊं.

( **विठोजी** आणि **संभाजी** जातात. )

[ **आर्तवीर्य** येतो. ]

**आर्तवीर्य**–सरकार, वीरसेन महाराज आपल्या आईसाहेबांच्या रंगमहालांत जाणार आहेत. तेव्हां मी पडद्याच्या मागं बसून राहतो, आणखी काय काय चमत्कार होतो तो पहातों. माझी खातरी आहे कीं, आईसाहेब त्यांच्या पोटांत शिरून सारं काढून घेतील. आणखी, आपण बोललांत तें कसं योग्य बोललांत–कीं तीं मायलेंकरंच पडलीं, तेव्हां त्यांचं संभाषण होईल तें वीरसेन महाराजांची आई आपल्या मुलाचा कैवार घेऊन सांगेल–तेव्हां तें तिसऱ्यानं लपून ऐकावं हेंच ठीक. बरं आहे सर

कार मी येतों तर. आज रात्रीं आपण महालांत जाण्याच्या अगोदर मी आपल्याला येऊन भेटेन व काय हकीकत झाली ती कळवीन.

**राजा**—आर्तवीर्य! आपले माझ्यावर फार उपकार आहेत

[ आर्तवीर्य जातो. ]

हर ! हर ! ह्या माझ्या अस्वस्थ मनाला शान्ती येण्याला काय बरं करावं ! असो. आतां देवतार्चनाची वेळ झाली आहे. तेव्हां आतां स्नान करावं.

[**राजा रमाकांत** देवघरांत देवपूजा करीत बसला आहे.]

**राजा**—( षोडशोपचार पूजा आटपल्यानंतर हात जोडून साचिंत असा. ) हर ! हर ! माझ्या हातून काय घोर पातक घडलं आहे ! या परमेश्वराला तें कसं सहन होत असेल ? पापच तें ! ही राजहत्या माझ्या हृदयांत डंवचत आहे ! राजहत्येसारखं महापातक दुसरं कोणचंही नसेल. ईश्वराचा रोष माझ्यावर न होईल तर काय होईल! देवा ! कोणच्या तोंडानं मी तुझी प्रार्थना करूं ? प्रभो ! मला वाटतं मात्र कीं तुझी प्रार्थना करून तुला आळवावं व माझ्या सर्व अपराधांची क्षमा मागावी, पण हें भयंकर पापकर्म माझ्या हृदयांत मूर्तिमंत उभं राहतं, यामुळं माझ्या मुखांतून एक शब्द दिखील बाहेर निघत नाहीं. आरंभ कसा करावा हेंच मला कळत नाहीं. माझ्या हातून कांहींच घडेनासं झालं आहे व मी अगदीं गोंधळून गेलों आहे ! पण देवा ! तूं दीनवत्सल व कृपासागर आहेस, तेव्हां राजवधच्या रक्तानं विटाळलेला हा हात, हे दयाघना ! आपल्या कृपावृष्टीनं निर्मळ व स्वच्छ करणं हें तुला अशक्य आहे काय ? देवा ! आह्मां मर्त्यांच्या हातून घडलेल्या अपराधांची क्षमा तूं न करशील तर तुझं ‘ दयाघन’ हें नांव काय उपयोगाचं ? पापवासनेपासून दूर ठेवणं आणखी एकदां

पतित झाला असतां त्याचं पावन करणं, याच करितां देवा तुला आळवायचं ना ? तर, प्रभो ! हा मी नम्र होऊन तुला विनवितों—मी आतां पापविमुक्त झालों असं समजतों. पण, हर ! हर ! मी कोणत्या शब्दांनीं तुला आळवूं ? 'माझ्या हातून झालेल्या घोर हत्येबद्दल मला क्षमा कर' असं म्हणूं ? छे ! पण असं कसं ह्मणतां येईल ? ज्याच्या करितां मी ही हत्या केली, त्या राज्याचा व त्या राणीचा उपभोग अद्यापि मी घेत आहें. चोरानं चोरलेला माल घरांत उतरावा आणखी पुनः प्रायश्चित घेऊन आपलं मोकळं व्हावं हें घडेल तरी कसं ? या मृत्युलोकांतल्या भ्रष्ट लोकरीतींत भरल्या मुठीला न्याय देखील भिऊन एकीकडे होतो. आणि त्यामुळें पुष्कळ वेळां असं घडतं कीं, दुष्कृत्यानं मिळवलेल्या द्रव्याची प्रत्यक्ष न्यायदेवता ही दासानुदास बनते. पण देवा ! तुझ्या दरबारीं हें चालायचं नाहीं. तिथें आपल्या चित्रगुप्तांनी खडान् खडा लिहून ठेवलेला असतो. तेव्हां तिथें आह्मी छपवावं काय आणखी दाखवावं काय? मग आतां काय राहिलं ! असो, पश्चात्तापानं काय होईल तें पहावं ! हो, शास्त्रच आहे कीं 'पश्चात्तापेन शुध्यंते': तेव्हां या पश्चात्तापानं काय नाहीं होणार ? पण इथें पश्चात्तापच जर होत नाहीं, तर मग पुढली गोष्ट काय विचारायची? हरहर! काय माझी भयंकर स्थिती ही ! काय हें माझं काळ्या मांगासारखं हृदय ! किती हें माझं निगरगट्ट, लुचरं मन ! एकीकडे या पापापासून आपली सुटका व्हावी असं इच्छितं, आणखी इकडे पाहिलं कीं या मोहजालांत पुन्हा अडकून पडतं! असो. भगवंन् ! मां पाहि !—आतां इंद्रियांनो, सोडा तो ताठा, सोडा, व्हा एकदां लीन व घाला या प्रभुपुढें लोटांगण. प्रभो !

अपराध सहस्राणि क्रीयंतेऽहर्निशंमया
दासोहमिति मां मत्वा क्षमस्व क्षमस्व क्षमस्व परमेश्वर!

(दोन्ही हातांनीं आपले कान धरून नमस्कार करतो तो.)

[वीरसेन येतो.]

**वीरसेन**–(कट्यार उपसून) हं ! आतां खुपसावी. हीच वेळ आहे. हा देवापुढें पडला आहे! भोसकाच तर आतां! अरे, पण हा देवापुढें मेला तर स्वर्गाला जाईल ! मग खासा आम्हीं सूड उगविला ! छे, याचा विचार केला पाहिजे: या रामोशानं आमच्या बापाला मारावं, आणखी आम्ही, त्यांचे सत्पुत्र, या कृत्याबद्दल त्याला अनायसं स्वर्ग प्राप्ति करून देणार! अरे! हा रे कसला सूड ? या चाण्डाळानं आमच्या वडलांचा प्राण असा एकाएकीं घेतला कीं, त्या महात्म्याला आपल्या पातकांचा विचार करण्याला देखील अवधि दिला नाहीं ; मग त्यांचा पश्चाताप तो कुठला ! तेव्हां हा चाण्डाळ 'क्षमस्व परमेश्वर' म्हणतो आहे—किंबहुना माझ्या पातकांची क्षमा होऊन मला स्वर्गसुख प्राप्त होईल असं याला वाटतं आहे—इतक्यांत मारून, याला खराच मोक्षाचा मार्ग दाखवून, मी सूड घेतला असं होईल. छे!—म्यानांत मागं हात. आणखी एखादी चांगला संधी साधून मग डाव साधावा ! म्हणजे, जेव्हां हा स्वारी ऐन मदिरेच्या धुंदींत असेल—किंवा खूप घोरत असेल—अथवा रागानं लाल झाली असेल—शिव्या देत असेल—किंवा जेव्हां मोठं एखादं दुष्कर्म करण्यांत गुंतली असेल—अशा वेळेला याला उडवावा कीं, मरतां मरतां 'राम' दिखील हरामखोराच्या तोंडांत येऊ नये.—असो. पण अरे, आई वाट पहात असेल—हं याला हें मुदत देतों आहे ही बरी आहे ! याला हा जो हृद्रोग लागून राहिला आहे त्यांतच तळमळत राहूं द्या स्वारीला कांहीं दिवस !

(जातो)

**राजा**–(उठून) छे! छे! मी तोंडानं 'क्षमस्व' म्हटलं खरं पण इथून (हृदयाला हात लाऊन) कांहीं 'क्षमस्व' असं निघत

नाहीं. मनांतच जर नाहीं तर नुसतं तोंडानं 'क्षमस्व' म्हणून काय उपयोग ? ( जातो. )

---

## प्रवेश ४.

स्थल—राणीचा महाल.

### राणी व आर्तवीर्य प्रवेश करितात.

**आर्तवीर्य**—वीरसेन महाराज आतां इथे येतील. तेव्हां बाईसाहेब त्यांच्या मनांत काय जें असेल तें मोठ्या युक्तीनं काढून घ्या. त्यानां सांगा कीं 'तूं अलीकडे अगदीं ढाळ नासली आहेस.' त्यानां म्हणा मी 'तुझ्या करितां पुष्कळ गोष्टी सहन केल्या; तुमच्या अपराधाबद्दल आजपर्यंत पुष्कळ डोळेझाक केली, तेव्हां आतां ह्या गमजा पुरे कर'. असो. मी अधिक बोलत नाहीं. पण सरकार, कसं ही करून त्यांचे कान पुरते उघडा.

**वीरसेन**—( आंतून ) आंई, आई, आईग !

**राणी**—आर्तवीर्य, तुह्मी जा इथून आतां. कांहीं काळजी करूं नका. हा बघा तो आला वाटतं.

( **आर्तवीर्य** लपून बसतो ) ( **वीरसेन** येतो. )

**वीरसेन**—आई, कांगं मला बोलावलंस ?

**राणी**—वीरसेना, अरे, तूं त्यांचं मन फार दुखीवलंस !

**वीरसेन**—आई, तूं माझ्या बाबांचं मन फार दुखीवलंस !

**राणी**—हात् तुझं ! बैस उगीच, हें काय भलतं भलतं बोलतो आहेस !

**वीरसेन**—तर मग तूं कसं बोलतेस ग हें? आई! तुझ्या जिभेला हाड तरी आहे काग?

**राणी**—ह्मणजे! असंरे काय करतोस वीरसेना?

**वीरसेन**—काय करतों आहे?

**राणी**—अरे मी कोण आहे हें लक्षांत आहे कां तुझ्या?

**वीरसेन**—हो. हो! काय विचारावं? अग पक्कं लक्षांत आहेग! तूं राणी आहेस! तुझ्या नवऱ्याच्या कारभाऱ्याचं तूं प्रियपात्र आहेस! आणखी—हरहर!—असं नसतं तर फार बरं झालं असतं—तु किनई माझी सख्खी आई आहेसग!

**राणी**—अस्सं का! बरं तर मग, ज्यांचं तूं ऐकशील त्यनंच मी धाडून देतें. मग तर तूं ऐकशील कीं नाहीं?

**वीरसेन**—अग बैस तर खरी अशी. कुठे जातेस? हा बघ तुझ्या समोर मी आरसा धरतो. या आरशांत तुझं अंतर्याम कसं स्वच्छ दिसेल! समजलीस?

**राणी**—अरे! तूं माझं करणार तरी काय? तूं माझा जीव का घेणार? धांवारे धांवा!

**आर्तवीर्य**—( पडद्याच्या आंतून ) अरेरे, काय आहेरे धांवारे धांवा!

**वीरसेन**—ओहो! अरे उंदीर चिव्‌चिव्‌ करतो आहे ( तरवार उपसतो ) मार, हें घे. मार आतां. पहातोस काय!

( तरवार पडद्यांत खुपसतो. )

**आर्तवीर्य**—( पडद्यांतून ) अरेरे! मेलोरें मेलों! ( खाली पडतो आणखी त्याचा प्राण जातो. )

**राणी**—अगवाई! हाय हाय! अरे वीरसेना, काय केलंस हें?

**वीरसेन**—हं, हं! छेः बोवा, आपल्याला नाहीं ठाऊक! कारभारीसाहेब कां आंत बसले होते?

**राणी**—अरेरे! दुष्टा, काय वेड्यासारखं भयंकर कृत्य केलंस हें!

**वीरसेन**—भयंकर अं! आई, अग, प्रत्यक्ष राजाला मारून त्याच्या कारभाऱ्यावर फिदा होण्यापेक्षां का भयंकर कृत्य आहे हें!

**राणी**—काय म्हणतोस? राजाला मारून?

**वीरसेन**—हो, हो, अस्सच, समजलीस?

[पडदा उघडून पहातो तों **आर्तवीर्य** दृष्टीस पडतो त्याला उद्देशून.]

अरे मूर्खा, हा लुबऱ्या, लुडबुड्या, फुकट फिरे जिवाला मुकलास! मला वाटलं कीं तुझा धनी इथे बसला होता! असो, आयुष्यच तुझं भरलं त्याला तूं तरी काय करशील? चोंबडे-पणाचा परिणामच हा असा. (आईकडे पाहून) अग, अशी घाबरली आहेस कां! जरा स्वस्थ हो, खाली बैस. तुझ्या ह्या पाषाण हृदयांत काय काय सांठवलं आहे तें तर मला पाहूंदे? मी पहाणारच. ह्मणजे येवढं तरी कळून येईल कीं हें तुझ्या घाणेऱ्या पापवासनांनींच पूर्ण भरून गेलं आहे, किंवा त्यांत अक्कल शिरायला थोडी जागा राहिली आहे!

**राणी**—अरे, मी केलं आहे तरी काय? तुझ्या मुखांतून असले मेले अभद्र शब्द निघण्यासारखं माझ्या हातून, बाबा, घडलं आहे तरी काय?

**वीरसेन**—अग आई! काय केलं आहेस ह्मणून काय सांगूं! अग, लाज, लज्जा, भीड, मर्यादा, सर्व किंग सोडून दिलस. कंबरेचं सोडून डोकीला गुंडाळलंस! पातिव्रत्य

रसातळाला पोचवलंस ! निर्मळप्रेमरूपवृक्षाचीं मुळं पाळं खणून काढलीस, आणखी त्या ठिकाणीं काटेरी झुडपं किंग पेरून ठेवलीस ! पाणिग्रहणाच्यावेळीं घेतलेल्या शपथा मारवाड्यांच्या शपथासारख्या अगदीं खोट्या करून टाकिल्यास ! आः ! दुष्टे, अशा तुझ्या या अधर्माचरणानं अखंड नरकवासाची सामग्री करून ठेवलीस ! पापिणी ! अशा या तुझ्या कृत्यानें देवादिकांनां देखील लज्जेनं खालीं बघायला लावलस ! ही पंचमहाभूतं, प्रत्यक्ष ही वसुंधरा, इला तुझ्या पापकर्माचा भार सहन न होऊन ती दुःखाचे सुस्कारे किंग टाकीत आहे !

**राणी**—अग बाईग !—असं हे भयंकर कृत्य; कोणचं तरी माझ्या हातून घडलं आहे !

**वीरसेन**—अग बघ ! बघ! हें राजाचं चित्र, आणखी हें त्याच्या कारभाऱ्याचं- अग, हा चेहेरा किती मनमोहक आहे ! त्याच्या त्या मिशांचा पीळ, ती भीमासारखी रुंद छाती, त्या डोळ्यांतलं तें अधिकाराचं तेज—माणसानं पाहिल्या बरोबर गर्भगळीतच व्हावं! ती उभी रहाण्याची ऐट, अग, कायती मुद्रा, काय तो आकार, प्रत्यक्ष ब्रह्मदेवानंच ह्या पुतळ्याची मूस ओतली होती. जगांत एक माणूस पण माणूस निर्माण करून ठेवला होता बरं ? आतां हे बघा नाहीं तर ! हे आपले हल्लीचे यजमान; ज्याला दूध पाजून वाढविलें त्याच या कृष्णसर्पानं आपल्या अन्नदात्याचा प्राण घेतला बरं ! अग तुझ्या डोळ्याचं खोबरं झालं कांग ? या मदनमूर्तीला तुच्छ मानून या लठ्ठ काळ्या बोंगळ्यावर इष्क झालीस ! असं हें पंचपक्वान्नानीं भरलेलं पान टाकून देऊन एखाद्या गाढवी सारखी उकिरडा फुंकण्याला प्रवृत्त झालीस अं ! आः ! अग त्यावेळेस तुझे डोळे फुटून खाचा कांग झाल्या होत्या ? बघ बघ ! हा केवळ प्रेमाचा प्रकार असेल, असं ही म्हणतां येत नाहीं. कारण, आई तुझ्या तारुण्याचा बहर का अजून राहिला आहे ! तुझं वय काग, आ-

णखी तुझी ही कृती कशी? तुझ्या या वयाच्या मानानं कांहीं तरी सारासार विचार करायचा होतास! तुजमध्यें तिळप्राय जरी सारासार विचार असतां तर हें सोडून हें असं पत्करायला कधींही प्रवृत्त झाली नसतीस! तुझ्या मध्यें अक्कल तर असलीच पाहिजे, नाहीं तर हा आवडी निवडीचा प्रकार कसा झाला असता? पण हें खचीत आहे कीं, तुझ्या अक्कलेला गंज चढून गेला आहे. असली ही चुकी केवळ वेडेपणानं व्हायची नाहीं. येवढा मोठा फरक समजूं नये इतकी कोणाची देखील अक्कल गुंग होऊन जाणार नाहीं. कांहीं तरी बरं वाईट पहाण्याची शक्ति राहीलच राहील! कोण्या दुष्टानं हे तुझे डोळे बांधून असा हा अंधळ्या कोशिंबिरीचा खेळ तुला शिकविला ग आई! डोळे असून स्पर्शेंद्रिय नाहीं, स्पर्शेंद्रिय आहे पण डोळे नाहींत; डोळे नाहींत व स्पर्श ही नाहीं, पण कान आहेत; फार कायबाकीची कोणचीही इंद्रियं नसली, पण घ्राणेंद्रिय आहे, किंवा लंगडं लुलं पण एक जरी खरं इंद्रिय शाबूद असेल तर तो सुद्धां इतका फसायचा नाहीं. आः! किती निगर्गट्ट्ग तूं! अग तुझी लाज कुठेग गेली! हा दुष्ट पापवासने! इच्या सारख्या पोक्त बायकोच्या मनाला सुद्धां हलवून सोडलं आहेस, तर मग ऐन भरज्वानींतल्या मुसमुसलेल्या एखाद्या अल्लड पोरीची काय कथा? तिच्या त्या कामाग्नींत सद्गुणाची आहुतीच पडून जायची! अहाहा! अशा जर गोष्टी घडायला लागल्या कीं—मनांत उत्कंट इच्छा उत्पन्न होण्याचा मात्र अवकाश कीं, ती द्यावी आपली परिपूर्ण करून, पाणी जर तेला सारखं जळायला लागले आणखी सारासार विचार हा जर केवळ इच्छेचा बंदा गुलाम झाला तर मग या जगांत लाज म्हणून कुठे उरली?

**राणी**—आहाहा! वीरसेन, पुरे बाबा! तूं माझ्या ह्या अंतःकरणांत पुरा उजेड पाडलास! माझ्या पापकर्माचे वज्रलेप काळे डाग मला स्वच्छ दिसूं लागले आहेत

**वीरसेन**—इतकंच नाहीं, पण असल्या गलिच्छ, घमट, कुजक्या सडक्या बिछान्यावर शयन करायचं, आणखी अशा प्रकारच्या घाणेरड्या जागेंत रतिसुखाचा अनुभव घ्यायचा— अरेरे !

**राणी**—नकोरे बाबा असं बोलूं, पुरेकर, पुरेकर. हे तुझे शब्द माझ्या काळजाला घरे किरे पाडताहेत! बाळा वीरसेना, नकोरे आतां मला छळूं.

**वीरसेन**—अरे निमकहरामा, गळेकापू, कसाबा ! अग, हा तुझ्या पहिल्या नवऱ्याच्या गुलामाचा गुलाम देखील किंग शोभणार नाहीं. अग राजा कसला, तोतया तो! या रामोशानं या गादीवर दिवसा ढवळ्या दरोडा घातला व सर्वस्व गिळून बसला अं !

**राणी**—पुरेरे आतां !

**वीरसेन**—अग हा राजा कसला, अठराधान्याचं कडबोळं हें, हजार ठिगळांचं रकटं—

( पिशाच येतें. )

( वरपाहून ) हे स्वर्लोकपालांनों ! हे यक्षकिन्नरहो ! आतां मात्र माझं रक्षण करा, आपल्या छायेखालीं मला घ्या ! हे महापुरुषा, काय तुझी इच्छा आहे ?

**राणी**—हाय हाय ! याला तर बाई अगदीं वेड लागून गेलं आहे !

**वीरसेन**—आपल्या आज्ञेप्रमाणं माझ्या हातून अजून वर्तन झालं नाहीं व आपण सांगितलेली कामगिरी मी केवळ क्रोधाधीन होऊन आजची उद्यांवर ढकलीत आहें, असं पाहून आपण या आपल्या सुस्त पुत्राचे कान उपटण्या करितां कां आलां आहांत ?

**पिशाच**—अरे, त्या गोष्टीचा तुला विसार पडूं देऊं नकोस. तुझ्या उद्योगाला शिथिलता आली आहे ती पुर्तेपणीं झाडून टाकण्या करितांच मी तुला फिरून भेट देत आहें. पण बघ बघ, तुझी आई अगदीं गर्भगळीत होऊन गेली आहे! तिच्या मनाची चलबिचल झाली आहे! तेव्हां आतां ही संधी दवडूं नकोस. दुर्बळ मनुष्याच्या मनामध्यें कल्पनेचे तरंग फार जोरानं उचंबळत असतात. वीरसेना, तिच्याशीं दोन शब्द बोल!

**वीरसेन**—आईग, कसं काय आहे आतां?

**राणी**—हाय हाय! तुला हें झालं आहे तरी काय! जिथें कांहीं नाहीं, अशा ठिकाणीं तूं आपले डोळे लाऊन वाऱ्याशीं कां बरं असा बोलत बसला आहेस? तुझे पंच-प्राण डोळ्यांत येऊन तूं असा अगदीं कावरा बावरा कां होऊन गेला आहेस? तुझे केंस अगदीं थरारून उभे राहिले आहेत! बाळा वीरसेना, तुझा क्रोधाग्नी अगदीं भडकून गेला आहे, तो थोडा शांत कर! अरे तूं पहातो आहेस तरी कशाकडे?

**वीरसेन**—तो पहा—तो पहा—मी त्याच्याकडे पहातों आहें. तो किती निस्तेज दिसतो आहे! त्याचा आकार व त्याची ती मुद्रा ह्या दोन गोष्टी दगडाला देखील चेतना आणतील.—असा माझ्याकडे पाहूं नकोस! या तुझ्या अशा पहाण्यानं मी आपलं मन जें कठोर केलं आहे, तें बरंच मृदु होईल. मग मला ज्या कांहीं गोष्टी करावयाच्या आहेत त्यांत कांहीं राम रहाणार नाहीं. कदाचित् असंही होईल कीं जिथें रक्तपात व्हायला पाहिजे, तिथें नुसता अश्रुपात होईल!

**राणी**—अरे! तूं बोलतोस तरी कोणाशी!

**वीरसेन**—तां बरं! तुला त्या तिथे कांहीं दिसत नाहीं?

**राणी**—कांहीं दिसत नाहीं. पण इथे जें जें आहे तें सारं दिसतं आहे.

**वीरसेन**—तुला कांहीं ऐकूंही आलं नाहीं?

**राणी**—आपल्या दोघां खेरीज तिसऱ्याचा शब्दच मी ऐकला नाहीं.

**वीरसेन**—हे पहा माझे बाबा—त्यांच्या अगांत ते जिवंत पणीं घालीत असत तोच पोषाख आहे! पहा, पहा ते कसे हळूच चालले आहेत—अजून तरी पहा—ते, ते पहा, सज्जाकडे गेले—गेले!

(पिशाच जातें.)

**राणी**—हे सर्व तुझ्या निवळ कल्पनेचे खेळ आहेत. असे हे चमत्कारिक तरंग तुझ्या मनांत उत्पन्न करण्याला कारण, बाबा, तुझा नुसता भ्रम रे भ्रम!

**वीरसेन**—भ्रम अं! नव्हे ग नव्हे! मला वायु का झाला आहे? मला वेड नाहीं बरं लागलं! माझा हात पहा पाहिजे तर. तुझी नाडी जशी वहात आहे, तशीच माझीही वहात आहे. मी एवढा वेळ जें बोललों तें वेडाच्या भरांत बोललों, कांहीं तरी आपलं बरळलों, असं समजूं नकोस. तुला प्रचिती पहायची असेल, तर मी जें जें बोललों ते पुनः सारं बोलून दाखवितों. असं वेड्याच्या हातून होईल का? आई! तुला जर एवढीशी तरी अन्नूची चाड असेल तर—मी तुला इतका वेळ जें बोललों तें—तुझ्या दुःष्कृत्यांनीं नव्हे तर माझ्या वेडानं मला बोलायला शिकाविलं—अशी ही गोड समजूत क्षणभर सुद्धां करून घेऊं नकोस. असं केल्यानं काय होईल—तुझं अंतरंग कुजून सडून जाईल, आणखी त्याच्या अंगाला क्षतं मात्र अकळत पडतील. असं नको करूं. ईश्वराजवळ आपली सर्व पातकं कबूल करून त्यांजबद्दल त्याची नम्र होऊन क्षमा माग. केल्या कर्माविषयीं तुला अनुताप होऊं दे. आणखी यापुढें मात्र अशी गोष्ट पुनः करूं नकोस. नाहीं तर [illegible]

होतं तिथे काय इलाज? या ह्मातान्याला माझ्या हातून शिक्षा मिळावी, याचा खून माझ्या हातून व्हावा आणखी माझं या कृत्यानं शासन व्हावं अशीच ईश्वराची इच्छा आहे ! सध्या तर याची विल्हेवाट लावतों. मग परमेश्वराला याच्या मरणाबद्दल जाब मी देईन. बरं तर. आतां येतों मी तुझं चांगलं व्हावं एवढ्याकरितांच माझी ही इतकी निष्ठुरता. मी तुला आज छळलं, वाईट केलं; पण यापासूनं तुझ्या हातून पुढं होणाऱ्या ज्या अगदीं वाईट गोष्टी, त्या मागं पडल्या. पण आईसाहेब, आणखी एकच शब्द—

**राणी**—आतां मी काय करूं तरी म्हणतोस !

**वीरसेन**—छे: छे: आईसाहेब, मघाच्या सारखं करायला नाहीं मी आपल्याला सांगत ! कारभारीसाहेबांकडून आतां रात्रीं आपल्याला बोलावणं येईल. मग आपल्या स्वाऱ्या तिकडे जातील. तो मग तुला 'ये माझे छबकडे !' ह्मणुन हाक मारील मग तो तुझे साखरेचे गोड गोड पापे घेईल. तुझ्या गळ्यांत लडिवाळपणानं तो आपले हात घालील. झालं—मग तुझ्या जवळून सारं काढून घेईल! मग तूं त्याला सांगशील कीं, 'कारट्यानं उगीच वेड्याचं सोंग घेतलं आहे. त्यांत कांहीं खरं नाहीं बरं का ! सारी लबाडी'. आणखी तूं असं सांगितलस तर चांगलंच. अग, आपल्यासारख्या सुंदर,शहाण्या,सुज्ञ राणीसाहेबांना असल्या त्या घिसाड्यापासून, त्या बैलोबापासून, किंवा त्या माजलेल्या रेड्यापासून, असल्या या अंतरंगांतील हितगुजाच्या गोष्टी कशा छपवून ठेवतां येतील ? छे ! छे ! असं कोण करील ? आपली लाजलज्जा ठेवा गुंडाळून, आणखी शहाणपण द्या छपरावर फेंकून—झालं. मग पंचतंत्रांतल्या पाचर उपटणाऱ्या वानरासारखी गत होईल. करायला गेला एक अन् झालं भलतं ! असंच ध्या करून झालं !

**राणी**—वीरसेना! असं पक्क समज कीं, तूं जें माझ्याजवळ

बोललास त्यांतलं एक अवाक्षर सुद्धां बाहेर काढीन म्हटलं तर माझ्यांत त्राण राहिलं नाहीं.

**वीरसेन**—आमची सौराष्ट्राला धिंड निघायची आहे. आपल्याला कळलंच असेल.

**राणी**—हो, मी विसरलें बाई सांगायला! असा विचार ठरला आहे खरा.

**वीरसेन**—त्या सौराष्ट्राधिपतीच्या थैलेवर मोहोरा सुद्धां झाल्या आहेत. आमचे बाळपणचे संवगडी संभाजी आणि विठोजी यांची आमच्या बरोबर नेमणूक झाली आहे. फुरशा इतकाच यांच्यावर माझा विश्वास आहे! आतां सगळ्या लुच्चेगिरीचा रस्ता तरी तेच मला दाखविणारे आहेत. हं! चालूच द्या तर मग आतां! ज्याचे दात त्याच्याच घशांत पाडले म्हणजे बरं. आतां हें जिवाशीं येऊन बेतणार! परंतु हे राजेश्री आमचा किल्ला ढासळण्याकरितां जें हें भुयार करित आहेत, त्याच्याच खालीं मी माझा सुरुंग लावतों व एकदम सगळंच उडवून देतों म्हणजे झालं. ओहो! ठकास महाठक भेटणं यांत तरी काय बहार आहे! ( आतवीर्याकडे पाहून ) आतां यांची व्यवस्था अम्हाला लावणं आहे. बांधतों गठडी आणखी देतों शेजारच्या कोठडींत झोंकून. हे मुत्सदी आतां अगदीं कसे शांत आहेत! आतां केव्हढे गंभीर! अगदीं चिप्प! या दोघांची जिवंतपणीं काय म्हणतां वटवट चालत असे! यावं आतां महाराज! तुमचा आतां पुरता शेवट करतों एकदां. घेतों रजा, आईसाहेब!

( दोघे दोहींकडून जातात.)

[ **वीरसेन** प्रेत ओढून घेऊन जातो. ]

# अंक चवथा.

## प्रवेश १ ला.

स्थळ—एक दिवाणखाना.

[ **राजा, राणी, विठोजी** आणि **संभाजी** येतात. ]

**राजा**—छे ! या याच्या दीर्घ उच्छ्वासांत कांहीं तरी अर्थ आहे.काय आहे,हें पक्कं समजलं पाहिजे.अग वीरसेन कुठे आहे?

**राणी**—आह्माला कांहीं वेळ इथे एकटंच राहुं द्या.

[ **विठोजी** व **संभाजी** जातात. ]

महराज, आज रात्रीं मला काय दिसलं !

**राजा**—प्रिये, कायग तें ? वीरसेन कसा काय आहे ?

**राणी**—वारा खूप सुटून वादळ सुटलं म्हणजे समुद्र जस अगदीं खवळून जातो, तशी त्याची काल स्थिती झाली; आणि त्यानं आपल्या वेडाच्या लहरींत, पडद्याच्या पाठी मागं कांहीं हालतांना ऐकलं. आणखी बाई ' उंदीर रे उंदीर ! ' असं म्हणून त्या बिचाऱ्या आर्तवीर्याला आपल्या तरवारीच्या सपाट्यानं ठार मारलन् !

**राजा**—अरेरे ! काय हें कृत्य ! आम्ही जर त्या पडद्याच्या आड असतों, तर आमची देखिल अशीच स्थिती झाली असती! त्याला हें आपण मोकळं सोडलं आहे त्यामुळं तुला, मला, सगळ्यांना. मोठी भीती आहे हर ! हर ! या कृत्याबद्दल कोणी विचारलं तर काय आतां उत्तर द्यावं ? आम्ही आधींच शहाणपणानं या वेड्याचा चांगला बंदोबस्त करायचा तो केला नाहीं आतां हें आमच्यावर येईल. परंतु आमच्या या अतिशय प्रेमामु-

ळं याचा बंदोबस्त काय करावा तेंच आम्हांला सुचेना. एखादा मोठा रोग जसा कांहीं प्रतिकार न करितां खुशाल वाढूं द्यावा, तसा आम्ही आपला त्याचा हा मानसिक रोग खुशाल वाढूं दिला. तो आमच्या आतां जीवावर बेतणार. वीरसेन गेला आहे तरी कुठे?

**राणी**—आपणच ठार केलेल्या त्या आर्तवीर्यांचं प्रेत कुठे तरी नेऊन टाकायला गेला आहे. पण बाई, तो जरी वेडा आहे तरी दिखील आपल्या कृत्याबद्दल अतिशय त्याला वाईट वाटलं आणि तो त्या प्रेताकडे पाहून रडूं लागला, बरं का!

**राजा**—प्रिये चल; आज संध्याकाळीं सूर्य अस्ताला जाय- च्या आधीं त्याची कुठे तरी लांब रवानगी करून देतों. आतां हें जे त्याच्या हातून वाईट कृत्य घडलं आहे त्याबद्दल मोठ्या शि- ताफीनं त्याला संभाळून घेणं भाग आहे—अहो संभाजीराव!—

[ **विठोजी** आणि **संभाजी** येतात. ]

जारे, तुम्ही आणखी कांहीं लोक घेऊन वीरसेनानं आपल्या वेडाच्या लहरीमध्यें आर्तवीर्यरावांचा प्राण घेतला आहे व त्याचं प्रेत घेऊन चालला आहे. तर त्याला शोधून इकडे बोलाऊ- न आणा आणि त्या प्रेताची नीट समाध वगैरे बांधायची ती सारी व्यवस्था करा. वीरसेनाशीं नीट गोड बोला हो. जा ल- वकर, जा.

[ विठोजी व संभाजी जातात. ]

प्रिये मदालसे! चल आपण आपल्या सर्व आप्तांस व मंत्री लो- कांस बोलाऊं व हें अकालीं झालं काय आणि त्याबद्दल आपण केलं काय, हें सर्व त्यांना कळवूं. ह्मणजे जनापवाद तरी टळेल. हा जनापवाद फार खोटा; सर्व जगभर फजिती करून टाकतो.

[ जातात. ]

## प्रवेश २

स्थळ—घरांतील दुसरा एक दिवाणखाना.

[ **वीरसेन** प्रवेश करितो. ]

**वीरसेन**—हं आतां चांगला बंदोबस्त झाला. आतां हें प्रेत सुरक्षित जागीं राहिल !

[विठोजी व संभाजी त्याला आंतून हाक मारतात] सरकार, वीरसेन महाराज, अहो वीरसेन महाराज.

**वीरसेन**—काय हा गलबला आहे ? कोणरे ते मला हाक मारताहेत? हं, हे पहा ते आले. [ विठोजी व संभाजी येतात. ]

**विठोजी**—सरकार, त्या प्रेताची आपण काय व्यवस्था लावली ?

**वीरसेन**—काय ह्मणजे ? ज्या माती पासून तें उत्पन्न झालं होतं तिची आणि त्याची पुनः भिसळ करून दिली.

**विठोजी**—सरकार ! तें कुठे पुरून टाकलं आहे तें आम्हाला सांगावं. ह्मणजे आम्ही तें तिथून नीट ठिकाणीं नेऊन त्याची समाध बांधूं.

**वीरसेन**—तुम्ही तें अगदीं मनांत आणूं नका—

**विठोजी**—महाराज हें काय ? मनांत काय आणूं नका ?

**वीरसेन**—मी माझ्या विचारानं न वागतां तुमच्या विचारानंच वागेन असं मनांत अगदीं आणूं नका ! आणखी कापसाच्या बोळ्याला राजाच्या पुत्रानं काय उत्तर द्यायचं आहे ?

**विठोजी**—काय सरकार ! आपण मला कापसाचा बोळा समजतां ?

**वीरसेन**—होय होय. असंच समजतों. कारण तुम्ही दरकदार मंडळी राजाची मेहेरबानी राजाच्या देणग्या आणखी

अधिकार, सारं आकर्षण करून घेतां. पण अशा तुमच्या सारख्या चाकर लोकांपासूनच राजाला सरते शेवटीं फार उपयोग होतो. पहिल्यान माकड जसं खा खा खातं, आणि मग गालफडांत भरभरून ठेवतं, तसा राजा तुम्हांला पहिल्यानदा आपल्या दाढेंत ठेवतो अन् मागून लागेल तेव्हां चट्ट करतो! आणखी मग तुम्ही जे शोषून घेतलं असेल तें त्याला पाहिजे तेव्हां तो तुह्मांला पिळून घेतो. ह्मणजे मग बोळ्या, तूं कोरडाचा कोरडाच !

**विठोजी**—सरकार, आपण काय बोलतां हें बिलकूल मला कळत नाहीं.

**वीरसेन**—यांत काय आश्चर्य आहे ? मखीचं बोलणं मूर्खाला समजायचंच नाहीं. गाढवा पुढें वाचली गीता—

**विठोजी**—महाराज, तें कांहीं असो; तें प्रेत कुठे आहे तें आम्हाला सांगितलं पाहिजे आणि आपल्याला राजेसाहेबांकडे ही आलं पाहिजे.

**वीरसेन**—बरं चल, मला तुझ्या राजेसाहेबांकडे घेऊन चल. हा सगळा लपंडाव आहे. आपण तर ठेवलं आहे लपवून, कुठे तरी. काढा आतां शोधून. धांवा त्याच्या मागं !

---

## प्रवेश ३.

### स्थळ—राजवाड्यांतील एक दिवाणखाना.

[ सपरिवार **राजा** येतो. ]

**राजा**—तें प्रेत कुठे आहे तें शोधायला आणि त्याला इकडे आणायला मी मनुष्य पाठविलेच आहेत. अरेरे, या मनुष्याला अगदीं तसाच मोकळा जाऊं देणं. ह्मणजे किती घातक

आहे! पण काय करावं? त्याच्यावर आपल्याला कायदा चालवितां येत नाहीं. या सगळ्या वेडगळ लोकांची त्याच्यावर गोष्ठी भक्ती आहे. ही जी त्याच्यावर त्यांची भक्ती आहे, ही वास्तविकन्यायाची नाहीं. आणि अंधभक्ति जिथे असते, तिथे अपराध्याच्या शिक्षेकडे मात्र पाहतात. अपराधाकडे पहात नाहींत. खरं म्हटलं तर सर्व यथास्थित असतांनां एकदम याला इथून काढून लावणं ह्मणजे, थोडसं चमत्कारिक, संशय घेण्याजोगंच होईल. पण रोग फार बळावला ह्मणजे त्याला जालिम औषध पोंचलं तरच तो बरा होतो, नाहींतर वैकुंठाची यात्रा!

( विठूजी येतो. )

कसं काय विठोजी! काय झालं?

**विठूजी**—प्रेत त्यांनीं कुठे ठेवलं आहे, हें कांहीं ते आम्हाला सांगत नाहींत.

**राजा**—बरं, पण तो आहे तरी कुठे?

**विठूजी**—बाहेर उभे केले आहेत, सरकार.

**राजा**—आण त्याला आंत, जा.

**विठूजी**—संभाजी, अहो संभाजी, वीरसेन महाराजांनां आंत आणा, आंत.

( वीरसेन व संभाजी येतात. )

**राजा**—बाळा वीरसेना, आर्तवीर्य कुठे आहेरे?

**वीरसेन**—जेवायच्या जागीं.

**राजा**—कुठे?

**वीरसेन**—जिथे तो खात असे तिथे नाहीं; तर जिथे त्याला खाताहेत तिथे! त्या मुत्सद्दी साहेबांनां कांहीं राजप्रकारणाची मसलत विचारण्याकारितां त्यांच्या अंगावर एक किड्यांची टोलेजंग सभा भरली आहे. आपण लहू व्हावं, म्हणून

इतर जिवांना पुष्ट करतो. आपण माणसं इतर जीव खाऊन लठ्ठ होतो. तें कोणाच्या करतां, तर किड्यांकरतां. ढेकूण आपल्याला खाऊन कसे पुष्ट होतात! गोड गोड खाऊन पुष्ट झालेला राजा, आणखी अन्ना शिवाय सुकलेला भिकारी, हीं दोन प्रकारचीं दोन पक्वान्नंच आहेत. दोन ताटांत भरलेलीं खरीं. पण त्यांवर ताव मारणारे किडे एकाच बैठकीला, एकाच पंक्तीला बसून ताव मारतात! म्हणजे लागतो झट् त्याचा निकाल.

**राजा**—शिव! शिव!

**वीरसेन**—अहो! आणखी पुढें ऐका. राजाला खाऊन लठ्ठ झालेला किडा मासे मारणारा कोळी गळाला लावतो. तेव्हां तो मासा त्या किड्याला खातो. आणखी तो किडा ज्यानं खाल्ला आहे, अशा माशाला तो कोळी खातो!

**राजा**—अरे वीरसेना! हें काय तूं बरळतो आहेस? याचा अर्थ तरी काय?

**वीरसेन**—याचा अर्थ एवढाच कीं, राजाच्या देहाची व्यवस्था एखाद्या भिकारड्या कोळ्याच्या नळ्यां मधून कशी लागते हें आपलं सांगितलं!

**राजा**—अरे, आर्तवीर्य आहे कुठे!

**वीरसेन**—स्वर्गांत. जा तिथे त्याला शोधायला. माणसं पाठवा. आणि तिथे जर न सांपडेल तर आपण स्वत:च पापी लोकांच्या जागेंत जाऊन तिथे त्यांनां शोधा. आणि खरोखरच आपली, आणखी त्याची गांठ या महिन्याच्या आंतच पडली नाहीं, तर वर सज्जावर जातांना आपल्या नाकालाच ता कुठे आहे हें समजेल.

**राजा**—जारे तिथे, शोधा जा त्या प्रेताला.

**वीरसेन**—आपण येईपर्यंत आपली तो वाट पहात बसेल!

**राजा**—बाळा वीरसेना, हे जें तुझ्या हातन भयंकर कृत्य

घडलं आहे, याबद्दल आम्हांला तुझी फार काळजी पडली आहे. त्याच्याशिक्षेपासून तुझं रक्षण व्हावं म्हणून आम्ही एक युक्ती योजून काढली आहे. पण आम्ही सांगूं त्याप्रमाणें तुला केलं पाहिजे. गलबत तयार आहे. वारा अनुकूल आहे. तुझ्याबरोबर तैनातीला दिलेले लोक तुझी वाट पाहताहेत. आणखी तुझी सौराष्ट्राला जाण्याची सर्व तयारी झाली आहे.

**वीरसेन**—काय, सौराष्ट्राला ?

**राजा**—होय बाळा.

**वीरसेन**—ठीक आहे!

**राजा**—बाळा, तुला आमचा असं करण्यांत हेतु काय तो समजला म्हणजे माझं करणं तुला फारच पसंत पडेल.

**वीरसेन**--हं ! पण त्याला पहाणारा एक यक्ष माझ्या ओळखीचा आहे.—तें असो. सौराष्ट्राला जायचंना ? तर आईसाहेब, हा मी आपल्याला नमस्कार करतों. आपला निरोप घेतों.

**राजा**—अरे, आईसाहेबच कां म्हणतोस ? माझ्या प्रिय बाबा, असं म्हणेनास ?

**वीरसेन**—नाहीं नाहीं. आईसाहेबच म्हणायचं. कारण, पिता आणि माता, म्हणजे नवरा आणि बायको. नवरा आणखी बायको यांचा मिळून एकच हाडामासाचा गोळा असतो. म्हणून आईचंच नांव घेतों. चला तर आतां सौराष्ट्राला. ( जातो. )

**राजा**—जा जा, त्याच्या मागोमाग जा. आणि त्याला होईल तितकं ( ? )रून लवकर एकदां गलबतावर न्या. अगदीं उशीर लावूं नका. आज रात्रीला कांहीं तो इथे नको. जा. थैल्या वगैरे सर्व मोहोरबंद होऊन तयार आहेत. जा लवकर, थोडी घाई करा.

( विठूजी व संभाजी जातात. )

हे सौराष्ट्राधिपते ! तूं अजून आम्हांला खंडणी देतोच आहेस, त्या अर्थी आमच्या शूरत्वाचा तुला चांगला दरारा आहे हें उघड आहे. या विचित्रपुरींतील लोकांचं शौर्य नाहींसं झालं नाहीं! या दराऱ्याचं आणि आह्मांवरील तुझ्या प्रीतीचं तुला जर कांहीं वाटत असेल, तर तूं यावेळेस आमची ही विनंति अमान्य करणार नाहींस. आह्मी आपल्या पत्रांनीं काय करायचं तें तुला कळविलंच आहे. फक्त वीरसेनाला जगांतून काढून लावायचा— आणखी कांहीं नाहीं! एवढं तूं करच बरं. हा पोरटा, म्हणजे माझ्या रक्ताला नासून टाकणारा एक रोगच बनला आहे ! तर आतां त्यांतून मुक्त करणें तुझ्याकडे आहे. ही गोष्ट ‘ घडली ’ असं जेव्हां मी या कानांनीं ऐकेन. तेव्हांच माझा जाव स्वस्थ होईल. एरवी होणार नाहीं. पुढें काय होईल तें होवो !

---

## प्रवेश ४.

स्थळ—विचित्रपुरीच्या बाहेरील एक मैदान.

( भीमसिंग आणि त्याचें सैन्य येतें. )

**भीमसिंग**—दफेदार, जा आणि रमाकांत महाराजांना आमचे प्रणाम सांगून अशी विनंती करा कीं, आज आह्मी वंगदेशावर स्वारी करण्याकरितां निघालों आहोंत. तर आपण मागं कबूल केल्याप्रमाणें आज आम्हांला आपल्या राज्यांतून जाण्याला मार्ग मिळावा. जर त्यांना आमची खुद्द भेट घेण्याची इच्छा असेल, तर त्यानां कुठें घेऊन यायचं हें तुला ठाऊकच आहे. तिथे आण. म्हणजे त्यांच्या आमच्या मुलाखती अंतीं त्यांनां काय सांगायचं तें सांगूं.

**दफेदार**—जशी महाराजांची आज्ञा.

**भीमसिंग**—नीट संभाळून जाहो !

( सैन्यासह जातो. ) ( **वीरसेन, विठोजी** आणि **संभाजी** येतात. )

**वीरसेन**—कायहो ! हें कोणाचं सैन्य ?

**दफेदार**—हें नवखंडाधिपतींचं सैन्य आहे.

**वीरसेन**—याचं आधिपत्य कोणाकडे आहे बरं ?

**दफेदार**—फत्तेसिंग महाराजांचे पुतणे भीमसिंग म्हणून आहेत त्यांच्याकडे.

**वीरसेन**—कुठली मोहीम आहे ?

**दफेदार**—वंग देशांतील कांहीं प्रदेश काबीज करणार !

**वीरसेन**—वंग देशांतला मध्य प्रदेश काबीज करणार किंवा बाहेरचा प्रदेश घेणार ?

**दफेदार**—खरं जर पुसाल तर जो प्रदेश मिळविण्याकरितां एवढी आमची तयारी चालली आहे, त्यांत कांहीं अर्थ नाहीं. तो अगदीं भिकार मुलुख आहे. मला जर कोणी म्हणेल कीं वर्षाच्या कांठीं पांच रुपये दे आणखी ती सारी जमीन लागवड करायला घे, तरी देखील मी तें कधीं कबूल करणार नाहीं. आणि भीमसिंग महाराजांनीं ती घेऊन खंडानं लावून द्यायला जर काढली, तर तिचे तितके देखील कोणी रुपये देणार नाहीं. पण नांव आहेना ? अमका मुलुख भीमसिंग महाराजांनीं घेतला, असा जगांत लौकिक होईलना ?

**वीरसेन**—वा ! मग वंग देशांतले लोक ह्या मुलखाकरतां तुमच्याशीं कांहीं निकरानं लढणार नाहींत.

**दफेदार**—लढणार कसे नाहींत ? त्यांनीं रक्षणा करितां लोक देखील पाठवून दिले.

**वीरसेन**—हें फुटक्या कवडीचं भांडण दोन हजार लोकं आणखी वीस हजार मोहोरा, यांनांही मिटत नाहीं अं ! काय चमत्कार आहे ? जसा एखादा मनुष्य बाहेरून दिसायला चांगला पुष्ट व निरोगी दिसतो—पण आंत त्याला एखाद्या भयंकर गुल्माचा रोग जडावा व साक्षात्कारीं दिसण्यांत कांहीं एक कारण दिसत नसून तो मनुष्य पटकन् मरावा—त्याच प्रमाणें राष्ट्रांचीही स्थिति असते. राज्यांत अतोनात संपत्ती झाली व फार दिवस शांतता असली, ह्मणजे त्याला आंतून कीड लागून तो रोग युध्धाच्या रूपानें असा बाहेर पडतो ! असो ! अहो, तुमचे माझ्यावर फार उपकार झाले बरं !

**दफेदार**—परमेश्वर तुमचं कल्याण करो! येतों महाराज मीं

( जातो )

. **वीरसेन**—मी आलोंच पहा तुमच्या बरोबर. तुह्मी थोडे पुढे व्हा.

[ **वीरसेना**शिवाय सर्व जातात. ]

काय सुस्त मी ! मी सूड घेणार ना ? अरे ! ज्या ज्या गोष्टी, जे जे प्रसंग मी पाहतों, ते ते सारे मला अतीशय मूर्ख मनुष्य ठरवितात! आपला अमूल्य वेळाचा उत्तम उपयोग व आपलं मुख्य कर्तव्य, आहार आणखी निद्रा, यातच आहे असं समजून जो खुशाल राहील, तो मनष्य कसला? पशू पशु! लांब कानाचा पशूच तो ! यापेक्षां त्याची योग्यता कांहीं अधिक नाहीं. खरोखर, ज्यांनं माणसाला अशी विलक्षण विचारशक्ति व अलौकिक बुद्धि दिली, भूतभविष्य जाणण्याचं हें जें दिव्य सामर्थ्य दिलं, तें असं गंजवून टाकण्या करितां का देणारानं दिलं ! हा काय चमत्कार आहे ! अरे ! असं हें होतं तरी कशानं ? मी का आपला नुसता फत्तर आहें ? गाढवला ऊसेतंकिती टेंच्छे मिळाले तरी घटकेनं ते राजश्री आपलं

सर्व पहिल विसरून जातात, तशी माझी अवस्था झाली म्हणावी —किंवा एकाच गोष्टीविषयीं विचार करित बसल्यामुळें असं होतं—म्हणावं तरी काय याला ? कांहीं झालं कीं आपला आला डोक्यांत विचार! त्या विचारांत खरं पाहिलं तर एक हिस्सा असतो शहाणपणाचा, आणखी तीन हिस्से असतात भित्रेपणाचे ! 'ही गोष्ट मला अजून करायची आहे' असं म्हणत बमायला मी अद्यापि जिवंत तरी कशाला राहिलों आहें ? कारण, ही गोष्ट सिद्धीस न्यायला मला योग्य हेतु, मनांत भरपूर इच्छा, माझ्या अंगांत विपुल शक्ति व इतर साधन सामग्री, या सर्व गोष्टी अनुकूळ असतां मी आपला मंद होऊन स्वस्थ बसतों. तेव्हां मी जगलों आहें तरी कशाला ? ही प्रत्यक्ष जड, अचेतन वसुंधरा मला हांसत आहे—हेंच पहाना प्रचण्ड सैन्य! हा सुकुमार व गोंडस राजपुत्र शत्रूशीं तुमुल युद्ध करण्याच्या हेतूनं कसा चालला आहे तो ? काय याचा उत्साह, काय याची उमेद; केवढी महत्वाकांक्षा—कीं तिच्या योगानं फुगून जाऊन, पुढें होणाऱ्या गोष्टीलाही तुच्छ मानून, केवळ दैवावर हवाला ठेऊन, संकटांत व मृत्यूच्या भयंकर दाढेंत आपली सुकुमार व क्षणभंगुर काया व आपली चंचळ लक्ष्मी खुशाल झुगारून देत आहे ! आणखी हें सारं कशा करतां—तर फुटक्या कवडी करतां ! बलवत्तर कारण असल्या खेरीज हालचालं करायचीच नाहीं हें थोरांचं लक्षण नव्हे—तर थोरांचं खरं लक्षण हेंच कीं, जिथे अब्रूला खरोखर मोठा धक्का बसत आहे अशा ठिकाणीं इतकंसं जरी कारण सांपडलं तरी त्यावर मोठा चक्रविभू रचायचा ! आतं हें सारं आमच्याकडे कसं लागतं आहे पहा ! माझ्या बापाचा खून झालेला—माझी आई भ्रष्ट केलेली—माझं डोकं आणखी रक्त अतोनात तापलेलीं—अशी ही माझी स्थिति असतांना मी आपला डोळे झांकून स्वस्थ झोंप घेतों आहें! याचं नांव काम ! थंव रे बापाचे अवलाद ! अं-

रे ! घडघडीत पुढून हे वीस हजार लोक आपल्या डोक्यांत एक कांहीं तरी वेड पिकवून पराच्या बिछान्याप्रमाणें धारातीर्थी खुशाल आपले देह ठेवण्या करतां जात आहेत! आणखी एवढा हा अजस्त्र खटाटोप कशा करतां? तर जिच्यावर सारी सेना उभी राहायला सुद्धां जागा मिळणार नाहीं, किंवा जी युद्धांत मृत्यु पावलेल्या लोकांची प्रेतें गाडून टाकायला सुद्धां पुरणार नाहीं, अशा एका भिकारी जमिनाची चिरटीसाठीं! अरेरे! आजपासून—याच घटकेपासून—माझ्यां डोक्यांत विचार येतील ते रक्तपाताचेच असले पाहिजेत! नाहीं तर ते कुच कामाचे असं मी समजेन !

[जातो.]

---

## प्रवेश ५.

(विशाल गडच्या किल्ल्यांतील एक दिवाणखाना.)

### [ राणी मदालसा, हरसेन व एक गृहस्थ ]

**राणी**—छेग बाई ! तिच्याशीं मी कांहीं बोलायची नाहीं.

**गृहस्थ**—छे ! तिची कांहीं स्थिति नीट दिसत नाहीं. अगदीं वेडी होऊन गेली आहे. एकंदर तिची ही अवस्था पाहून आपल्याला तिची फारच कींव येते.

**राणी**—ती म्हणते तरी काय ?

**गृहस्थ**—हें पहा, ती एक सारखी आपल्या बापाबद्दल बडबडत असते. ती म्हणते, या जगांत एकंदर साऱ्या लबाड्या आहेत. 'हं हं' असं म्हणून आपला ऊर बडविते. रस्त्यांत पडलेल्या काड्या पाहून त्यांच्यावर रागावते. एकंदरींत पाहिलं असतां ती जें भाषण करिते त्यांत मेळ मुळींच नसतो. त्याचा अर्थ मुळींच करितां येत नाहीं. आतां ती जेव्हां जेव्हां आपल्या मनाशीं बोलत असते, तेव्हां ती जे थोडेसे शब्द बोलते, त्या श-

द्दांत ऐकणारानें आपल्या पदरचें कांहीं शद्ब घातल्या खेरीज त्यांचा अर्थच होत नाहीं. तिच्या त्या डोळ्यांवरून, त्या मानेवरून, आणखी इतर हावभावावरून तिच्या मनामध्यें कसला तरी विचार चालला आहे असं वाटतं. पण निश्चितार्थ कांहींच निघत नाहीं. तरी पण तिच्या मनाला कांहीं तरी मोठं दुःख झालं आहे, इतका अर्थ उघड होतो.

**हरसेन**—सरकार, आपण स्वतः जर तिच्याशीं एकदां बोलाल तर बरं होईल. कारण, दुःखानं डागलेल्या मनांवर ती एखादा भलताच ग्रह करील, अशी भीती वाटते.

**राणी**—घेऊन यातर मग तिला इकडे.

**हरसेन**—जी सरकार. ( जातो. )

**राणी**—( मनांत ) हर ! हर ! माझ्या या पापी मनाला एवढंसं कांहीं अधिक झालं म्हणजे कांहीं तरी मेला एखादा भयंकर प्रसंग गुदरतो कीं काय, अशी भीती वाटते. पापाला म्हणून जितकं जितकं छपवायला जावं तितकं तितकं मेलं तें अधिकच उघडकीस येतं!

( हरसेन चंद्रकलेला घेऊन येतो. )

**चंद्रकला**—विचित्रपुरीच्या त्या सुंदर महाराणीसाहेब कुठे आहेत बरं ?

**राणी**—चंद्रकले ! बेटा तुझं कसं आहे आतां ?

**चंद्रकला**—( गाते )—

पद.

' उर्मीजवळ खरी ' या चालीवर.

॥ प्रेमाचें चिन्ह म्हणोनी, काय बाई तरि सांगावें॥ध्रु०॥

॥ वस्त्रादिकभूषणभारें काय बाई तरि समजावें ॥

**राणी**—अग बाई या तुझ्या कडव्याचा अर्थ तरी काय समजावा ?

**चंद्रकला**—असं म्हणता ? पायां पडतें. बघा—बघा— ( गाते )

॥ गेला तो गेला बाई, काय करूं जाइ मरोनी ॥
॥ भणभण हा वारा वाही, दगडामधिं राहि पडोनी ॥

**राणी** अग पण चंद्रकले—

**चंद्रकला**—अहो बाई हें पहा—( गाते )

॥ शुभ्र अशा वस्त्रांनीं, तनु त्यांचि जाइ झांकोनी ॥

( **राजा** येतो. )

**राणी**—अग बाई ! पाहिलीत कां काय इची स्थिती झाली आहे ती !

**चंद्रकला**—( गाते. )

॥ मधुर अशा पुष्पांनीं, तनु सुंदर जाइ भरोनी ॥
॥चाल॥ ज्या पुष्पानीं । पडताचि जीवें । मार्गी रडावें ।
अश्रु गळावे । जेविं खरें प्रेम असावें ॥ प्रेमाचें ॥१॥

**राजा**—काय होतं आहे माझ्या बाईला ?

**चंद्रकला**—तुमचं साऱ्यांचं कल्याण असो. अधीं होता वाघ्या, मग झाला पाग्या. देवा ! आपली साऱ्यांची सध्यां काय स्थिती आहे, हें आपल्याला ठाऊक आहे. पण पुढें काय आपली स्थिती होईल हें कोणाला ठाऊक आहे ? देव तुम्हांला पोटभर खायला देवो बरं०!

**राजा**—अरे ! अरे ! पोरीला बापाशिवाय कांहीं दिसत नाहीं बरं. बापाच्या दुःखानं ही अगदीं वेडी झाली आहे.

**चंद्रकला**—अहो, मी पदर पसरतें, त्याची गोष्ट आतां कशाला काढतां ? पण हें पहा, याचा अर्थ काय, असं जर कोणी विचारलं तर मी सांगतें हें त्याला सांगा—( गाते. )

## साकी.

॥ दिवस सणाचा उदइक येई प्रातःकाळीं जाऊं ॥
॥ कुमार तूं वा मी हि कुमारी उपवनीं सौख्या घेऊं ॥
॥ जाऊं गुणवंता । उपवनीं जाऊं कुलवंता ॥ १ ॥

**राजा**—अरे, पण इची अशी ही स्थिती झाली तरी केव्हां पासून?

**चंद्रकला**—सारं ठीक होईल, थोडा धीर धरला पाहिजे. पण त्याला त्यांनीं दूर रानांत नेलं, हा विचार माझ्या मनांत आला म्हणजे मला रडूं आवरत नाहीं. अरेरे ! माझ्या भावाला मुद्दां हें कळेलच. तर मग तुमचे साऱ्यांचे मजवर फार उपकार आहेत. अरे माझी गाडी कुठे आहे ?—बायांनो मी येतें बरं—मी येतें बरं—मी येतें बरं—

( जाते. )

**राजा**—अरे, जा तिच्या मागं जारे. कोणी तरी तिला. नीट संभाळा.

[ **हरसेन** जातो. ]

**राजा**—अरेरे ! या हिच्या वेडाचं कारण दुर्धर दुःखरूप विष होय. ह्या सव दुःखाचं कारण, तिच्या बापाचा मृत्यूच होय. हे पहा. ( राणीकडे पाहून ) विघ्नं यायला लागलीं, म्ह-

णजे एकावर एक येतात. प्रथम ह्या पोरीचा बाप बळी पडला, त्यावर तुमचा मुलगा विदेशीं गेला. आणखी वस्तुतः येथून त्याची रवानगी करण्यास सुद्धां तो स्वतांच कारण झाला. प्रजाजनांची मनं या आर्तवीर्यगावाच्या मरणापासून अगदीं क्षुब्ध होऊन गेलीं आहेत. आर्तवीर्याची क्रिया आह्मी कशी तरी आटोपली. पण गरिब बिचारी चंद्रकला भ्रमिष्ट होऊन वेड्या सारखी चोहोंकडे फिरूं लागली बरं ! इचा भाऊ सुद्धां विलासनगरीहून परत आला आहे. कारण, त्याच्या बापाच्या मृत्यूविषयीं लोकांनीं त्याच्या मनींत भलभलत्या गोष्टी सांगून त्याचे कान भरून टाकले आहेत ! काय करावं ! प्रिये ! ह्या एकंदर गोष्टी मनांत आल्या ह्मणजे दुःखानं व भितीनं माझी मती मूढ होऊन जाते व हा जीव अगदीं नकोसा होऊन जातो.

[ आंत गडबड होते. ]

**राणी**—अग बाई ! कसली ही गडबड ?

**राजा** -अरे, ते नागव्या तरवारीचे आरव काय करताहेत?

( दुसरा गृहस्थ येतो. )

**राजा**—कायरे, काय गडबड आहे?

**गृहस्थ**—महाराज, आपला जीव बचावावा! घात होण्याची वेळ आली आहे. जसा एखादा समुद्र खवळतो, त्याप्रमाणं शूरसेन बरोबर बंडखोर लोक घेऊन आपल्या राज्यांत मोठा धिंगाणा घालीत आहे. लोक त्यालाच राजा ह्मणून आरडत आहेत. आणखी राजसत्तेचा विध्वंस करण्यास प्रवृत्त होऊन लोक 'आमचा राजा शूरसेन आहे ! शूरसेन आमचा राजा!' असे म्हणत सुटले आहेत.

**राजा**—अरे तुह्मी सारे हे विचित्रपुरीचे लोक कुत्र्यासारखे भलत्यालाच राजा म्हणतां अं ! अरे मेल्यानों!

**राजा**—अरे दरवाजे तर यांनीं फोडले.

[ आंत गडबड होते. ]

(शूरसेन सशस्त्र आंत येतो. त्याच्या मागून लोक येतात

**शूरसेन**—अरे तो कारभारी कुठे आहे ! [लोकांना] बाब नो! तुम्ही सर्व बाहेर उभे रहा.

**लोक**—छे, छे, आह्मी आंत येणार.

**शूरसेन**—मी तुह्मांपुढें पदर पसरतों, क्षणभर बाहेर उभे रहा—

**लोक**—बरं आहे सरकार.

[ बाहेर उभे रहातात. ]

**शूरसेन**—लोकहो, तुम्ही दरवाज्याशीं उभे रहा ( रमाकांतास ) अरे चांडाळा ! माझा बाप कुठे आहे तो दे—

**राजा**—बाळा शूरसेना, शांत हो, शांत हो.

**शूरसेन**—बाई साहेब! ही वेळ शांत होण्याची नाहीं. जर मी यावेळीं शांत झालों, तर मी आपल्या बापाचा अवलादच नव्हे !

**राजा**—अरे शूरसेना, तूं असं हें बंड काय म्हणून माजिवलस?

[ राणी शूरसेनास धरावयास जाते. ]

**राजा**—तूं कशाला त्याला धरतेस? माझ्या विषयीं कांहीं काळजी करूं नकोस. मला हा काय करणार आहे ? राजसत्ता जी आहे, तिचा असा कांहीं प्रताप आहे कीं, राजद्रोही मनुष्याचं त्याच्या पुढें कांहीं चालणार नाहीं. शूरसेना तुला इतकं संतापायला झालं तरी काय ? ( राणीला ) तूं त्याला सोड.

**शूरसेन**—माझा बाप कुठे आहे तो सांग ?

**राजा**—तुझा बाप तर मेला.

**राणी**—पण हें बघ, त्याला कांहीं यानीं मारलं नाहीं.

**राजा**—उगीच रहाग, त्याचं काय ह्मणणं आहे तें तर ऐकूं दे.

**शूरसेन**—तो मेला कसा—कुणी मारला, तें सर्व सांगा. मी या वेळीं थ पाथापीला ऐकणणार नाहीं. समजलांत ? मी या-बद्दल सूड घ्यायला कधीं कमी करणार नाहीं ! आणि याबद्दल जरी मला नर्कवास प्राप्त झाला तरी तो मी सुखानं सोशीन. काय होईल तें होवो—मी आपल्या बापाबद्दल सूड उगिवणार.

**राजा**—खुशाल उगिव! तुला कोण आड येतो आहे ?

**शूरसेन**—मला बंदी करण्याची कोणाची प्राज्ञा आहे? माझ्या मनाचीच मला अटक!

**राजा**—बाबा शूरसेना, तुझ्या बापाच्या मृत्यूला कोण कारण झाला, हें जर तुला समजून घेण्याची इच्छा असेल तर त्याचं खरं कारण समजून घेण्याचं एकीकडे ठेऊन, तुझ्या बापाचे शत्रू व मित्र, या दोघांवर जेव्हां तूं सारखंच शस्त्र धरतोस, तेव्हां हें मोठं आश्चर्य आहे बोवा !

**शूरसेन**—छे, छे, मी तसं कांहीं एक करणार नाहीं. माझ्या बापाला ज्यानं मारलं असेल, त्याचाच मी सूड घेईन.

**राजा**—तुझ्या बापाला कोणी मारलं हें कळण्याची तुझी इच्छा आहे काय ?

**शूरसेन**—उघड आहे. जो मला त्याचं नांव कळवील, त्याला आपल्या बाहूंनीं मी दृढ आलिंगन देईन. आणि मी त्याच्या घरीं कच्च्या घड्यानं पाणी भरीन.

**राजा**—आतां मात्र तूं शहाण्यासारखा बोलतोस. हें बघ, तुझ्या बापाच्या मृत्युविषयीं मी निरपराधी आहे. इतकंच नाहीं पण त्याच्या कळण्यानं मला उलटं फार दुःख झालं आहे !

**लोक**—(आंत गडबड करितात.) अरे, तिला येऊं द्या, आंत येऊं द्या. तिला वाट सोडा:— ( चंद्रकला येते. ) .

**शूरसेन**—अरे, कसला गलबला ? ( चंद्रकलेकडे पाहून ) हे भगवन् सूर्यनारायणा ! तूं आपल्या प्रखर किरणांनीं माझा मेंदू दग्ध करून टाक ! हे अश्रूनों ! तुम्ही माझ्या या नेत्रांची दर्शनशक्ति नष्ट करून टाका ! ताई, अग ताई ? देवाची शपत घेऊन मी तुला सांगतों. या तुझ्या वेडाचा मी पक्का सूड घेईन! ज्या दुष्टाच्या कृत्यानं माझी ताई भ्रमिष्ट झाली, त्याच्या नरडीचा घोंट घेतल्याशिवाय हा शूरसेन कधीं ही रहाणार नाहीं. हे वसंतमंजरी ! हे माझे भगिनी ! माझे ताई ! सुंदरि चंद्रकले ! अरेरे ! भगवन् ! या तरुण कुमारिकेची बुद्धि, एखाद्या म्हातारड्याच्या बुद्धी सारखी नष्ट व्हावी हें उचित आहे काय ? अहाहा ! जगांत असंच आहे ! जीं जीं म्हणून चांगलीं माणसं असतात, तींच देवाला आवडतात. तेव्हां, त्यांचा तो चांगुलपणा आम्हां अधम पातकी माणसांच्या उपयोगी पडावा, इतकं आमचं मोठं भाग्य कुठून असेल बरं ?

**चंद्रकला**—( गाते )

## पद.

('परिणिलें न मुनिकन्येला' या चालीवर.)

ठेविलें मदीया ताता ॥ धरणीवर मी हि वसतां ॥
बहु होय दुःख मम चित्ता ॥ किति वर्णूं किती तरी
आतां ॥ किति सांगुं तुम्हां, बाई सांगूं ॥२॥ नयनाश्रु
तनूवरि पडतां ॥ भिजुनी ती भिजुनी जातां ॥ हृदय
हें जणों घन होतां ॥ हो वष्टि काय ट्रं पुसता ॥

**शूरसेन**–ताई! तूं जर देहभानावर असतीस तर माझी सूड घेण्याची इच्छा जशी आतां उचंबळली आहे, तशी उचंबळली नसती.

**चंद्रकला**—( गाते )

गा बाई गाहो गाहो गा, गा, गा, तुह्मी गाहो—

अग बाई ! काय तरी हें कडवं जमलं आहे !

**शूरसेन**–यांत काय अर्थ आहे? हिच्या बोलण्यांत कांहीं मेळच नाहीं. अरेरे !

**चंद्रकला**—( हातांतल्या परडींतलीं फुलें घेऊन ) हं. हीं घ्या गुलाबाचीं फुलं ! हं. हें चाफ्याचं फूल. वा: ! कानावर ठेवलं ह्मणजे काय मौज दिसते ! हें शिरसाचं फूल ! सख्या, हें तूंच माझ्या कानावर ठेवलं होतंस नव्हे ?

**शूरसेन**–वेड रे वेड! काय म्हणावं याला ! शिव ! शिव !

**चंद्रकला**–हं,झालं. हीं घ्या बकुळीचीं फुलं. हीं घ्या मदनबाणाची. ही शेवंती ! अग बाई, पण हें पहा सूर्यफूल ! मी तुह्मांला प्राजक्ताचीं फुलं दिलीं असतीं, पण माझा बाबा मला सोडून गेला, तेव्हां तीं सारीं कोमेजून गेलीं! कुणी म्हणतात, त्यांचं झालं तें बरंच झालं ! ( गाते. )

## पद.

( ' जाऊनि सांगा माधवाला '—या चालीवर. )

॥ मैना आवडती ॥ पोपट मैना आवडती ॥ ध्रु ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ... ९२५

आणि दुःखानं व शोकानं विव्हळ झाली आहे. पण तिचें तें सौंदर्य तिला सोडीत नाहीं !

**चंदकला**–( गाते. )

## पद.

( ' मदना चंद्रा सुवैरी तुझी '—या चालीवर. )

ताता माझी कशी तरी झाली स्थिती । झाली माझी स्थिती ॥ ध्रु० ॥

' येई न आतां खास पुन्हा तो ' ।
म्हणुनि असे रडती ॥ विहगगण ॥ १ ॥
येईल आतां परतुन कैंचा ।
कुंठित होय मती । मम ही ॥ २ ॥
शुभ्र तयाचे केश हिमासम ।
शुभ्र असे असती । सकळही ॥ ३ ॥
गेला गेला—शोक वृथा कां
सकळांची ही गति ॥ भू वरी ॥ ४ ॥
देव तयाला निज सुखधामीं
नेवो, ही विनती ॥ प्रभुला ॥ ५ ॥

तुम्हां सर्वांचं कल्याण होवो बरं !

—जाते—

**शूरसेन**—अरे देवा ! अहो! हें पाहिलंतना?

**राजा**—शूरसेना, तुला दुःख फार झालं आहे हें मी

ला मारण्याच्या कामांत जर माझा हात कोणच्याही प्रकारें असला तर, फार काय-पण हें सर्व राज्य तुझ्या स्वाधीन करीन! माझं सर्वस्व, माझं जीवितही तुझ्या स्वाधीन करीन! पण असं जर नसेल, आणि तूं जर क्षणभर स्वस्थपणानं माझं बोलणं ऐकशील, तर ज्या दुष्टानं तुझ्या बापाचं जीवित हरण केलं आहे त्याचा सूड घेण्याच्या कामांत मी देखील सहाय होईन !

**शूरसेन**—बरं, तसंच कां होईना. पण ज्यानं माझा बाप मारला, तो प्रत्यक्ष कृतांत जरी असला तरी देखील मी त्यास शासन करीन! अहारे ! माझ्या बाबा ! या दुष्टानं तुझे पुरते अंत्यविधीही मला करून दिले नाहींत! तझ्या मुलाची व तुझी भेट सुद्धां होऊ दिली नाहीं! असा जो दुरात्मा असेल त्याच्या नरडीचा घोंट मी घेईनच घेईन!

**राजा**—खुशाल घे बाबा. पण ज्यानं हा अपराध केला असेल, त्याजवरच तुझी कुन्हाड पडूं दे, ह्मणजे झालं. चल, माझ्या बराबर चल. (जातात.)

---

## प्रवेश ६.

स्थळ—किल्ल्यांतील दुसरा एक दिवाणखाना.

(**हरसेन** व एक **सेवक** येतात.)

**हरसेन**—कोण आहेत रे ते? माझ्याजवळ काय त्यांचं काम आहे?

**सेवक**—महाराज, कोणी कोळी लोक आले आहेत. आपल्या नांवचं पत्र आणलं आहे असं ते सांगतात.

**हरसेन**—येऊं दे त्यांना आंत. (सेवक जातो) कठन बरं

(कोळी लोक येतात)

**एक कोळी**-जोहार सरकार!

**हरसेन**-कांरे, कुठून आलांत तुम्ही?

**कोळी**-महाराज, आपल्या इकडून सौराष्ट्राला वकील गेले होते, त्यांनीं आम्हांजवळ आपल्या करितां हें पत्र दिलं आहे. आपलंच नांव हरसेनराव नाहीं का?

**हरसेन**-होय बाबा. माझंच नांव हरसेन. आण पाहूं पत्र कुठे आहे तें

(कोळी पत्र देतो.)

(वाचतो.)

'विनंति विशेष. हरसेना, तूं हें पत्र चोरून वाच. आणखी वाचल्यावर या कोळ्याची राजापाशीं दाद लाव. त्यांच्या जवळ राजाला देण्याकरितां कांहीं पत्रें पाठविलीं आहेत. विचित्रपुरी सोडून आम्ही निघाल्यानंतर दोन दिवसांनीं समुद्रांत कांहीं शूर चांचे लोकांचें एक गलबत आमच्या गलबतावर चढून आलें. आमचें गलबत लवकर चालेना. यामुळें हातघाईची वेळ येऊन आम्हांला त्या चोरट्यांशीं युद्ध करावें लागलें. त्या सपाट्यांत मी त्यांच्या गलबतावर निसटून गेलों. ते चोरटे आमचें गलबत सोडून पळूं लागले. मी एकटाच सांपडलों. त्यांनीं मला बंदिवान केलें. परंतु, पुढें मजवर दया करून त्यांनीं मला फार चांगल्या रीतीनें वागविलें व शेवटीं मला विचित्रपुरीजवळ

ह्या मनांत आहे. असो. मी पाठविलेलीं पत्रें राजाला पोंचतील असें कर. आणि माझ्याजवळ फार त्वरेनें निघून ये. असें केलेंस तरच तुझा अकस्मात् मृत्यु टळेल असें समज. मी तुला अशा कांहीं गोष्टी कळविणार आहें कीं, तूं त्या ऐकल्या-बरोबर तोंडांत बोटच घालशील ! हे कोळी लोक फार भले आहेत. ते तुला मी जेथे आहें तेथे आणून पोंहोंचवितील. विठोजी व संभाजी हे सौराष्ट्राला जाऊन पोंहोंचले असतील. त्यांच्या विष-यीं तुझ्याजवळ मला पुष्कळ सांगायचें आहे. लोभ करावा, हे विनंति.

तुझा प्रिय मित्र,

**वीरसेन'**

चलारे गड्यांनो ! मी तुम्हांला राजाकडे नेतों. ही तुम्ही आण-लेलीं दुसरीं पत्रं ज्याचीं त्याच्या हातांत एकदां पडलीं, म्हणजे तावडतोब ज्याच्याकडून तुम्ही हीं पत्रं घेऊन आलांत त्याच्या-कडे मला घेऊन जा. मी तुमच्या बरोबर येणार. समजलां ?

( जातात. )

---

## प्रवेश ७ वा.

स्थळ—किल्ल्यांतला एक दिवाणखाना.

[ राजा व शूरसेन येतात. ]

तुला ठाऊकच आहे कीं, तुझ्या बापाला ज्यानं मारलं त्यानं माझाही जीव घेण्याचा यत्न केला होता.

**शूरसेन**—हो. मी तें ऐकलंच. पण कांहो, असले हे त्याचे वेडेवेडे चाळे व त्याचीं तीं दुष्ट कृत्यं आपण सहन कशीं केलींत? राजाच्या संरक्षणाला व आपल्या शहाणपणाला योग्य असा बंदोबस्त आपण करायचा होता.

**राजा**—शूरसेना, तूं म्हणतोस असं मी केलं नाहीं याचीं दोन विशेष कारणं आहेत. हीं कारणं तुला कदाचित् चांगलींशीं वाटणार नाहींत. तरी मला तीं सबळ वाटलीं. त्याच्या आईचा त्याच्यावर पडला विलक्षण लोभ ! तिचा सर्वस्वी जीव कायतो वीरसेन ! माझ्याविषयीं म्हणशील, तर माझा तो गुणं म्हण, किंवा माझी आपली एक वाईट खोड आहे असं म्हण, माझा व तिचा असा कांहीं ऋणानुबंध आहे कीं, ती जें करील त्याच्या बाहेर मला जावतच नाहीं! तिच्या मर्जीविरुद्ध कोणचीही गोष्ट करणं, हें माझ्या हातून घडतच नाहीं! दुसरं कारण असं कीं, प्रजेचा तो फार आवडता पडला. वीरसेनावर लोकांचं फार प्रेम असल्यामुळं त्याचे दोष त्यांनां दिसत नाहींत. उलट त्याचे जे दोष, तेच त्यांनां गुण असे वाटतात. त्यामुळं एखादा बाण सोडला असतां वाऱ्याच्या सोसाट्यानं तो पुन्हा जसा आपल्या ठिकाणीं परत यावा, तशी माझी अवस्था होते !

**शूरसेन**—वा! हें चांगलं ! आमचा बाप गमावला. माझ्या वहिणीला भ्रमिष्ट करून सोडली. माझ्या ताई सारखी बहीण सगळं जग शोधूं गेलं तरी मिळायची नाहीं ! इतकं माझं नुकसान झालं ! तेव्हां या साऱ्याबद्दल मी त्याचा सूड घेतल्याशिवाय राहूं म्हणतां? कधींही रहाणार नाहीं.

आम्ही आहोंत ? थोडक्यांत समजेल तुला आम्ही काय करणार आहोंत तें ! तुझ्या बापावर आमचा मोठा लोभ, आणखी आमचेही जीव आम्हांला प्यारच आहेत. तेव्हां, एवढ्यावरून मला वाटतं—गोष्ट तुझ्या ध्यानांत येऊन चुकलीच असेल.—

(एक जासूद येतो.)

(जासुदाला) कायरे ? काय खबर आहे ?

**जासूद**—खाविंद, वीरसेन महाराजांकडून पत्रं आलीं आहेत. (पत्रें पुढें करतो.) हें सरकारच्या नावचं. आणखी हें राणी साहेबांच्या नावाचं.

**राजा**—वीरसेनाकडून ? कुणी आणलीं हीं पत्रं ?

**जासूद**—जहाजावरच्या कोळी लोकांनीं आणलीं असं सांगतात. मी कांहीं त्यांना पाहिलं नाहीं. मला हीं माणकोजीनं दिलीं. आणखी ज्यानं तीं आणलीं त्याच्या पासून माणकोजीला मिळालीं.

**राजा**—शूरसेना ? मी हीं वाचतों. तूं ऐक त्यांत काय लिहिलं आहे तें. (जासूदाला) जा तूं.

(जासद जातो.)

(राजा पत्र वाचतो.)

'श्रीमंत रमाकांत महाराज, स्वामींचे सेवेशीं. आपल्या राज्यांत मी नागवलेला येऊन पडलों आहे. उदईक आपल्या चरणांचें दर्शन व्हावें ही इच्छा आहे. भेटी अंतीं आपली क्षमा मागून मी असा अकस्मात परत कसा आलों, वगैरे इत्थंभूत वर्तमान सेवेशीं विदित करीन, हे विज्ञापना.

मेहली परत आली ! कां त्यांत कांहीं तरी लबाडी आहे? छे:, खोट असेल हें !

**शूरसेन**—त्याचं अक्षर आपण चांगलं ओळखीत असाल ?

**राजा**—हो हो. ओळखीत असाल ह्मणून काय विचारतोस? हें वीरसेनाचंच अक्षर! काय, काय ह्मणतो? 'नागवलेला!' आणि हें इथें ताजाकलम घातलें आहे, यांत म्हणतो कीं 'मी इथें एकटा आलों आहें' ! शूरसेना, तुला यांत कसं काय वाटतं आहे ?

**शूरसेन**—महाराज, माझी यांत बिलकूल मति चालत नाहीं ! पण त्याला येऊं द्या तर खरा. हें ऐकल्या बरोबर मला मोठी हुशारी आली आहे. 'तूं असं काम केलं आहेस या बद्दल बच्चाराम! तुला चांगला हात दाखवीन ' असं मी त्याच्या तोंडावर बोलेन !

**राजा**—शूरसेना, असं जर असेल—आणखी असं असलंच पाहिजे—असं जर नसावं तर मग कसं असावं ? पण हें बघ, तूं माझी एक गोष्ट ऐकशील ?

**शूरसेन**—हो, हो. हें काय विचारणं ? पण तोडजोडीची गोष्ट नका सांगूं.

**राजा**—छे, छे. तोडजोड कसली घेऊन बसलास ? तो जर परत आला असेल, आणि ही सफर पुन: न करण्याचा त्याचा विचार असेल, तर मी एक अशी युक्ती योजून ठेवली आहे कीं, त्या युक्तीनं त्याचा निकाल लागणारच लागणार ! इतकं होऊन पुन: तो मेल्या बद्दल आपण आपले नामा निराळेच ! फार काय, त्याची आई सुद्धां केवळ आपल्या दैवाला दोष देऊन स्वस्थ बसेल.

**राजा**—ठीक आहे. तें माझ्याकडे लागलं- तूं प्रवास पुष्कळ केला आहेस असं मी ऐकलं आहे—आणखी ती गोष्ट वीरसेनाच्याही कानीं पडली आहे—कीं, तूं एक अलौकिक गुण संपादन केला आहेस : तुझ्यांत दुसरे पुष्कळ गुण वास करतात, पण त्यांच्या मध्यें हा जो अप्रतिम गुण तुझ्या अंगीं आहे, त्याचा वीरसेनाला मोठा मोठा हेवा वाटतो. मला वाटतं हें फार नीचपणाचं लक्षण आहे !

**शूरसेन**—महाराज, असा हा अप्रतिम गुण माझ्यांत आहे असं आपण म्हणतां, तो कोणचा वरं ?

**राजा**—तो गुण तुझ्या तारुण्याला परम शोभा देणारा आहे. एवढंच नाहीं तर तुझ्या सारख्याला तो अवश्यच आहे म्हटलं तरी चालेल. कारण, तरुण माणसांनां तो आलबेला मंदील, तो कडकडीत अंगरखा, तो सुडसुडित छान छबेला पोषाख, या गोष्टी शोभणाऱ्याच असतात; त्याचप्रमाणे वृद्धापकाळीं वृद्ध माणसांनीं पांढरं किंवा कंदी पागोटं घालणं, साधा पोषाख करणं, हेंच त्यांनां योग्य आहे. कारण, त्यांच्या ठिकाणीं भारदास्तपणा, पोक्तपणा व गांभिर्य असलं पाहिजे. अस्तु. दोन महिन्यापूर्वी विलासनगरीहून एक गृहस्थ आला होता. विलासनगरीचे लोक मी स्वतां पाहिलेच आहेत. घोड्यावर बसण्यांत मोठे पटाईत—पण हा बोवा गृहस्थ पाहिला त्याची या कामांत अगदीं हद्द आहे ! घोड्यावर गडी एकदां भिडला कीं जसा त्याच्या पाठींतूनच निघाला आहे! काय सांगावं, ह्या उमद्या सुंदर जनावरावर एकदा त्यानं स्वारी केली कीं असं वाटे—ब्रम्हदेवानं त्या घोड्याला अन् स्वाराला एकदमच निर्माण केलं कीं काय असं वाटे! माझी बघ, कल्पनाच चालेना त्याला पाहिल्या बरोबर ! मला वाटे कीं हें असेल तरी कसं ?

**शूरसेन**—हाँ, आला लक्षांत. मी आपल्याला खास सांगतों, तो आमचा हयपतीच असेल.

**राजा**—हो. हो. तोच तो. त्याला इथे हे लोक हैपतरावं म्हणत. कुणी कुणी हैयतराव असंही ह्मणत.

**शूरसेन**—वा ! हा हयपती तर माझ्या चांगल्या ओळखीचा आहे. त्याचा माझा फार स्नेह. विलासनगरातल्या लोकांच्या गळ्यांतला तो केवळ ताईत आहे.

**राजा**—त्यानं माझ्या जवळ असं कांहीं तुझ्या पट्टा खेळण्याच्या कसबाचं वर्णन केलं कीं कांहीं बोलणं नाहीं ! आणखी या कामांत तूं विलक्षण कसरत करून अलौकीक गुण संपादन केला आहेस असं त्यानं मला सांगितलं. आणखी त्यांतून तुझ्या तरवारीची तर त्यानं फारच तारीफ केली बोवा. ती इतकी कीं, तुला जर जोड मिळेल तर तुम्हां दोघांची झूंज पहाण्याची फारच मौज आहे. फार काय, त्यानं मला शपथ वाहून सांगितलं कीं आमच्या विलासनगरींत तलवार झेलण्यांत त्याची हातचलाखी, त्याची ती उभं रहाण्याची ऐट, आणखी ती डोळ्यांची तरतरी, या गोष्टींत शूरसेनाचा हात कोणाच्यानेंही धरवणार नाहीं! त्या गृहस्थाच्या तोंडचीं हीं अक्षरं जेव्हां वीरसेनानं ऐकलीं, तेव्हां त्याला तुझ्याविषयीं अतिशय हेवा वाटला. आणखी तो म्हणाला, 'देव करो आणखी शूरसेन इथे येवो कीं मग दाखवूं त्याला हात ! ' या वरून पहा आतां काय असेल तें !

**शूरसेन**—महाराज, ह्मणजे काय ?

**राजा**—शूरसेना, तुझा बाप तुला प्रिय होता कीं नाहीं ? तझं हे बापाविषयींचं दुःख वरवर आहे. किंवा तुझ्या अंत

**राजा**—हेतु काय ह्मणून काय विचारतोस? तुझी बापावर मुळींच प्रीति नव्हती असं नाहीं कांहीं माझं ह्मणणं! अरे, प्रीतीला कोणच्या तरी काळीं आरंभ होतोना? तेव्हां मला अनुभवानं असं वाटयाला लागलं आहे कीं, विस्तव किंवा विस्तवाचा ठिणगी पडल्यापासून कांहीं वेळानं विझून जाते, तसं बापाविषयीं तुझं जें प्रेम, त्याची तर अशी अवस्था झाली नसेलना? प्रीतिरूप ज्योतीमध्येंच अशी एक वात किंवा काजळी राहते कीं, तिच्या योगानं ती ज्योत विझून जाते. दुसरं असं आहे कीं, कोणच्याच गोष्टींत नेहेमी एक सारखा चांगुलपणा राहतच नाहीं. कारण, चांगुलपणा वाढतां वाढतां इतका वाढतो कीं तो अतिशयित होऊन त्याची शेवटीं माती होते: अमकी गोष्ट करायची, असं एकदां मनानं ठरविलं ह्मणजे मग ती केलीच पाहिजे. पण कोणचीही गोष्ट करण्याविषयींची ही इच्छा परिपूर्ण व्हायला हजारों विघ्नं मध्यें येनात ना! एकदां ती वेळ निघून गेली मग फलाणी गोष्ट आपल्याला केली पाहिजे होती, कारणं आपलं कर्तव्य होतं, असं म्हणत बसणं म्हणजे एखादा उधळ्या मनुष्य आपण उधळून टाकलेल्या संपत्ती करतां रडत बसतो, तशी गत आहे. असो. आतां मुळाशीं येऊं. वीरसेन परत आला आहे. तूं आपल्या बापाचा मुलगा आहेस असं नुमतं तोंडानं म्हणण्यापेक्षां हातानं काय करायला तयार आहेस तें सांग?

**शूरसेन**—तो कुठे देवदर्शनाला गेला, ह्मणजे तिथेंच त्याची मुंडी उडवितों! म्हणजे झालं कीं नाहीं?

**राजा**—छे, छे, देवळांत झालं ह्मणून काय झालं? खून कुठे केला तरी वाईटच- पण अरे! सूडच घ्यायचा आहे तर त्या-

परत आला म्हणजे शूरसेन या नगरांत आला आहे असं त्याच्या कानावर घालतील, तुझी खूप बडेजाव त्याच्याजवळ सांगतील व त्या विलासनगरीच्या गृहस्थानं ज्या तुझ्या गुणाचं वर्णन केलं त्या गुणाची खूप तारीफ वीरसेनापाशीं करतील, अशीं माणसं तयार करण्याची तजवीज मी ठेवतों. तात्पर्य काय, कीं तुम्हां दोघांचे दोन हात एकमेकांशी झाले पाहिजेत. वीरसेन म्हणशील तर तो जातीनं भोळवट, मनाचा उदार, व निष्कपट, सफा मनुष्य असल्यामुळं, हा दांडपट्टाच आहे किंवा तरवार आहे, हें कांहीं एक न पहातां एकदम लागेल खेळायला—पण तूं काय करशील—तूं कशी तरी लटपट करून दांडपट्टा न घेतां नुकतंच पाणी दिलेली एक छान तरवार हातांत घे, आणखी खेळाच्या नादांत कर एक वार, आणखी घे आपल्या बापाच्या मरणाबद्दलचा सूड, आणखी काय !

**शूरसेन**—हो, हो. मी असंच करीन. आणखी त्यांत दुसरं असं करीन कीं मी आपल्या तरवारीला विषाचं पाणी देऊन ठेवतों. मला कोणी अवलियानं एका विषवल्लीचा अर्क देऊन ठेवला आहे ; तो इतका घातक आहे म्हणतां कीं, तो उगीच एवढासा सुरीच्या पाताला लाऊन ठेवला, आणखी त्यानं जर एखाद्याच्या अंगावर उगीच आपला ओरखाडा जरी ओढला, अन् रक्ताचा आणखी त्या विषाचा एकदां कां संयोग झाला—म्हणजे तुम्ही हवं तें करा, प्रत्यक्ष द्रोणागिरी जरी आणला अथवा एकंदर औषधी जमा करून त्यांचा जरी लेप केला, तरी कांहीं एक चालणार नाहीं ! त्या विषावर मुळीं उताराच नाहीं. तेव्हां मी आपल्या तरवारीचं टोंक त्या विषाच्या अर्कांत बुडवून काढतों.—म्हणजे त्याला कुठे जरी बोचकरलं तरी त्याचा प्राणच जावा !

**राजा**—या गोष्टीचा आणखी थोडासा विचार केला पाहिजे. आपला हा डाव साधायला योग्य वेळ आणखी योग्य साधनं

सांपडतात कीं नाहीं, हें पाहिलं पाहिजे. कारण, हा चक्रविभु जर बासळला, आणखी आपला हेतु बाहेर पडला, तर मागून आपल्याला पश्चात्ताप होईल, असं काम करून उपयोग नाहीं. तेव्हां असं करावं कीं, आपली पहिली गोळी चुकली तर निदान दुसरी तरी लागावी! म्हणून दोन गोळीचा बार भरून ठेऊं. थांब! पाहूं बरं विचार करून कसं करावं तें. तुमची एकमेकांची पट्टा खेळण्यांत कुशळता किती आहे, हें पहाण्याकरतां आपण पैज लाऊं. —हं, बरं सुचलं—असंच करावं. पट्टा खेळतां खेळतां तुम्ही दोघे ही खूप तापलांत, आणखी तुमच्या तोंडाला शोष पडला—म्हणजे तूं खूप सपाटून खेळायला लाग—म्हणजे तो पाणी मागेल! त्या वेळेस मी एक झारी भरून ठेवतों. त्यानं त्यातला थोडासा घोट घेतला म्हणजे त्यावर खायला एक विडा तयार करून ठेवतों— तो असा कीं आपला पहिला बार जर चुकला तर त्या विड्याची पिंक घशाखालीं उतरते आहे तो निकाल!

## ( राणी येते. )

कां हो काय खबर आहे?

**राणी**—विघ्नं किनई मेलीं, यायला लागलीं म्हणजे एकावर एक उड्या घालतात बाई! शूरसेना! बाळा, तुझी ताई बुडाली रे बुडाली!

**शूरसेन**—बुडाली! म्हणजे! कुठे?

**राणी**—तो आपल्या त्या कळकीच्या बेटाखालीं मोठा डोह आहे कीं नाहीं—त्या आरशासारख्या पाण्यांत कळकीच्या वाळलेल्या—पानांचं प्रतिबिंब पडलेलं असतं—तिथे ती पाण्याच्या कडेला कमळं वेचायला गेली होती. कांहीं थोडींशीं कमळं वेचलीन आणखी आरांटी, जासवंद, कोरांटी आणखी अशी नेहेमीं रानांतली फुलं वेंचून हार करीत होती. तेवढ्यांत एक कळक पाण्यांत वाकला होता, त्याला तिचा कुठे बाई पदर अ-

हकला तो सोडवायला म्हणून गेली, तों तो दुष्ट घातकी कळक मोडून किहो पाण्यांत पडला ! त्या बरोबर हिचा पाय निसटून ती त्या डोहांत पडली. त्या पाण्यांत पडलेल्या कळकाच्या आधारानं कांहीं वेळ एखाद्या जलदेवतेसारखी ती पाण्यावर गोड गाणीं गात गात तरंगत होती.—आपली स्थिति काय झाली हें तिला वेडामुळ कसलं समजतं—इतक्यांत मला वाटतं तिला बाई पाण्यांतल्या आसरांनीं पाण्यांत ओढून नेली! शिव ! शिव !

**शूरसेन**—हाय हाय! माझी ताई खरंच कां बुडाली म्हणतां?

**राणी**—होय रे बाबा, बुडाली बरं, बुडाली !

**शूरसेन**—काय माझ्यावर हे प्रसंग ? डोळ्यांतले अश्रू देखील सुकून गेले ! तथापि ममतेमुळं माझं हृदय अगदीं भरून आलं आहे. महाराज, मी आतां येतों. माझ्याच्यानं एक शब्द देखील बोलवत नाहीं.

( जातो. )

**राजा**—प्रिये मदालसे ! चल आपण जाऊं ! त्याला ताळ्यावर आणायला मला किती कष्ट पडले ? आतां हें आणखी दुसरं एक अरिष्ट उद्‌भवलं ! यामुळं याचा राग आणखी भडकेल कीं काय, अशी मोठी भिती वाटते. चल ये तर, जाऊं.

( जातात. )

# अंक पांचवा.

## प्रवेश १

स्थळ—स्मशान.

दोन खाडा खणणारे लोक खोरे व कुदळी घेऊन येतात.

**पहिला**—काहो राव ! ह्ये कस, जीव दिलेल्या मानसाला पित्रांत कसं घाल्त्याल ?

**दुसरा**—व्हय, पन् हिला घालत्यात्. बामनांनी जमूनशान् सांगितलया.

**पहिला**—अस कस व्हईल् राव ? तिला कुनी बुडिवलया ?

**दुसरा**—व्हयर, तसच म्हनूत्याती.

**पहिला**—छेः राव! त्ये उगीच लटकच म्हनत असत्याल—अस बगा, म्याहून पान्यामंदी येड्यावानी दिली टाकून उडी, अन् बुडालो. अन् मंग, मला कुनी बुडावल ? म्याच न्हव काय ? अन् म्याच मला बुडावल, तवा म्या जीव दिला न्हव ? तसंच त्ये. तिनंबी पान्यामंदी उडी टाकली.

**दुसरा**—अव पन् माज तर ऐकाल का न्हाई राव ?

**पहिला**—दमाव्ह राव. ह्ये बगा, ह्ये हत पानी. वरं, अन् तुमचं द्याव भलं करो, हत योक मनुक्षे. व्हयना ? जर त्ये मनुक्षे ग्यालं अन् शिरलं पान्यांत, अन् बुडालं—आल का ध्येनांत—तर का कुनी दुसऱ्यानं बुडावलं? जर पानी त्येला वडून न्हेऊन बुडावत, तर मंग मातर येगळा इचार व्हता. तर मंग, आपुन् आपल्याला जो मारीत न्हाई त्येन आपुन् आपलं औक्षे कमी वयेल असं कसं यईल राव म्हनता ?

**दुसरा**—अस का शास्तर ह्ये व्हय ?

**पहिला**—व्हय राव, त्ये काय कारटा वाचतो त्ये शास्तर.

**दुसरा**—अव पन् त्येच खर यिगीत न्यारच् हये ! ही जर शिरमंताची आवा नसती तर बाम्नाच पायबी पुंजाया लागतना!

**पहिला**—ह्ये मातर खरं, इच्ये भन शिरमंतांनी पान्यांत जीव देवा, फास घेवा, काईबी करावं, बामन् पोती काडतुया अन् देतुया पित्रांत ढकलून ! गरीबाचं मातर तस न्हाई. चला घा तर त्ये खोर इकड. इच्येभन आपुन म्हादेवाच गन् बनलोया—

**दुसरा**—म्हादेव कोन ? सावकार व्हय ?

**पहिला**—न्हाई व्ह, समद्यांचा मायबाप. पहिल्यांदा कवटी त्येन हातात धरली बगा !

**दुसरा**—अव त्येला हात कुट व्हत ?

**पहिला**—हात् ल्योकाच्या ! थोतांड कुटल, इच्येभन पुरान् बी आयकत न्हाई तुम्ही जनू ! अन् त्ये तुह्मासनी समजत बी नसल् ! परवा देवळांत पुरानिकान न्हाई का मांगितलं कीं म्हादुबा मानसाच्या कवटीमंदी भीक मागत्यात ! मग हात नसन्याल तर म्हादुबांनं कशी कवटी धरता यईल, अन् भीक मागता यईल? आतां येक तुम्हासनी इचारतो जाब द्या, अन् जर न्हाई दिला तर खर राव तुह्मी थोतांडी !

**दुसरा**—अव जा राव, काय इच्यारता ?—

**पहिला**—बरं तर, सगळ्यापून बळकाट कोन धंदनाग ह्ये घरं ? गवंड्यापून, पाथरटापून, सुतारापून अक्शी बळकाट बगा !

**दुसरा**—अव तुरंगावरचा मांग त्यो ? यकटा मानुस झाडाला धांधतो कीं न्हाई, त्ये मातर तुटतातुटत न्हाई बगा !

**पहिला**—भल पटाईत् थोतांडी तर तुमी ! पन् भल मोजाची हा. त्यो मांग मुड्दाराला बांधतुया तसं राव तुह्मी मुड्दार !

तुम्हासनी पोतीबी न्हाई, पुरान्‌बी न्हाई, शास्तरबी न्हाई, तुमासनी त्यो मांग व्हवा बांदाया ! बरं पन् बोला पघु.

**दुसरा**—काय म्हनता, गवंड्यापून, सुतारापून, पाथरटापून, अक्‌शी बळकाट बांधनारा कोन हये ?

**पहिला**—व्हय व्हय.

**दुसरा**—ध्येरूच तर !

**पहिला**—हुं, पडू द्या की परकास् !

**दुसरा**—न्हाईं भा ! ह्मादोबाच्यान् आपनाला न्हाईं ह्माईत·

( दूर हरसेन व वीरसेन येतात. )

**पहिला**—न्हाइच् त्ये समजायच ! इच्यार करा, काईबी करा, नका उगाच डवॉक खाजवू ! अस कुट थ्वतांड्यांना कळतया ? बगा त्येचा जाब—मसनांतला खळगी खनूनारा, त्यो असं घर मानसाला बांदून देतो कीं कंदीच मोडत न्हाई—! अर ए, आपल्याला खन्‌ता खन्‌ता लई सोस पडलाया. आन् की वाइच तांबडं पानी !

( दुसरा जातो व पहिला खणता खणता गातो. )

॥ भर जानीच्या मरामंदी राव काइच सूचन्ना ॥ जी ॥
॥ खान प्येन बस्‌न बोलून त्येबी उमगन्ना ॥ जी ॥
॥ पिर्थी मंदी अस्त्री ईन काई दिस्सना ॥ जी ॥
॥ पत बोलावं पत बसावं असं वाटं मन्ना ॥ जी ॥

**वीरसेन**—याला काळवेळ तरी आहे ? स्मशानांत खांच खणतांना गातो आहे बेटा ? नेहमींचे सवई मुळें मन बधिरावलं आहे !

**हरसेन**—खरें तें. सहवासांत हा कांहीं अनुपमेय गुण आहे ( खांच खणणारा गातो )—

॥ पर् काळानं हळू हळू खिल्ल झुगारून ॥ जी ॥

॥ पोटा पान्याच्या काळजी मंदी खिल्ल लोटून्न ॥ जी ॥

॥ जसं इस्क्राच्या उब्या वाऱ्याला नव्तं कंदी मन्न ॥ जी ॥

( मनुष्याची कवटी वर फेंकतो.)

**वीरसेन**—ह्या कवटी मध्यें पूर्वी जीभ होती नव्हे? आणि ती गातही असेल! आणि तिला हा वडोबा एखाद्या महापातक्याच्या अस्थीसारखा कसा फेंकून देतो आहे? ही एखाद्या महा विष्णूसारख्या मुत्सद्याची देखील असेल! आणि तिची या गाढवाच्या हातून अशी अनास्था व्हावी अं?

**हरसेन**—सरकार, असं ही संभवेल.

**वीरसेन**—किंवा एखाद्या हांजी हांजी करणाऱ्या लुच्च्या गृहस्थाची असेल! किंवा हे कोणी मडे बहादर दुसऱ्या समशेर बाहादरांनां घोड्यावर पाहून त्यांचा तो घोडा उपटण्याकरितां त्याची वृथा स्तुती करणाराचीही असेल! नाहीं बरं?

**हरसेन**—होय सरकार. असंही असेल!

**वीरसेन**—किंवा आपल्या एखाद्या दरबारी बयासाहेबांची असेल! ज्यांच्याकडे कोणाला पहायची देखील पंचाईत, तिच्या कवटीला आतां या गृहस्थाचे खोऱ्याचे आणखी कुदळांचे टोले बसत आहेत. आणखी ही मौज बघायला आम्ही इथे! या हाडकांनीं या वेड्यानं विटीदांडू खेळावा, इतकीच या हाडांची योग्यता असावी अं! अरेरे, काय हें स्थित्यन्तर! हें पाहून मला किळस उत्पन्न होते!

**प० मजूर०**—( गातो )

॥ कुदळ पाटी आनिक् फावडं समदं मिळुन्न ॥ जी ॥

॥ मसूना मंदी पोटा मिळवितों खांची खनून ॥ जी ॥
॥ भिकार धंदा माज्या अवडूला मन्ना लागून ॥ जी ॥

( दुसरी कवटी फेंकतो.)

**वीरसेन**—ही दुसरी पहा, ही एकाद्या न्यायशास्त्री बोवांची कशावरून नसेल? किंवा एखाद्या धर्मशास्त्र्याची असेल! आतां ह्यांचे ते श्लेष, ती घटपटादिक खटपट, तें धर्मशास्त्र व जशी दक्षणा तसा अर्थ करण्याविषयीं तें त्यांचं दाक्षिण्य कुठे गेलं? आतां हे ह्या मजुराला त्या घाणेरड्या खोऱ्यानं आपल्यास कसे स्पर्श करूं देतात! अथवा हे गृहस्थ कोणी जमीनदार असावेत! मग त्यांचे ते पट्टे, चिट्टे आतां कुठे गेले? चिट्टे आतां साडे तीन हात जागा देखील राखूं सकत नाहींत! पण ते चांगले पट्टे मात्र गाळीव माती त्या डोक्यांत भरताहेत! त्यांच्या जमीनी तर जागच्या जागींच!

**हरसेन**—खरंच, त्यांचा कांहीं उपयोग नाहीं!

**वीरसेन**—हरसेना, कागद कशाचे करतात?

**हरसेन**—चिंध्यांचे महाराज.

**वीरसेन**—मग जुळलं! ह्यांच्यावर लिहिलेल्या रेघोट्यांवर जे भरवंसा ठेवतात, त्यांची अक्कल देखील तितकीच चिंध्यासारखी उकिरड्यावर टाकण्याच्या किंमतीची समजायची! असो. ह्या गड्याशीं मी कांहीं बोलतों. अरे, ही खांच कुणाचीरे?

**प० मजूर**—माझी. ('मसना मंदी' वगैरे गातो.)

**वीरसेन**—खरोखर, तूं आंत आहेस त्या अर्थी ती तुझीच.

**प० मजूर०**—म्हाराज, आपून तिच्या भाइर हात म्हुन ती आपली न्हव! माज्याइशी जर म्हनाल तर हा मरद काइ इच्यांत ऱ्हानार न्हाई. बाकी ही खाच आपली.

**वीरसेन**—तूं तिच्यांत आहेस येवढ्याच वरून ती माझी

म्हणणं हां अगदीं लबाडी ! कारण, ही मेलेल्या माणसाकरतां आहे.

**प० मजूर**—तुम्हीच राव जिती लबाडी बोलता! ही पघा माझ्यापून तुमच्याप उडल ! अपुन् म्हनृता तर आज माझी, उंद्या तुमची बी व्हईल !

**वीरसेन**—ही कोणच्या पुरुषाला पुरण्या करितां खणली आहे ?

**प० मजूर**—पुरसा करता न्हव.

**वीरसेन**—तर कोणच्या बायको करितां ?

**प० मजूर**—त्येबी न्हव.

**वीरसेन**—तर मग पुरायच तरी कुणाला यांत ?

**प० मजूर**—असं न्हव म्हाराज, हींत पुरायची ती आवा व्हती. पन् ती आतां म्येली.

**वीरसेन**—काय लबाड आहे बेटा ! मोठा खुबीदार बोलतो गुलाम ! हा धंदा किती दिवस करितोस बाबा ?

**प० मजूर**—हम्मेस! वर्सातल सार दिस्. थोरल म्हारजांनीं ज्या दिशीं फत्ते शिगावर फत क्येली त्या दिशीं क्येला म्हुरत.

**वीरसेन**—त्याला वर्षे किती झालीं ?

**प० मजूर**—इत्तबी न्हाइ तुमाला ठाव म्हन्ता ? अव, गांवातलं याकांद यड बी सांगल ! आमच धाकुट सरकार ईरसेन म्हाराज जल्माला आल, त्योच दिस बगा. त्ये त्ये यड झाल्याती त्ये ! तोन लांब कुट सुराक्ष्या का का झन्त्याती—इच्यभन नांव बी न्हाई येत—तकुड पाटिवल हाये जनू !

**वीरसेन**—हं हं ! का बरं त्याला सौराष्ट्राला पाठिवलं ?

**प० मजूर**–हां, आक्षि त्ये त्येच सुराक्ष्या बर का—अन् का मंजी ? त्येना येद लागलया म्हूनशनी ! तत त्ये बर, श्यान न्हत्याल, आन् न्हाई झाल तरी थत काय मोठीशी पंचाइत ? न्हाइतना तसच येद !

**वीरसेन**–कारे, असं कां ?

**प० मजूर**–अव थत त्येचं याडपन् कशानं समजत—थ समदच गार्डाच्ये येडे !

**वीरसेन**–बरं, पण त्याला वेड कसं लागलं?

**प० मजूर**–लई चमत्कारानं लागलं म्हनत्याती!

**वीरसेन**–चमत्कारानं म्हणजे रे ?

**प० मजूर**—तुमच्याच पायाच्यान्, त्येचं श्यान्पन् गेलं म्हुन् याड लागलं म्हनायचं.

**वीरसेन**–शाबास ! कुठे रे त्यांचं शहाणपण गेलं ?

**मजूर**—अव कुट मंजी, हत हतच या इचित्रपुरीमंदी हा मरद बगा–त्येला मिसरूबी नवत फुटलं, तवापुन् ह्या हित्त भन् ह्येच बगा काम करतुया ! ही कवटी बगा–एक दुसा भन् तीन मजी किती–तित्ती जुनी हाय.

**वीर०**—कोणाचीरे ही ?

**मजूर**—न्हता योक रांडल्योक यडा, त्येची हाय. तुमास्नी कुनाची वाटतीया ?

**वीर०**—आम्हांस नाहीं माहित बोवा.

**प०मजूर**–तो थोरल्या म्हाराजाचा खुस् मसकऱ्या अन्या म्हुनशनी व्हता तो, त्येनं रांडल्योकान योक वखत माज्या डोक्शीनर अधनाचं पानी वतलन किव–त्येची त्येचो ही–त्याच रांडल्योकाची !

**वीर०**—काय अन्याबाची ? बघु बघू. (कवटी घेतो.)

**प० मजूर**—होय सरकार !

**वीर०**—हरहर ! गरीब विच्यारा अन्याया ! हरसेना, हा फारच नकल्या असे बोवा ! ह्यानं मला हजारदां पाठीवर नाचविलं आहे आणि आतां तें स्वरूप इतकं बदलून गेलं आहे कीं, तिकडे पहावत देखील नाहीं ! ज्या ओठांनीं त्यानं माझे लहानपणीं पुष्कळदां मुके घेतले, ते ओठ इथें असतील बरं ! कां राव, आतां त्या तुमच्या चेष्टा कुठे गेल्या, त्या गप्पा, त्या मजेदार नकला आणि सर्व मंडळी एकदम खोखो हंसण्याजोग्या त्या थट्टा ! जा आतां जनानखान्यांत आणि सांगा मासाहेबांस इकडे येण्याच्या तयारीनं जरा जास्ती चटीपटी करण्यास ! असो, हरसेना ! तुला कांहीं विचारायचं आहे.

**हरसेन**—काय महाराज विचारायचं आहे ?

**वीर०**—भीष्मास.रख्याची देखील हीच अवस्था झालीना ?

**हरसेन**—होय, अशीच महाराज.

**वीर०**—आणि अशीच ही घाण येत असेल ? हं: ! ( करवटी खालीं टाकतो. )

**हरसेन**—होय, महाराज!

**वीर०**—काय चमत्कार हा ! आपण असतो कसे आणखी आपली काय ही दशा होते ! आणखी त्याच मातीचा एखादा कूड लिंपायला आणखी एखाद्या मोरीचं भोक बंद करायला उपयोग व्हावाना ! अशाची अशी माती व्हावीना ! तिनं एखादा कूड लिंपावा ? हरहर !

**हरसेन**—महाराज, असं मनांत आणणं ह्मणजे या दीर्घ कल्पनाच काढायच्या ! दुसरं काय ?

**वीर०**—कां बरं, यांत काय विलक्षण आहे ? भीष्म मनुष्य होता, भीष्म मेला. त्याची राख झाली व ती राख मातींत मि-

सळून गेली, आणि मातीचा चिखल करतांच, तीच एखाद्यानं कूड लिंपायला घेतली तर यांत अशक्य काय बरं?

## श्लोक.

(हरिणी) भुवनिं असतां केली ज्यानें समस्त वसुंधरा
निजभुजबलें पादाक्रान्ता, नृवीर असा खरा !
अहह ! वनुनी त्याची माती विचित्र घडे स्थिती,
गरिबगुरिबें तीनें मोठ्या घरांतिल लिंपिती !—

पण थांबा, बाजूला व्हा. ती राजाची स्वारी येत आहे !

**( भट, चंद्राननेचें प्रेत, शूरसेन, राजा व राणी प्रवेश करितात. )**

काय? राजा! आणखी हे मानकरी! या आईसाहेबही आल्या! या कशाला बरं आल्या? कोणाचं प्रेत हें असावं बोवा! पण इतके बरोबर आहेत तेव्हां कोणा मोठ्याचं प्रेत असावं. असो. आपण जरा आड उभेराहून पाहूं या. (एका बाजूला होतात.)

**शूर०**—भटजी, आतां काय करयाचं ?

**वीर०**—अरे, हा शूरसेन! गडी काय जवान नामी दिसतो! पहा !

**शूर०**—भटजी पुढें कसं ?

**भट०**—आतां कांहीं नाहीं. भट्टींत सांगितलेले सर्व प्रयोग झाले. जलांत मृत्यू झाल्यानें फक्त अंत्येष्टीस मात्र बाईसाहेब अधिकारी होतात; परंतु प्रायश्चित दिल्या कारणानं सपिंडीला अधिकारी झाल्या आहेत.

**शूर०**—आतां पुढें कांहीं नाहीं ?

**भट०**—नाहीं महाराज. प्रायश्चित्तं व्हायचीं तीं सर्व झालीं. आतां नित्यक्रिया मात्र राहिल्या आहेत. प्रेत ठेवा यां इथें. ह्या भूमीवर सडा घालून व त्यावर सुवर्णरज टाकून ती पवित्र केली आहे. (प्रेत तेथें ठेवितात) शूरसेनराव, मी मंत्र म्हणतों. आपण या भूमीवर उदक सिंचन करा. (तोंडानें म्हणतो) 'आर्तवीर्यसंभवस्य, चंद्रकलाप्रेतस्य, वैकुंठे उत्तमगतिप्राप्त्यर्थं उदकममह संप्रददे' तोंडानं म्हणा—'ममभगिन्याः चंद्रकलायाः पितृलोके उत्तमसुखावाप्तिरस्तु'.. हं, झालं हें. शूरसेनराव हे पिंड तिच्या तोंडावर, दोन हातांवर व पायांवर ठेवा. मृत्तिकेची एक मुष्टी द्या आणखी टाका या खाड्यांत म्हणजे झाले.

**शूरसेन**—(तसें करितो) हे सद्‍गुणकलिके! माझे ताई! चंद्रकले! बाबा गेले आणखी शेवटी तूंही मला सोडून गेलीसना! तुझ्या सुस्वभावाची, तुझ्या निर्मळ मनाची, तुझ्या या अप्रातिम सौंदर्याची आठवण मात्र आमच्या हृदयांत वज्रलेप करून ठेऊन निघून गेलीस! अहाहा, बहिण असावी तर आमच्या ताई सारखीच! अशी त्रैलोक्यांत दुर्मिळ! (डोळ्यांतून पाणी काढतो.)

**वीरसेन**—अहाहा! अरे, ही माझी प्रिया चंद्राकला!

**राणी**—बया, चाललीसना? बाळे, ही तुला जाईच्या फुलाची जाळी शेवटची घालतें. तूं तरी आम्हांला एक जाईचं फूलच होतीस कीं नाहीं! याच फुलाचा मुंडावळ माझ्या वीरसेनाची राणी तूं व्हावेंस व मी ती तुझ्या डोक्याला बांधावी, असं माझ्या मनांत फार होतं! पण शेवटीं हें माझ्या नशीबीं आलं-ना! (फुलाची जाळी बांधते.)

**शूरसेन**—(आवेशानें) आः! ज्या दुरात्म्याच्या दुष्कृत्यानं माझ्या ताईला वेड लागून तिची शेवटीं ही स्थिति झाली, त्या चांडाळाच्या डोक्यावर दुःखाचा डोंगर कोसळो! खबरदार,

नकारे तिच्या वर माती टाकूं:—एकदां मला तिची शेवटची भेट घेऊंद्या !

( त्याचेंत उडी टाकतो. )

आतां या जित्यावर व मेल्यावर लोटा माती ! आणखी रचा एक मोठा हिमाचला सारखा पर्वत ! पहातां काय ?

**वीरसेन**—( पुढें सरसावून ) अरे, हिच्या करितां आंतड्याला पीळ देऊन आपलं दुःख प्रदर्शित करितो आहे, आणखी ज्यानं आपल्या शोकाच्या आक्रोशानं ह्या तारांगणांतील तारकांनां विस्मयानं कुंठित करून टाकलं आहे, असा हा कोण ? हा मी विचित्रपुरीचा वीरसेन !

( त्याचेंत उडी टाकतो. )

**शूरसेन**—दुरात्मन् ! रवरव नरकांत रे कां नाहीं पडलास? ( त्याची गचांडी धरतो. )

**वीरसेन**—बाबा, अरे अशी कां दुष्ट इच्छा करतोस ! कृपा कर, माझ्या गळ्यावरचा हात काढ. कारण जरी मी शीघ्रकोपी आणखी अविचारी नाहीं, तरी माझं कर्म असलं भयंकर आहे कीं, तूं माझ्या वाटेस न जावंस यांत तुझा शहाणपणा आहे. चल काढ हात !

**राजा**—अरे, सोडवा रे त्यांनां !

**राणी**—वीरसेना, अरे वीरसेना, हें काय ?

**सर्व**—महाराज असं काय ?

**हरसेन**—सरकार, शांत व्हा. ( लोक त्या दोघांस सोडवितात व ते खाचेच्या बाहेर येतात. )

**वीरसेन**—असं का ह्मणून?—मी या विषयाच्या संबंधानं असाच भांडेन! मग प्राण गेला तरी बेहेत्तर!

**राणी**—बाळा, कोणचा रे विषय तो!

**वीरसेन**—चंद्रकलेवर माझं प्रेम तसंच होतं! असं हजार भर्त्यांचं प्रेम जरी एका ठिकाणीं केलं तरी माझ्या प्रेमाच्या पासंगासही तें पुरणार नाहीं! काय रे, तूं काय तिच्याकरतां करणार?

**राजा**—शूरसेना? तो वेडा आहे.

**राणी**-अरे! त्याला कोणी तरी आंवरा—

**वीरसेन**—छे:, कायरे सांग, तूं काय तिच्याकरतां करणार? रडणार? लढणार? उपास करशील? अंगाच्या चिंध्यो करून घेशील? विषप्राशन करशील? अग्निकाष्टं भक्षण करशील? मी तें सारं करीन! तूं इथे कां आरडा ओरडा करायला आलास होय? आणखी जिवंत पुरून घेईन ह्मणून मोठी बढाई मारतोस? लोटा म्हणे मजवर डोंगरचे डोंगर माती! अरे, डोंगर तर काय? पण हा जीव तिच्या कारितां लाखों चाहूर माती अंगावर घेण्याला तयार आहे! मी मातीचे इतके ढीग अंगावर घेईन कीं त्या ढिगांनीं सूर्याचा रस्ताच बंद होईल! तूं आरडा ओरड करशील होय? पण हा गडी त्याच्याही पेक्षां दसपट आरडा करील! समजलास?

**राणी**—खूळ हो! हें सगळं खूळ! आतां हा इतका खवळलेला दिसतोना, पण ही लहर गेली कीं शुद्ध बिल्ली होईल!

**वीरसेन**—गड्या शूरसेना! आज माझ्याशीं तूं इतकं फारसं सौजन्य कां बरं दाखिवलंस? अरे! तुझं माझं पहिल्यापासून फार सख्य; असं असून हा प्रकार घडावा अं! असो, भवितव्यता बलवती!

( जातो. )

**राजा**—हरसेना! कृपाकरून जरा त्याच्या मागं रहा.

( हरसेन जातो. )

( शूरसेनास ) कालच्या आपल्या बोलण्यावर भरंवसा ठेवून स्वस्थ रहा. ही वेळ कशी तरी जाऊं दे. ( राणीकडे पाहून ) आपल्या चिरंजीवावर जरा नजर ठेवा, नाहीं तर ह्या थट्टयांत बाळ आपल्याला जिवंतच पुरून घ्यायचं एखादं ! कांहीं वेळानं सर्व शांत होईल, पण तोंपर्यंत जरा शांतता धरली पाहिजे.

( सर्व जातात. )

---

## प्रवेश २.

### स्थळ—राजवाड्यांतील दिवाणखाना.

### वीरसेन व हरसेन येतात.

**वीरसेन**—ही गोष्ट इतकी झाली. आतां दुसरीला प्रारंभ. पहिला सगळा प्रकार तुझ्या लक्षांत आहेना ?

**हरसेन**—सरकार, लक्षांत आहे तर !

**वीरसेन**—हरसेना, माझ्या हृदयांत अशी कांहीं मनोविकारांची लढाई चालली होती कीं, बिलकुल मला झोंपच लागेना; मला असं वाटायला लागलं कीं, बंडखोरांच्या पायांत बेड्या ठोकल्या असतां त्यांची जशी अवस्था व्हावी, त्याही पेक्षां माझी स्थिति वाईट आहे. आणि नंतर अविचारानं—त्या अविचाराची तरी स्तुती केली पाहिजे, कारण हा अविचार जर प्रसंगविशेषीं आपल्या मोठ्या उपयोगीं पडतो व मोठ्या विचार करकरून केलेले आपले बेत ढांसळतात, तर त्याला अविचार असं कां म्हणावं—ती परमेश्वराची प्रेरणा कशावरून नसेल? कारण, आपण मानवांनीं कांहीं जरी केलं तरी जो आपला कर्ता करविता त्याच्या मनांत असेल तसं तो करतो !

**हरसेन**—होय; हें अगदीं खरं आहे.

**वीरसेन**—जहाजांतल्या खोलींत मी झटकर उठून बसलों व आपला प्रवासाचा झगा काळोखांत अंगावर तसाच घातला, आणखी त्यांना हुडकून काढले. नंतर त्यांचे खिसे चांपसले; आणि त्याच पावलीं मी आपल्या खोलींत परत आलों. भयानं विचाराची पूर्वीच गाळण करून टाकली होती! नंतर त्या लखोट्यावरील मोहोर फोडली आणि आंत पहातों तों काय सांगू! हरसेना! ऐक, आंत राजकीय लुच्चेगिरीची अगदीं कमाल करून सोडली होती! नमस्कार चमत्कार, आह्मी खुशाल, आपण खुशाल, इत्यादि मजकुराखालीं आमच्या प्राणाच्या आहुतीचा हुकुम! आणि तो देखिल फार अवकाशाचा नाहीं! तरवार परजायला देखिल वेळ न लावतां आमची कत्तल करावी म्हणून त्यांत लिहिलं होतं! आणि तो खलिता अमलांत न आणला तर खूप धाक घातला होता!

**हरसेन**—काय? हें घडावं तरी कसं!

**वीरसेन**—हा घे तो कागद, आणि फावल्या वेळीं वाच, म्हणजे समजेल; पण आह्मी पुढें काय केलं तें ऐकतोसना?

**हरसेन**—सरकार, चालूं द्या.

**वीरसेन**—मी गैर सावध असतां लुच्चांनीं हें असं जाळं पसरलेलं पाहून क्षणभर स्तब्ध बसलों. मग निराळ्याच एका पत्राचा मसुदा मनांत आणला, आणि तो मोठ्या युक्तीनं लिहिला. कारकूनलोकांसारखा गोड गोड मजकूर लिहिण्याची कला आह्मी शिकलों ही होतों, आणि ती विसरण्याविषयीं पूर्वी पुष्कळ प्रयत्न देखील केले होते. पण या वेळेला ही चिटणीशी आमच्या फारच उपयोगीं पडली! आमच्या पत्राचा परिणाम काय झाला तो सांगतों ऐक.

**हरसेन**—सांगावा सरकार.

**वीरसेन**—पहिल्या प्रथम गोड शब्दांची अशी चंगळ उडवून दिली होती—त्यांना असं वाटावं कीं विचित्रपूरकरांची व आमची अतिशय दोस्ती असून हीं आमचीं राज्यं दोन म्हणणं देखील लज्जेची गोष्ट आहे! आणि शेवटीं असं लिहिलं कीं हें पत्र घेऊन येणारांचा वेळ न लावतां तत्काळ शिरच्छेद करावा !

**हरसेन**—पण सरकार, त्याच्यावर मोहोर कशी केली ?

**वीरसेन**—अरे, त्यावेळेस देखील नशीबानं मला मदत केली! ती अशी कीं, माझ्या बापाची आंगठी माझ्या पिशवींत होती. तीच हल्लीं आपल्या राज्याचा शिक्का आहे. तेव्हां कागदाची रीतीप्रमाणें घडी घालून त्याच्यावर शिक्का वठिवला आणि तो कागद जिथल्या तिथे परत ठेवला. मग दुसऱ्या दिवशींची समुद्रांतली गडबड तुला माहितच आहे.

**हरसेन**—विठोजी व पिलाजी यांनीं हें काम कसं पतकरलं?

**वीरसेन**—नुसतं पतकरलं नव्हे, पण पूर्ण उत्साहानं पतकरलं! आपल्या मनाला त्यांच्या विषयीं कांहीं खात नाहीं बोवा. कारण, ही त्यांची हानी केवळ त्यांच्याच लुच्चेपणामुळं झाली. गड्यांच्या लढाईत ह्या हामाड्यांचाही नाश होतो, हें त्यांनां कळूं नये काय ?

**हरसेन**—काय विचित्र तरी हा राजा !

**वीरसेन**—अहो, ज्यानं माझ्या बापाला मारला, माझ्या आईला बिघडिवली, माझं सर्व आशेचं घर जें राज्य त्याच्या व माझ्यामध्यें हा डोंगरासारखा आडवा आला, माझ्या प्राणावर देखील यानं फांसा टाकला, अशा त्या राजश्रींचं या हातानं काम काढावं हें श्रेयस्कर नव्हे काय ?

**हरसेन**—परंतु सौराष्ट्रांत काय झालं हें त्यांना लौकर समजेल.

**वीरसेन**—होय, पण तों पर्यंत तर वेळ आपला आहे किंवा नाहीं? अरे, एका माणसाचा जीव घेणं म्हणजे काय अं: ! पण गड्या हरसेना ! शूरसेनाशीं जें मीं वर्तन केलं त्याचं मला आतां फार वाईट वाटतं. आमच्या या कामाला तो मनुष्य फार चांगला आहे. असो. आपण पुन्हा त्याला मिळवून घेऊं. त्याचें तें दुःख पाहून इथें देहभानावर होता कोण?

**हरसेन**—गप्प ! इकडे कोणी येतो आहे वाटतं.

## ( मानाजी फांकडा येतो. )

**फांकडा**—रामराम सरकार, म्हाराजांच्या सवाऱ्या य इचितरपुरींमंदी सकरूप परापत झाल्या अन् लई ग्वाड झालं सवस्तिक्ष्येम हयंना म्हाराजांचं ?

**वीरसेन**—या फांकडे! आपल्याला पाहून आम्हांला संतोष होतो आहे. ( हरसेनाकडे पाहून ) हे फक्कड तुझ्या ओळखीचे आहेत का ?

**हरसेन**—महाराज माझ्या ओळखीचे नाहींत.

**वीरसेन**—तर मग तूं मोठा नशीबवान आहेस! कारण,यांची ओळख असणं हें कांहीं मोठं प्रतिष्ठेचं काम नाहीं. हा मोठा जमीनदार आहे. आणि ती जमीन ही फार सुपीक आहे. पण रानडुक्कर जरी आपल्या कळपाचा मोहोरक्या असला तरी काय उपयोग ? चिखलांतच लोळायचा !

**फांकडे**—सरकारची वानी अक्षि मधुर ! सरकारलां जर अवद असली, तर बढ म्हाराजांनीं मला कथलली आज्ञा या चरणाप इदित करायची हाये.

**वीरसेन**—फार चांगलं. ती आज्ञा मी अत्यंत मनोभावा-नं शिरसावंद्य करीन. आपली ही शालजोडीअशी हातावर फारशी झोंकांत हालते आहे! फांकडे, तेवढी अंगावर घ्या!

**फांकडे**—न्हाई, तसं न्हव सरकार. उस्मा लई हो-तोया. म्हनुनशान् ती अस्कंदावर घेतलीया.

**वीरसेन**—छे, छे, काय थंडी ही! माझ्या अंगावर तर कां-टा आला आहे बुवा. काय गार वारा हा!

**फांकडे**—खरं आहे सरकार. भडत थंडी हाये सरकार!

**वीरसेन**—पण आज मला तर बोवा फार ऊष्मा होतो आहे.

**फांकडे**—अव तर? लईच होतो हाये! ब्वालनं न्हाई अक्षि—उस्मा मंजि जनु वगा बोलूच नका! पर सरकार, थोरल्या म्हाराजांनीं आपल्याला इदित करायला सांगतलं हाये कीं आ-पल्यावर जनु पैज लावलिया. अन् काय म्हनत्यात त्ये—

**वीरसेन**—फांकडे, मेहेरबानी करून तेवढी शालजोडी अं-गावर घ्या असं मी म्हणतोना? ही माझी एवढी विनंति मान्य कराच!

( वीरसेन त्याच्या कडून शालजोडी अंगावर घेववितो. )

**फांकडे**—छे, तसं न्हव सरकार. या चरनाच्यान् माज्या जिवाला या शालीच्या वाऱ्यानं वायसं सुक व्हतं. त्ये शूरसेनराव म्हुन् नुकत्येच दरबारामंदी आल्यात् सरकार. या चरनाच्यान् गिरस्त मंजी काय अक्षि गिरस्त हाये! त्याच गून वर्नन कराया सरस्तीच परतक्ष आली पाहिजे! काय सभ्ये, काय त्येची ऐट, खरं खरंच सरकार—पगा मंजी गिरस्तांत गिरस्त हाये, अक्षि रतन हाये—गिरस्तांत म्हून जे जे गून असावत् त्येचा जनु सामिंदरच हाये. जिकुडल्या तिकडं कसं ठाकठीक!

**वीरसेन**—वाः, फाकडे वाः, तुह्मी त्याच्या गुणांचं जें वर्णन केलंत तें अगदीं भरपूर केलंत. त्यांत कांहीं कमी नाहीं. तथापि त्याच्या गुणसमुदायाचं पृथक्करण किंवा वर्गीकरण करूं गेलं तर स्मृतीचं गणितशास्त्र अगदीं गोंधळून जाईल! इतकंही असून त्याच्या गुणसमुद्राचं सर्वथा मंथन होणंच नाहीं. परंतु त्याची यथार्थ वर्णना करूं म्हटलं तर, तो महापदार्थाचा अर्क आहे, असंच समजलं पाहिजे! आणि त्याचं माहार्घ्य आणि वैरल्य याचं प्राचुर्य वस्तुदृष्ट्या योग्य रीतीनं प्रदर्शित करणं ह्मणजे, त्याची प्रतिकृति त्याचा दर्पणच आणि दुसरं काय! आणि त्याच्या सारखा दुसरा, ह्मणजे त्याची नक्कल करणारी त्याची छायाच, आणखी काय बोलाव!

**फांकडे**—म्हाराजांनीं त्यांची परतिमा अक्षि बिनचुक उटवलीया!

**वीरसेन**—अहो पण फांकडे, हा जो इतकावेळ वाग्विलास झाला तदंत काय? त्या गृहस्थाला आपण आपल्या चर्पटपंजरींत कां घालावा?

**फांकडे**—सरकार!

**हरसेन**— कायहो फांकडे! आपल्या डौलदार भाषेनं दुसरा कांहीं आपल्याशीं बोलला तर तें आपणांस कसं बरं कळत नाहीं? मला वाटतं आपल्याला खास तें कळावं.

**वीरसेन**—त्या गृहस्थाचं नामाभिधान काय?

**फांकडे**—महाराज कोणाचं? शूरसेनाचं?

**हरसेन**—या स्वारीचं भांडवल संपलं! फाकड्यांचं निघालं दिवाळं! फांकडे लागले साध्या भाषेनं बोलायला!

**वीरसेन**—होय होय, त्याचंच नांव मी विचारलं.

**फांकडे**—मला ठावं हाय् आपुन त्याला दळकतां.

**वीरसेन**—पण सांगाना कां त्याचं नांव? आणखी सांगितलंत तरी ते आपल्या गीर्वाण भाषेनं आपण सांगणार! मला तें समजायचीच पंचाईत!—हं, बोला तर मग.

**फांकडे**—शूरसेनराव मंजी कसला नामी गिरस्त-आपल्याला ठावा असलाच पायजेन्—

**वीरसेन**—त्याला मी ओळखतों असं कधीं कबूल करणार नाहीं. कारण, नामीपणांत त्याची माझी बरोबरी व्हायची एखादी! लोकांत ती एक म्हण आहेना—कीं आपल्यावरून जग ओळखावं—तसंच मीं म्हणतों, दुसऱ्याला जो पक्का ओळखतो तो आपल्या स्वतांलाही पक्कं ओळखतो असं समजावं

**फांकडे**—म्हाराज, मी म्हतलं त्येचं समूतर आपल्याला ठावं असल्. लोक म्हनत्यात की तो या पटा खेळण्याच्या कामांत अक्षि बिनतोड हाये!

**वीरसेन**—त्याचं शस्त्र कोणतं आहे?

**फांकडे**—तरवार आणखी कट्यार.

**वीरसेन**—हीं तर त्याच्या अनेक शस्त्रांपैकीं दोन झालीं. बरं असो, पुढें?

**फांकडे**— थोरल्या म्हाराजांनीं आपली दोगांची जनु झूज व्हायची म्हुन् जनु पैजा लावल्यात्. शूरसेन रावानं जितलं तर सरकारचं म्हननं कीं मी त्येला सहा आरबी घोडं देनार—आनकी शूरसेनराव हरल तर शूरसेनरावांनीं सरकाराला इलासपुरीच्या सहा तरवारी आन् बरच्या, म्याना पडदळांसुद्धां द्याव्या. काय सांगावं म्हाराज! असं म्हनत्यात् कीं त्या तरवारींची तीन व्हान अक्षि फक्कड केल्याती. याच चरनाच्यांवर त्येंच्या मुठीला म्हनं लईच सोबत्यात! आन् त्या व्हानांची नकशीची काय—अक्षि पसंत! लई लईच नामी काम क्येल्या

**वीरसेन**—यंव्! पण अहो फांकडे, तुम्ही व्हानं कशाला ह्मणतां?

**हरसेन**—महाराज आपल्याला त्याच्या ह्मणण्याचा अर्थ पुरा कळायला खालीं भगवत्‌गीतेप्रमाणें टीका दिली पाहिजे'

**फांकडे**—महाराज, व्हान् मंजी तरवारीचं पडदाळ. जर वार गळ्यामंदी अडकवाया चामड्याचं किंवा रेशमाचं पडदाळ असतं त्ये!

**वीरसेन**—वा: राव! तुम्ही दुसरे एक पाणिनीच होऊं पहातां! मी समजलों, वाहन ह्मणजे दारू गोळा नेण्याच्या मोठमोठ्या गाड्या असतील! बरं असो, तुमची भाषा अगोदर शिकून मग तुमच्याशीं बोललं पाहिज तेव्हां तुमच्या ह्मणण्याचा अर्थ कळणार! बरं मग—सहा आरबी घोडे एकाचे, आणखी दुसरी कडून—सहा विलासपुरींत बनिवलेल्या सुंदर मुठीच्या नक्षीदार नामी तरवारी—असंचना? याचना विचित्रपुरी आणखी विलास नगरी यांच्या परस्पर देणग्या?—पुढें?

**फांकडे**—थोरल्या म्हारजांचं आन्‌की ह्मनन पंडतया कीं तुम्हा दोगामंदी बारा खट्‌क उडावत. अन् शूरसेनराव ह्मनन्यात कीं आपून त्येनं नऊ खट्‌क घाल—इकत्यात त्ये आपल्यासर्नी बारा येनार. असं काई हाय खरं. म्हाराज, आपुन 'व्हइ' म्हनायचा अवकास कीं आपली दोगांची परकुशा ठरलीच-म्हना!

**वीरसेन**—आणखी मी नाहीं म्हटलं तर?

**फांकडे**—न्हाई काय म्हनाव त्येतं? आपुन लढाया उठ् न्हावंच अन् काय सरकार! आपुन् काय मरद कमी हा!

**वीरसेन**—बरं आहे तर मग फांकडे! मी हा इथेच दिवाणखान्यांत आहें.—ही वेळ माझी नेहेमींची कसरत कर-

ण्याचीच आहे. पट्टे, तरवारी, काय असतील त्या आणून ठेविल्या व हे गृहस्थ तयार झाले, आणि तुमच्या वडया महाराजांची ही प्रस्तुत इच्छा असलीच कायम, तर पाहिन बरं त्या गृहस्थाला जिंकण्याचा यत्न करून नाहीं जिंकलं, तरी आपल्याला या झटापटींत वार लागतील ते, आणखी आपली लाज, ही तर नाहींना कुठे गेली? तेवढीच फलप्राप्ति म्हटली !

**फाकडे**—महाराज, आपल हेच सब्द थोरल्या सरकारसूनी कळवूं तर जाऊन?

**वीरसेन**—हो. मी सांगितला मजकूर हा जाऊन कळवा—तुम्हांला वाटेल तशा झोंकांत सांगा !

**फाकडे**—येतों तर मग—म्हाराजासूनी मुजरा करतों !

**वीरसेन**—या या बरं फांकडे !

(फांकडे जातात.)

**हरसेन**—सरकार! हा मानाजी फांकडे जातो आहे पहा कसा ऐटींनं ! तीं पाण्यावर चित्र विचित्र पंखांचीं पाखरं इकडून तिकडे तिकडून इकडे अशा डौलांत घिरट्या घालीत असतात तीं—त्यांतलीच ही एक असामी म्हटली तरी चालेल !

**वीरसेन**—अगदीं बरोबर बोललास ! हरसेना, आईच्या पोटांतून बाहेर पडण्या पूर्वीच आईच्या स्तनाचा परीघ आपल्या तोंडापुरता आहे कीं नाहीं म्हणून मोजून पहायला लागणारा गृहस्थ हा ! हे असले फक्कड चंगी भंगी लोक आलीकडे फारच झाले आहेत. गुलामांनां अक्कल नसते 'दमडीची—बोलतात बरीक फाजील—त्या बोलण्याला ताळ ना मेळ. बेऱ्यांना सरळ जबाब तर देतांच येत नाहीं. पण अरे अशांचीच या हलकट मूर्ख लोकांत फार प्रतिष्ठा ! ते एखादे वेळेस पाहुणांना मोठ मोठे बुड बुडे येतात कीं नाहीं—त्यांची अवस्था आणखी यांची अवस्था सारखीच—फू केल्या बरोबर फट्याँ होतं !

( एक **सरदार** येतो. )

**सरदार**—महाराजांनीं आपल्या सुचनेप्रमाणं शूरसेनाशीं दांडपट्टा खेळण्या करितां बारद्वारींत आपण केव्हां येणार ह्मणून विचारलं आहे.

**वीरसेन**—होय, मी केव्हांची वाट पहात आहें ! महाराजांच्या सूचनेचा मात्र अवकाश. जर त्यांची तयारी असेल तर मीही सिद्ध आहेंच. पण त्यावेळेस माझी स्थिती आतां आहे अशीच असली पाहिजे.

**सरदार**—महाराज व आईसाहेब निघाल्या देखील असतील.

**वीरसेन**—बरं तर.

**सरदार**—आईसाहेबांनीं हा दांडपट्टा खेळण्याला आरंभ करण्यापूर्वीं शूरसेनाशीं सलगी करावी म्हणून सांगितलं आहे.

**वीरसेन**—फार चांगलं. जा तर तुम्ही.

( **सरदार** जातो. )

**हरसेन**—सरकार, आपण ह्या पैजेंत हरणार.

**वीरसेन**—छेः मला नाहीं असं वाटत. तो शूरसेन विलासपुरीस गेल्यावर मागं माझी कसरत रोज चालली होती. तेव्हां आपण खचित जिंकणार ! पण तुला माहित आहे काय (छातीवर हात ठेऊन ) इथें काय एकच गडबड चालली आहे ती ?

**हरसेन**—सरकार, नका ह्या नादीं लागूं.

**वीरसेन**—अंः, त्यांत काय आहे, अशा गोष्टींचं भय बाळगावं बायकांनीं!

**हरसेन**—सरकार, आपल्याला जर हें आवडत नसेल तर, मी तिथे जाण्याच्या पूर्वीं जाऊन आपली प्रकृति बरी नाहीं ह्मणून सांगतो.

**वीरसेन**—नको, नको. काडी जरी हालली तरी त्यांत कांहीं तरी हेतू असतो, ह्यामुळं हें ही ईशसत्तेनंच व्हायचं आहे. जर आतां ही गोष्ट जमून आली नाहीं, तर मग कधींच जमून येणं नाहीं. जर मनुष्यास आपण सोडून दिलेल्या गोष्टींचं महत्व ती गोष्ट सोडतांनां कळत नाहीं व मागून त्या गोष्टीचा पश्चाताप होतो, तर आधींच आलेली संधी त्यानं दवडूं नये हें बरं.

---

## प्रवेश २.

### स्थळ किल्ल्यांतील बारद्वारी.

**( राजा, राणी, शूरसेन,** कांहीं मुत्सद्दी, **मानाजी फांकडे** व सेवक पट्टे घेऊन येतात. )

**राजा**—वीरसेना? ह्या शूरसेनाला भेट. ( ते भेटतात ).

**वीरसेन**—शूरसेना, मी जें कांहीं तुला राग येण्यासारखं बोललों असेन त्याची मला क्षमा कर. कारण, या केलेल्या कृत्याबद्दल परमेश्वरानं मला कशी कडक शिक्षा केली आहे, हें येथील सर्व मंडळीला माहित आहे. आज तुझं हें सौजन्य, तुझा सुस्वभाव व तुझी अब्रू यांस जर कांहीं धक्का पोहोंचला असेल, तर माझ्या वेडाकडे दृष्टि देऊन माझे सर्व अपराध क्षमा कर. ह्या वीरसेनानं शूरसेनाचा अपराध केला आहे, असं कां तूं समजतोस ? छेः तसं नव्हे. पहा, वीरसेनाची सदसद्विचारशक्ति ह्या देहातून काढून घेतली व मग त्या शक्तिविहीन झालेल्या देहानं जर तुझा अपराध केला, तर तो कां ह्या वीरसेनानं केला ? नाहीं, तर त्याचा शत्रू जें त्याचं वेड त्यानं केला हेंच खाचित ! तेव्हां हरणाला मारलेला तीर श्रावणाला लागला, त्याबद्दल जशी त्यानं दशरथाला क्षमा केली, त्याप्रमाणं या मंडळीसमक्ष तुझं उदार मन म[illegible] क्षमा करो !

**शूरसेन**—सृष्टिस्वभाव ह्मटला तर या कामांत मी सूड घ्यावा, हेंच मला योग्य दिसतं. खरं ह्मणाल तर मला अब्रू ही मुख्य गोष्ट आहे. तेव्हां या कामांत दोन प्रतिष्ठित माणसं मध्यस्त पडून त्यांनीं मला जर सांगितलं कीं 'बाबा ! तुझ्या अब्रूला बिलकुल धक्का नाहीं व तूं आपलं नांव राखलंस !' तर मी संधी करण्यास तयार आहें. असं होई पर्यंत मी तोडजोड करण्यास मुळींच इच्छित नाहीं. आतां आपला स्नेहसंबंध म्हणाल, तर तो आपल्या दोघांत जशाचा तसा कायम ठेवण्याविषयीं मी सिद्धच आहें.

**वीरसेन**—ठीक आहे. तुझं ह्मणणं मला कबूल आहे चला आतां, आपण खेळूं या. आणारे आणा, तो माझा दांडपट्टा कुठे आहे तो आणा.

**शूरसेन**- आणा, मलाही एक द्या.

**वीरसेन**—मी बहुतकरून तुझ्या पुढें टिकणार नाहींच. तुझं तें खेळण्याचं चातुर्य काळोख्या रात्रीं जसा तारा चमकतों तसं चोंहोंकडे चमकतं आहे.

**शूरसेन**—कां माझा उगीच उपहास करता ?

**वीरसेन**—छे, छे. मी यथार्थ बोलतों आहे.

**राजा**—मानाजी, द्याहो त्यांनां दांडपट्टे. वीरसेना, पैज काय आहे ती माहित आहेना ?

**वीरसेन**—होय महाराज. आपण दुर्बळपक्षाला अधीक अनुकूलता दाखवून पैज ठरविली आहे, हें मला माहित आहें.

**राजा**—मला तसं वाटत नाहीं. कारण, मी तुम्हां दोघांनाही खेळतांनां पाहिलं आहे. तथापि शूरसेनाची कसरत आलीकडे जास्त झाली आहे, असं पाहून मी दुर्बळ पक्षाला अधीक अवधी दिली आहे.

**शूरसेन**–( एक पट्टा घेऊन ) हा फार जड आहे. मला दुसरा द्या.

**वीरसेन**—मला हा आवडतो. सगळे सारख्याच लांबीचे आहेतना? ( ते खेळण्याची तयारी करितात. )

**फांकडे**–व्हय सरकार.

**राजा**—आणारे दारूचे प्याले, चौरंगावर ठेवा. जर बाळा वीरसेनानं पहिल्या दुसऱ्या पवित्र्यांत मारा केला, किंवा तिसरा मारा जर आपल्या पट्ट्यावर घेतला तर आपल्या किल्ल्यावरच्या सगळ्या तोफांचे आवाज एकदम करावे! मी आमच्या बाळाला आशिर्वाद देऊन हा प्याला झोंकणार, म्हणजे त्या कादंबरीच्या साहाय्यानं या आमच्या विचित्रयुगीमध्यें आज पर्यंत कुणी केला नाहीं, असा आम्ही आनंदीं आनंद करून टाकणार! चला, आणा तो पेला, माझ्या हातांत द्या, आणि पहिल्यानदां आमच्या बाळानं वार केल्याबरोबर हलकाऱ्या वाजवा! हलकाऱ्याच्या आवाजाबरोबर शिंगाड्यानं आपलं शिंग फुंकावं! आणि त्याचा आवाज ऐकल्याबरोबर बाहेरच्या कोटावरील गोलंदाजानं एकदम सरबत्ती करावी, ती अशी कीं त्याच्या दणक्यासरसे आकाश व पाताळ दणाणून जातील! चला–प्रारंभ करा. पंचमंडळींनो, तुम्ही फार बारीक नजरेनं पहा. हा मी पेला तोंडाला लावला.

**वीरसेन**–हुं, चालू द्या.

**शूरसेन**—हं, सुरू करावं सरकार. (ते खेळतात. )

**वीरसेन**—हा घे एक. लागला बघ.

**शूरसेन**–छेः, नाहीं लागला.

**वीरसेन**—( पंचांना ) काय बोवा लागला कीं नाहीं?

**फांकडे**—लागला तर खरा, अगदीं साफ लागला!

**शूरसेन**—बरं चला, पुन्हा होऊं द्या!

**राजा**—आणारे ती इकडे पाण्याची झारी. वीरसेना, हें मोतीं मी तुझ्या नावानं झारींत टाकतों. थारे त्याला ऐक विडा द्या कोणी, म्हणजे जरा दम येईल.

( हलकाऱ्या शिंगं व नौबदी वाजतात. )

**वीरसेन**—थांबा. माझं खेळणं पुरें झालं म्हणजे मी खाईन, त्याच्या पूर्वी मी कांहीं करीत नाहीं. हं चल. हा दुसरा ! मारला बघ ! काय म्हणतोस याला आतां ?

**शूरसेन**—अंमळ ओरखडलं आहे खरं ! मी कबूल करितों.

**राजा**—आमचा वीरसेन ही पैज खचित जिंकणार !

**राणी**—तो पहा कसा धांपा टाकायला लागला आहे तो ! आणि अगदीं कसा दमल्यासारखा दिसता आहे. हा घे माझा शेला, घे तो. डोक्यावरचा घाम पूस. ( जवळच्या झारींतलें थोडेंसें पाणी पिऊन डब्यांतला विडा खाऊं लागते. )

**राजा**—( घाबरून ) अग ! नको, नको तें पाणी पिऊं—तो विडा खाऊं नको !

**राणी**—त्यांत काय झालं न खायला ? ( विडा खाते. )

**राजा**—( एकीकडे ) अरेरे. त्यांत विष घातलं आहे. पण आतां काय उपयोग ? होऊन चुकलं !

**वीरसेन**—मी आतांच घाम पुसून काय उपयोग ? जरा अंमळशानं पुशीन.

**राणी**—नाहींरे बाळा. वीरसेना, ये. तुझ्या तोंडावरचा घाम मला माझ्या पदरानं पुसूं दे.

**शूरसेन**—( राजास ) या खेपेला याला आतां वार करतों, सरकार.

**राजा**—छे:, होणं नाहीं !

**शूरसेन**—( एकीकडे ) अरेरे, शेवटीं हें कपट करणं मा-

**वीरसेन**—चला शूरसेनराव. आतां तिसऱ्यांदा खेळा ! मला वाटतं तुम्ही कांहीं मनापासून खेळत नाहीं ! जरा उमेदींत या ! उगीच आपलं मला खेळवावं म्हणून खेळतां !

**शूरसेन**—असं अं ! बरं चला. घ्या तर मग—

( ते खेळतात. )

**फांकडे**—अद्याप कोनीबी कोनावर पगडा बशिवला न्हाई.

**शूरसेन**—हें घ्या तर.

( शूरसेन वीरसेनास वार करितो नंतर खेळतां खेळतां ते आपल्या तरवारी बदलतात व वीरसेन शूरसेनास वार करतो. )

**राजा**—अरे, त्यांनां सोडवा सोडवा! ते अगदीं हातघाईला आले !

**वीरसेन**—छेः, चल पुनः खेळ.

( राणी खाली पडते )

**फांकडे**—अरेरे! त्या राणीसाहेब पडल्या. तिकडे पहा!

**हरसेन**—हाय हाय ! दोघानंही वार लागून दोघेहीं रक्तबंबाळ झाले आहेत!—महाराज, आपली काय ही अवस्था झाली आहे !

**फांकडे**—शूरसेनराव ! काय आपली ही स्थिति !

**शूरसेन**—फांकडे ! अहो स्थिति म्हणून काय विचारतां ? मी पसरून ठेवलेल्या जाळ्यांत मीच सांपडलों—माझी युक्ति मलाच मारक झाली, हें योग्यच झालं !

**वीरसेन**—राणी साहेबांचं कसं काय आहे !

**राजा**—हाय, हाय! हा रक्तस्राव पाहून तिला मूर्छा आली.

**राणी**—नाहीं हो नाहीं ! तें झारींतलं पाणी ! तो मला

विडा! तो विडारे बाळा, बाळा शूरसेना—मेला विडारे! तो विड अन् तें पाणी—त्यांत विष होतं तें माझ्या अंगांत भिनलं रे भिनलं!

( मरते )

**वीरसेन**—दगारे दगा. दरवाजे बंद करा! कुलपं लावा पकडा त्या हरामखोराला! कोण आहे रे तिकडे?

**शूरसेन**—वीरसेना! अरे हा बघ तो हरामखोर! ( शूरसेन पडतो) हा बघ! वीरसेना, तूं एक घटकेचा देखील सोबती नाहींस! तुला ज्या तरवारीचा वार लागला आहे, त्या तरवारीला विषाचं पाणी दिलं होतं. तें विष इतकं जालीम आहे कीं, तुला कोणत्याही औषधानं गुण यायचा नाहीं. ही जी तरवार तुझ्या हातांत आहे, तिलाच विष लावलं आहे. ह्या दुष्ट कृत्याचा परिणाम मजवरही तितकाच झाला. हा पहा मी मरतों. वीरसेना, तुझ्या आईला देखील विषप्रयोगच झाला आहे. आतां माझ्याच्यानं जास्ती बोलवत नाहीं. ह्या सर्वांचा दोष या रमाकान्ताच्या शिरावर आहे!

**वीरसेन**—काय? या तरवारीच्या टोंकाला विष लावलं आहे? तर विषराज, करा आपलं काम!

( तवारीचं टोंक राजाच्या उरांत भोंसकतो. )

**सर्व**—घात रे! घात! हाय, हाय. घात झाला!

**राजा**—मित्रांनों, अजून मला वांचवा, माझं रक्षण करा! मला नुसती जखम लागली आहे—

**वीरसेन**—अरे मांगा, हरामखोरा, बेरडा, मानकाप्या रामोशा? मर गुलामा आतां! पी हा घोंट तूं माझ्या करतां तयार करून ठेवला होतास तो! अरे चोरा, मोतीं अ! जा माझ्या आईच्या सोबतीला! [ राजा मरतो. ]

**शूरसेन**—याला योग्य शिक्षा झाली. त्यानं स्वतांच तें विषाचं मिश्रण तयार करून ठेवलं होतं! उदार वीरसेना! माझ्या

सर्व अपराधांची क्षमा कर. ' मी तुझ्या सर्व अपराधांची क्षमा केली' असं एकदां म्हण, म्हणजे मी सुखानं मरन. माझ्या व माझ्या बापाच्या मरणाबद्दल तुझा कांहीं एक दोष नाहीं. त्याचप्रमाणं तुझ्या मरणाचा दोष ही मजवर नाहीं. राम—राम—

[ मरतो. ]

**वीरसेन**—शिव ! शिव ! बाबा शूरसेना ! ईश्वर तुझ्या सर्व पातकांची क्षमा करो ! हा बघ मी तुझ्या मागून आलोंच. हरसेना ! मी आतां मरणार ! पापिणी आई ! मी येतों आतां. लोभ ठेव !—ह लोकहो—गड्यांनों, तुमचीं तोंडं निस्तेज झालीं आहेत. आणि हा दुर्धर प्रसंग पाहून भयानं आणखी आश्चर्यानं तुह्मी कुंठित होऊन चित्रा सारखे तटस्थ उभे राहिला आहां ! मला जर अवकाश असता —अरेरे, हा दुष्ट निर्दय कोतवाल—मृत्यु—मला क्षणभर ही अवकाश देत नाहीं, आपल्या पाशानं माझे हा पंचप्राण ओढीत आहे—गड्यांनों! मला जर अवकाश असता तर मी तुह्मांला सर्व वृत्तांत सांगितला असता—पण असो. हरसेना ! हरसेना ! अरे तुझा मित्र चालला बरं—लोभ असूं दे! या गरीब वीरसेनाला विसरूं नको बरं ! मी तर मेलोंच—पण गड्या तूं मागं रहा, आणखी माझी सारी हकीगत या असंतुष्ट प्रजेला कळीव.

**हरसेन**—महाराज, असं कधीं घडायचं नाहीं ! असली गोष्ट मनांत देखील आणूं नका. आपल्या मागं मी जगून काय करूं ? त्या झारींत अजून विष राहिलं असेल तेवढं मला बस्स आहे.

**वीरसेन**—छे, छे! हरसेना, असं करूं नको! माझ्यावर तुझं जर खरं प्रेम असेल, तर माझ्या गळ्याची शपत आहे तुला—तूं असं करूं नको ! दे ती झारी मला. मीच तें विष घेतों. हरसेना ! लोकांनं जर हा सारा प्रकार समजला नाहीं, तर माझी केवढी दुष्कीर्ति—माझ्या नांवाला केवढा —

राहील ? तर एवढं कर—माझी ही शेवटची गोष्ट ऐकच. ही माझ्या कर्माची गोष्ट साऱ्या लोकांनां कळविण्याकरितां दोन दिवस स्वर्गसुखास अंतर—पण या दुःखमय जगांत चार दिवस कष्टानं कसे तरी काढ.—

[ दूर तोफांची सरबत्ती होते. ]

अरे, पण हा लढाईच्या सारखा ध्वनि कुठून ऐकूं आला बरं ?

**फांकडे**—नवखंडाहून राणा भीमसिंग विजयी होऊन सौराष्ट्राहून येत असलेल्या वकिलांस सलामी देत आहे. त्याचा हा ध्वनि आहे सरकार !

**वीरसेन**—हरसेना ! मी मरतों रे मरतों ! हें तीव्र विष माझ्या रोमरंध्रीं भिनून माझे सर्व प्राण व्याकुळ करित आहे! सौराष्ट्राहून हे वकील काय खबर आणतील ती या कानांनीं ऐकणं तर माझ्या नशिबीं नाहींच. परंतु मी असं भविष्य करतों कीं या गादीचं स्वामित्व त्यांनीं भीमसिंगासच दिलं आहे. माझीही शेवटची इच्छा तीच आहे. तेव्हां हरसेना! जो जो प्रकार आमच्या येथे हा घडला तो इत्थंभूत त्याला कळीव—अधिक काय सांगू ? देवानं मला निजधामाप्रत नेऊन पूर्ण शान्तिसुख द्यावं—भगवन्—

[ मरतो. ]

**हरसेन**—हाय ! हाय ! केवढा गुणराशी हा माझ्या समोर कोसळतो आहे ! केवढ्या महात्म्याचा आज हा लय झाला ! या विचित्रपुरीचा प्रतापसूर्य आज अस्ताला गेला ! हे उदार राजपुत्रा ! तुजप्रत माझा प्रणाम असो. तुझ्या आत्म्याला त्या सुखधामीं स्वास्थ्य मिळो ! अरे ! पण ही नौबत कसली वाजते आहे ?

[ आंत नौबत वाजते. ]

[ **राणा भीमसिंग**, सौराष्ट्रांतले **वकील** व इतर लोक येतात. ]

**भीमसिंग**—काय हो, कुठे आहेत ती मंडळी ?

**हरसेन**—महाराज, आपणांस काय पहाण्याची इच्छा आहे—हा पहा शोकसमुद्र येथें प्रचण्ड गर्जना करीत आहे—. आपल्यापुढेंच हें सर्व आहे. अधिक शोध करण्याची गरज नाहीं!

**भीमसिंग**—हाय ! हाय ! काय भयंकर देखावा हा ! हे गर्वानं ताठून जाणाऱ्या दुष्टा मृत्यो! तूं आपल्या त्या अनंत दाढेंत इतके राजपुरुष एकदम चट्ट केलेस अं ?

**पहिला वकील**—हा फार भयंकर प्रकार झाला. आपणांस सौराष्ट्राहून येथें येऊन पोंचण्यास फार उशिर झाला. 'आम्ही आपली आज्ञा शिरसा वंद्य करून आपल्या इच्छेप्रमाणं सर्व तजवीज केली व विठोजी आणि संभाजी हे मरण पावले' हें वृत्त ज्या कानांनीं ऐकायचं ते कान तर निर्जीव होऊन गेले! आतां आम्ही हें कुणाला सांगावं ? आणखी कुणाच्या मुखांतून 'शाबास' असं म्हणवून घ्यावं !

**हरसेन**—ज्याचा हुकूम तुम्ही बजावला म्हणतां, तो जरी जिवंत असता, तरी त्याच्या मुखांतून या कृत्याबद्दल 'शाबास' अशीं अक्षरं निघालीं नसती. कारण, त्यानं आपण होऊन खुषीनं असा हुकूम केला नव्हता. परंतु हे थोर पुरुषांनों—तुम्ही ज्या अर्थी कोणी नवखंडाहून व कोणी सौराष्ट्राहून या भयंकर प्रसंगींच येथें येऊन ठेपला आहां—त्या अर्थी या सर्व मृतांचे हे देह लोकांनां दिसतील अशा एखाद्या उंचस्थळीं ठेवण्याची तजवीज करा. म्हणजे मी आपल्या उदार प्रियमित्राची शेवटची इच्छा पूर्ण करतों व या अज्ञानांत असणाऱ्या लोकांस झालेलें सर्व वृत्त कळवितों. म्हणजे, हीं चमत्कारिक सृष्टिविरुध्ध कृत्यं कशीं घडलीं, हा रक्तपात कसा झाला, परस्पर गैरसमजुतींनीं व अपघातानं एकमेकांचे प्राण यांनीं कसे हरण केले, मूळचा हेतु एक असून भलतंच कसं घडलं, ज्याचं त्याच्याच गळ्यांत कसं आलं, ज्यांची दिवा त्यालाच कशी फळली; वगैरे सर्व इत्थंभूत प्रकार तुमच्या ध्यानांत येतील.

**भीमसिंग**—तर आम्हांला हा सर्व प्रकार सत्वर कळला पाहिजे. राज्यांतले मोठमोठे मानकरी बोलवा. मजविषयीं म्हणाल तर मी या चालून आलेल्या वैभवाचा मोठ्या दुःखानं स्वीकार करितों. या गादीवर माझा दूरचा हक्कसंबंध थोडा तरी आहेच आहे, असं मला पक्कं आठवतं.

**हरसेन**—याविषयींही मला बोलायचं आहे, तें मी मागून बोलेन. प्रत्यक्ष वीरसेन महाराजांची काय इच्छा होती, तीही मी मागून सविस्तर कळवीन. पण आधीं ही पहिली गोष्ट करून टाका. लोकांचीं मनं फार खवळून गेलीं आहेत, याकरितां मी तुम्हांला वर सांगितलेलं काम अगोदर करून टाकलं नाहीं, तर बंड वगैरे अणीक धामधूम होण्याचा संभव आहे.

**भीमसिंग**—( जवळच्या सरदारांकडे पाहून ) अरे! आधीं तुम्ही दोघे चोघे जाऊन या शूर राजपुत्राचं प्रेत त्या उंच जागेवर नेऊन ठेवा. अरेरे ! देवानं जर त्याचं आयुष्य कमी केलं नसतं, तर तो फार चांगला राजा झाला असता. आणि त्याला नेतांना त्याच्या नांवाचा जयजयकार करून दुंदुभी वाजवा— दुसरींहीं प्रेतं उचला—अरेरे, हाच देखावा रणांगणांत फारच चांगला दिसला असता—पण येथें तो किती विलक्षण दिसतो आहे ! जारे ! तोफांची सरबत्ती करायला सांगा !

( प्रेतांस नेतांना तोफांची सरबत्ती होते. )

( सर्व जातात. )

---

समाप्त.

# प्रस्तुत नाटकांतील पात्रांचें गुणा-वगुणविवेचन.

या नाटकांत एकंदर संविधानकाची जुळणी कशी केली आहे व निरनिराळ्या पात्रांचे स्वभाव किंवा त्यांचीं स्व-रूपें कवीनें किती चातुर्यानें भिन्न भिन्न अशीं दाखविलीं आहेत, या गोष्टीचें उद्घाटन करूं. आपल्यांत म्हण आहे—'जितक्या व्यक्ति तितक्या प्रकृति.' या म्हणीचा खरेपणा या नाटकांतल्या पात्रांचें विवेचन करीत असतां वाचकांच्या स्पष्ट लक्षांत येईल. कोणच्याही उत्कृष्ट नाट्यकाराचें मुख्य कर्तव्य हें आहे तें कीं, सृष्टींत ह्मणा किंवा या संसारांत म्हणा, जें स्वभाववैचित्र्य आढळतें, तसें हुबेहूब नाटकांत उतरणें. याचेंच नांव नाट्यनैपुण्य. आणि खरी नाट्यकला काय ती ही. आधुनिक नाट्यकलेचा आद्य गुरू शेक्सपीयर यानें स्वतांच प्रस्तुत नाटकांत वीरसेना-कडून नाटकवाल्यांस उपदेश करविला आहे, त्यांतही त्यानें असेंच सांगितलें आहे:—'नाट्यकलेचा मुख्य हेतु म्हटला म्हणजे पूर्वी काय—आतां काय—केव्हां काय, संसाराचं चि-त्रच तें! संसारांतील गोष्टी हुबेहुब करून दाखवाव्या व त्यांत अंमळ चमत्कृतिही असावी. नाटक म्हणजे सृष्टीचा आरसा. या संसाराचं प्रतिबिंब त्यांत दिसावं. सद्गुणाचा चेहेरा सद्गुणाला, दुर्गुणाचा दुर्गुणाला दाखवावा. त्या त्या काळाचं स्वरूप वगैरे सर्व कांहीं मूर्तिमंत श्रोत्यांपुढें उभं करावं याचं नांव नाटक!' वर दिलेल्या शेक्सपीयरच्या या उक्तीचीं उदाहरणें म्हटलीं म्हणजे त्याचीं उत्तम उत्तम नाटकें व आमच्या कविकुलगुरु कालि-दासाचें जगद्विख्यात शाकुन्तल, हीं होत. या व्याख्येंत जरी या

पाश्चिमात्य कविवर्यांनें केवळ नटांसच उद्देशून ही उक्ति केली आहे, तरी हे आमच्या अवतरणांतले शद्ब नाटक लिहिणाऱ्या प्रत्येक कर्त्यासही सर्वथा लागतात. विशेषेंकरून लोकरंजनार्थ व लोकशिक्षणार्थ रंगभूमीवर सत्कवींनीं केलेल्या कृतींचे अभिनय करून दाखविणाऱ्या नटमंडळींनें हें उपदेशामृत नित्य प्राशन केलें असतां त्यांपासून त्यांचें व देशाचें फार हित होईल. असो.

प्रस्तुत नाटकांत मुख्य पात्रें म्हटलीं तर—वीरसेन, राजा रमाकान्त, राणी मदालसा, चंद्रकला, आर्तवीर्य, शूरसेन, व हरसेन हीं सात आहेत. या शिवाय पिशाच, विठोजी व संभाजी, हीं तीन दुसऱ्या वर्गांत घातली असतां चालतील. यांपैकीं प्रत्येक पात्राच्या सदृश अशीं माणसें जगांत नेहमीं आढळतात. वीरसेनासारखे केवळ विद्याविभूषित, वाचाल, क्रियापराङ्मुख, असे पुरुष तर आज काल आपल्यांत पुष्कळच आहेत हें सांगणें नकोच. तथापि या पात्राचें अमळ सविस्तर उद्घाटन पुढें करूं.

राजा रमाकांतासारखे महत्वाकांक्षा, अधिकारतृष्णा व दुष्टवासना या मनोविकारांनीं ग्रासलेले, विश्वासघातक, स्वार्थपरायण, निमकहराम, दुष्ट प्रधान राज्यांत असतात, हें मनुष्यतत्व सृष्टीच्या आरंभा पासूनच होत आलेल्या गोष्टींपासून आजपर्यंत आपण शिकत आलों आहों. तेव्हां रमाकान्ताचें पात्रही या नाटकांत पाहून आपणांस विस्मय मानण्याचें कारण नाहीं. राणी मदालसेसारख्या स्त्रियाही जगांत बऱ्याच आढळतात. कपटपटु पुरुषांच्या मधुरवाणीला भुलून मोहजालांत पडणाऱ्या व आपल्यावर तनमनधनें करून प्रेम ठेवणाऱ्या पतीला विसरून परपुरुषाच्या नादीं लागणाऱ्या अबलांचा प्रभाव, पुराणादिकांत, कादंबऱ्यांत व प्रत्यक्ष व्यवहारांत आपणां सर्वांस नेहमीं कळून येतोच. वीरसेनाप्रमाणें एकंदर स्त्रिया तेथून साऱ्या लबाड व पातकी, असें मद्यातत्व किंवा सर्वसाधारण अनमान,

काढण्याची आपली छाती न होतो. कारण, असें अनुमान करणें म्हणजे विलक्षण धाडसाचेंच काम आहे. परंतु वीरसेनाच्या आईचें. सर्वथा धर्मपराङ्मुख वर्तन पाहून वीरसेनाविषयीं आपणांस अनुकंपा वाटणें, हें अगदीं योग्य आहे. आपली प्रत्यक्ष मातुश्री, आपले वडील परलोकांस जाऊन दोनही महिने झाले नाहींत तों सर्व लाजलज्जा सोडून दुसऱ्याशीं रत होऊन राहिली. तर एवढीच गोष्ट साधारण मनुष्याच्या मनास ही जिवाचा वीट आणणारी आहे. मग ज्या दुष्ट प्रधानानें आपल्या बापाचा विश्वासघातानें जीव घेतला—एवढेंच नाहीं, तर आपली गादी बळकाऊन आपली आई सुद्धां ज्यानें बळकाविली, त्या दुरात्म्याविषयीं मनांत काय वाटावें व हृदयांत काय होऊन राहावें, याची वाचकांनींच कल्पना करावी ! वीरसेनानें तरी खोटें वेड घेतलें तें सूड घेण्याचा उपाय असें समजून घेतलें. परंतु त्याच्या त्या स्थितीचा विचार करितां त्याला खरोखर वेड लागणें हेंच साहजिक दिसतें !

आर्तवीर्य हा लुच्चा, हांजी हांजी करणारा, पढत मूर्ख, फाजील डौली, पण जगांत टक्के टोणपे खाऊन अनुभवलेला, असा एक म्हातारा मुत्सद्दी आहे. आर्तवीर्य हें आपल्या ठिकाणीं मी मोठा शहाणा व धूर्त म्हणविणाऱ्या, (अंक२प्र० २.) पण वस्तुतः अगदीं मूर्ख, अशा एका वृद्ध मनुष्याचें चित्र आहे. (अंक १ प्रवेश ३.) या ठिकाणीं त्यानें आपल्या मुलाला केलेला उपदेश व्यवहारांतल्या शहाणपणाचें सार आहे, असें म्हटलें तरी चालेल. तो उपदेश प्रत्येक तरुण मनुष्यानें आपल्या हृत्कमलांत सतत वागविण्या सारखा आहे. शिवाय, आज काल तरुण मंडळीस जुनीं, म्हातारीं, वडील, अनुभवशीर माणसें बहुतेक असाच उपदेश करीत असतात, हेंही मार्मिक वाचकांच्या लक्षांत येण्यासारखें आहे. आर्तवीर्य हा लबाड्या सांगण्यास, असत्य भाषण करण्यास व 'होला हो' म्हणण्यास बिलकुल मागें पुढें पहा-

णारा नव्हता. तो स्तुतिप्रिय तर पहिल्या प्रतीचा असे. मुत्सद्दी काय तो मी, युक्तिवान् काय तो मी, वक्ता काय तो मी, फार काय–नाटकांत चांगला भाग करणारांपैकींही मी—असे त्यास वाटे. शेवटीं, अशा तोंडपुजा, लुबऱ्या, लुडबुड्या माणसांचा जगांत नेहेमी जसा परिणाम होतो तसाच बिचाऱ्या आर्तवर्याचाही या नाटकांत झाला आहे.

चंद्रकला—हें पात्र फार मनोवेधक आहे. एखादी चवदा पंधरा वर्षांची मुग्धसुंदरी, जिला जग फारसें ठाऊक नाहीं–परंतु निर्मळ, शुद्ध अंतःकरणाची भोळी मुलगी असावी, अशा मुलीचें. चंद्राकला हें चित्र आहे. तिचा बाप म्हातारा व विक्षिप्त; भाऊ तर चैनी, यौवनभराच्या अभिमानानें ताठलेला व अंशतः आपल्या शरीरसंपत्तीच्या व तालीमबाजीच्या डौलांत चूर असा होता दोघेही आपणांस व्यवहारनिष्णात व दीर्घ द्रष्टे म्हणविणारे होते. तेव्हां बिचाऱ्या चंद्रकले विषयीं अनुकम्पा कोणास वाटणार? भावाची बहिणीवर अत्यंत ममता तर खरी, परंतु, ती हल्लीं आमच्यांत असते त्या प्रकारची; म्हणजे वडिलपणाच्या नात्यामुळें आकुंचित व परिछिन्न झालेली! तिच्या दादानें चंद्रकलेजवळ तिच्या हृदयवल्लभाविषयीं गाऱ्हाणीं गाऊन खूप चर्पटपंजरी सांगितली, तरी ती भोळ्या स्वभावामुळें 'दादा, असंचना?' एवढेंच बोलली. चंद्रकला केवळ अगदीं भाबडी, किंवा वेडगळ, अशी मुलगी तर खास नव्हती. कारण, त्याच संभाषणाच्या शेवटीं भावाचा सारा वेदांत ऐकून घेऊन मग ती म्हणतेः 'दादा, एखाद्या आतांच्या वेदांत्याप्रमाणें मला मात्र मोक्षप्राप्तीचा कठीण मार्ग दाखवून देऊन आपण खुशाल एखाद्या चैनी मनुष्यासारखा ऐष आरामांत रहाशील, असं मात्र करूं नको हो!' या एवढ्याच भाषणावरून पोर मोठी चटकदार होती, अशी खात्री होते.__ आर्तवर्याच्या अनेक खटपटीमुळें.

कपटाचरणामुळें व फाजीलपणामुळें त्या बिचारीच्या मा-नसिकशक्तीचा व बुद्धीचा जितका विकास व्हावा, तितका न होऊन चंद्रकलेची खरी योग्यता चांगलीशी दिसण्यांत आली नाहीं. तथापि ही हरिणाक्षी स्वभावानें ही हरिणीप्रमाणें भीरु व साहसशून्य दिसते. रत्नपालाची नायिका जी शशिकला (ज्यूलियट्) तिच्यांतलें पाणी किंवा तिची तरतरी इच्यांत नाहीं. या दोन नायिका धाष्टर्याच्या कामांत परस्पर अत्यंत विरुद्ध आहेत. खेरीज राणी, राजा व आर्तवीर्य, या 'तिघांनीं मिळून' उंदीर धरण्याकरितां जसा सांपळा किंवा पिंजरा ठेवतात, तसें वीरसेनाच्या वेडाचें खरें कारण सांपडावें म्हणून बिचारी चंद्रकला एक यंत्रच करून् ठेविलें होतें. त्यामुळें वीरसेनाच्या मनांत तिजविषयीं दीर्घ कुशंका येऊन त्यांच्या परस्पर प्रेमांत बिघाड आला. ( अंक ३ प्रवेश १. ) यास्थळीं त्या दोघांचा जो मर्मभेदक संवाद झाला आहे, तो पाहून नायिकेविषयीं कोणाच्या हृदयांत दया उत्पन्न होणार नाहीं? 'तूं सुंदर आहेस, तर तूं माझ्या आईसारखीच बेइमानी व लबाड असशील!' अशा अभिप्रायाचें भाषण, ज्याला तिनें आपलें सर्व तनमन अर्पण केलें होतें व ज्याचें कल्याण ती मनोभावें ईश्वराजवळ चिंतीत होती, त्या वीरसेनाच्या मुखांतून ऐकून त्या बिचाऱ्या चंद्रकलेची अगदीं गाळण झाली व तिला दे माय धरणी ठाय असें झालें! बापाच्या मरणानें व अंशतः वीरसेनाच्या निष्ठूर वर्तनानें वेड लागलेल्या चंद्रकलेचें चित्र ( अंक ४ प्र० ५. ) या स्थळीं पाहून सहृदय वाचकांच्या मनास चटका लागून राहील यात संशय नाहीं! शूरसेन हें पात्र वीरसेनाच्या पेक्षां अगदीं विरुद्ध स्वभावाचें आहे. वीरसेन अत्यन्त विचारी, परंतु क्रियाशून्य असा कवीनें दाखविला आहे. शूरसेन हा अत्यन्त अविचारी असून क्रियेंत अगदीं निपुण, साहसी, शूर, अभिमानी, मनांत येण्याचा अवकाश—कीं तात्काळ

तें काम करून दाखविणारा—अशा मनुष्याचें चित्र आहे. आपल्या बापाला विचित्रपुरींत राजानें स्वतां, किंवा कोणाकडून तरी मारविलें, असें कळतांच शूरसेन विलासनगरींतून निघून राजाचा सूड घेण्या करितां धांवत आला. त्या गोष्टीचा पुरा शोध काढल्या खेरीज व त्याचा फारसा विचार केल्या खेरीज, वीज जशी लागेल त्यावर कोसळावी, त्या प्रमाणें आपला राग शान्त व्हावा म्हणून शूरसेन एकदम आला तो राजावर कोसळला. पुढें राजानें त्याला, 'तुझ्या बापाच्या मृत्यूचें कारण वीरसेन आहे' असें सांगितलें, तेव्हां वीरसेनाचा प्राण घ्यावा असें लागलेंच त्याच्या मनांत आलें. परंतु वीरसेनानें आपला बाप मारला तो कां, कसा, केव्हां, कोठें, वगैरे कांहीं एक चौकशी त्यानें केली नाहीं. शूरसेनाचें हृदय ही फार घातक होतें असें दिसतें. कारण, (अंक ४ प्रवेश ७.) या स्थळीं राजाचें व त्याचें भाषण झालें आहे, त्यांत राजा त्यास जसजसें सांगत गेला तसतसें तो 'बरें' म्हणून सर्व ऐकतच गेला, हें केवढें अविचाराचें सूचक आहे? वीरसेनाचा घात करण्याची युक्ति भीत भीत शूरसेनास सांगत असतां राजानें प्रथम 'तूं पट्टा न घेतां कपटानें हातांत कोणास नकळत नागवी तरवार घे' इतकेंच सांगितलें. पण शूरसेनानें लागलीच दुसरी एक हरामखोरपणाची कल्पना सुचविली कीं 'मी त्या आपल्या तरवारीस विषाचें पाणी ही लाऊन ठेवितों!' सारांश, शूरसेनाच्या पात्रांत थोरपणाचें व बुद्धिमत्तेचें लक्षण मुळींच दिसत नाहीं म्हटलें तरी चालेल. शूरसेन व वीरसेन, दोघे ही तरुण, दोघेही उद्दामवृत्तीचे, व तीव्र मनोविकाराचे होते. परंतु त्यांतला एक जण अगदी विलासी, चैनी, विचारशून्य, दुराग्रही, दृढनिश्चयी, गर्विष्ठ, शीघ्रकोपी, तामसी, व कोणचीही गोष्ट मनांत आल्या बरोबर ती कृतीनें करून दाखविणारा, असा होता. दुसरा याच्या बहुतेक अगदीं उलट.

आतां हरसेनाच्या पात्राचा विचार करूं. हरसेन हा वीर-

सेनाचा सहाध्यायी पाठशाळेंतील मित्र होता. त्या दोघांचीं मनें मिळालेलीं होतीं. वीरसेनाच्या बापाचा वध झाल्यावर तो विचित्रपुरीस आला, तेव्हां त्यानें येतांनां आपल्या परमप्रिय मित्रास बरोबर आणिलें होतें असें दिसतें. हरसेन हा स्वभावानें गंभीर, शान्त असून मोठा विचारी व उदार मनाचा होता. त्याची स्थिति फार गरीब होती असें वाटतें. वीरसेन विचित्रपुरीस आल्या पासून त्याचें मन अत्यंत उदास व कष्टी होऊन गेलें; अशा स्थितींत वीरसेनाला क्षणमात्र विश्रान्ति पावण्याला जागा काय ती हरसेन. कारण, हरसेना शिवाय आपलें मन उघडून व आपल्या सर्वदुःखाचें इंगित सांगण्यास वीरसेनाला दुसरें कोण होतें? कालिदासानेंही शाकुन्तलनाटकांत म्हटलें आहे: 'स्निग्धजन हि संविभक्तं दुःखं सह्यवेदनं भवति.' वीरसेनानें एका ठिकाणीं हरसेनाच्या या स्वभावाचें वर्णन केलें आहे, त्या वरून तो खरा वेदान्ती व काञ्चन व लोष्ठ ज्यास सारखींच असा होता. 'लक्ष्मीःसमाविशतु गच्छतु वा यथेष्टम्' या भर्तृहरीच्या उक्तीचें अवलंबन करणारा तो होता. वीरसेन हरसेनाविषयीं (अंक ३ प्रवेश ९.) येथें ह्मणतोः—'तूं मनुष्य कसा आहेस? सारीं दुःखं सहन करतोस तरी त्यांचं तुला कांहींच वाटत नाहीं. दैव अनुकूळ असो किंवा प्रतिकूळ असो, लक्ष्मी येवो किंवा जावो; तुझ्या दृष्टीनं दोन्हीही सारखींच.' या वरून हरसेन हा कसा मनुष्य होता, हें चांगलें लक्षांत येतें. सारांश, हरसेन हा 'विधीच्या हातांत तो नाचवील त्या प्रमाणें नाचणारें बाहुलें होऊन रहाणारा' नव्हता. तथापि वीरसेनाच्या बुद्धीची तीव्रता हरसेनाच्या ठायीं नव्हती, हें मार्मिक वाचकांच्या ध्यानांत येईलच.

आतां राहतां पैकीं तीन पात्रें शिलक राहिलीं. पिशाच, विठोजी व संभाजी. बहुतेक मानवजातींत मनुष्याचें देहावसान झाल्यावर प्राण्यांस मृत्यू नंतर कांहीं एक अवस्था प्राप्त होते असा समज आहे. आणि विशेषें करून ज्या प्राण्यांचे जि-

त असतां कांहीं हेतु रहातात त्यांस पिशाचयोनि प्राप्त होते, अशी समजूत आहे. त्यांत जे एखाद्या घातपातानें मरतात, त्यांनां तर ही योनि प्राप्त होतेच होते, असें म्हणतात. प्रस्तुत यूरोप खंडांतल्या बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांतील लोकांत ही कल्पना दिवसांनुदिवस कमी कमी होत चालली आहे. तथापि, ज्या काळास उद्देशून शेक्सपायरनें हें नाटक रचिलें आहे, त्या वेळेस लोकांत ही कल्पना जागृत होती एवढेंच नाहीं, तर कवी स्वतां ज्या काळांत जन्मला या कालीं ही पिशाचाविषयीं लोकांच्या फारच चत्मकारिक कल्पनां असत. पिशाचांचा राजा सयतान; पिशाचांस अनेक प्रकारच्या भयंकर यातना सोसाव्या लागतात व जे इहलोकीं घोर पातकें करितात ते दुष्ट पिशांचांची योनि पावतात, व अंधार काळोख्या रात्रीं भूपृष्ठावर भ्रमण करून मनुष्यांस झपाटतात, इत्यादि तत्कालीन कल्पनांस अनुलक्षून कवीनें पिशाच्याचें पात्र बनविलें आहे. या विषयाच्या संबंधानें आपल्या लोकांच्या कल्पना फारशा निराळ्या नाहींत. गरुडपुराणांत मृत्यु नंतर प्राण्यास होणाऱ्या यमयातनांचें फारच भयंकर वर्णन केलेलें आहे. या सर्वांचा उपयोग ह्मणून इतकाच कीं आपस्वार्थी मतलबी लोक अज्ञान व भोळ्या मनुष्यांच्या मनावर विलक्षण भीतीचा ठसा उठवून त्यांच्या द्रव्याचा अपहार करितात. असो. प्रस्तुत नाटकांतील पिशाच्याच्या संबंधानें एक दोन गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. त्या या कीं, हें पिशाच चांगलें आहे. दुष्ट नाहीं. कारण, मूळचा राजा वीरसेनाचा बाप, हा सज्जन होता. परंतु तो अपघातानें मेल्यामुळें ज्यानें आपल्यास असा विश्वासघात करून मारिलें त्याचा कसा सूड उगवावा, हा हेतु त्याच्या मनांत राहिल्यामुळें त्यास पिशाचयोनि प्राप्त झाली. दुसरा एक चमत्कार या पात्रांत असा आहे कीं, मेल्या नंतरही राणीविषयीं राजाचें प्रेम पूर्वी प्रमाणेंच कायम राहिलें, असें कवीचें हृद्गत आहे. पिशाचानें वीरसेनास सूड घेण्यास सांगतांनाच मुद्दाम

बजावलें 'कीं या घोर कृत्याचें प्रायश्चित्त तूं त्या हरामखोराला हव्या त्या रीतीनं दे. परंतु कोणत्या ही रीतीनं तूं आपल्या आईचा छळ करूं नकोस किंवा तिला दुखवूं नकोस.' (अंक १ प्रवेश ५). पुढें (अंक २ प्रवेश ४.) या ठिकाणीं वीरसेन आपल्या आईची एकांतांत यथेच्छ निर्भर्त्सना करित असतां पिशाच तेथें येतें व तिचीं 'हृदयशल्यें तिला टोंचित आहेत, व तिचा अंतरात्मा पश्चात्तापामुळें तळमळत आहे, असें पाहून त्या पिशाचस्वरूप राजास आपल्या राणीच्या स्थितीच्या विषयीं फार दुःख वाटून त्यानें वीरसेनास 'तूं आपल्या आईला फार गांजूं नको' म्हणून सांगितलें आहे. यावरून वीरसेनाच्या बापाची प्रीति राणीवर जिवंतपणीं किती असेल याची वाचकांनींच कल्पना करावी.

विठोजी व संभाजी यांजविषयीं फार लिहिण्याची जरूर नाहीं. ते वीरसेनाचे मित्र, तथापि स्वार्थसाधक होऊन व रमाकान्ताच्या दुष्ट व नीच पक्षास अनुकूळ होऊन आपल्या खऱ्या स्वामीशीं त्यानीं हरामखोरपणा केला. त्याजबद्दल त्यांस योग्य शासन मिळावयाचें तें शेवटीं मिळालेच. दुसऱ्या करितां तयार केलेल्या फांसांत ते आपणच सांपडले. व जशास तसा भेटून दुसऱ्याच्या घाता करितां पसरलेल्या कपटजालांत त्यांच्याच माना सांपडून ते प्राणास मात्र मुकले.

मानाजी फांकडे—या गृहस्थासारखा गृहस्थ प्रत्येक राजदरबारीं बहुत करून एखादा तरी असायचाच. दुसरा करील तसें आपण करावयाचें, दुसरा बोलेल, दुसरा चालेल, तसें आपण बोलावयाचें, आपण चालावयाचें; अमुक मनुष्य असा प्रतिष्ठित आहे, तर आपण तसाच प्रतिष्ठितपणाचा आव घालावयाचा; फाजील गोड बोलावयाचें, फाजील संभावितपणा, दाखवावयाचा, वेडेवांकडे हातवारे करून आपल्या मनें मोठ्या चमत्कारिक गोष्टी सांगायच्या—अशीं जी जगांत

भाषणें असतात त्यांचें हें चित्र होय. हे लोक केवळ हास्यास्पद असतात. जसा एखादा पाण्याचा बुडबुडा असतो त्यावर फुंकर घातल्या बरोबर तो फुटून जातो, त्याप्रमाणें या फांकडे रावांना वीरसेना सारखा एखादा चाणाक्ष व खमक्या भेटला कीं त्याची फटफजिती होऊन जाते.

स्मशानांत मृतांकरितां खाडे खणणारे जे मजूर त्यांची तसल्या प्रसंगीं व तसल्या स्थळीं थट्टामस्करीचीं विनोदपर भाषणें ऐकून आपणास सखेदाश्चर्य वाटतें. परंतु, सहवासाचा प्रभाव किती चमत्कारिक असतो तो ध्यानांत आणला तर त्यांत नवल मानण्यासारखें कांहीं नसून कवीनें वर्णिलेलीच स्थिति स्वाभाविक आहे, हें मर्मज्ञ वाचकांच्या लक्षांत येईल. आज काल आपल्यांत देखील प्रेतसंस्कारार्थ स्मशानभूमीस जाणारे त्या ठिकाणीं खुशाल चैनींत विड्या चितेवर पेटवून ओटींत बसणारे, किंवा तेथें गाण्याची तार लागून तान मारणारे किंवा समोर होण्याऱ्या विधींस अनुलक्षून थट्टेवीं भाषणें करून मोठा हशा पिकविणारे हरीचे लाल किती आढळतात, त्याचा अनुभव पुष्कळांस असेल ! मग ज्यांचा सारा जन्म स्मशानांत जातो अशा कारट्यांची किंवा प्रेतें पुरण्याकरितां खाडे खणणारांची काय गोष्ट सांगावी !

आतां वर सांगितल्या प्रमाणें वीरसेनाच्या पात्राचा अंमल विस्तारपूर्वक विचार करूं. वीरसेनाला वस्तुतः आपला इष्ट हेतु साधून घेण्याला पुष्कळ अनुकूळ गोष्टी होत्या. त्या कोण कोणत्या त्यांची अनुक्रमें गणना करूं.

रमाकांताच्या लोभाला बळी पडलेल्या राजाचें पिशाच स्मशानांतून निघून ‘ तुला जर काळीज असेल तर या कृत्याबद्दल सूड घेतल्याखेरीज तूं राहूं नकोस ; हें काम बजाविण्यांत जर कांहीं मात्र हयगय करशील तर तूं एक मनुष्यरूपी अजगर

आहेस, असंच समजलं पाहिजे. या कार्याविषयीं तूं उदासीन राहिलास तर एखाद्या पाणथळ घाणेऱ्या जागेंत तरवडाचें झाड खूप माजतें व जागच्या जागींच कुजून सडून जातें, त्याप्रमाणें तुझी स्थिति मी समजेन-'—अशी शपथ घालून त्यानें मुलापासून आपल्या खुनाबद्दल सूड घेण्याविषयीं प्रतिज्ञा करविली. दैवयोगानें यमधर्माचा दास होऊन यातना सोशीत भूपृष्ठावर भटकत राहणाऱ्या त्या पिशाचानें केलेला हा भयंकर उपदेश वीरसेनाच्या कोंवळ्या मनावर प्रथम फारच ठसला. शिवाय, प्राचीन काळीं अशा कर्माबद्दल सूड उगविणें हें प्रत्येकाचें कर्तव्य कर्म असून तें कोणी पूर्वी सुचविल्याखेरीजही बजाविलेंच पाहिजे अशी समजूत असे. वीरसेनाला खरोखर म्हटलें तर सूड उगविण्यापेक्षां न्याय्य गोष्ट तीच करणें प्राप्त झालें होतें. कारण, त्याच्या बापाच्या कारभाऱ्यानें त्याची गादी अन्यायानें हरण केली होती. या अन्यायाबद्दल वीरसेनाला राज्याचा मुख्य न्यायाधीश या नात्यानें गुन्हेगाराला देहांत शिक्षा देण्याचा पूर्ण अधिकार होता. याखेरीज वीरसेनाच्या बापावर लोकांचा फारच लोभ होता. शिवाय, त्या राजा दाशरथी रामासारख्या प्रजापालनदक्ष राजाची स्मृति प्रत्येक प्रजाजनाच्या अंतःकरणांत निरंतर जागृत असे. आर्तवीर्य म्हणून विचित्रपुरीच्या दरबारांत जो एक जुना मुत्सद्दी होता त्याला वीरसेनानें (अंक ३ प्र० ४.) मारल्यानंतर नव्या राजाविषयीं लोकांची मनें बिघडून जाऊन नाटकांतील नायिका चंद्रकला हिचा भाउ शूरसेन याला गादीवर बसविण्याविषयीं लोक अत्यंत उत्सुक होते. (अंक ४ प्र० ५). परंतु शूरसेनापेक्षां वीरसेनावर लोकांची प्रीति व निष्ठा अधिक होती; ती इतकी कीं त्याचे सर्व दोष त्यांना गुणच वाटत. एवढेंच नाहीं, तर वीरसेनाच्या आईचेंही त्याजवर विलक्षण प्रेम होतें, त्यामुळें प्रसंग पडल्यास तिनें आपल्या नूतन पतीच्यापेक्षां आपल्या मुलाचा कैवार अ-

धिक घेतला असता. इतकें असून वीरसेनाचे स्वतांचे गुण खरोखर अप्रतिम होते. चंद्रकलेनेंच एका ठिकाणीं त्याच्या गुणांचें वर्णन केलें आहे ( अंक ३ प्र० १. ). त्यावरून वीरसेन मोठा मुत्सद्दी, शूर, विद्वान्, मानसिक व शारिरिक अशा सर्व गुणांनीं संपन्न, असा होता. अशीं कारणें, अशीं साधनें, असा अधिकार वीरसेनास अनुकूळ असून केवळ आपल्या बापास ठार मारिल्या बद्दल मारणाऱ्याचा सूड उगविणें एवढेंच त्याचें कर्तव्य ह्मणून होतें. हें कर्तव्य बजावण्याची प्रतिज्ञाही तो बापाच्या पिंशाचाजवळ करून चुकला. 'फार काय—माझ्या या स्मृतिपटावर जुन्या बारीक सारिक गोष्टी लिहून ठेवल्या असतील तेवढ्या पुसून टाकीन; आणि या स्मृतिरूप पुस्तकांत तुझी आज्ञा मात्र लिहून ठेवीन' व ' मनाच्या धांवे बरोबर त्याचा सूड उगवण्यास जातों ' अशी शपथ त्यानें ईश्वरसाक्ष घेतली होती.

पण पुढें काय चमत्कार झाला तो पहा. ज्या मनुष्याचा इतका निश्चय झाला होता, त्यान आपल्या पहिल्याच एका भाषणांत आपल्या हृदयास लागलेंच म्हणावें ' हृदया ! थांब, थांब ' व आपल्या शिरांना म्हणावें ' शिरांनों ! तुम्ही इतक्या दुर्बळ कां झालांत ! मला बळकट सांवरून धरा'—व कांहीं वेळानें मोठ्या दु:खाचा उद्गार काढून ह्मणावें ' काय हा दीर्घ द्वेष ! आग लागो या द्वेषाला. आणि हें सर्व निस्तरणं माझ्या कपाळीं यावेंना ?'—हें केवढं आश्चर्य ! ज्या आपल्या मित्रांना तें पिशाच पूर्वी दिसलें होतें त्यांना ही गूढ गोष्ट त्यानें कळऊं नये हें ही अंमळ आश्चर्यकारक खरें. त्याचा जिवश्च कण्ठश्च मित्र हरसेन याला तरी ती गोष्ट त्यानें मागून कळविली. जें दिसण्यांत अगदीं क्षुल्लक काम तें सिद्धिस जावें या हेतुनें शेवटीं वेड घेण्याचा विचार त्यानें केला !

रमाकांताला आपल्या सावत्र मुलाची उदासीन वृत्ति पाहून अगोदरच संशय उत्पन्न झाला होता. परंतु वीरसेनाचे ते वेडगळ

चाळे पाहून राजाच्या मनांत त्याज विषयीं पूर्ण द्वेष उत्पन्न झाला. आपल्याला कांहीं मानसिक विकार झाला आहे असा व ह्मणा करून वीरसेन दरबारांतील चाकर माणसांना वेडे वेडे प्रश्न करूं लागला, व आपली प्रिया चंद्रकला इला भलभलतें बोलून व तिचा छळ करून तिचा सर्व उत्साह त्यानें घालविला. या प्रमाणें दोन महिने गेले. परंतु पिशाच्या जवळ केलेल्या प्रतिज्ञेचें स्मरण वीरसेनास झालें नाहीं. शेवटीं नाटककारानें त्याज पुढें नमुन्या करितां म्हणून जें भाषण केलें ( अंक २ प्रवेश २.) त्या मुळें त्याला आपल्या कर्तव्याची आठवण झाली. ही झाल्या बरोबर त्याचें मन त्याला खाऊं लागून तो आपल्यास अनेक प्रकारें शापून घेऊं लागला व आपल्याला ' जड, मूर्ख-द्बुद्धि. हरामखोर, वेडोबा, गाढव, ' इत्यादि विशेषणें देऊं लागला. परंतु त्या शिव्यांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. आपलें कर्तव्यकर्म सोडून नाटकवाल्यांच्या त्या भाषणानें राजाच्या हृदयांतलें ' इंगित ' नाटकप्रयोगाच्या योगानें काढून घ्यावें अशी मात्र कल्पना त्याला सुचली. असें आजचें उद्यां वर लोटतां लोटतां पुढें ज्या पिशाचाला आपल्या मित्रांच्या देखत ' मोठं इमानी पिशाच !' असं म्हटलें, त्याच्याच विषयीं या राजपुत्राच्या मनांत संशय येऊन ' हें पिशाच दुष्ट असेल! दुष्ट पिशाचं हवं तें मनोहर रूप धारण करतात......कदाचित् माझ्या मनाचा हा दुर्बळपणा व हें औदासिन्य पाहून मला फसवून माझा घात करावा असं सुध्दां त्यानं मनांत आणलं असेल !' असें ह्मणूं लागला.

नाटकाचा प्रयोग झाला. त्या प्रसंगीं नाटकांतल्या राणीचें भाषण मर्मभेदपणानें आपल्या आईकडे लाऊन ' कडू कडू वीष ! ' असें म्हणून गेला नाहीं तोंच नाटकांतील राजाचें भाषण वीरसेनालाच लागू पडतें व त्याच मतलबाचें भाषण पिशाच्यानें ही

पुढें वीरसेनानें आपल्या आईला नीतीचें व्याख्यान दिलें त्या-वेळेस केलें आहे. उपनाटकांतला राजा ह्मणतो:—

'निश्चय हा स्मृतीचा दास आहे. त्याच्या जन्मकाळीं त्या-ची मोठी धामधूम असते—पण त्याचा तो तकवा, त्याची ती शक्ति, स्थिर रहात नाहीं. * * * * * अगदीं ऐन भरांत आलों असतां आपण जो एखादा विचार किंवा नि-श्चय करितों, तो विचार किंवा निश्चय, तो आपला भर संपला ह्मणजे नाहींसा होतो.'

या वाक्यांत वीरसेनाचे हुबेहूब चित्र दिलें आहे असें ह्म-टलें असतां चालेल. या पात्राविषयीं आणखी पुष्कळ लिहा-वयास पाहिजे होतें. परंतु विस्तार फार झाल्या मुळें नाइलाज आहे असें म्हणून आपण या ठिकाणींच थांबूं.

वीरसेनाची आत्मगत भाषणें किंवा त्याचे एकान्तांतले वि-चार फार महत्वाचे असून त्यांत कवीनें आपल्या बुद्धिप्रभा-वाची खरोखर कमाल करून मांडली आहे. हे भाग वाचकांनीं विशेष लक्षपूर्वक वाचावे अशी त्यांस माझी सविनय प्रार्थना आहे.

प्रस्तुत नाटकांतील वीरसेनाच्या पात्रापासून आमच्या लो-कांनीं शिकण्यासारख्या गोष्टी कोणत्या त्याचा आतां विचार क-रूं. नाटक वाचणें व विशेषेंकरून प्रयोगतः पहाणें, यापासून क-रमणूक व शिक्षण असे दोन फायदे आहेत. एखादा चांगला कवि किंवा एखादा चांगला नट या दोघांपैकीं प्रत्येकाच्या ठिकाणीं दोन प्रकारचे अधिकार असतात, एक शिक्षकाचा व दुसरा म-नोरंजन करण्याचा. नुसतें मनोरंजन करणें इतकें कठिण नस-तें. परंतु मनोरंजनाबरोबर ज्ञानप्राप्ति करून देणें व मनावर स-दुपदेश ठसविणें हें काम फार कठीण आहे. तेव्हां हें काम आ-मच्या कविवर्यानें कसें केलें तें पाहूं व त्याच्या नाटकाचा मुख्य भाव किंवा हेतु काय आहे तो शोधून काढण्याचा यत्न करूं.

ठाणे.

माझ्या मतें हा कविवर्य जणों प्रस्तुतकाळी जिवंत असून त्यानें आपल्या सर्वांकरितां व सर्वांस उद्देशूनच हें नाटक रचिलें आहे. आणि विशेषेंकरून नाटकाचा नायक जो वीरसेन या पात्राचा जों जों आपण अधिक विचार करावा तों तों माझ्या म्हणण्याची यथार्थता दिसते. मी म्हणतों वीरसेन नाटक म्हणजे आमच्या देशबांधवांच्या स्थितीचें चित्र होय. कसें तें पहा. आपल्या देशांतील आंग्लभाषा-शिक्षण मिळत असलेल्या किंवा मिळालेल्या लोकांची स्थिति अगदीं वीरसेना सारखी आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. आपण आज काल शहाणे शहाणे म्हणविणारे सारे लोक वीरसेन बनून गेलों आहोंत! हें म्हणणें केवळ अलंकारिक किंवा अन्योक्तीचें नाहीं, तर खरोखरच अशी गोष्ट आहे. वीरसेना प्रमाणें प्रस्तुत आपल्या पुढें ही कामाचे डोंगरच्या डोंगर येऊन पडले आहेत. आपल्याला अशीं मोठमोठीं कामें उचलावयाचीं आहेत कीं तीं निवळ अंगमेहनत व शारिरिकश्रम यांनींच पार पडतील—केवळ शब्दपांडित्यानें व्याख्यानांनीं व नुसत्या विचारांनीं पार पडणारीं नाहींत. परंतु आपल्या अंगीं एक दुर्गुण वीरसेना सारखाच खिळून गेल्या सारखा दिसतो आहे. तो कोणचा, तर बोलण्या प्रमाणें करणें या गोष्टीचा अभाव! वाचाळपणा पुष्कळ, पण क्रियेच्या नांवानें शून्य. वीरसेना प्रमाणेंच प्रस्तुत आपल्या मनाची सुधारणा, ज्ञानवृद्धि, अंतःकरणांतील दया, प्रेम, शान्ती इत्यादि गुणांची अभिवृद्धि करण्याकडेच आमचें सर्व लक्ष लागून गेलें आहे. विद्यासंपादनार्थ वीरसेनाप्रमाणें आपण ही शाळांतून व पाठशाळांतून परिश्रम केले व विद्वान् झालों—आपण एम ए. इत्यादि पाठशाळेतील पदव्या मिळविण्यांत मोठे तरबेज झालों, व एकमेकांशी केवळ पुस्तकींज्ञानसंपादनांत स्पर्धा करितों—पण शक्तिसंपादन, अधिकारसंपादन, स्वातंत्र्यप्राप्ति यां गोष्टीं करितां जीव कोणाचें तळमळताहेत व आकाश पाताळ कोण एक करीत बसला आहे!

परमेश्वर कृपेनें आपणांस राजे मोठे विचारी, शहाणे, राजकार्यधुरंधर व प्रजेचें योग्य पालन करण्याविषयीं उमेद बाळगणारे असे मिळाले आहेत. परंतु वीरसेना प्रमाणें आपण देखील 'काळाचे काटे, जुलमी मनुष्याचा जुलूम, गर्वानें ताठलेल्या माणसाकडून होत असलेली मानखण्डना न्याय मिळायला लागणारा अतिशय वेळ, मोठ्या हुद्यावर असणाऱ्या अधिकाऱ्यांचा मग्रूरीपणा व साधुजनांचा दुर्जनांकडून होणारा छळ' किंवा योग्य, सहनशील मनुष्याला अयोग्य व हलकट मनुष्याकडून मिळत असलेले लत्ताप्रहार, या गोष्टी मुकाट्यानें मनांत चुरमुरे खात सहन करितों कीं नाहीं? वीरसेनानें जसा सूड घेण्याचा उपाय नाटकें करून दाखविणें हा केला व जे करायचें तें एकीकडेच टाकलें त्याचप्रमाणें आपण ही जो काळ प्राप्त झाला त्याशीं योग्य उपायांनीं टक्कर देण्याचें व वारा वाहील त्याप्रमाणें पाठ देण्याचे सोडून, मोठमोठीं व्याख्यानें, निरर्थक सभा, अयोग्य स्मारकें करून घेऊन केवळ शब्दप्राचुर्यानें आपली करमणूक व आपल्या शौर्याचें व प्रतापाचें केवळ प्रदर्शन करितों आहों कीं नाहीं? नवखंडाचा तरुण राणा भीमसिंग हा एवढ्याशा फुटक्या कवडीच्या मोलाचा भिकार मुलुख किंवा जमिनीची चिरपटी केवळ महत्वाकांक्षेच्या भरीस पडून वीस हजार फौज घेऊन शत्रूंशीं लढण्यास चालला आहे हें उदाहरण पाहून वीरसेनाच्या मनावर जरी त्याचा क्षणभंगुर ठसा उठला तरी त्याची तदनुसार कृति पाहूं जातां त्याजकडे त्यानें अगदीं दुर्लक्षच केलें; तसेंच आपण ही इंग्लंड, जपान, नेपाळ, चीन, किंबहुना अमेरिका यांच्या उद्योगांचीं साहसांचीं व खऱ्या देशाभिमानाची ठळक ठळक उदाहरणें ढळढळीत उघड्या डोळ्यांनीं पहात असतां त्यांचा कितपत उपयोग करून घेत आहों?

वीरसेनाप्रमाणेंच प्रस्तुत आमच्या पाश्चिमात्य विद्या विभूषित

तरुण वांड मंडळींचीं मनें उदास व निराश होऊन जाऊन 'मरावें कां जगावें' अशा संदिग्ध स्थितींत पडलीं आहेत. जिवाचा कंटाळा; व्यावहारिक व सांसारिक खटपटीचा द्वेष, उद्योगहीनता, चांचल्याचा अभाव व क्रियापराङ्मुखता हे दुर्गुण वीरसेनाच्या प्रमाणें अस्मद्वर्गीयांच्या हाडीं ही अगदीं खिळून राहिले आहेत असें दिसतें. वीरसेनाप्रमाणें आपणांस ही आपली स्थिति वाईट आहे, असें वाटत असून वीरसेना प्रमाणेंच ती स्थिति सुधारण्याविषयीं अनेक उपाययोजना, अनेक विचार, अनेक कल्पना, केवळ मेंदूच्या जोरावर आपण ही करितों आहों! वीरसेना प्रमाणें प्रस्तुत आपला हा देश, आपली ही जन्मभूमि कारागृहच भासत असून जगांत जितकें कांहीं कुचकें सडकें, नासकें, तेवढ्यानें ती व्यापून गेली आहे, असें वाटतें कीं नाहीं? ही 'रमणीय वसुधरा समुद्रांतल्या एखाद्या खडकासारखी भयाण व शुष्क' दिसते कीं नाहीं? 'मनुष्य काय तो सृष्टिचें मुख्य सौंदर्य व प्राणिमात्रांचा मुकुटमणी' अशी आपली एकंदर मानवजातीविषयीं पूज्य बुद्धि असतां, आपले देश बांधव आपणांस वीरसेना प्रमाणेंच मृत्तिकामय 'मातीरे माती!' असे वाटतात! वीरसेना सारखा आपणांपैकीं प्रत्येक जण असाच शोक करीत आहे कीं 'अरेरे! चिन्ह कांहीं ठीक दिसत नाहीं, काळ मोठा विपरीत आला आहे.' प्रत्येकाला वीरसेना प्रमाणेंच वाटत आहे कीं 'हें सारें निस्तरणें माझ्या एकट्याच्याच कपाळीं यावें ना?' वीरसेनाप्रमाणें आपणही स्वसुधारणा सोडून देऊन, ह्मणजे बोलण्या प्रमाणें आपल्या वर्तनानें करून दाखविण्याचें तें सोडून एकंदर विश्वाच्या खटपटीचा विचार करीत बसतों. वीरसेनाला त्या लहानशा विचित्रपुरीचा कारभार व व्यवस्था उरकेना; तरी साऱ्या जगाच्या कारभाराचे विचार जसे त्याच्या मनांत घोळत, त्याप्रमाणें आम्हांस आपापल्या लहानशा कुटुंबाची व्यवस्था व सुधारणा उरकत नाहीं 'आणखी' बाहे,

ऱ्या साऱ्या विश्वाच्या उलाढालीचे विचार आम्ही करीत असतों. वीरसेना प्रमाणें आपणही विधवाविवाह, बालविवाह, स्त्रीशिक्षण, देशकल्याण, व्यापारोत्तेजन, इत्यादि महत्वाच्या प्रकरणांवर मोठमोठीं भाषणें व चर्पटपजऱ्या मात्र करितों. पण आमच्या हातून त्यांतलें एकही पार पडत नाहीं!

वीरसेनाप्रमाणेंच आम्हांपैकीं ही प्रत्येक मनुष्याला वाटतें कीं, जगांत ज्या खटपटी होतात, त्यामध्यें आपली बडेज्याव, आपला स्वार्थ, आपली तारीफ असावी व कोणत्याही प्रकारें तरी आपलें घोडें पुढें ढकलावें. असें होतां होतां स्वार्थपरायणतेला कोठें हा एवढासा धक्का बसला कीं लागलाच जिवाचा कंटाळा येतो व सर्व तुच्छ वाटावयास लागतें.

वीरसेनासारखी नुसती व्यवहारशून्य विद्वत्ता आमच्या अंगी असल्यामुळें त्याचा परिणाम असा होतो कीं, मी सर्वज्ञ, मी जाणता, साऱ्या जगाच्या भाकरी भाजण्यास योग्य काय तो मी; मी हें करीन, मी तें करीन—अशा हावरेपणामुळें सर्वांला हात घालण्यास आम्ही उद्युक्त होतों; सरतेशेवटीं 'एक ना धड भाराभर चिंध्या' या म्हणी प्रमाणें होऊन आमच्या हातून कांहींच होत नाहीं. अशी स्थिति झाली असतां आत्मदयवज्ञा उत्पन्न होऊन व आपल्या जीविताचा तिरस्कार येऊन वीरसेना-प्रमाणेंच आम्हांस असें वाटूं लागतें कीं 'आमच्या सारख्या केवळ भुईला भार असणाऱ्या प्राण्यांचा काय उपयोग? आह्मीं या जगांत असून नसून सारखेच! आमची प्रवृत्ति विशेषें करून सार्वजनिक कामें, राजकीय कामें, मराठी भाषेची उन्नति, ग्रंथसामुग्री वाढविणें, या संबंधांत अगदां स्पष्ट दिसते. आपलें खरें सामर्थ्य किती आहे, आपली योग्यता काय, आपला आवका केवढा आहे, हें समजून, म्हणजे आपल्यास आपण न ओळखून, पोकळ घमंड मारणारे मात्र दिवसानुदिवस पुष्कळ निपजूं लागले आहेत. वीरसेना प्रमा-

णेंच आपलें दोष समजून आपल्या वर्तनांत बदल करण्याची कोणाची ही प्रवृत्ति होत नाहीं. वीरसेनाप्रमाणेंच आम्ही ही मोठमोठीं बृहस्पती सारखीं भाषणांवर भाषणें, उदात्त विचार, अचाट कल्पना, बडींबडीं कारस्थानें, वेदान्ताची रेलचेल यांची गर्दी करून सोडतों. परंतु यापैकीं एक देखील करून दाखविणें म्हटलें, नुसतें शब्दपांडित्य टाकून करणी करण्याची वेळ आली कीं आमच्या सर्वांच्या नांग्या खालीं पडतात. आम्ही विधवांचे कनवाळू म्हणून मोठ्या शोधक बुद्धीनें व चौकस पणानें त्या त्या विषयांची महाप्रमेयें काढून आम्हीं आमच्या दुःखार्णवांत निमग्न झालेल्या भगिनींच्या करितां हळहळतों; परंतु कृति करण्याची वेळ आली कीं चक्कदिशीं डोळे उघडतात. आम्हांला वाटूं लागतें कीं आम्ही वक्तृत्वाच्या भरांत व देशाभिमानाच्या आवेशांत, पूर्वीं जें बोलून गेलों तें व्यर्थ, फसलों रे फसलों ! तेव्हां मग आमच्या या राष्ट्रीय स्थितीची खरी दुर्बलता, व दशा एकदम आमच्या दृष्टोत्पत्तीस येते. अंतर्बाह्य खऱ्या स्वातंत्र्याची उत्कृष्ट इच्छा जेव्हां प्रथमतःच आम्हांत जागृत होते त्या वेळेस ज्या गोष्टी आह्मांस यथार्थ, सत्य, स्पष्ट, योग्य, खरोखर हितावह, अशा वाटतात, त्याच गोष्टी पुढें प्रचारांत आणण्याचा प्रसंग आला कीं मग आड रस्ते व पळून जाण्याचे मार्ग अम्हांस सुचतात; आणखी पूर्वींच्या त्याच गोष्टी मिथ्या, असत्य, अयोग्य, अहितकारी अशा भासूं लागतात. आरंभशूर, शब्दशूर अशा बहादुरांवर कर्तव्य बजावण्याचा दुर्धर प्रसंग येऊन ठेपतो तेव्हां दौर्बल्य, मांद्य, औदासिन्य, व स्वार्थपरायणता या दुर्गुणांचें मिश्रण हेंच कोणी एक जबर विष त्यांच्या निश्चयरूप देहांत भिनून त्याचा भडका करून देतें व त्यांस मारक होतें. लहान अर्भकांची लग्नें झाल्यापासून फलाणे महा अनर्थ होतात असें लोकांच्या कानाशीं आम्ही निरंतर ओरडतों. माणसा माणसांचे हक्क सारखे आहेत, देशाची संपत्ति पोलिवणें इष्ट आहे,

बोलण्याची व लिहिण्याची लोकांस मोकळीक असावी, वगैरे अनेक प्रकारें वाक्पांडित्य करितों मात्र ; परंतु हीं महातत्वें प्रचारांत आणण्याचा प्रसंग आला ह्मणजे आमचे तेव्हांच विचार बदलत त, आमचे वडील, भाऊ, बहिणी, आप्त, मित्र यांच्या पुढें कांहीं चालत नाहीं असा बहाणा करून आम्ही आपला पुनःविवाह एखाद्या कोऱ्या करकरीत अल्लड अज्ञान आठ वर्षांच्या पोरीशीं लावतों: आमच्या बाळयाची मुंज झाल्या बरोबर त्याच्या दोन हाताचे चार हात करून टाकतों, आर्तत्रयींसारखे, आमचीं व आमच्या मुला बाळांचीं पोटें जळालीं पाहिजेत ह्मणून खाविंदचरणारविंदीं मिलिंदायमान होऊन आमच्या देशाचें खरें हित अगदीं विसरून जाऊन 'जो हुकूम' ह्मणण्यास सिध्ध होतों. सारांश, कागदाचे घोडे, व मुखाचे राऊत करून ते मोठ्या उत्साहानें नाचवितों, या शिवाय दुसरें आमच्या हातून कांहीं एक घडत नाहीं !

या प्रमाणें वीरसेन या पात्रांत आपल्या लोकांच्या प्रस्तुत स्थितीचें हुबेहूब प्रतिबिंब दिसतें कीं नाहीं याचा वाचकानींच विचार करावा !

---

## 'ह्याज्लिट्झ' याचा प्रस्तुत नाटकाविषयीं अभिप्राय.

शेक्सपीअर यानें जितकीं नाटकें रचिलीं आहेत त्यांत या नाटकाचें स्मरण आपणांस वारंवार होतें. या प्रपंचाच्या किंवा संसाराच्या संबंधानें विस्मयकारक विचारांनीं हें नाटक परिपूर्ण आहे व वीरसेनाच्या विपत्ती व मनोव्याधी एकंदर मनुष्य जातीशीं अनुलक्षून आपल्या समोर येतात, असा कांहीं

त्याच्या मनाचाच झोंक किंवा धर्म आहे. त्याला जें जें होतें तें आपण आपल्याकडे लाऊन घेतों. त्याचे विचार जरी केवळ त्याला स्वतांलाच अनुलक्षून असतात तरी ते सर्व साधारण किंवा सर्व व्यापक असे असतात. तो एक मोठा नीतिव्याख्यानकार आहे. आणि त्याचा उपदेश विशेष करून ऐकावासा वाटतो; कां तर आपल्या स्वतांचीं सुखदुःखें, आपले मनोविकार व आपला अनुभव याला धरून त्याचा उपदेश आहे. साधरणतः जगांत जे उपदेशक, किंवा साधू, 'लोकां सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडा पाषाण' असे आढळतात तशांतला प्रकार त्याचा नाहीं. इतर कवींहून शेक्सपीअर याचें हृदय फार विशाळ होतें, ज्याला महात्मे असें आपण समजतों त्या पुरुषांपैकीं हा सत्कवि होता, त्यामुळें ही अंतःकरणाची उदात्त प्रवृत्ति, ही हृदयविशालता, कवीनें आपल्या इतर कृतींपेक्षां या कृतींतच फार दाखविली आहे. संविधानक फार सरळ असून प्रेक्षकांचे किंवा वाचकाचें मन मुद्दाम वेधण्याचा अथवा आकर्षण करण्याचा यत्न केलेला कोठेंही दिसत नाहीं. प्रसंग ठिकठिकाणीं असे आणले आहेत कीं ते सहजवृत्या तसेच आले आहेत. आणखी तेही कसे कीं मनुष्याचें लक्ष त्यांचेकडे सहज लागून जातें. पात्रांचे विचार, त्यांचीं भाषणें, त्यांची कृति, हीं सर्व अशीं आहेत कीं काणतीं ही माणसें त्या स्थितींत असलीं तर तसेंच करितील. तात्पर्य, कवीनें आपल्या उद्दिष्ट हेतूच्या परिपूर्ततेकरितां विशेष म्हणून कोठेच केलेली आढळत नाहीं. आपल्यापुढें जो प्रवेश येतो तो पहातांच जे कांहीं विचार सहज आपणांस सुचावे तेच विचार पात्रांस ही सुचतात व साधारणतः त्या स्थितींत आपण आहों अशी कल्पना केली असतां, आपले मनोविकार जसे उचंबळावे, आपल्या हृदयांत जें कांही वाटावें. तेंच आपण पात्रांच्याही तोंडुन ऐकतों. कल्पना केल्या

प्रमाणें, फार प्राचीन काळीं विचित्रपुरींत झालेल्या गोष्टी जर ध्यानांत आणल्या, तर बाकीचा इत्थंभूत प्रकार जसा तेथें घडला असावा, तसाच तो या नाटकांत जणों उतरून घेतला आहे. अशी ही गोष्ट विचित्रपुरींत प्रत्यक्ष घडली, असें समजून त्या प्रसंगाला आपण प्रेक्षक असतां तो सर्व चमत्कार मूर्तिमंत पाहावयास सांपडता तर मोठी मौज खरी; तथापि या नकलेची किंवा प्रतिकृतीची गोष्ट कांहीं विशेष आहे. ती कशी, तर या नाटकांत 'दुःखाचा केवळ बाह्य प्रकार किंवा बाहेरचा डौल' दिसतो एवढेंच नाहीं तर आपल्या 'हृदयांत जें कांहीं होऊन राहतें व जें दाखवितां येतच नाहीं' तें ही दिसतें. आपण एखाद्या कागदावरची अक्षरें जशीं स्पष्ट वाचावीं तसेच अंतःकरणांतले उद्गार आपणांस स्पष्ट वाचतां येतात व पाण्याच्या मध्यभागीं कांहीं कारणानें क्षोभ झाला किंवा चळवळ झाली ह्मणजे वर भराभर जे मोठमोठे बुडबुडे येतांनां आपल्या दृष्टीस पडतात, त्याप्रमाणें मनांत उचंबळणारे ते विकार उत्पन्न होतांनां मूर्तिमंत अपल्या डोळ्यापुढें दिसतात. इतर नाट्यकार सृष्टीस्वरूपाचें भाषान्तर किंवा सुरेख रूपान्तर करून आपल्यापुढें ठेवतात, परंतु शेक्सपीअर तर आपल्या पुढें सृष्टीचें मूळ स्वरूपच उभें करितो असें वाटतें. असा हा अलौकिक गुण या सत्कृतींत आहे.

वीरसेन या नाटकांतील जो नायक त्याचें पात्र फारच चमत्कारिक आहे. विलक्षण धैर्य, किंवा विलक्षण मनोनिग्रह किंवा अतिरेकाप्रत गेलेला कांहीं एक मनोविकार ज्यांच्यांत दाखविला आहे असें हें पात्र नाहीं, तर या पात्रांत मुख्यत्वें करून मनाची चंचलता, अत्यंत संदिग्ध वृत्ति, विचारांची सूक्ष्मता व मनाचा कोंवळेपणा, हे गुण विशेष दाखविले आहेत. प्राचीन अलंकारज्ञांनीं किंवा नाट्यशास्त्रज्ञांनीं नायक ज्या प्रकारचा असावा ह्मणून सांगितलें आहे त्याच प्रकारचा या नाटकांतील नायक हुबेहूब नाहीं. कारण त्यांत ...

नायकासारखा मिळणाराच नाहीं. प्रस्तुत नाटकांतील नायक एक तरूण राजपुत्र, नुकताच विद्योपार्जनाचें काम कांहीं काळ पर्यंत एकीकडे सारून राजदरबारांत आलेला,—मी असें करीन मी तसें करीन अशी ज्याला मोठी उमेद—असें असून मन फार कोंवळें, उगीच एवढीशी कांहीं गोष्ट झाली तरी ही ज्याच्या मनाला ती अगदीं लागून राहावी त्याच्यावर विलक्षण प्रसंग आलेला, दैवदुर्विलासानें अगदीं गांगरून गेलेला व डोकें अगदीं भणभणलेलें—जो आपल्या मनांत संतत उत्पन्न होणाऱ्या विचारलहरींत सर्वथा बुडून गेलेला—असा आहे. कोणचाही एका निश्चय करून त्याप्रमाणें वर्तन करणें, किंवा आपला कार्यभाग उरकून घेणें ही गोष्ट त्याच्या हातून घडणें केवळ असंभाव्य: आणखी ज्या ज्या ठिकाणीं त्याच्या हातून मनांत कांहीं एक विचार आल्या बरोबर खाडदिशीं करणी झाली असें आढळतें तेथें मनाच्या झटक्या बरोबर काय उडेल तें उडेल; अशांतला प्रकार या साऱ्या नाटकांत तीन चारदांच घडला आहे. आर्नवीर्य पडद्याच्या आंत लपून बसला असतां वीरसेनानें तो राजा बसला आहे असें समजून ठार मारला, हें एक स्थळ व विठोजी व संभाजी हे वीरसेनाला जिवें मारण्याच्या हेतूनें सौराष्ट्रास नेत असतां राजानें त्यांचे बरोबर जी थैली दिली, त्यांतली वीरसेनानें नांवें बदलली—हे दुसरें, आणि तिसरें, शेवटचें—ह्मणजे शूरसेन व वीरसेन यांचें द्वंद्व लागून वीरसेनाला वार लागला असतां व 'मी आतां फार अल्प काळांतच खास मरणार' अशी वीरसेनाची खात्री झाली तेव्हां तलवार राजाच्या उरांत भोसकली—हें स्थळ. या प्रसंगां शिवाय इतर सर्व प्रसंगीं—म्हणजे जे मोठे आणीबाणीचे प्रसंग कीं ज्या वेळेस आपलें कर्तव्यकर्म बजावण्याची ऐन संधी—अशा प्रसंगीं गोंधळून, 'करूं कीं नको करूं' अशा विचारांत निमग्न होऊन त्याच्या मनाची स्थिति अत्यन्त संदिग्ध होऊन जाते

मांजरानें उंदीर धरला असतां तें त्याच्याशीं पुष्कळ वेळ खेळत राहतें व खेळखेळतां पटकन् तो उंदीर पळून जातो; त्याप्रमाणें वीरसेन हा आपल्या मनांत धरलेला मुख्य उद्देश पुष्कळ वेळ घोळवीत घोळवीत राहून मोठे आणीबाणीचे प्रसंग चुकवीत आहे. कांहीं तरी कारण काढून पुनः आपला सुस्त, मंद होऊन विचारांत गर्क होऊन जातो आणखी कराययें कृत्य विसरुन जातो. अशाच निमित्तानें राजा देवपूजेंत निमग्न झाला असतां त्याला हणून टाकावा तें न करितां त्यांतही चांगलें वरें पहात भ मारण्याच्या कामाला हा शुभ अशुभ मुहूर्त असें करीत आपलें सूड उगवण्याचें काम त्यावेळे पेक्षां आणखी एखाद्या अधिक घातक वेळांवर लोटतो.

---

## या नाटकांतील कांहीं वादविषयक गोष्टींचें उद्घाटन.

या नाटकांतील दोन पात्रें—वीरसेन व राणी यांचीं चित्रें या अति निपुण चिताऱ्यानें इतक्या खुबीनें रंगविलीं आहेत कीं त्यबद्दल महान महान नाट्यकलाविशारद विद्वानांमध्यें मोठे वाद पडले आहेत.

वीरसेनाचें वेड खरें किंवा खोटें या गोष्टी विषयीं मोठमोठ्या पंडितांनीं व डाक्टर लोकांनीं पुष्कळ लिहिलें आहे. कोणी म्हणतात त्याचें वेड खरें होतें. कोणी म्हणतात खोटें होतें. या गोष्टीचा निर्णय नाटक वाचून ज्याचा त्याणें आपल्या ठिकाणीं करावा हेंच योग्य. या लहानशा निबंधांत अस्ति नास्तिपक्षांच्या ह्मणण्याचा नुसता सारांश देखील देण्यास स्थळ नाहीं. एका विद्वान डाक्टरानें असें म्हटलें आहे कीं 'वीरसेनानें

जर खोटेंच वेड घेतलें असेल तर त्याच्या बुद्धीची व त्याच्या चातुर्याची वाखाणणी करावी तेवढी थोडीच. त्याच्या भाषणावरून व एकंदर वर्तनावरून एखाद्याला खरोखर वेड लागून तो जी कृति करतो व जें बोलतो, तसें हुबेहुब वीरसेनानें केलें आहे—तात्पर्य, वीरसेनानें जे सोंग घेतलें त्याची बनावणी त्याणें बरोबर केली आहे यांत संशय नाहीं.'

दुसरा प्रश्न असा उत्पन्न होतो कीं 'वीरसेनाच्या बापाचा खून करण्यांत रमाकांताला राणी सामील होती कीं काय?'

याला नास्तिपक्षाचीं कारणें:—१ वीरसेनाला दुःख झालें तें मुख्यत्वें करून त्याच्या आईनें रमाकांताशीं पाट लावण्यांत फार घाई केली त्यामुळें झालें. २ पिशाचानें आपल्या खुनाचा आरोप एकट्या रमाकांतावर ठेवला व वीरसेनाला 'तूं आपल्या आईस दुखवूं नको म्हणून मुद्दाम सांगितलें. ३ रमाकांताच्या एकंदर आचरणावरून राणी त्यास सामील होती असें दिसत नाहीं. ४ वीरसेनानें करविलेल्या उपनाटकापासून राजासारखा राणीच्या मनावर कांहीं विशेष परिणाम झाला नाहीं. ५ नाटकरूप आरशांत आपला चंचलपणा पाहून व नाटकांतील राणीचे 'आपला पहिला नवरा जिला मेलीला आवडत नसेल, ती मेली त्याला ठार मारल्याखेरीज दुसरा कशाला करील?' हे मर्मभेदक शब्द तिच्या हृदयांत भिनून तिच्या अंगाची आग करून सोडिली असती. पण तसें कांहीं झालें नाहीं. ६ राणीला हें गुह्य जों जों थोडथोडें कळूं लागलें तों तों रमाकांत तिचा द्वेष करूं लागला. एवढेंच नाहीं—पण त्यानें वीरसेना करितां करून ठेविलेला विषाचा विडा व झारींत ठेवलेल्या पाण्यांत विष टाकिलें होतें तें तिला ठाऊक नसून तिनें तें निर्धास्तपणें प्राशन केलें.

अस्तिपक्षाचीं कारणें:—१ आपला पूर्वीचा पति मरून दोन महिने झाले नाहींत तोंच कारभारी रमाकांत याचें व तिचें मन जमून लागलीच पाट लागला, यावरून वीरसेनाचा बाप जिवंत

असतांच राणीचा व रमाकांताचा कांहीं लपंडाव असावा असें दृढ अनुमान निघतें. २ पिशाचानें आपल्या खुनांत आपली राणी सामील आहे असें जरी स्पष्ट सांगितलें नाहीं तरी 'दिसण्यांत सद्गुणी अशा तुझ्या आईच्या पातिव्रत्याचा भंग केला' असें सांगितलें. आणि 'तूं आपल्या आईला दुखवूं नको किंवा तिचा छळ करूं नको. परमेश्वर तिला पाहून घेईल. तिची दुष्कृत्यें तिला जाचतील व तिचीं हृदयशल्यें तिला खेंचतील.' असें ही ह्मटलें आहे ( अंक १ प्र० ५ ). ३ वीरसेनानें राणीला केलेल्या कर्माचा पश्चात्ताप व्हावा म्हणून नाटक झाल्याबरोबर विचारलें 'आईसाहेब ! आपल्याला हा खेळ कसा काय आवडला ?' ४ वीरसेनानें स्पष्टपणें आईला दोषी ठरविलें आहे. ( अंक ३ प्र० ४. ) येथें त्यानें म्हटलें आहेः—"भयंकर अं ! आई, अग प्रत्यक्ष राजाला मारून त्याच्या कारभाऱ्यावर फिदा होण्यापेक्षां का भयंकर कृत्य आहे हें !" ५. राणीनें अंशतः आपण केलेला गुन्हा कबूल केला आहे. ( अंक ३ प्रवेश ४. ) येथें तिनें म्हटलें आहेः 'वीरसेना! पुरे बाबा! तूं माझ्या ह्या अंतःकरणांत पुरा उजेड पाडलास! माझ्या पापकर्मांचे वज्रलेप काळे डाग मला स्वच्छ दिसूं लागले आहेत.'

या प्रमाणें दोन पक्षांचें म्हणणें झालें. यावरून निर्णय करूं जातां रमाकान्तानें जो खून केला त्यांत राणी सामील होतीच असें सिध्ध होत नाहीं. निदान ही गोष्ट अत्यन्त संशयात्मक दिसते. तेव्हां राणीला या संशाचा फायदा दिला असतां ती निर्दोष आहे असें म्हणावें लागतें !

या शोकपर्यवसायी नाटकाचा शेवट कवीनें सृष्टिनियमाविरुद्ध केला आहे असें कित्येकांचें मत आहे. परंतु कवीचें खरें तद्दगत अशा लोकांस कळलें नाहीं असें दिसतें. ज्यांस शासन व्हावें त्यांसच शासन न होतां दुर्जनांबरोबर सज्जनांस ही शासन [illegible]